[इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेलीं.]

दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें

अथवा

दिल्ली येथील पेशव्यांचे वकील हिंगणे

ह्यांचा पत्रव्यवहार.

(इ. स. १७९०-इ. स. १७९४.)

भाग २ रा.

हें प्रकरण

दत्तात्रय बळवंत पारसनीस,

संपादक 'इतिहाससंग्रह'-सातारा,

ह्यांनीं संशोधून तयार केलें.

तें

मुंबई येथें,

तुकाराम जावजी ह्यांनीं

'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

इ. स. १९१४.

Published by Tukaram Javaji, Proprietor, N. S. Press,
23, Kolbhat Lane, Bombay.

Printed by R. Y. Shedge, at the N. S. Press,
23, Kolbhat Lane, Bombay.

दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें.

भाग २ रा.

लेखांक १.

श्री. १७ जानेवारी इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

राजश्री गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति· येथील कुशल तागाइत छ १ माहे जमादिलावल मु॥ लष्कर नजीक श्री मथुरा जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे· विशेषः—पेशजी विनंतिपत्रें छ० १८ रविलाखरचीं सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त श्रुत जाहालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तर, रावराजे प्रतापसिंग लक्ष्मणगडास फौजसुद्धां आहेत. राजश्री पाटीलबावांनीं मशारनिल्हेचे वकिलास त्यांजकडे रवाना केलें, आणि बहुत खातरजमा सांगून पाठविलें आहे कीं, "लौकरच कंपू व फौजा तुम्हांकडे येतात. तुम्हीं तयार रहाणें." राजे प्रतापसिंग शहरांत आहेत. पेंढाऱ्यांनीं हिंडोन वगैरे जागा लुटून फस्त केली. गाजुद्दीखान बिकानेर प्रांतीं आल्याची आवाई आहे. तैमुरशहांनीं दोन दस्ते बराबर देऊन जोतपुरकराचे कुमकेस पाठविले म्हणून श्रवणांत आलें. परंतु येथून काशीद गेले आहेत ते माघारे आले नाहींत. आल्यावर विनंति लिहूं. शहा बदस्तुर मुक्काम मजकुरीं आहेत. फत्तेअलीखान दाऊद पोतरे यांणीं तिकडील अवाई ऐकून, तीन लक्ष रुपये भावलपुरचे खंडणीबद्दल शहास दिल्हे. दिल्लींत शाहाजींनीं शहरचे लोकांस बहुत उपद्रव दिल्हा. म्हणून येथील अनास्था जाली आहे. राजश्री रवळोजी शिंदे यांस तेथील कारभारी करून पाठवावें ऐसा विचार आहे. इकडील बोलणें नव लक्ष रुपयांची निशा करोडसुद्धां द्यावी. शिंदे मजकुराचे बोलण्यांत आठ-पावेतों घडल्यास कबूल करावें, म्हणून जाबसाल आहे. आठपंधरा रोजा ठरेल ते विनंति लिहूं. पालमर साहेब आगऱ्याहून येथें येऊन राजश्री पाटीलबावांची भेट घेतली. दों चौ रोजा पुनः आगऱ्यास जाणार आहेत. लखनऊंत ऐफ साहेब फिरंगी आमीन आहे, त्याची बदली होऊन दुसरा साहेब कलकत्त्याहून येणार.

नवाब-वजीर मु॥ मजकुरीं शेरशिकार करून स्वस्थ आहेत. नवाब हैदरबेग खान मुखतारीनें कारभार करितात. राजश्री लक्ष्मणराव हरि यांजबरोबर पूर्वी राजश्री पाटीलबावांनीं मोठ्या तोफा व पलटण वगैरे फौज देऊन बुंदेलखंड प्रांतीं पाठविलें आहे. त्यास, मशारनिल्हे सागरपावेतों पावले. राजश्री रघुनाथ हरि ह्यांची भेट घेऊन पुढें जाणार. राजश्री बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद यांजवर शंभर रुपये रोजाची दस्तक करून शंभर स्वार येथून गेले आहेत. पूर्वी बुंदेलखंडचे खंडणीबाबद आबाजी नाईक यांची निशा केली होती. तो ऐवज न पावला, सबब स्वार पाठविले आहेत. आश्विनमासीं राजश्री बापूजी नाईक भावे कोंचेस गेले. त्यांणीं, राजश्री गंगाधरबाबास श्रीनगराहून बोलावून, राजश्री बाळाजी गोविंद यांसीं आपसांत दोन वरिषांपासून कलह होता, तो आतां एकवाक्यता करून दिल्ही. त्यास, भोजो धोंडदेव व दिनकरराव यांजकडे पेंच आणून पागा वगैरे मामलती सर्व जप्त केल्या. हल्लीं राजश्री पांडुरंग नारायण पूर्ववत्प्रमाणें कारभारी ठेरले आहेत. श्रुत होय. राजश्री पाटीलबावा मुक्काम मजकुरींच राहून फौज पाठवितात, व छावणीची तयारी होते. राजश्री सुभेदार व बापूजी होळकर व नारो गणेश वगैरे वृंदावनाचे अलीकडे दीड कोस मथुरेहून छावणी करून आहेत. नवाब अल्लीबहादर यांचे खर्चाचा बंदोबस्त अद्यापि जाला नाहीं. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व आखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. बहुतकाय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २.

श्री. मार्च इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:— राजे बिजेसिंग व राजे प्रतापसिंग जैपूरकर यांनीं बारा लक्ष रुपये मिर्जास देणें कबूल करून, मशारनिल्हेस खातरजमेचीं पत्रें लिहिलीं आहेत. पैकीं सात लक्ष जोधपूरकरांनीं व पांच लक्ष रुपये जयपूरकरांनीं द्यावे, याप्रमाणें ठैराव होऊन दोन लक्षांचा भरणा मिर्जाकडे जाला. बाकी ऐवज लढाई रुबकार जाल्यावर द्यावा; व मिर्जानीं आपले कबिले जयपुरांत ठेवावे; ह्मणजे आमची खातरजमा होईल. याप्रमाणें जोधपूरवाल्याचा मुद्दा आहे. त्यावरून मिर्जाकडील वकील राजे प्रतापसिंगाकडे पकायत जाबसाल करावयास पुन्हां गेला आहे. वकील तेथून आल्यावर कुटुंबास तेथें ठेवावें, ऐसा विचार मिर्जाचा

आहे. हल्लीं मशारनिल्हेनीं खाजगत फौजेची हजेरी घेतली. त्यास, बारा हजार पलटणचे लोक व सात हजार स्वार मोंगल वगैरे आहेत. याशिवाय निगादास्त जारी करून, नवीन शिबंदी चाकर ठेवितात, व राजाचे अनुमतेंकरून मिर्जानें, राजश्री पाटीलबावांकडील वकील केशवपंत तेथें होता त्यासी, जाहीरदारी राखून निरोप दिल्हा. त्यास वकील मजकूर दिल्लीचे मार्गानें लष्करांत पावला. तेथील दगाबाजीचा प्रकार सर्व यांस निवेदन केला. ह्मणून केवळ मिर्जावर अनास्था जाली आहे. मिर्जानीं दिल्लीकडील महाल फरुखनगर वगैरे जप्त केले. व दोन पलटणा व तीन हजार स्वार राठोडांकडील यांस नजफगडाकडे दिल्लीचे रूखास पाठविले, व मार्गाचा शोध आणविला आहे. गडमजकूर दिल्लीहून पंचविसां कोसांवर आहे. मिर्जाची आंवई शहरचे लोकांनीं ऐकोन सर्व अंदेशांत आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ३.

श्री. मार्च. इ. स. १८९०.

''पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे:–मारवार प्रांतीं सिंधी यांनीं जमाव भारी करून चहूंकडे दुंडी केली, म्हणून गंगाराम सोभाराम भंडारी वगैरे पांच सात हजार राठोर सांभरास होते ते कूच करून भीमराज बक्षी जवळ गेले. खर्चाविशीं तगादा केला. ऐवजाची सोय न पाहिली. सबब राठोर बेदील होऊन आपल्या घरास उठोन गेले, व बक्षी मजकूरही माघारे जोधपुरचे रूखास कूच करून गेला. राजे विजेसिंग यांनीं फौजेचें वृत्त श्रवण करून व राजश्री पाटीलबावांकडील फौजेची आंवई ऐकोन बहुत घाबरला आहे. रात्रंदिवस चैन पडत नाहीं. जयपूरकरांनीं राजेमजकुरास पत्रें पाठविलीं होतीं कीं, ''राजश्री पाटीलबावांकडील फौजा आमच्या मुलुखांत येऊन पोंचल्या. अद्यापि आपल्याकडून उपराळा फौजेचा होत नाहीं.'' म्हणून लिहिलें. त्याचें प्रतिउत्तर जोधपूरकरांनीं लिहिलें कीं, ''सांप्रत या प्रांतीं सिंधी यांनीं उपद्रव केला आहे. म्हणून फौज दरोबस्त त्यांच्या मुकाबल्यास पाठविली आहे. तेथील बंदोबस्त जाल्यावर आपणांकडे सत्वरच फौज, सरदार, रवाना करितों.'' याप्रमाणें उत्तर आल्यावर जयपूरकर बहुत उदास आहेत. जोधपूरकरांनीं वकील राजश्री पाटीलबावांकडे जाबसालास पाठविला आहे. त्यास जयपुरास दाखल जाला. राजे प्रतापसिंग यांसही सांगि-

तलें कीं, आपणही कोणी मातबर इतबारी आमच्या बरोबर करून द्यावा. त्यावरून राजे मजकूर आंदेशांत आहेत. तेथील एक विचार ठरल्यावर वकीलमजकूर इकडे येणार आहे. जोधपूरकरांचें मानस आहे कीं, पूर्ववत्प्रमाणें मामला द्यावा व अजमेरही देतो. परंतु पक्केपणें जाबसाल ठरल्यावर याप्रमाणें करावेंसें आहे. व येथील मर्जी आहे कीं, अगोदर अजमेरचे किल्ल्यांत आमचा बंदोबस्त करून द्यावा, मग काय जाबसाल करणें तें करावें; ह्मणजे कबूल करूं. त्यास वकील येथें आल्यावर त्यांच्या भेटी होऊन काय बोलणें ठरेल, तें प्रत्यास आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ४.

श्री. २ एप्रिल इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २४ माहे रजब मुक्काम दिल्ली जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ ११ माहे मजकूरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालें असेल. हल्लीं वर्तमान तरी, रा॥ गोपाळराव रघुनाथ दतियानजीक तीन कोसांवर मुक्काम करून आहेत. झांसीकराचे विद्यमानें मामल्याचा जाबसाल रूबकार आहे. दोन लक्ष रुपये राजांचें बोलणें आहे. परंतु कांहीं अद्यापि ठेरण्यांत आलें नाहीं. नवाब अलीबहादर तीस कोसांचे तफावतीनें मौजे कछोजे येथें मु॥ करून आहेत. आपली फौज सर्व एकत्र केली. राव मशारनिल्हेकडील पेंढारी यांनीं नवाब मशारनिल्हेचे लष्करावर दौड केली होती. परंतु ते सावध होते. सबब कांहीं काबू न सांपडला. माघारे आले. त्यावरून नवाब मजकुरास केवळ खतरा इकडील फौजेचा जाला असे. नोने अर्जुनसिंगाचे पुत्रांनीं राव मशारनिल्हेकडे पैगाम केला कीं, बुंदेलखंडांतून नवाबाचा अंमल उठवून देऊन, आमचा बंदोबस्त करून दिधल्यास, दहा लक्ष रुपये नजराणा व दरसालची खंडणी ठरेल ते आदा करूं. त्यावरून यांनीं जिवाजी बल्लाळ यांस कंपूसुद्धां बोलाविलें आहे. हिंमतबहादर यांनीं उमरावगिरास नवाब वजिराकडे पाठवून, नवाब अलीबहादर यांची दोस्ती परस्परें पक्केपणें ठैरावून आले. राजश्री खंडेराव हरी झझरनजीक आहे. बिकानेरवाला राजा मृत्यु पावला. सबब अद्यापि खंडणीचा पैका यांजकडे आला नाहीं. जमाशहांनीं राजा मृत्यु

पावल्याचें वृत्त ऐकून, कांहीं फौज बिकानेरास पाठवावयाची योजना केली ह्मणोन वदंता आहे. राव मशारनिल्हेंनीं जहाज फिरंगी यास चाकर ठऊन पलटणाची भरती करतात, व सीख पांच हजार स्वार बोलाविले आहेत. जैपूरकरांनीं दौलतरामाचे पुत्रास खिलत हत्ती घोडा देऊन सर्फराज केलें. हल्लीं मशारनिल्हेस फौजसुद्धां राजश्री जिवाजी बल्लाळ यांजकडे पाठविलें आहे. देवजी गवळी व बापूजी मल्हार फौजसुद्धां दतियाकडे जाणार. सध्या दिल्लीचे गीर्द प्रांतांत खलश करून हरएक गांवासी उपद्रव करून आहेत. शहाजीची नियत सांप्रतकालीं ठीक नाहीं. हरएकास हजारों सख्त भाषण करून बेदिल करतात. पादशाहा व अकबारशाहा वगैरे सरदार सर्व बेदिल आहेत. लखनऊंत जमाशहाकडील ऐलची आला. त्यानें, नवाब वजिरास, शहा मशारनिल्हेकडील खिलतनामा व घोडा देऊन, बहुत ममतेचें बोलणें केलें. त्यावरून वजिरांनीं पांच हजार रुपये नख्त व खिलत जेगा शिरपेंच देऊन त्यास ठेऊन घेतलें आहे. शाह मजकुरास तोफा तायफ देऊन, एलचीची रुखसत करणार आहे. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापि."

लेखांक ५.

श्री. एप्रिल इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नानास्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री सुभेदार परतापगड नजीक रावराजाचे मुलकांत मु॥ करून आहेत. रोडजी खवास यांणीं लाख रुपयांची टीप सुभेदार यांस देऊन, रामगडचा किल्ला खाली करून दिल्हा. नंतर निरोप घेऊन जैपुरास दाखल जाला. रामगडांत राजश्री सुभेदारांकडील लोक दाखल होऊन, तेथील बंदोबस्त सुभेदार मशारनिल्हेंनीं केला आहे. सेवेसीं श्रुत होय. रावराजाचा पुत्र बखतावरसिंग अलवरास आहे. त्यासी खंडणी रुपये सुभेदार मागतात. परंतु अद्याप कांहीं ठैरण्यांत आलें नाहीं. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

नजबकुलीखान रेवाडीचे मुक्कामीं येऊन राजश्री गोपाळराव रघुनाथ यांची भेट घेतली. त्यास कानोड व नारनोल व कोट वगैरे दोन लक्षांची जागा खान मशारनिल्हेकडे बहाले ठेऊन, बाकी महाल राजश्री खंडेराव हरी यांजकडे सांगितले आहे. खानमजकूर याचे शरीरास केवळ समाधान नाहीं. यास्तव राव

मशारनिल्हेनीं केशोपंत कारकून कानोडास पाठविला आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं.

नोने अर्जुनसिंग याचा मामला बुंदेलखंडाबद्दल चाळीस लक्ष रुो ठरला. वकील राजश्री पाटीलबावांकडे आले आहेत. ऐवजाची निशा जालियावर वस्त्रें खिलत देऊन वकिलाची रवानगी होईल. राजश्री लक्ष्मणराव हरी यांचे विद्यमानें जाबसाल ठरलें आहे. सेवेसीं श्रुत होय.

नवाब अलीबहादर प्र॥ शिकंदरा नजीक जैपूर प्रांतीं छावणी करून आहेत. जैपुरचा मुलूख लुटून कालक्षेप होत आहे. परस्परें सरदारांत चित्तशुद्धता नाहीं.

रावराजांचा पुत्र बखतावरसिंग यांसीं खंडणीचें बोलणें राजश्री गोपाळराव रघुनाथ यांचें आहे, व राजश्री सुभेदारही मागतात. ह्मणोन पत्रें यांस आलीं आहेत कीं, एक ठिकाणीं खंडणी घ्यावी. त्यावरून रावमजकुरांनीं पत्रें पाठविलीं आहेत कीं, खंडणीचा ऐवज आह्मांकडे पाठवावा. पुढें काय ठरेल तें मागाहून विनंति लिहूं.

देवजी गवळी व बहिरो कोनेर पादशाहापुरचे मुकामीं येऊन राजश्री गोपाळराव रघुनाथ यांची भेटी जाल्या. त्यास, सांप्रत गवळी मजकुरास पाणिपताकडे रुखसत केलें. बहिरोपंत यांस मथुरेस नेलें आहे. तेथें गेल्यावर फौजेची समजूत करून दहा हजार फौज शिखांचे मुलकांत पाठविणार आहेत. नानुमलाचा पुत्र गवळी मजकूर यांच्या बरोबर पाठविला आहे. मशारनिल्हेचे विचारें तिकडील बंदोबस्त करावा ऐसा विचार ठरण्यांत आहे. सेवेसीं श्रुत होय.

तैमुरशहा बदस्तुर काबिलांत आहेत. एलची सांप्रत येथेंच आहे. महिना पंधरा रोजां येथून विलायतेस जाणार आहे. हल्लीं तिकडील बातमी पक्की आली नाहीं. आल्यावर विनंति लिहूं.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६.

श्री. एप्रिल इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, राजश्री सुभेदार जैपूरनजीक देवशास मुक्काम करून आहेत. जैपुरवाल्याकडून रोडजी खवास मामल्याचे जाबसालास आले आहेत. सोळा लक्ष रुपये कबूल करितात. पैकीं मुलकाची पायमाली मुजरा द्यावी ह्मणून तिकडील बोलणें आहे. यांची मर्जी आहे कीं, पायमाली न द्यावी. ह्मणून अद्यापि

पक्कें ठैरण्यांत आलें नाहीं. परंतु दारमदार करावा ऐसा विचार परस्परें आहे. दो चौ रोजां ठरेल ते विनंति लिहूं. नवाब अलीबहादर अजमेरास दरगाहचे ज्यारीतीस जाणार आहेत. राजश्री पाटीलबावा व राजश्री शिवाजी विठ्ठल यांस पत्रें येविसीं लिहिलीं आहेत. त्याजवरून राजश्री शिवाजीपंत बापू यांनीं राजश्री पाटीलबावांस सांगितलें कीं, नबाब मजकूर अजमेरास येतात. हल्लीं परस्परें आपसांत दारमदार करून पुनः कलह न राहे तें करावें. राणेखानभाई वगैरे यांची सलाह हेच आहे कीं, आपसांत सफाई व्हावी. त्यावरून राजश्री पाटीलबावांनीं पत्रोत्तर पाठविलें आहे. व वैरण वगैरे याची तयारी करावी ह्मणून अजमेरचे किल्लेदारांस लिहिलें आहे. नवाब मशारनिल्हे तेथें दाखल जाल्यावर भेटीनंतर उभेतां सरदारांचा जाबसाल काय ठैरेल, तें प्रत्यास आल्यावर सेवसीं विनंति लिहूं.

रावराजाकडील होदादारखान चार हजार फौजेनिसीं राजश्री पाटीलबावांचे लिहिल्यान्वयें नजबकुलीखान यांस शामील होऊन, गोकुळगडास मोर्चे लाऊन अद्यापि आहे. राजश्री पाटीलबावाकडील कल्याणराव नामें गृहस्थ दोन हजार स्वार प्याद्यांनिसीं रेवाडीस आहे. महालाचा पैका वसूल करितात. त्यापैकीं तिमाही हिस्सा नजबकुलीखानास देऊन एक हिस्सा मशारनिल्हे घेतात. त्याप्रमाणें ठरलें आहे. मुनियमबेगांनीं पूर्वीं पत्रें राजश्री सुभेदारास पाठविलीं होतीं. परंतु तेथून कांहीं उपराळा न जाला. सबब हिरासा आहे. गुलाबसिंग व मोंगले वगैरे पांचशें लोक गडांत राहिले आहेत. वरकड दोन तीन जमादार हजार बाराशें लोकांनिशीं गडाहून निघोन, कुलीमजकुराकडे येऊन शामील जाले आहेत. राजश्री पाटीलबावांची मोठी ताकीद आहे कीं, मुनियमबेगास बजिन्नस धरून कैद करावें. ह्मणून वारंवार नजबकुलीखानास पत्रें येतात. त्यावरून त्यांनीं चहूंकडून गडाचे गिर्द मोर्चे आणिक कायम केले, व रात्रंदिवस मोठी खबरदारी आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ७.

श्री. एप्रिल इ. स. १७९०.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—मिर्जा इस्मालबेग जोधपूरकरांसीं बेदील होऊन गुजराथचे रूखास कूच करून गेले. तिकडे........पठाण गुजराथचे सुभेदारासीं बदमामली

करून आहे. तो मिर्जाची अवाई ऐकोन शामील जाला. चार हजार लोक मिर्जाबरोबर व पांच सा हजार पठाण जमा जाला आहे. त्या प्रांतीं उपद्रव करावा ऐसा विचार मिर्जाचा आहे. पुढें प्रत्यास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं.

राजश्री बाबाराव गोविंद, नवाब निजामअलीखानाकडील वकील दिल्लीस होते, ते छ ७ माहे मजकुरीं येथून कूच करून, राजश्री पाटीलबावांचे लष्करास जयपूरच्या मार्गानें गेले. नवाब अलीबहादर यांची भेट घेऊन जयपुरास जातील. नवाब मशारनिल्हेंनीं साडेबावीस सुभ्यांचा कागद आणविला आहे. त्याचे खर्चास हजार रुपये पाठविले आहेत. त्यास तपशीलवार कागदाची तलास आहे. सध्या लाहोर सुभ्याचा कागद तयार होत आहे. तयार जाला ह्मणजे वकील मजकूर तिकडे रवाना करणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं.

नवाब वजीर लखनौंत शेर शिकार करून आहेत. इंग्रेजांचा तगादा ऐवजाविसीं बहुत आहे. ह्मणून पहाडाकडे कूच जाला नाहीं. पामर साहेब आग्र्यांत आहेत. सेवेसीं श्रुत होय.

नवाब अलीबहादर व राजश्री सुभेदार देवशास मुक्काम करून आहेत. जयपूरवाल्याकडील महाल पूर्वीं जप्त केले आहेत, ते अद्यापि सोडले नाहींत. मामलत्याबद्दल ऐवज बाकी आहे. त्याजकरितां रोडजी खवास यास ठेवून घेतलें आहे. रामगडची सूटचिठ्ठी व मामलत्याची बेबाकी जाली, ह्मणजे खवास मजकुरास निरोप देणार. राजश्री पाटीलबावा उज्जनीस जातात ह्मणोन आवई ऐकोन, राजश्री सुभेदारांचाही विचार आहे कीं, राजश्री बापूजी होळकर यांस फौजसुद्धां या प्रांतीं ठेवून महेश्वरास जावें. ऐसा विचार श्रवणांत आला आहे. नवाब अलीबहादर यांजकडील लोकांनीं खर्चाकरितां बहुत दंगा राजश्री सुभेदारांसीं केला. त्यावरून लाख रुपये सावकारासीं खर्चास देविले आहेत. उभयतां सरदारांतही चित्तशुद्धता नाहीं. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

तैमूरशहा काबिलांत आहेत. मुरादशहा वगैरे सरदारांस पत्रें पाठविलीं आहेत कीं, स्वारी हिंदुस्थानाकडे होणार. त्यास फौजसुद्धां येऊन सामील होणें. ह्मणून तेथील अखबार हुजुरांत व शाहाजीकडे आली होती. त्याची नक्कल पारशी बजिन्नस सेवेसीं पाठविली आहे. त्यावरून साकल्य वृत्त ध्यानारूढ होईल. आणिक कासीदजोडी आल्यावर बाकी बातनी असेल ती विनंति लिहूं.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति. ”

लेखांक ८.

श्री. एप्रिल इ. स. १७९०.

" पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, राजश्री सुभेदार व बापूजी होळकर फौजसुद्धां जैपूर प्रांतीं देवशानजीक मु॥ करून आहेत. रोडजी खवास याचे विद्यमानें पूर्वीं मामला ठैरला होता, त्यापैकीं कांहीं ऐवजाचा भरणा जाला. इतकियांत राजे प्रतापसिंग जयपूरकर यांनीं, दौलतरामास मुखत्यारी देऊन, खवास मजकुरास कैद करून, सात लक्ष रुा दंड घेतले. सबब राजश्री सुभेदारास ऐवज पावला नाहीं. ह्मणून यांनीं मुलकाची खराबी केली. त्यावरून राजे मशारनिल्हेंनीं खुशालीराम बोहऱ्यास राजश्री सुभेदारापासीं जाबसालास पाठविलें आहे. परंतु अद्यापि दारमदार जाला नाहीं. ह्मणून राजांनीं दौलतरामाचे सांगितल्यावरून मिर्जा इस्मालबेगास लगामीं लाऊन ठेविलें आहे. मिर्जानीं गुजरातप्रांतचा शह सोडोन, जोधपुरास येऊन, राजे बिजेसिंगासीं भेट घेतली. तेथें कांहीं उमेद न पाहिली. यास्तव दरकूच मारोटास येऊन, दोन गढ्या तास्ततराज केल्या. त्यावरून बिजेसिंगाची बहुत बेमर्जी जाली आहे. हल्लीं जैपुरवाल्याकडे सूत्र लाऊन आहे. मिर्जाचे कबिले जैपुरांत होते. त्यास मिर्जानीं आपल्याजवळ आणोन घेतलें. मिर्जाचे लष्करांत महागाई फार आहे. ह्मणून लोक बहुत बेदिल व हैराण आहेत. मिर्जाचा इरादा आहे कीं, कानोडवाल्याची कुमक करावी. हें वृत्त राजश्री खंडेराव हरी यांनीं श्रवण करून फौजेची निगादास्त जारी केली आहे, व दादरीचे गढीस मोर्चे कायम ठेऊन, दरकूच कानोडनजीक तीन कोसांवर मु॥ करून आहेत. कानोडास दसऱ्याचे मुहूर्तानीं मोर्चे लावणार ह्मणून वदंता आहे. चारशें बेलदार येथून भवानीकुंवर यांनीं रवाना केलें. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं डिभाईकडील चार पलटणा व पंधरा तोफा कानोडचे पारपत्यास राव मशारनिल्हेकडे रवाना केल्या. लौकरच शामील होणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक ९.

श्री. इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवसीं:—

विनंति ऐसीजे, नवाब अलीबहादर यांनीं बुंदेलखंडचे रूखास कूच करून धवडपूर बाडीस दाखल जाले. चंबळनदीचा उतारा करून झांशी काल्पीचे मार्गानें छत्रपुराकडे जाणार आहे. दरम्यान गढीबंद मवास आहेत, यांसी

खंडणी घेऊन पुढें जातील. ऐसा विचार आहे. राजश्री सुभेदार जैपूर प्रांतीं भुसावर नजीक मु॥ करून आहेत. राजे प्रतापसिंग जैपुरकर यांनीं रोडजी खवास यास कैद करून रणथंबोरचे किल्ल्यावर पाठविलें. खुशालीराम बोहरा व दौलतराम हळदिया यांस मुखतारीचीं वस्त्रें दिल्हीं. त्यास, दौलतरामाचा इरादा आहे कीं, फौज जमा करून रावराजाचे मुलकांत दखल करावें. व राजश्री सुभेदारासही शामील करून महाल सोडवावें. त्यापैकीं निमे हिस्सा आपसांत वांटोन घ्यावा. ऐसा बेत आहे. दौलतरामानें खवास मजकुरास कैद करविलें, सबब राजश्री पाटीलबावांची बेमर्जी आहे. मामलत्याचा पैकाही वसूल होतां दिसत नाहीं. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं.

नवाब. वजीर लखनऊंत शेरशिकार करून आहेत. नवाबाची आजी मोठी बेगम यांचे शरीरास केवळ समाधान नाहीं. ह्मणून नवाब बंगल्यास जाणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. जोधपुरकराकडून वकील, मामलत्याबद्दल दीड लक्षांत जवाहीर वगैरे भरण्याचा सरंजाम घेऊन आला आहे. गायकवाड यांचीं पत्रें राजश्री पाटीलबावांस आलीं आहेत कीं, मिर्जा इस्मालबेगानें गुजरात प्रांतीं जाऊन तमाम मुलकांत फितूर केला आहे; त्यास राजे विजेसिंगास लिहून मिर्जाचा बंदोबस्त करावा. याप्रमाणें पत्रें आल्यावर राजश्री पाटीलबावांनीं जोधपुरकरास पत्र लिहिलें आहे कीं, इस्मालबेगास बोलाऊन आपल्यापाशीं ठेवावें. नाहींतर आपला आमचा आपसांत खलेल होईल. मिर्जापाशीं कुल जमात पांच सात हजार स्वार प्यादे आहेत. परंतु लष्करांत गिराणी फार, ह्मणून लोक बहुत हैराण परेशान आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

सादुल्लाखान एलची व जवदीखान अद्यापी येथेंच आहेत. दसऱ्यापावेतों जाणार. एलचीची मर्जी आहे कीं, पादशाहासीं भेट घेऊन जावें. परंतु शाहाजीचें बोलणें आहे कीं, एक वेळ रुखसत जालें, आतां वारंवार हुजुरांत जाणें ठीक नाहीं. तैमुरशाहा काबीलांत आहेत. पेशावरास येणार ह्मणून चहूंकडे लोकांनीं आवाई केली आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०.

श्री.　　इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:–राजश्री बाबाराव गोविंद, नवाब निजाम अल्लीखान यांजकडील

वकील, येथें आले होते. त्यांनीं पूर्वीं नवाबास ऐवजाविशीं लिहिलें. त्यावरून दहा लक्षांच्या हुंड्या तेथून वकील मजकुराकडे आल्या आहेत. यास्तव हल्लीं दरकूच राजश्री पाटीलबावांकडे जाऊन, नवाबांनीं........ सरंजाम वगैरे तोफा तायफ पाठविले आहे तो, व ऐवज देऊन सर्व मतालीबचा बंदोबस्त करून घ्यावा, ऐसा विचार आहे. त्यास, छ २६ तारखेस येथून निघोन रेवाडीचे मार्गानें चितोडास जाणार आहेत. पूर्वीं सविस्तर विनंति लिहिलीच आहे; त्यावरून श्रुत जालेंच असेल. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ११.

पैवस्ती छ २५ सव्वाल इहिदे तिसैन. **श्री.** ता. २९ मे सन १७९०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ १४ माहे रमजान मुक्काम लष्कर नजीक श्रीमथुरा जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं विनंतिपत्रें छ २६ साबानचीं सेवेसीं पाठविलीं आहेत, ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जहालें असेलच. हल्लीं इकडील वर्तमान तरी, मिर्जा इस्मालबेग छ २८ माहे मजकुरीं नारनोलाहून कूच करून वीस कोस माघारे सेखावट प्रांतीं पाटणास गेला. तेथें चोहोंकडून पहाड व घांट, आहेत; ह्मणून त्या ठिकाणीं मुक्काम करून आहे. सोभाराम भंडारी व शाहमल वगैरे आठ हजार फौज जोधपूरकराकडील तेथून खर्चास कराराप्रमाणें पावलें नाहीं ह्मणून बेदिल आहे. व आपसांत सर्वांशीं चित्तशुद्धता नाहीं. जोधपुरवाल्याकडील वकील येथें येणार आहे. आल्यावर काय जाबसाल ठरेल, तें प्रत्यास आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. त्रिवर्ग सरदार छावणींत आहेत. फौजा पै दरपै येथून रवाना होतात. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वर्तमान पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२.

पैवस्ती छ २९ सव्वाल. **श्री.** ता० २९ मे इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:–नवाब अलीबहादर व राजश्री सुभेदार बदस्तुर देवशास

मुक्काम करून आहेत. नवाब मजकुरांनीं बुंदेलखंडाकडे जावयाचा विचार केला होता; परंतु राजश्री सुभेदारांनीं आग्रह करून चार महिने ठेऊन घेतलें आहे. साडेचार लक्ष रुपये खर्चास द्यावे. पैकीं लाख रुपये सध्यां दिल्हे. बाकी साडेतीन लक्ष सा महिन्यांत देणें कबूल केलें. सबब नवाब मशारनिल्हे यांचें सांप्रत रहाणें जालें. हिंमतबहादर गोसावी यास घेऊन अजमेरास जाणार होते. मार्गांत राजश्री पाटीलबावांची भेट घेऊन, गोसावी मजकुराची सफाई करून द्यावी, ऐसा बेत होता. परंतु राजश्री सुभेदारांची सलाह ठरली ह्मणून तिकडील जाणें राहिलें. रोडजी खवास याचे विद्यमानें राजश्री सुभेदारांसीं जयपूरकरांचें बोलणें आहे कीं, मामल्यापैकीं हिंडोन वगैरे दोन महाल बशर्त रामगड सोडल्यास लावून देतों. नंतर रावराजाचे मुलुखाची जप्ती करावी. आह्मी फौजसुद्धां सामील आहों. याप्रमाणें परस्परें बोलणें आहे. मामल्याबद्दल ऐवजाची भरती जालियावर अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं.

देवजी गवळी व बापू मल्हार बदस्तुर पानिपत नजीक मुक्काम करून आहेत. पूर्वीं नानूमल मृत्यु पावला, सबब साहेबसिंग पटयालेकर, याचे घरची जप्ती करणार, ह्मणून नानूमलाचा पुत्र राजश्री पाटीलबावांपाशीं हजीर होऊन साकल्य-वृत्त सांगितलें. त्यावरून यांनीं साहेबसिंगास निक्षून पत्रें पाठविलीं आहेत कीं, तुह्मीं नानूमलाचे लोकांसीं व घरासीं मुजाहीम न होणें. साहेबसिंगाचा विचार आहे कीं, वरकड शिखांस शामील करून मशारनिल्हेची जप्ती करावी. त्यावरून गवळी मजकुरास राजश्री पाटीलबावांनीं लिहिलें आहे कीं, लौकरच फौजा शिखांचे पारिपत्यास रवाना होतात. तुह्मीं कूच करून पुढें जाणें. व गुलशेरखां कुंज-पुरेकर पठाण इकडे सूत्र राखून आहे. शिखांचा व पठाणांचा बिघाड आहे. सेवेसीं श्रुत होय.

राजे बिजेसिंगांनीं मिर्जा इस्मालबेगास तीन लक्षांची जायदाद लावून दिल्ही आहे. तूर्त लगामीं लावून ठेविलें आहे. परंतु मिर्जाचा विश्वास राजेमजकु-रांसही नाहीं. रात्रंदिवस खतऱ्यांत असतात. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३.

श्री. मे इ० स० १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– हल्लीं वर्तमान तर, इस्मायलबेग दरकूच हिसारप्रांतीं हरयाणा कानोडाहून पन्नास कोस आहे, तिकडे रूख करून जातात; व जोधपूरकरांकडून

दोन लक्ष रुपये मिर्जाचे खर्चास आले, व पत्रें आलीं कीं, तुह्मीं नानूमलासीं सलूख * * शीखांस ममतेंत घेऊन तुह्मी व शीख व भंभोखान हे सर्व एकत्र होऊन, राजश्री पाटीलबावांचा मुकाबला करावा, व जोतपूरकर राजे बिजेसिंग मिर्जा-इ-खोजे जादा यास समागमें घेऊन पुष्करास येणार. इकडून जयपूरकरही तथें जाणार. व उदेपूरचा राणाही तेथेंच येऊन सर्व एकत्र होऊन विचार आहे कीं, मिर्जा-इ-खोजे जादा यास पातशाहा करावें, व गाजुद्दीखानास येथें बोलावून वजिरात मशारनिल्हेस देऊन, सर्वांनीं मिर्जाईचे स्वारीसमागमें होऊन बंदोबस्त सलतनतचा करावा, ऐसा बेत आहे. नानूमल वगैरे सीख यांणीं आपसांत सलाहा केली आहे कीं, राजश्री पाटीलबावांचे पाशीं जावयास आमचें धैर्य पुरत नाहीं. इंद्राणी गेली होती तिला आठमास कैदेंत ठेविलें. त्यास मिर्जासीं सर्वांनीं मिळून, शामील होऊन, गोसगड वगैरे प्रांतींचा बंदोबस्त करावा. हा विचार करून मिर्जास पत्रें नानूमलाचीं आलीं, व जोतपूरकराकडील सलाह, त्यावरून मिर्जा दरकूच त्या प्रांतीं जाणार. ह्मणून बारकाईची बातनी आली. अद्याप जुळून आलें नाहीं. पक्कें वर्तमान आल्यावर मागाहून विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति".

लेखांक १४.

श्री. मे. इ. स. १७९०.

" पु ॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:— नानूमल सीख याचा मामला आठा लक्षांवर फडशा जाला होता. त्यापैकीं एक लक्ष साठ हजार रुपये राणेखानभाईकडे वसूल जाले. बाकी पैक्याचा ठिकाण नाहीं, व सीख मजकूर पळोन जाण्याचे उद्योगांत होता. हें वृत्त हिंमतगीर गोसावी यांनीं भाईस सांगितलें कीं, नानूमल हरामी, दगाबाज आहे; याचा भरंवसा नाहीं. मशारनिल्हे येथून निघोन गेलियासी मग कठीण आहे. त्यावरून राणेखानभाईनीं राजेंद्री राणी व नानूमल यांस नजरबंद केले. साहेबसिंग सीख भाईशीं रुजू आहे कीं, नानूमल यास आमच्या स्वाधीन करावें. आपले पैक्याचा ठिकाण मी करून देतों. आणीक सीख जमा होऊन, सतलज नदीवर मुक्काम करून, नित्य लष्करांत कजाकी करून नेतात. तेथून राजश्री पाटीलबावांचीं पत्रें वरचेवर भाईस जातात कीं, तुह्मीं तिकडील मामला दारमदार करून लवकर निघोन येणें. त्यावरून राणेखानभाईनीं पांच कोसांचा कूच अलीकडे केला. हल्लीं लवकरच इकडे येणार आहेत. इकडे आल्यावर काय सल्ला ठरेल तें प्रत्यास आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १५.

श्री. मे. इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—नवाब निजाम अल्लीखां याजकडील राजश्री बाबाराव वकील सांप्रत दिल्लींत आहेत. त्यांनीं पादशाहांस अर्जी करून नवाबाचें नांवें गंजाचें दसखत करून घेतलें, व गंज आबाद करावा, त्याची तरतूद आहे. बागाची तयारी केली आहे. गुदस्तां राव मजकूर यांचे विद्यमानें, राजश्री पाटीलबावांनीं नवाब निजाम अल्लीखानासीं दहा लक्ष रुपये कर्ज घेतले होते, ते भरून दिल्हे. हल्लीं बारा लक्ष रुपये कर्जाऊ मागतात. त्यावरून वकील मजकुरांनीं नवाबास लिहिलें होतें. तेथूनही उत्तर आलें कीं, मागाहून हुंडी पाठवितों. परंतु तुह्मी जागीर वगैरे सर्व मतालीब करून घेणें. ह्मणून मशारनिल्हे येथें राहिले आहेत. हुंडी आल्यावर राजश्री पाटीलबावांकडे जाणार आहेत. तेथें पावल्यानंतर काय ठेरोन अमलांत येईल तें विनंति लिहूं.

पामरसाहेब अनुपशहराहून कलकत्त्यास जाणार होते. परंतु नवाब वजिराचे लिहिल्यान्वयें आगऱ्यांत दाखल जाले. तात्पर्य, राजश्री पाटीलबावांची भेट घेऊन यांचे विचारें सलाह ठैरेल त्याप्रमाणें करावें, ऐसा बेत साहेबमजकुराचा आहे. व पत्रेंही राजश्री पाटीलबावांकडे पाठविलीं आहेत. तेथील पत्रोत्तर आल्यानंतर प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

नवाब गाजुदीखान व अहसनबख्त शाहाजादे कांगड्यास पावले. तेथील राजा संसारचंद्र नामें यानें दोन कोस सामोरे येऊन शाहाजादे मजकुराची मुलाजमत केली. दोन हजार रुपये नख्त व दोन घोडे नजर करून अर्ज केली कीं, आपण दोन चार मास येथें राहावें. महासिंग सीख मोठा सरदार अटकनजीक शाहाचे हद्देवर होता, तो मृत्यु पावला. सबब शाहाकडील फौज येणार आहे व तैमुरशाहा पेशावरास दरकूच दाखल होणार. तेथें पत्रें पाठऊन लाहोर सुभा वगैरे आपल्याकडे करून घ्यावें. तेथील बंदोबस्ताचा जिम्मा आमचा आहे. खर्च पडेल तो देऊं. ह्याप्रमाणें बोलणें जालें. परंतु वरकड शिखाचे दहशतीमुळें नवाबांनीं तेथील राहाणें कबूल न केलें. पाहाडाचे घाटीनजीक आहेत. तेथून तैमुरशाहास नामा पाठविला आहे. गाजुदीखानाचा पुत्र फरूकाबादेहून नवाबाची आमदनी ऐकोन येथें आला आहे. जिलानीखान नांव आहे. दहा बारा माणसें व एक घोडा, गाडी, बरोबर आहे. पादशाहांची मर्जी आहे कीं, मशारनिल्हेस कैद करावें. परंतु राजश्री पाटीलबावांनीं लिहिलें कीं, तेथून त्यास काहाडून द्यावें. ठैरेल तें प्रत्यास आल्यावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १६.

पै॥ छ २९ सव्वाल **श्री.** ता० २९ मे इ० स १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—राजश्री पाटीलबावा सांभराहून कूच करून, मारोटनजीक जयपुराहून विसां कोसांवर मुक्काम करून आहेत. मारोटवाल्यासीं खंडणीचा जाबसाल रुबकार आहे. निशा जालीयावर जयपूरकरांचे मुलुखांत दबाव दाखवून, मामल्याची बेवाकी करून छावणीस येणार. राजश्री सदाशिव मल्हार व अंबोजी इंगळे, जालिमसिंग कोटेकर, उदेपूर प्रांतीं आहेत. भीमसिंग चितोडकर यांचीं पत्रें राजश्री पाटीलबावांस आलीं आहेत कीं, जालिमसिंगाचे मार्फतीनें आमचा मामला होणार नाहीं. राजश्री सदाशिव मल्हार व इंगळे मजकूर यांनीं चितोडगडास मोर्चे लाविले आहेत. त्यावरून भीमसिंगांनीं वकील जाबसालास पाठविले आहेत, व उदेपूरवाल्याकडील बोलणें जालिमसिंगाचे विद्यमानें लागलें आहे. मामल्याचा जाबसाल ठरल्यावर प्रत्यास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं.

मिर्जा अहसनबख्त व नवाब गाजुद्दीखां कांगड्यापर्यंत बरोबर होते. शहाजाद्यासीं बिघाड जाला. सबब मिर्जामजकूर बेदिल होऊन पंधरा कोस पुढें गेले. पन्नास चाळीस माणसें बरोबर आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

राजे बिजेसिंगांनीं फकीरजी गाढवे यांस मामल्याचे बाकीबद्दल कापड व जवाहीर वगैरे भरण्याचा सरंजाम देऊन रुखसत केलें. त्यास मशारनिल्हे दरमजल राजश्री पाटीलबावांचे लष्करांत दाखल होऊन, राजे मजकुरांकडील सरंजाम आणिला तो सर्व, बुधसिंगाचे विद्यमानें दाखवून ठेविला आहे. शिलेदारांचा हंगामा बहुत, यास्तव हिशेब सर्वांचे होतात. राजश्री धारराव शिंदे बेदिल होऊन निरोप घेऊन देशास गेले. मशारनिल्हेचे समजुतीस राणेखानभाईस सांगितलें आहे. परंतु शिंदे मजकूर उदास होऊन, कूच करून दहा कोस गेले. वरकड शिलेदार वगैरे यांचे हिशेबाची समजूत करून, राजश्री गोपाळ रघुनाथ व जिवबा बक्षी व डिभाई वगैरे फौज शिखांचे मुकाबल्यास रवाना होणार आहेत. नजबकुलीखां जाहीरदारी करून, गोकुळगडास मोर्चे लावून होता. परंतु खुफिया मुनिशाबेगास रसद पावती केली. हें वृत्त राजश्री पाटीलबावांनीं श्रवण करून, अगोदर फौज गोकुळगडाकडे पाठवून, मुनिशाबेगाचें पारिपत्य जालियावर पटयाल्यास जाणार; ऐसा विचार आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १७.

श्री. ११ जून. इ. स. १७९०.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल ता॥ २७ माहे रमजान मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ २७ साबानचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून साकल्य वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री सुभेदार यांची अर्जी पादशाहांस आली. त्यांत मजकूर कीं, सरकारआज्ञेप्रमाणें काशीराव व बापूजी होळकर यांस फौजसुद्धां हुजुरांत रवाना करितों. त्यावरून हजरतांनीं शुका दरजाब खातरजमेचा लिहून पाठविला असे. होळकराची आवई ऐकून येथील मुखतार केवळ हिरासा जाले आहेत. राजश्री जिवाजी बल्लाळ यांनीं जैपुरकराचे इशाऱ्याप्रमाणें फौजसुद्धां कालकगढीनजीक येऊन मुक्काम केला. चौथ्या दिवशीं गढी खालीं करून घेतली. सुखराम, दौलतरामाचा पुत्र, हमराहा सामील होता. त्याच्या स्वाधीन गढी केली. आठा चौ रोजांत बक्षी मजकूर फौजसुद्धां जैपुरास येणार आहेत. राजासीं भेट घेऊन, मागील बाकी व सालहालचे खंडणीचा जाबसाल फडशा करून, सेखावाटीचे सुमारें येऊन, तेथीलही खंडणी हातास येईल ते वरचेवर घेऊन, श्रीमथुरेस यावें ऐसा विचार आहे. पामरसाहेब कलकत्त्याहून त्वरेनें दरमजल येतात. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांची भेट घेऊन मेदरफाशसाहेब सहित पातशाहापासीं येणार आहे. येथें आल्यानंतर पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १८.

पै॥ छ १० जिल्हेज इहिदे तिसैन श्रावण. श्री. २२ जुलई इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ ५ माहे जिलकाद मुक्काम लष्कर नजीक श्रीमथुरा जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं विनंतिपत्रें छ १० सव्वालचीं सेवेसीं पाठविलीं आहेत, ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ



(२) नेपोलियन बादशाहाचें विनोदचित्रः—

(जॉन बुल नेपोलियनचें नाक घासण्याचा प्रयत्न करितो.)

जाहालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, मिर्जा इस्मालबेग चौदा स्वारांनिसीं पळोन छ ९ तारखेस जैपुरांत दाखल जाला व सोभाराम भंडारी वगैरे राठोर हिरासा होऊन सांभरपावेतों गेले. गंगाराम भंडारीचा शोध नव्हता. त्यास तिसऱ्या दिवशीं मशारनिल्हे हा फौजेंत सामील जाला. राजे बिजेसिंगांनीं लढाई शिकस्त जाल्याचें वृत्त श्रवण करून, गंगाराम भंडारी वगैरे राठोर सरदार होते यांजवर बहुत इतराजी केली. जीवें मारावें ऐसें जालें होतें. परंतु राणीनें रदबदली करून तकसीर माफ करविली. नंतर राजे मजकुरांनीं मिर्जा इस्मालबेग यास खातरजमेचीं पत्रें पाठविलीं कीं, तुह्मीं फौजेची निगादास्त ज्यारी करून फौज जमा करणें. येथून जालीमसिंग व भीमसिंग बक्षी यांजबरोबर वीस हजार फौज देऊन तुह्मांकडे रवाना केले आहेत. लौकरच शामील होतील. त्यास जालीमसिंगांनीं जोधपुराहून दोन कूच जैपुरच्या रुखास केले. ह्मणून वदंता आहे. राजे प्रतापसिंग व दौलतराम कारभारी यांनीं मिर्जाची बहुत खातरजमा करून ठेविलें आहे, व फौजेची निगादास्त जारी केली. परंतु खर्चाची सरबरा होत नाहीं. ह्मणून मिर्जा वगैरे सर्व बेदिल होऊन जोधपुराकडे जावयाचा उद्योग केला आहे. मिर्जा अहसनबख्त शाहाजादा दरकूच जोधपुरास दाखल जाला. राजे बिजेसिंग चार कोस सामोरे येऊन घेऊन गेले. वस्त्रें जवाहीर हत्ती घोडे वगैरे सरंजाम नजर करून, पांच हजार रुपये दरमहा तुरुत खर्चास नेमून दिल्हा. व शहरांत जागा देऊन ठेविले आहेत. शहा निजामुद्दीन यांचे विचारें पातशाहांनीं बेदारबख्त व मिर्जा हिंगा, उभेता बंधु महमदशाहाचे नातू, त्यास गुलामकादरानें बेदारबख्त यास पातशाहा केला होता, त्या उद्देशानें हल्लीं पातशाहांनीं तोफांनीं लावून छ २६ तारखेस जीवें मारून, उभेता बंधूस किल्ल्यांतच पुरून दिल्हें. शाहाजी येथें येणार आहेत. राजश्री गोपाळ रघुनाथ व जिवबा बक्षी, बापूजी होळकर वगैरे फौजा जैपुराहून पंचवीस कोस अलीकडे पिरागपुरावर मु॥ करून आहेत. राजश्री लखबादादा व काशीराव होळकर वगैरे दहा हजार फौज सेखावट प्रांतीं कूच करून जाणार. पाटणचा मामला साठ हजार रुपये ठैरोन फडशा जाला. तेथील राजानें लालजीमल व कुमेदान वगैरे चार असामी धरून यांचे स्वाधीन केल्या. एका दो रोजां तोफखाना वगैरे लुटीचा सरंजाम लष्करांत येणार आहे. येथें आल्यावर सविस्तर विनंति लिहूं. नवाब वजीर लखनऊस स्वस्थ आहेत. सेवेसीं श्रुत होत. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १९.

श्री. ९ जुलई इ. स. १७९०.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ २५ माहे सव्वाल मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ २१ रमजानचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारुढ जालें असेलच. हल्लीं इकडील वर्तमान तरी, येथील सरदारांत आपसांत चित्तशुद्धता नाहीं. सबब हरएक जागा अंतरवेद प्रांतीं गुजरांनीं उपद्रव प्रारंभ केला. शहरांत रात्रीं चोरांचा उपद्रव फार रहातो. पातशाहाचें वर्तमान बदस्तुर आहे. शाहाजीस राजश्री गोपाळराव रघुनाथ यांचीं पत्रें वरचेवर येतात कीं, सात लक्ष रुपयांची सरबरा करून पाठवावी. त्यावरून यांचा इरादा आहे कीं, लष्कर श्रीमथुरेस आल्यानंतर राव मशारनिल्हेपासीं जाऊन येथील कामांचा इस्तिफा द्यावा. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वर्तमान पुरवणी पत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति. "

लेखांक २०.

श्री. ६ आगष्ट इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ २४ माहे जिल्काद मु॥ दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ २६ सव्वालचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळ रघुनाथ व जिवबा बक्षी, डिभाई वगैरे फौज नारनोळनजीक पांच कोसांवर मु॥ करून आहेत. सेखावट प्रांतची खंडणी तीन लक्ष रुपये ठैरले आहेत, ते वसूल जाल्यावर रेवाडीस येणार आहेत. शाहाजीकडील तागिरी बहालीचा जाबसाल बोलण्यांत आहे. फौज रेवाडीस दाखल जाल्यावर शाहाजी जाणार. तेथें गेल्यावर काय जाबसाल ठैरेल तें मागाहून विनंति लिहूं. नजबकुलीखान कोट कासम येथें मु॥ करून आहे.

मशारनिल्हेचे शरीरास केवळ समाधान नाहीं. यास्तव तेथेंच मुक्काम करून आहेत. सादुलाखान एलची व वजहुदीखान सडी फौज बरोबर रेवाडीस येणार आहे. नंतर पातशाहापासीं येऊन विलायतेस रुखसत होणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्याजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २१.

श्री. ६ आगष्ट इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २४ माहे जिलकाद मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ २६ सव्वालचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावा दरकूच देवगडनजीक चितोड प्रांतीं पावले. राजश्री अंबोजी इंगळे व जालीमसिंग कोटेकर यांनीं येऊन साकल्यवृत्त चितोडवाल्याकडील सांगितलें. त्यावरून महिना पंध्रा दिवस तेथें मु॥ करून राहणार. चितोडगडाकडील वकील मामल्याचे जाबसालास आले आहेत. बोलणें लागलें आहे. परंतु अद्याप कांहीं ठरण्यांत आलें नाहीं. मिर्जा इस्मालबेग जोधपुरकरासीं बेदिल होऊन गुजराथचे जिल्ह्यांत गेला आहे. नवाब अलीबहादूर व राजश्री सुभेदार जैपुरप्रांतीं देवशास मु॥ करून आहेत. जैपुरकराकडून मामल्याची बेबाकी जाली नाहीं, सबब तेथें मु॥ आहेत. ऐवजाची निशा जालियावर छावणीस येणार आहेत. राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवबा बक्षी फौजसुद्धां नारनोळनजीक बारा कोसांवर मु॥ करून आहेत. सेखावटीचा मामला तीन लक्षांवर फडशा जाला. सावकारी निशा जालियावर रेवाडीस लष्कर येणार आहे. शहा निजामुद्दीनही रेवाडीस जातील. तेथें गेल्यावर परस्परें बोलणें होऊन ठरण्यांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. नवाब वजीर लखनऊंत शेरशिकार करून आहेत. तैमूरशहा काबिलांत छावणी करून आहेत. मुरादशाहा वगैरे सरदारांस पत्रें पाठविलीं आहेत कीं, खासा स्वारी हिंदुस्थानाकडे जाणार. तुह्मीं फौजसुद्धां येऊन शामील होणें. ह्मणोन तेथील अखबार पातशाहाचे हुजूर आली. ते सेवेसीं विनंति लिहिली आहे. मिर्जा अहसनबख्त काबिलास गेले. पातशाहांनीं बहुत

खातरजमा केली. ह्मणोन तेथें पत्रें आलीं आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक २२.

पै॥ छ १५ मोहरम इहिदे तिसैन. **श्री.** ता. ८ आगष्ट इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ २६ माहे जिल्काद मु॥ लष्कर नजीक श्रीमथुरा जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ ५ माहे मजकूरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जाहालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, शाहाजींनीं चारकुबा व नव पारचे खिलत जेगा शिरपेच मोत्यांची माळ हत्ती घोडा सिपर शमशेर राजश्री पाटीलबावांस पादशाहांनीं पाठविलें होतें. तो सरंजाम श्रीमंत स्वामींस पाठवावा ऐसा विचार ठेरला. नंतर शाहाजींनीं सांगितलें कीं, फर्मानबाडी करून खिलत न घेतल्यास पादशाहाची चहूकडे सुबाकी होईल. त्यावरून राजश्री पाटीलबावांनीं छ २५ तारखेस फर्मानबाडी उभी करून, राजश्री अलीबहादरबाबा व राजश्री शिवाजी विठ्ठल वगैरे सरदारांस बोलावून, पादशाही फर्मानबाडींत जाऊन खिलत वगैरे सरंजाम पाहून मुजरा मात्र केला, व श्रीमंतांकडील एकशें एक मोहोर खिलता बद्दल नजर केली. उपरांत तेथून स्वार जाले. ते समयीं सलख तोफखान्याची जाहाली. राजश्री लाडोजी देशमुख शितोळे यांस वस्त्रें देऊन जैपुराकडे रवाना केले. त्यास मशारनिल्हे प्रस्थानीं दोन कोस भुतेश्वरानजीक जाऊन राहिले आहेत. नबाब अल्लीबहादर याजकडील फौज व राजश्री सदाशिवपंत आस्वलकर व समरूचीं पलटणा वगैरे सर्व एकत्र होऊन, दो चौ रोजा कूच करून जाणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २३.

श्री. आगष्ट इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- राजश्री सदाशिव मल्हार यांस दिवाणीचीं वस्त्रें राजश्री पाटीलबावांनीं देऊन कारभार सांगितला आहे. राजश्री आबाजी नाईक बानवळे यांजवर सर्फराजी जाली. पंचवीस तीस लक्ष रुपयेपावेतों पैका सरकारांत सरंजाम करून द्यावा याप्रमाणें करार ठैरला आहे. दिवाणीचा कारभार राजश्री सदाशिव मल्हार करितात. सेवेसीं श्रुत होय. राजश्री अंबोजी इंगळे यांस राजश्री पाटीलबावांनीं ग्वाहेर, कछवाघार, भदावर वगैरे दरोबस्त प्रांत मशारनिल्हेकडे सांगितला आहे. त्यास ग्वाल्हेरचे किल्ल्यांत इंगळे मजकुराकडील ठाणेदार गेला आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

तैमूरशाहांनीं भावलपूरचा बंदोबस्त करून, आपण काबिलास स्वार होऊन गेला. कारण हें कीं, तेथें मुरादशाहा बगदादचा पातशाहा त्याणें तैमूरशाहाचे मुलुखांत उपद्रव केला आहे. यास्तव शाहा त्या प्रांतीं त्वरेनें जाऊन लढाईची तयारी केली आहे. सिखांसीं व शाहाचे लोकांशीं लढाई जाली. उभय पक्षीं बहुत लोक ठार राहिले. सेवेसीं श्रुत होय.

नवाब अलीबहादर यास सहाराणपूर वगैरे महाल राजश्री पाटीलबावांनीं लावून दिल्हे आहेत, व पन्नास हजार रुपये खर्चास दिल्हे. राजश्री रायाजी पाटील सहाराणपूरप्रांतीं होते. त्यांणीं राजश्री पाटीलबावांचे आज्ञेप्रमाणें त्या प्रांतांत नवाब मशारनिल्हे यांचा बंदोबस्त करून दिल्हा, व आपण फौजसुद्धां लष्करांत येऊन राजश्री पाटीलबावांची भेट घेतली. सांप्रत येथेंच मुक्काम करून आहेत. सेवेसीं श्रुत होय.

इस्मायल बेग यांणीं नजबकुलीखानासीं मुकाबिला करून एक लढाई मैदानांत घेतली. त्यास कुलीमजकूर हिरासा होऊन कानोडच्या किल्ल्यांत पळोन गेला. इस्माईलबेगांनीं पिच्छा करून कानोडच्या किल्यास मोर्चे कायम केले आहेत. नजबकुली किल्ल्यांतून झुंजतो. येथून राजश्री पाटीलबावांनीं इस्मायलबेगास सर्फराजीची खिलत सा पारचे, जेगा, शिर्पेंच, माळ मोत्यांची पाठविली व बहुत खातरजमेचीं पत्रें पाठविलीं आहेत. सेवेसीं श्रुत होय.

बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २४.

श्री. सप्टेंबर इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसी जे:—राजश्री अंबोजी इंगळे दरकूच अलवारास गेले. राव राजे प्रतापसिंग यांच्या भेटी जाल्या. परस्परें विचार होऊन फौज जमा केली आहे. इंगळे मजकुरांचे बोलणें आहे कीं, कांहीं खर्चाची तजवीज करून द्यावी. ह्मणजे फौजा लवकर तुह्मांस शामील होतील. त्यावरून राव मशारनिल्हेंनीं उत्तर केलें कीं, मी सर्व प्रकारें आपला आहें. फौजसुद्धां चाकरीस हजीर आहें. ह्मणून राजश्री पाटीलबावांस पत्रें आलीं. त्यास तुरुत येथून उत्तर गेलें आहे कीं, तुह्मी व मशारनिल्हे फौज सुद्धां कृष्णगडाकडे जाऊन तेथील बंदोबस्त करावा. दिल्लीचे मार्गानें सर्व फौजा मिर्जाचे मुकाबल्यास येतील. पेंढारी नित्य दौड करून जयपूरनजीक पावेतों लुटून आणितात. राजाकडील चार हजार फौज बनास अलीकडे पांच सा कोसांवर मुक्काम करून आहेत व गंगाराम भंडारी तीन हजार फौजेनसीं जयपूरनजीक आहे. नजबकुलीखानाचीं पत्रें राजश्री अंबाजी इंगळे यांस व राव राजास आलीं आहेत कीं, राजश्री पाटीलबावांनीं आमची दस्तगिरी केली; यासी दोन चार हजार लोक जमा करून तुह्मांजवळ येतों; अथवा मिर्जाचा मुकाबला करितों. त्यास इंगळे मजकुरांनीं बहुत खातरजमेचीं पत्रें पाठविलीं आहेत, व येथें राजश्री पाटीलबावांसही या गोष्टीचें अगत्य आहे. कुलीमजकूर चार हजार लोकांनशीं अलवारास येणार. तेथून त्रिवर्ग एकत्र होऊन कृष्णगडास येतील. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५.

श्री. ४ सप्टेंबर इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे राजश्री खंडेराव हरी यांनीं येथील किल्ल्याचा बंदोबस्त करून हजरताची मर्जी बहुत प्रसन्न केली. इतकियांत नजबकुलीखान छ २३ जिल्हेजचे तारखेस मृत्यु पावला. त्याच्या कारभाऱ्यांनीं इस्मालखां नामें मशारनिल्हेचा पुत्र यास सरदारीवर बसवून, कानोडचे किल्ल्याचा बंदोबस्त केला. हें वर्तमान राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस समजलें. त्यावरून राजश्री खंडेराव हरी यांस वरचे वर पत्रें पाठविलीं कीं, तुह्मीं पत्रदर्शनीं स्वार होऊन कानोडास जाणें.

नजबकुलीकडे माहाल व किल्ला वगैरे जागा आहे ती जप्त करावी. ह्याप्रमाणें पत्रें येतांच रावमजकूर यांनीं साशें लोक खानदेशी वगैरे किल्ल्यांत ठेऊन, भवानी-कुंवर यांस आपल्याकडून किल्लेदारीचे कामावर सोडलें. नंतर छ २ माहे मजकुरीं पातशाहांचा निरोप घेतला. हजरतांनीं राव मशारनिल्हे यांसीं एकांतीं खलबत करून इ॥ त॥ शहाजींनीं सख्तगाई केली, तें साकल्य सांगितलें. हें वृत्त शाहाजींस समजल्यावर बहुत गिलेगुजार आहेत. रावमजकुराची रुखसत जाली. त्या प्रसंगीं पातशाहांनीं यांस सांगून पाठविलें कीं, तुह्मी हुजुरांत येऊन यांची रवानगी करावी. त्यावरून शाहाजींनीं स्पष्ट सांगून पाठविलें कीं, खिलताची सरबरा मजसीं होत नाहीं. आखर पादशाहांनीं महालांतून एक दुशाला व गोषवारा आणोन, राव मजकुरास निरोपाचे समयीं इनायत केला. सबब शाहाजी बहुत बेदिल आहेत. राजश्री खंडेराव हरी यांसींही आपसांत नाचाखीच आहे. शाहाजी आठ दहा दिवस जाले, दरबारास जात नव्हते. ह्मणून पातशाहा मशारनिल्हेचे घरास येऊन समजोन घेऊन गेले. परंतु परस्परें कांहीं बोलणेंही जालें नाहीं. शाहाजी सख्तगो फार. यास्तव कोणासीं बनत नाहीं. अकबरशहासीं केवळ बिगाड आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस पत्रें शाहाजींनीं लिहिलीं होतीं कीं, राजश्री खंडेराव हरी आमच्या इतल्याखेरीज हजरताकडे एकांतीं जाऊन खलबत केलें, व भवानीकुवरही दरबारास जाऊन खलबत करितात, ह्मणून बहुत गिलेगुजारीनें लिहिलें होतें. त्यावरून राव मजकुरांनीं उत्तर जाहीरदारीनें खातरजमेचें पाठविलें आहे कीं, तुमच्या मर्जीनुरूप अंमलांत येईल. परंतु अंतस्थ येथील कामांचें बोलणें राजश्री खंडेराव हरी यांसीं लागलें आहे. कानोड वगैरे येथील बंदोबस्त करून दिल्लीस येणार आहेत. राजश्री वामन खंडेराव यांनीं मेवात्याची एक लढाई मारली. शें दीडशें मेवाती ठार जाला. रेवाडी वगैरे दरोबस्त महालांत बंदोबस्त यथास्थित केला आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २६.

श्री. ४ सप्टेंबर इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवबा बक्षी वगैरे सडी फौज व डिभाई कंपू सुद्धां सेखावट वगैरे प्रांतींची खंडणी घेऊन दरकूच पातशाहापुरास आले. येथून शाहाजी पादशाहाकडून खिलत वस्त्रें घेऊन सामोरे

मु॥ मजकुरीं गेले. तेथें पावल्यावर राव मशारनिल्हेची भेटी जाल्यानंतर, छ १० तारिखेस फर्मानबाडी होऊन खिलत घेतले. सा पारचे खिलत जेगा शिरपेंच मोत्यांची माळ व कंठी रावमजकूर यांस व जिवबा बक्षीसही येणेंप्रमाणें वगैरे हमराही लोकांस सत्रा खिलत दुशाले गोशवारे इनायत जाले. तेथें एक मुक्काम होऊन दुसऱ्या दिवसीं दरकूच करून पळवळास मथुरेच्या रुखास आले. तेथेंही एक मुक्काम जाला. शाहाजीकडे बदस्तुर साबिक दिल्लीची सुभेदारी सांप्रत बहाल राहिली. व राजश्री खंडेराव हरी यांस संस्थानचे किल्ल्याचीं किल्लेदारीचीं वस्त्रें राजश्री पाटीलबावांचे इशाऱ्याप्रमाणें रावमजकुरांनीं देऊन छ १६ तारखेस शाहाजीबरोबर दिल्लीस रुखसत केलें. त्यास छ १७ माहे मजकुरीं येथें दाखल जाले. छ २० तारखेस पादशाहांची मुलाजमत जाली. सा पारचे खिलत जेगा शिरपेंच मोत्याची माळ येणेप्रमाणें रावमजकूर यांस व हमराही लोकांस बारा खिलत चार पारचे इनायत जाले. नंतर सर्वांनीं नजरा केल्या. किल्ल्यांत दरोबस्त बंदोबस्त राव मशारनिल्हे यांणीं केला. हिरासिंग जाट यांचे लोक होते, ते निघोन बाहेर शहरांत राहिले आहेत. रावमजकूर आल्यानें पादशाहांची मर्जी प्रसन्न आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २७.

श्री. ४ सप्टेंबर इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ २३ माहे जिल्हेज मु॥ दिल्ली जाणोन स्वानंदलेखज्ञाना केली पाहिजे. विशेषः– छ २४ जिलकादचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून साकल्य वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्ली इकडील वर्तमान तरी राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवबा बक्षी वगैरे छ २० तारखेस श्रीमथुरेस दाखल जाले. राजश्री रवळोजी शिंदे वगैरे कामदार यांस ऐवजाविसीं ताकीद आहे. डिभाईचे कंपूची जायदाद, बाहपिनाट व जलेश्वर वगैरे बारा लक्षांचे वसूली महाल लाऊन दिल्हे आहेत. राजश्री भास्कर लक्ष्मण ह्यांस दरोबस्त पलटणांचा कारभार राजश्री पाटिलबावांनीं सांगितला आहे. शाहाजीस तुरुत येथें बहाल करून पाठविलें आहे. परंतु अंतस्थ येथील पातशाही महालांचा जाबसाल राजश्री खंडेराव हरी यांजकडे लागला आहे. लौकरच सुभेदारीचेंही

काम राव मशारनिल्हेकडे होईलसें आहे. राजश्री पाटीलबावांनीं अंबोजी इंगळे व राजे जालीमसिंग कोटेकर यांस उदेपुरचे राणास आणावयास पाठविलें आहे. व पत्रेंही खातरजमेचीं पाठविलीं आहेत कीं, तुह्मीं खातरजमेनें यावें; तुमच्या विचारें सर्व बंदोबस्त केला जाईल; ह्मणोन लिहिलें आहे. चितोडवाला भीमसिंग यानें फौज जमा करून लढाईची तयारी केली आहे. व उदेपुरकरासही लिहिलें आहे कीं, आमच्याही मामल्याचा फडशा आपल्या विद्यमानें जालियासी करावा. नवाब वजीर लखनऊस शेर शिकार करून आहेत. पामरसाहेब आगरियांत छावणी करून आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अकबारा पाठविल्या आहेत त्यांवरून श्रुत होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २८.

श्री.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. नवाब वजीर लखनऊकर बकराझील प्रांतीं शेर शिकार करून आहेत. यंदा त्या प्रांतीं पर्जन्य जाला नाहीं. सबब खरीफांत खुष्की पडली. याजमुळें कमावीसदारांनीं इस्तिफा दिल्हा. ह्मणून नवाबमजकूर व हैदरबेगखां वगैरे इंग्रजांचे तगाद्यानें बहुत हैराण आहेत. पांच सात हजार फौज बरतरफ करावी ऐसा विचार श्रवणांत आला आहे. पामरसाहेबाची बदली होणार. लखनऊकर बडा साहेब आगऱ्यास येऊन, दिल्लीस पातशाहाकडे येणार आहे. साल गुदस्तां शिखांनीं इष्टुरसाहेब नामें फिरंगी अनुपशहराहून धरून नेला होता. तो आजतागाईत शिखांचे कैदेंत होता. हल्ली समरूची बेगमेचे विद्यमानें साठ हजार रुपये यांची निशा सिखांनीं घेऊन फिरंगी मजकुरास सोडिलें व दिल्लीस रवाना केलें. अनुपशहराहून चार फिरंगी व एक कंपनी इष्टुरसाहेबास घ्यावयास आले आहेत. छ २८ तारखेस साहेब मजकुरांनीं हजरतांची मुलाजमत केली. अकरा मोहरा पातशाहांस व अकबरशहा वगैरे यांस माफक मरातब नजरा केल्या. हजुराहून सर्वांस खिलत इनायत जाले. हल्लीं रुखसत होऊन लखनऊस जाणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २९.

श्री. सप्टेंबर इ. स. १७९०.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. पातशाहास, राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवबा बक्षी यांनीं कानोडचा किल्ला सुटला व मिर्जा इस्मालबेग दस्तगिरींत आला, ह्मणून उभयतांनीं बेतालीस मोहरा नजर पाठविल्या, ते शाहाजींनीं हजुरांत गुजराणल्या. पातशाहांची मर्जी आहे कीं, गुलामकादराप्रमाणें मिर्जाचीही तंबी करावी. येविसीं राजश्री पाटीलबावांस वरचेवर लिहिलें आहे. सैद रजीखां नामें पामरसाहेबांकडून येथें पातशाहापासीं आहे. त्यांनीं लखनौस जाऊन पातशाहांचे भोजनखर्चाबद्दल चारशें रुपये दरमहा इजाफा वजीरासीं पूर्वीपेक्षां अधिक करून आणिले. व मिर्जा अकबरशाहाचाही दोनशें रुपये दरमहा वगैरे शाहाजादे यांस ईद बकरीद याची नजर येणेंप्रमाणें बंदोबस्त करून आणिले. सबब पातशाहा खुशी होऊन तीन पारचे खिलत इनायत केला. परंतु शाहाजी खेरीज मशारनिल्हेंनीं खिलत घेतला नाहीं. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं.

राजश्री सुभेदार यांनीं रणजितसिंग जाट भरतपूरकर यांस पत्रें पाठविलीं आहेत कीं, तुह्मीं आपली फौज बापूजी होळकर यांजकडे कुमकेस पाठविणें. कदाचित् टाळा दिधला तरी, होळकर मजकूर व पेंढारी वगैरे फौज, तुमच्या महालांत येऊन तख्ततराज करतील. याप्रमाणें पत्रें आल्यानंतर जाट मजकूर यांनीं राजश्री पाटीलबावांस व राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस लिहिलें कीं, तुह्मीं सांगाल तैसें करूं. त्यास यांनीं राजश्री पाटीलबावांचे पत्रोत्तरावर ठेविलें आहे. तेथून उत्तर येईल त्याप्रमाणें करतील.

डिभाई फिरंगी.......येऊन लग्नाची योजना....ची कन्या मोती बेगम........ कळवंतनीशीं होती. तिचें लग्न करून नंतर बहा..........स गेले. लग्नप्रसंगीं बेगम....इचें बोलणें जालेंच होतें कीं, मिर्जा इस्मालबेगास बआबरू ठेवावें. तुमच्या विद्यमानें कानोडचे किल्ल्यांतून निघोन किल्ला खाली करून देईन. परंतु त्याचें संरक्षण होय तें करावें. याप्रमाणें अंतस्थ बोलणें जालेंच होतें. तदनंतर मिर्जामजकूर पीरु सोचे विद्यमानें पलटणांत येऊन राहिला. हल्लीं डिभाईनीं हत्तीवर बसवून, गीर्द आपले लोक करून, राजश्री गोपाळराव रघुनाथ यांजपाशीं मिर्जा वगैरे सर्वांस नेलें आहे. राव मशारनिल्हे यांचें मानस आहे कीं, मिर्जास कुटुंबसहित आग्र्याचे किल्ल्यांत ठेवावें. परंतु डिभाई साहेब अंतस्थ पक्ष राखून आहे. लष्करांत दाखल जाल्यावर काय ठैरून प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

नवाब वजीर लखनौंत आहेत. परंतु बहिरायच प्रांतीं शेर शिकारीस जाणार. इंग्रेजांचा तगादा ऐवजाविशीं बहुत आहे. सबब, मिर्जा हैदरबेगखां कारभारी यांनीं शरीरास समाधान नाहीं याचा बहाणा करून, दरबारांत येत नाहींत. लखनौंत नवाबांनीं पन्नास लक्ष रुपये इंग्रजांशीं तीन रुपये शेंकडा व्याजीं कर्ज घेऊन इष्टिन साहेबाकडे पाठविले आहेत. आणीकही तगादा आहेच. ह्मणून शिबंदीचे लोक व शागीर्दपेशा वगैरे शिकारखाना नि................केला असे. श्रुत होय.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३०.

श्री. ता. ४ सप्टेंबर इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २३ माहे जिल्हेज मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं विनंतिपत्रें छ० २४ जिलकादचीं सेवेसीं पाठविलीं आहेत, तीं पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरीः— राजश्री पाटीलबावा नाथद्वारानजीक मुक्काम करून आहेत. उदेपूरवाल्याचा जाबसाल राजश्री अंबोजी इंगळे व भाऊ बक्षी यांचे विद्यमानें रुबकार आहे. देवगडवाल्याचा मामला दहा लक्षांवर फडशा जाला. दोन लक्षांची निशा जप्त जाली. बाकीच्या ऐवजाची ताकीद आहे. राजश्री पाटीलबावांची स्त्री गंगाबाई छ ११ माहे मजकुरीं निवर्तली. सांप्रत तेथेंच आहेत. राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवबा बक्षी वगैरे सडी फौज डिभाई कंपूसुद्धां सेखावटी वगैरे रेवाडीच्या जिम्याची खंडणी घेऊन दरकूच श्रीमथुरेस छ २० तारखेस दाखल जाले. राजश्री खंडेराव हरी यांजकडे रेवाडी वगैरे बेवीस महाल पूर्वीं सांगितलेच होते. हल्लीं राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं राजश्री पाटीलबावांच्या इशाऱ्याप्रमाणें दिल्लीचे किल्लेदारीचीं वस्त्रें दिलीं. शाहाजीकडे पूर्ववत्प्रमाणें संस्थानची सुभेदारीचें काम सांप्रत बहाल राहिलें. पलवलच्या मुक्कामाहून राव मशारनिल्हे व शाहाजी निरोप घेऊन दिल्लीस छ १६ तारखेस दाखल जाले. पातशाहाची मुलाजमत शाहाजींनीं केली. व छ २१ तारखेस राजश्री खंडेराव हरी यांनीं हजरताची मुलाजमत केली. सा पारचे, खिलत, जेगा, शिरपेंच, मोत्याची माळ येणेंप्रमाणें मशारनिल्हेची

व हमराई लोकांची मुलाजमत जाली. त्यांस चवदा खिलत, चार चार पारचे इनायत जाले. राव मशारनिल्हेंनीं व लोकांनीं नजरा पातशाहास केल्या. नंतर किल्ल्यांत चौकीपहाऱ्याचा बंदोबस्त करून नाजरच्या हवेलींत राहिले. किल्लेदारी यांजकडे जाल्यानें पातशाहांस मोठी खुशी जाली. तैमूरशाकडील येलची अद्यापवर येथेंच आहेत. आठा पंधरा रोजांनीं विलायतेस जाणार. राजश्री सुभेदार व अल्ली बहादूर पूर्वस्थळींच मुक्काम करून आहेत. रामगड खाली जाला. तेथें राजश्री सुभेदार यांचे लोक किल्ल्यांत दाखल जाले. मामल्याचे ऐवजाची बेबाकी जाल्यावर उभयतां सरदार छावणीस येणार ह्मणोन वदंता आहे. सेवेसीं श्रुत होय. वरकड वर्तमान राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिलें आहे. त्याजवरून सविस्तर ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ३१.

श्री. ४ सप्टेंबर इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, राजश्री पाटीलबावा मौजे नेवाई प्रांत मेवाड नजीक श्रीनाथद्वारा येथें मुकाम करून आहेत. मेवाड वगैरे प्रांत येथील मामलयाचा जाबसाल साठ लक्ष रुपये बोलण्यांत आहेत. दहा लक्ष रुपये पायमाली मुजरा देऊन बाकी पन्नास लक्षांचा जिमा राजे जालीमसिंग कोटेकर यांणीं केला. बशर्त फौज व अंबोजी इंगळे यांस या प्रांतीं ठेवावें याप्रमाणें जाबसाल रूबकार आहे. देवगडवाल्याचा मामला दहा लक्ष रुपये ठरले, पैकीं दोनलक्ष रुपये नख्त दिल्हे. बाकी आठ लक्षांची निशा जालियावर वकिलास निरोप देणार. वऱ्हाड प्रांतींची खंडणी लाख रुपये ठरले. त्याची निशा जाली. उजेनीस कूच करून जावें ऐसा विचार होता. इतकियांत राजश्री पाटीलबावांची स्त्री गंगाबाई निवर्तली. ह्मणोन मु॥ करून आहेत. बनास नदीतीरीं जाणार. जोतपुरवाल्यांनीं मामल्याचे बाकीबद्दल दोन लक्ष रुपयांची चिठ्ठी सावकारी पाठविली आहे. राजे मशारनिल्हेकडील भंडारी नामें कारभारी होता, त्याचीं पत्रें फितुराचीं धरलीं. यावर भंडारीस जीवें मारिलें. मिर्जा इस्मालबेगांनीं सरदीही चार लक्ष रुपये खंडणी घेऊन गुजराथचे जिल्ह्यांत दहा हजार फौजेनिशीं मुक्काम करून आहे. जोतपुरकरासीं अंतस्थ सूत्र लागलें आहे ह्मणोन राजश्री पाटीलबावांस समजलें. त्यावरून हल्लीं यांणीं जोधपुरपावेतों डांक बसविली आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३२.

श्री. ता. २२ सप्टेंबर इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ १२ माहे मोहरम मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष:– स्वामीनीं कृपा करून पत्र पाठविलें तें छ ११ माहे मजकुरीं पावलें. शिरसा वंदून सनाथ जालों. पेशजीं छ २३ जिल्हेजचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून साकल्य वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी:–राजश्री पाटीलबावा श्रीनाथद्वार नजीक मुक्काम करून आहेत. राजश्री सदाशिव मल्हार व जालीमसिंग कोटेकर उदेपुरास जाऊन राणाची भेट घेतली. परस्परें बोलणें जालें. त्यावरून राणांनीं उत्तर केलें कीं, राजश्री पाटीलबावा दोन मजल अलीकडे आले ह्मणजे आह्मी येथून कूच करूं. याप्रमाणें बोलणें जाल्यावर उभयतांनीं राजश्री पाटीलबावांस पत्रें लिहिलीं. त्यावरून यांनींही तयारी केली आहे. राणाची भेट जाल्यानंतर जाबसाल होऊन अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवबा बक्षी वगैरे सडी फौज छावणींत आहेत. रवळोजी शिंदे यांसीं ऐवजाविशीं ताकीद बहुत आहे. महालाची रसद कमाविसदारासीं घेऊन, शिलेदाराची समजूत करून, शिखांचे मुकाबल्यास दसऱ्यानंतर फौज रवाना होणार आहे. देवजी गवळी बदस्तुर करनाल प्रांतीं आहेत. गोरख्या राजा यानें श्रीनगर व आलमोड्याचे जिल्ह्यांत उपद्रव केला आहे. ह्मणून नवाब वजीराकडील फौज पहाडाकडे जाणार आहे. मुनिशाबेग यांस राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं आग्र्याचे किल्ल्यांत कैद करून, बेड्या घालून ठेविलें आहे. तेथून ग्वाल्हेरीस पाठविणार ह्मणून वदंता आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्ययास येईल ते विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३३.

श्री. ता. २२ सप्टेंबर इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ० १२ माहे मोहरम मुक्काम दिल्ली

जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—स्वामींनीं कृपा करून पत्र पाठविलें तें छ ११ माहे मजकुरीं पावलें. शिरसा वंदून सनाथ जालों. पेशजीं छ २३ जिल्हेजचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरीः—राजश्री पाटीलबावा श्रीनाथद्वार नजीक ती कोसांवर मुक्काम करून आहेत. उदेपूरकर राणा भेटीस येणार ह्मणून राजश्री पाटीलबावांस जालीमसिंगाचीं पत्रें आलीं. त्यावरून पांच कोस सामोरे जाणार आहेत. राणाची भेट जाल्यावर बोलणें होऊन अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. मिर्जा इस्मालबेग यानें गुजरात प्रांतीं बहुत उपद्रव केला. सबब, राजश्री पाटीलबावांनीं जोधपूरकरांस पत्रें लिहिलीं आहेत कीं, मिर्जास बोलावून आपल्याजवळ ठेवणें ठीक आहे. नाहीं तरी आपसांत बिघाड होईल. याप्रमाणें निक्षून पत्र पाठविलें आहे. राजश्री सुभेदार जयपूर प्रांतीं भुसावर नजीक मुक्काम करून आहेत. राजे प्रतापसिंग जयपूरकर यांनीं रोडजी खवास यास कैद करून रणथंबोरचे किल्ल्यावर पाठविलें. खुशालीराम बोहोरा व दौलतराम हाळदिया यांस मुखत्यारीचीं वस्त्रें दिलीं. हल्लीं दौलतराम, फौज जमा करून, राजश्री सुभेदारांसही शामील करून, रावराजाचा मुलूख काबीज करावे, ऐसा बेत आहे. नबाब अल्ली बहादर बेदील होऊन बुंदेलखंडचे रूखास कूच करून धवडपूर बाडीपावेतों दाखल जाले. चंबल नदी उतरोन झांशी कालपीचे मार्गानें छत्रपुराकडे दरकूच खंडणी गढीबंदासीं घेऊन जात आहेत. राजश्री खंडेराव हरी यांनीं येथील किल्ल्याचा बंदोबस्त केला. भवानी कुंवर यास किल्लेदारीवर ठेविलें आहे. नजब कुलीखान मृत्यु पावला ह्मणून राव मशारनिल्हेनीं त्वरेनें पातशाहाचा निरोप घेऊन छ २ माहे मजकुरीं येथून कूच करून कानोडचे रूखास गेले. नबाब वजीर लखनौंत शेरशिकार करून आहेत. तैमुरशाहा काबिलांत आहेत. परंतु पेशावरास येणार ह्मणून चहूंकडे आंवई आहे. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ३४.

श्री. ता. २६ सप्टेंबर इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ १६ माहे मोहुरम मुक्काम दिल्ली जाणोन

स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ १९ जिल्हेजचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत; ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हलीं इकडील वर्तमान तरीः—राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजसुद्धां खुशालगड नजीक मुक्काम करून आहेत. खुशालगडचे शहरांत दोन पलटणा डिभाईकडील दाखल जाल्या. हिंडोन वगैरे जयपूरकरांचे महाल यांत गारदून फिरंगीनें दखल केला. इतक्यांत जयपूरकरांकडील वकील येऊन हजीर जाला. मागील बाकी व साल हालचे खंडणीचा जाबसाल रुबकार असे. तात्पर्य, डिभाईचे विचारें जयपुराकडे कूच होणार. सिवपूरवाल्यासीं एंशी हजार रुपये खंडणी मागतात. तेथील जाबसाल फडशा जाला ह्मणजे कूच करणार. राव मशारनिल्हेस पुत्र जाला. सबब सडेस्वारी श्रीमथुरेस यावें ऐसा विचार आहे. परंतु डिभाईचे अनुमतें ठरेल त्याप्रमाणें करितील. पातशाहाचे हुजुरांत जबानी बातमी हरकाऱ्यांनीं जाहीर केली कीं, नवाब गाजुद्दीखान जमाशाहापाशीं येऊन मुलाजमत हांसील केली. त्यावरून शाहांनीं बहुत तसली करून मुलतानास रवाना केलें. हें वृत्त हजरतांनीं श्रवण करून कासीदजोडी खुफिया मिर्जा आहसनबख्त याजकडे पाठविले आहे. पक्की बातमी आल्यावर साकल्यवृत्त सेवेसीं विनंति लिहूं. पालमर साहेब कलकत्त्याहून रुखसत जाले. अगोदर नवाब वजीर व चेरी साहेब यांसीं भेटून, उभयतांचे विचारें ठरल्यास परभारें पुण्यास जावें, ऐसा विचार कलकत्त्याहून ठरला आहे. राजश्री सदाशिव मल्हार यांचींही पत्रें येविसीं साहेब मजकुरास वरचेवर आलीं. सबब लवकरच येणार. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३५.

श्री. ता. २५ आक्टोबर इ. स. १७९०.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसींः—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ १६ माहे सफर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ १२ मोहरमची विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. ते पावून साकल्य वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हलीं इकडील वर्तमान तरी—राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवबा बक्षी वगैरे सडी फौज श्री-

मथुरेंत छावणी करून आहेत. देवजी गवळी व बापू मल्हार यांचीं पत्रें आलीं होतीं कीं, शिखांचा इरादा आहे कीं, कार्तिकमासीं अंतर्वेदप्रांतीं येऊन उपद्रव करावा. त्यास फौज लवकर पाठविल्यास इकडील बंदोबस्त राहील. त्यावरून फौज पाठवावयाची तजवीज दिपवाळीपावेतों आहे. पामरसाहेब आग्र्याहून मथुरेस येऊन राव मजकूर वगैरे सर्वांच्या भेटी जाल्या. पूर्ववत् कायद्याप्रमाणें वस्त्रें जवाहीर साहेब मजकुरास व हमराही लोकांस वस्त्रें दिल्हीं. नंतर साहेब मजकुरांनीं आपल्या डेऱ्यास नेऊन, राव मशारनिल्हे वगैरे मंडळीस वस्त्रें दिल्हीं व बहुत दोस्तीचें भाषण परस्परें जालें. दुसऱ्या दिवशीं साहेब मशारनिल्हे रुखसत होऊन लखनौस गेले. नवाब वजीर बहिरायच प्रांतीं शिकारेस गेले आहेत. पामर साहेबासही त्वरेनें बोलाविलें आहे. त्यास साहेबमजकूर दरमजल लखनौस दाखल जाला. तैमूरशाहाकडील सादुल्लाखा येलची व वजहुदीखान राजश्री पाटीलबावांकडील येथून छ २३ मोहरमचे तारखेस शाहाजीसीं रुखसत होऊन विलायतेस गेले. राजश्री खंडेराव हरी यांनीं बादरखां येलची बरोबर देऊन पुढें रवाना केलें. तैमूरशहा पेशावरास येणार ह्मणून वदंता आहे. लखनौहून छ १५ तारखेस दोन फिरंगी येथें आले आहेत. युनानी साहेब व मुमनेक साहेब नामें उभयतांचे नांवें आहेत. एका दो रोजां पातशाहाची मुलाजमत होणार. हजरतांचे शरीरास दोन दिवस गैरआरामी आहे. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३६.

श्री. ता. २६ आक्टोबर इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ १६ माहे सफर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ १२ मोहरमची विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून साकल्य वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी– राजश्री पाटीलबावा व उदेपूरकर राणा व राजे जालीमसिंग कोटेकर श्रीनाथद्वाराहून कूच करून चितोडगड नजीक दों कोसांवर दाखल जाले. राणाचे अनुमतें चितोडगडास मोर्चे लाविले. त्यावरून राजे भीमसिंग

चितोडकर यांनीं वकील जाबसालास पाठविले आहेत. राणेखानभाईचे विद्य-मानें मामलयाचा जाबसाल रुबकार आहे. परंतु भीमसिंगाचें बोलणें आहे कीं, राणाचे मार्फत मामला करणार नाहीं. लष्करांत महागाई फार आहे. रुपयास सात शेर अन्न मिळत नाहीं. ह्मणून लोक हिरासा आहेत. राजश्री खंडेराव हरी बारा हजार फौजेनशीं कानोडास पावले. गिर्दची जागा दरोबस्त जप्त करून कानोडचे किल्यास दसऱ्याचे मुहूर्तानीं मोर्चे कायम करणार. नजबकुली-खानाचे घरांत व किल्यांत आपसांत फितूर फार जाला आहे. राजश्री गोपाळ-राव रघुनाथ व जिवबा बक्षी वगैरे सडी फौज छावणींत आहेत. दिवाळीनंतर फौजेची रवानगी साहारणपूरचे रूखास होणार. तैमूरशहाकडील येलची, छ २३ मोहोरमचे तारखेस, येथून शाहा निजामउद्दीन यांचा निरोप घेऊन, वनहुदीखाना-सहीत विलायतेस गेले. तैमूरशाहा काबिलांत आहेत. नवाब वजीर लखनौकर बाहीरायच प्रांतीं शिकारेस गेले आहेत. मिर्जा इस्मालबेग व राजे बिजेसिंग यांसीं आपसांत नाचाखी जाली. ह्मणून मिर्जा बेदील होऊन, मारोटास येऊन दोन गढ्या ताख्ततताराज केल्या. जयपुरांत मिर्जाचे कबिले होते, त्यांस बोला-वून आपल्याजवळ ठेविलें; व दौलतरामाचे विद्यमानें जयपूरकराकडे सूत्र लाविलें आहे. कानोडवाल्याचे कुमकेस येणार ह्मणून आवई आहे. त्यावरून राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं डिभाईकडील चार पलटणा व तोफखाना मिर्जाचे मुकाबल्यास कानोडाकडे रवाना केल्या आहेत. राजश्री सुभेदार जयपूरप्रांतीं बदस्तूर देवशानजीक मुक्काम करून आहेत. जयपूरकरांनीं खुशालीराम बोहोरा यास जाबसालास पाठविलें आहे. परंतु अद्यापि आपसांत सफाईचें बोलणें जालें नाहीं. नवाब अलीबहाद्दर बुंदेलखंड प्रांतीं दतियास दाखल जाले. तेथून पर्ण्याकडे जाणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ३७.

श्री. आक्टोबर इ. स. १७९०.

" पुरवणी श्रीमंत नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री पाटीलबावा दरकूच देवीपुरा नजीक देवगड प्रांतीं चितोड येथें मुक्काम करून आहेत. राजश्री अंबोजी इंगळे व जालीमसिंग कोटेकरं

यांनीं येऊन तिकडील वर्तमान साकल्य निवेदन केलें; व परस्परें बोलणें जालें कीं, दोन महिने या प्रांतीं छावणी जालीयासी पन्नास लक्ष रुपये तहशील होतील. त्यावरून राजश्री पाटीलबावांनीं हबीबशहा यांस उज्जेनीस रुखसत केलें, व फौजेचा मुक्काम महिना पंधरा दिवस चितोडचा गिर्द होणार आहे. चितोडवाल्याकडील वकील मामल्याचे जाबसालास आले आहेत. दहा लक्षांचें बोलणें आहे. राजश्री पाटीलबावा फौज खर्च वगैरे तीस लक्ष मागतात. ह्मणोन अद्यापि कांहीं ठैरण्यांत आलें नाहीं. जाबसाल रूबकार आहे. राजश्री सदाशिव मल्हार यांजकडील भडोच वगैरे महाल दुसऱ्याकडे सांगितले आहेत. तेथील हिशेबी नव लक्ष रुपये मशारनिल्हेकडे बाकी निघाले. सबब ऐवजाचा तगादा बहुत आहे. राजश्री आबा चिटणीस यांस हिशेबाचे चौकशीस सांगितलें आहे. राजश्री अंबोजी इंगळे यांसीं ग्वाल्हेर कछवाघार वगैरे महालांची रसद पंधरा लक्ष रुपये मागतात. पैकीं दहा लक्ष रुपये इंगळे मजकुरांनीं सरबरा करून दिल्हे. बाकी पांच लक्ष आणीक द्यावे ह्मणोन बोलणें आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३८.

श्री. नोव्हबर इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं.—

विनंति ऐसीजेः—राजश्री पाटीलबावा व उदेपूरकर राणा व राजे जालीमसिंग कोटेकर श्रीनाथद्वाराहून कूच करून चितोडगड नजीक दों कोसांवर मुक्काम करून आहेत. राजे भीमसिंग चितोडकर यांचें बोलणें आहे कीं, आमचा मामला राणाचे व जालीमसिंगाचे विद्यमानें होणार नाहीं. त्यावरून राजश्री पाटीलबावांनीं चितोडगडास मोर्चे कायम केले, व गिर्द किल्याचे फौज पाठविली. इतक्यांत भीमसिंगांनीं सिताराम भंडारी वगैरे वकील, राणेखानभाईचे विद्यमानें, जाबसालास पाठविले आहेत. त्यास वकीलमजकुरांनीं छ ७ तारखेस राजश्री पाटीलबावांची भेट घेतली. नंतर एक घोडा नजर केला. व राणेखानभाईचे मार्फत मामल्याचें बोलणें रुबकार आहे. राणाकडील कांहीं लोक चितोडांत आहेत. त्यांचीं पत्रें आलीं होतीं कीं, पूर्ववत्प्रमाणें आमची जागीर बहाल करून द्यावी व पन्नास हजार रुपये नख्त द्यावे, ह्मणजे भीमसिंगासुद्धां गड आपल्या स्वाधीन करून देतों. राणांनीं तीं पत्रें बजिन्नस राजश्री पाटीलबावांस

दाखविलीं. त्यावरून यांनीं बदस्तुर जागीर बहालीची फर्द दसकत करून दिल्ही, व पंचवीस हजार रुपये नख्त देणें कबूल करून, खातरजमेचीं पत्रें पाठविलीं. हें वृत्त राजे भीमसिंगांनीं ऐकोन, राणाचे लोकांस गडांतून काढून दिल्हें. व कल्याणसिंग नामें किल्लेदार होते त्यांस कैद केलें. गडास मोर्चे कायम जाल्यावर सलुखाचें बोलणें लागलें आहे. राणाचे मानस आहे कीं, करोड रुपये नख्त व पन्नास लक्षांचा मुलूख दिधल्यास मामला करावा. नाहीं तरी चार महिने या प्रांतीं राहून दरोबस्त जागा जप्त करावी. ह्मणून राजश्री पाटीलबावांसीं बोलणें आहे. परंतु लष्करांत महागाई फार; रुपयास सात शेर अन्न मिळत नाहीं. ह्मणून सर्व लोक बहुत हैराण परेशान आहेत. यास्तव राणेखान भाई वगैरे सर्वांचे अनुमतें तुरुत दारमदार करून, मामला घेऊन उज्जनीस जावें, ऐसा विचार आहे. राजे भीमसिंगाचें बोलणें आहे कीं, राणाची आमची आपसांत सफाई करून द्यावी, ह्मणजे चितोडगड त्यांच्या हवाले करितों. परंतु राणाकडून दिवाणीचीं वस्त्रें आह्मांस देवावीं. कारभार माझ्या स्वाधीन असावा. याप्रमाणें ठैरल्यास चितोडगड खालीं करून देतों. याप्रमाणें भीमसिंगाचा जाबसाल आहे. पन्नास लक्ष रुपये मामला द्यावयास राजी आहे. परंतु इकडील मर्जी करोड रुपये नख्त व कांहीं मुलूख दिधल्यास मामला करावा. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३९.

श्री. ता. १० नोवेंबर इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २ माहे रविलावल मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष:– पेशजीं छ ७ रविलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालें असेलच. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावांनीं चितोडगडास मोर्चे कायम केल्यावर, राजे भीमसिंग चितोडकर हिरासा होऊन, सलूखाचा पैगाम राणेखानभाई व राजश्री आबा चिटणीस यांचे विद्यमानें करून, परस्परें वचन प्रमाण ठैरोन, छ २० रविलावलचे तारखेस चितोडगड खालीं करून दिल्हा. राजश्री पाटीलबावांनीं उदेपूरकर राणा यांजकडील कारभारी व आपल्याकडील पांचशें लोक किल्ल्यांत दाखल केले. नंतर राजे भीमसिंगाची भेटी जाल्या. मामलाही लवकरच फडशा होऊन उज्जनीकडे कूच होणार आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ बदस्तूर

छावणींत आहेत. राजश्री खंडेराव हरी यांनीं दादरी वगैरे नजबकुलीखांचा मुलूख दरोबस्त कबजांत करून, कानोडचे किल्ल्यासीं मोर्चे लाविले आहेत. शहर हल्ला करून घेतला. तेथील किल्लेदारासीं साजीश करून सव्वीस कोठें बारुदचे किल्ल्यांतील उडविले. सबब लोक बहुत भयभीत जाले आहेत. नवाब वजीर लखनौकर बकराझील प्रांतीं शेर शिकार करितात. इंग्रेजांची निकड ऐवजाविशीं फार. मुलुखांत खुष्की पडली, याजमुळें नवाब व हैदरबेगखां वगैरे कारभारी सर्व सचिंत आहेत. नवाब अलीबहाद्दर श्रीनगरनजीक डंघाईचे जिल्ह्यांत मुक्काम करून, राजे बिजेबहाद्दर बांदेकर यांजकडील मुलूख अर्जुनसिंगाचे कबजांत होता तो जप्त करून, निमे राजेमजकुरास द्यावा व निमे सरकारांत घेऊन तिकडील बंदोबस्त करावा, ऐसा विचार ठैरण्यांत आहे. इथूर साहेब नामें फिरंगी शिखांचे कैदेंतून सुटून येथें आला. त्यास छ २६ तारखेस शाहाजीचे विद्यमानें हजरताची मुलाजमत जाली. फिरंग्यांनीं नजरा केल्या. नंतर साहेबमजकुरास व वगैरे हमराई लोकांस, माफक मरातब, हजुरांतून खिलत इनायत जाले. दो चौ रोजां लखनौस जाणार. पामरसाहेब इंग्रेजाचा वकील राजश्री पाटीलबावांपासीं आहे. त्याची बदली होणार. लखनौचा बडा साहेब आग्र्यास येऊन दिल्लीस पातशाहाकडे येणार आहे. राजश्री सुभेदारांनीं रावराजाचे मुलुखांत फौज पाठवून दोन चार महाल जप्त केले. व खुद्द देवशानजीक जयपूरप्रांतीं मुक्काम करून आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ४०.

श्री. १८ नोव्हेंबर इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ७ माहे रविलावल मु॥ दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजी चंद्र १६ सफरची विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून साकल्यवृत्त निवेदन जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावा चितोडनजीक एक कोस अलीकडे मु॥ करून आहेत. राजे भीमसिंग चितोडकर यांजकडील व

किल्यामल्याचा जाबसाल करितात. परंतु राणेखानभाईचे शरीरास समाधान नाहीं. यास्तव अद्यापि मामला ठैरला नाहीं. तात्पर्य, येथील जाबसाल ठैरल्यावर उज्जेनीकडे कूच होणार आहे. जालीमसिंग कोटेकर बेदील होऊन कोट्यास जाणार आहे. त्याजवरून राजश्री पाटीलबावांनीं खातीर करून सांप्रत ठेऊन घेतलें आहे. मिर्जा इस्मालबेग कानोडचे रुखास आला आहे. राजश्री खंडेराव हरी यांजपासीं लढाईचा सरंजाम पोख्त आहे. कानोडवाल्याकडील बोलणें लागलें आहे. राजश्री सुभेदार बदस्तुर मु॥ करून आहेत. राजश्री बापूजी होळकर यांचे विद्यमानें खुशालीराम बोहरा याचें बोलणें होऊन, तीन लक्ष रुपये मामला ठैरला. पैकीं लाख रुपये नख्त व लक्ष रुपयाचा पशमीना वगैरे जवाहीर व लाख रुपयांत हत्ती घोडे वगैरे सरंजाम येणेंप्रमाणें ठैराव जाला आहे. ऐवजाचा भरणा जाल्यावर तेथून कूच करून रावराजाचे मुलकांत जाणार आहेत. नवाब अलीबहाद्दर काल्पीनजीक जालोनचे गिर्द मु॥ करून आहेत. तिकडील जाबसाल हिंमतबहादर गोसावी यांचे विद्यमानें होत आहे. दतियाकर राजे वगैरे यांची खंडणी जाली. रा॥ बाळाजी गोविंद यांची भेटी जाल्यानंतर डभाईकडे जाऊन, नोने अर्जुनसिंग याचा मुलूख जप्त करावा, ऐसा विचार आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ वगैरे सडी फौज छावणींत आहेत. पातशाहाकडील बोभाट राजश्री पाटीलबावांनीं ऐकून संस्थानचे कारभारी यांजवर इतराजी आहे. नवाब वजीर लखनऊकर गोरखपुरचे जिल्ह्यांत आहेत. तैमूरशहा काबिलांत आहे. परंतु बादआज-ईद पेशावरास येणार. इकडून एलची व राजश्री पाटीलबावाकडील वजहुदीखान वकील पेशावरचे रुखास जात आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे. त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ४१.

श्री. नोव्हेंबर इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. मिर्जा इस्मालबेग माघारें जयपुराकडे कूच करून गेला. इकडील फौजेचा दबाव पाहून, राजश्री सुभेदारासीं सलूखाचे बोलणें लाविलें आहे. परंतु मिर्जाचा विश्वास कोणासही नाहीं. मशारनिल्हेचे लष्करांत

खर्चाची तसदी बहुत, ह्मणून लोक उठोन जातात. मिर्जाबरोबर चार हजार स्वार प्याद्यांची कुल जमात आहे. मलकमहमदखां नामें मोंगल पूर्वी जैपुरवाल्याकडे चाकर होते. त्यास तेथें दौलतरामाचे कारभारांत गुजराण न पाहिली. सबब राजश्री खंडेराव हरी यांसी वचनप्रमाण होऊन, छ २६ रविलावलचे तारखेस परस्परें भेटी जाल्या. पांचशें लोक त्यांच्याबरोबर आहेत. तुरूत राव मशारनिल्हेंनीं लगामीं लाऊन, ठेऊन घेतलें आहे. कानोडचा किल्ला हस्तगत जाल्यानंतर पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

अंतरवेदप्रांतीं सीख व गुजर यांनीं जमाव करून मोठा हंगामा केला आहे. मार्गाचा निर्वाह पांच कोस होत नाहीं. दिल्लींत शहरांत रात्रीं चोरांचा उपद्रव बहुत जाला. त्यावरून राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं बहिरो कोनेर यांची रवानगी साहारनपुराकडे ठैराविली आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. राजश्री पाटीलबावांनीं चितोडगडास मोर्चे लाविले होते. त्यावरून राजे भीमसिंग चितोडकर हिरासा होऊन, राणेखानभाई व राजश्री आबा चिटणीस यांचे विद्यमानें सलुखाचा जाबसाल केला. नंतर राजश्री पाटीलबावांनीं अंबोजी इंगळे ह्यांस मशारनिल्हेकडे पाठवून वचनप्रमाण करून भेटीस आणावें ह्याप्रमाणें ठैरल्यावर, राजे भीमसिंगांनीं छ २० रविलावलचे तारखेस चितोडगड खालीं करून दिल्हा; व भेटीस येतों ह्मणून इंगळे मजकुरांचे मार्फत पैगाम केला. राजश्री पाटीलबावांनीं उदेपुरकर राणा यांजकडील कारभारी व पांचशें लोक आपल्याकडील गडांत दाखल केले. तदनंतर भीमसिंगासीं भेटी जाल्या. परस्परें बहुत शिष्टाचाराचें बोलणें जालें. मामल्याचाही जाबसाल लौकरच ठैरोन, राजश्री आंबोजी इंगळे ह्यांजपासीं पलटणा वगैरे फौज तैनातीस ठेऊन, राजश्री पाटीलबावा उज्जेनीस जाणार. चितोडगडाचा बंदोबस्त उदेपुरकर राणाचे जिम्मे करून जातीलसें आहे. परंतु मशारनिल्हेसीं कांहीं पैका ठैरोन नंतर किल्ला स्वाधीन करावा ऐसें ठैरलें आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ४२.

श्री. ९ डिसेंबर इ. स. १७९०.

''श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ २ माहे रविलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद

लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशर्जी छ ७ रविलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, नबाब निजाम अल्लीखान यांनीं दिल्लीचे नहरचा नक्षा आणविला होता. त्यावरून राजश्री बाबाराव गोविंद वकील यांनीं शोध करून नहरचा नक्षा तयार केला आहे. दो चौ रोजां येथून रवाना होईल. नबाब आसफजाह यांची जागीर भखरिदी देहेबरा दिल्लीसन्निध आहे. ते व गाजियाबाद यमुनापार ऐसीं दोन्हीं स्थळें बदस्तुर साबिक सोडून घ्यावीं ह्मणून वकिलाचें बोलणें राजश्री पाटीलबावांसी रूबकार आहे. आजतागाईत चितोडची मसलत होती, याजमुळें कांहीं ठेरण्यांत आलें नव्हतें. पुढें जाब ठेरल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. तैमुरशाहा बदस्तुर काबिलांत आहेत. मिर्जा अहसनबख्त यांसही तेथेंच तलब केलें आहे. जोधपुरकर राजे बिजेसिंग व जैपुरकर यांसीं मामल्याचे ऐवजाविसीं सख्त ताकीद आहे. राजश्री सुभेदारांनीं कांहीं फौज रावराजाचे मुलकांत पाठविली आहे, व खुद्द बदस्तुर देवशानजीक मुक्काम करून आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे. हे विनंति.''

लेखांक ४३.

श्री. ९ डिसेंबर इ. स. १७९०.

''पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री पाटीलबावांस नबाब निजाम अल्लीखान यांनीं पूर्वीं बिदरी वगैरे सरंजाम पाठविला होता. तो राजश्री बाबाराव गोविंद यांनीं राजश्री पाटीलबावांस नजर केला. त्यावरून राजश्री पाटीलबावांनीं पादशाहाकडील खिलत व जवाहीर हत्ती घोडे व आपल्याकडून पशमिन्याचा सरंजाम वगैरे इकडील तोफा तायफ राजश्री बाबाराव गोविंद यांचे पुतणे लक्ष्मणराव नामें यांजबरोबर देवून, नबाब मशारनिल्हेकडे रुखसत केलें आहे. नबावमजकूर यांचा विचार आहे कीं, दिल्लीची नहर दरोबस्त तयार करून पुनः नहर ज्यारी करावी. नहरचे तयारीचा अदमास येथून आणविला आहे. राजश्री बाबाराव गोविंद यांचे विद्यमानें राजश्री पाटीलबावांसीं बोलणें आहे. जाबसाल पक्केपणें ठेरल्यावर तेथून नहरचे तयारीस दोन लाख रूपये खर्चास येणार, ह्मणून वदंता आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ४४.

श्री. २७ डिसेंबर इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल त॥ छ० २० माहे रविलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजी छ २ माहे मजकुराचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, मिर्जा इस्मालबेग पूर्वीं जैपुराकडे कूच करून गेला होता. इतक्यांत नजबकुलीखानाचे स्त्रीनें वकील पाठवून पैगाम केला कीं, ह्या प्रसंगीं कानोडची कुमक केलीयासी जागा कायम राहाते. त्यावरून मिर्जा माघारे कानोडचे रुखास येऊन, आठ कोसांवर मुक्काम केला. छ ७ तारखेस राजश्री खंडेराव हरी यांसीं लढाईचा मुकाबला केला. रावमजकुरांनीं मैदानांत घेऊन, नंतर चहूंकडून हल्ला करोन मिर्जाची लढाई शिकस्त केली. चोवीस तोफा वगैरे सरंजाम लुटींत आला. मिर्जा हटोन कानोडास दाखल जाल्यावर, नजबकुलीचे स्त्रीनें दोन मण चंदी व शंभर मोहरा खर्चास पाठवून, मिर्जाची बहुत खातीर केली, व तेरा तोफा वगैरे जंगीं सरंजाम मिर्जाकडे पाठविला. आणि फौजेची निगादास्त ज्यारी करून पांच हजार लोक चाकर ठेविले आहेत. पुनः लढाई रूबकार आहे. पादशाहांनीं मिर्जाची लढाई शिकस्त जाल्याचें वृत्त श्रवण करून राजश्री खंडेराव हरी यांस सा पारचे खिलत, जेगा, शिरपेंच, मोत्यांची माळ, तरवार येणेंप्रमाणें इनायत करून, हत्ती घोड्यांची [नेमणूक] शाहाजीकडे जाली. राजश्री पाटीलबावांनीं राजे भीमसिंग चितोडकर यांस बरोबर नेऊन, उदेपुरकर राण्याची भेट करून, त्यांची आपसांत सफाई केली. राण्याचे बोलण्याप्रमाणें ऐवजाची सोय जाल्यावर उज्जेनचे रुखास कूच होणार आहे. नबाब वजीर लखनऊकर छ ३ तारीखेस लखनऊस दाखल जाले. इंग्रेजाचा तगादा ऐवजाविसीं सख्त. ह्मणून हैदरबेगखां वगैरे कारभारी सर्व सचिंत आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपा पत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ४५.

श्री. २७ डिसेंबर इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ २० माहे रविलाखर मु।। दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ २ माहे रविलाखरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावांनीं राजे भीमसिंग यांस बरोबर नेऊन, उदेपुरकर राण्याची भेट करून, भिमसिंगाची तकसीर माफ करविली. राण्याची मर्जी एकरूप नव्हती. परंतु राजश्री पाटीलबावांचा आग्रह फार, यास्तव भेटी जाल्या. राण्यासीं जाबसाल आहे कीं, करारप्रमाणें साठ लक्षांची सरबरा करून द्यावी. कदाचित् आपल्यासीं ऐवजाची सरबरा होत नसली, तरी राजे भीमसिंग यांसीं सर्फराजीचीं वस्त्रें देऊन बहाल करावें, ह्मणजे मशारनिल्हेस ऐवजाचा जिमा करितो. याप्रमाणें राणासीं जाबसाल रूबकार आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ वगैरे सडी फौज बदस्तुर छावणींत आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ४६.

श्री. डिसेंबर इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. मिर्जा इस्मालबेग जैपुराकडे कूच करून गेला होता. इतकियांत नजबकुलीखानाचे बेगम यांनीं मिर्जाकडे वकील पाठवून पैगाम केला कीं, खंडेराव हरी यांनीं कानोड शहरांत दखल करून किल्ल्यासीं मोर्चे कायम केले; आपसांत लोकांचा फितूर जाला आहे; ह्या प्रसंगीं तुह्मीं कुमक केलीयासी हें स्थळ कायम राहातें. खर्चाची सरबरा येथें आल्यानंतर होईल. ह्याप्रमाणें वकिलानें जाबसाल करून मिर्जाचा कूच कानोडचे रुखास करविला. हें वृत्त राजश्री खंडेराव हरी यांनीं छ ५ तारखेस रात्रीं श्रवण केल्यावर, तत्काल कानोडचा शह सोडून, बहीर बुणगे दरोबस्त रेवाडीस रवाना केले. नारनोळचे रुखास मिर्जाचे मुकाबल्यास गेले.

मिर्जांनीं तेथून कूच करून कानोडनजीक पांच कोसांवर मुक्काम करून छ ७ तारखेस लढाईची तयारी करून स्वार जाला. हें वृत्त राजश्री खंडेराव हरी यांनीं ऐकून लढाईचे मुकाबल्यास आले. तोफगोळ्याची लढाई दोन प्रहरपावेतों परस्परें जाली. मिर्जानीं हल्ला केला. त्यावरून इकडील लोकांनीं मैदानांत पेरवून, चहूंकडून हल्ला करून मिर्जाची शिकस्त केलियावर, मिर्जा कानोडास दाखल जाला. मिर्जा-कडील चोवीस तोफा वगैरे सरंजाम लुटींत आला. हें वृत्त पातशाहांनीं श्रवण करून तोफखान्याची सलख करून, रावमजकुरास सा पारचे खिलत, जेगा, शिरपेंच, मोत्यांची माळ, तरवार येणेंप्रमाणें भवानीकुंवर किल्लेदार ह्यांच्या हवाले करून, हत्ती घोड्याची परवानगी जबानी जाली आहे. कुंवरमजकुरांनीं खिलत रावमशारनिल्हेकडे छ १७ तारखेस रवाना केले. मिर्जा कानोडनजीक मु॥ करून आहे. नजबकुलीचे स्त्रीनें दोन मण चांदी व शंभर मोहरा व तेरा तोफा वगैरे सरंजाम मिर्जास देऊन, फौजेची निगादास्त ज्यारी करून, पुनः मिर्जानीं लढाईची तयारी केली आहे. रावमजकूर यांनीं वीस हजार फौजेचा जमाव करून लढाईस मुस्तेद आहे. दो चौ रोजां मिर्जाचा मुकाबला रूबकार आहे. श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ४७.

श्री. डिसेंबर इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं शिखांचे पारिपत्यास राजश्री माधोराव फाळके यांजबरोबर चार हजार फौज देऊन, अंतरवेदप्रांतीं खुर्ज्याचे जिल्ह्यांत पाठविलें आहे. त्यास, हलीं मिर्जानें लढाईची तयारी पुनः केली. हे आवाई रावमशारनिल्हे यांनीं ऐकोन, तुरूत खुर्जानजीक मु॥ करून आहेत. गढीबंद मवास यांसीं खंडणीचा जाबसाल केला. त्यावरून गुजर वगैरे जमीदारांनीं हंगामा केला आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

तैमुरशाहा बदस्तुर काबिलांत आहेत. सादुल्लाखान एलची व वजहुदीखान राजश्री पाटीलबावांकडील भावलपुरास दाखल जाले. तेथून विलायतेस जाणार. नबाबवजीर लखनऊकर यांनीं तैमुरशाहास तोफा तायफ वगैरे लवाजमा व हत्ती दोन येणेंप्रमाणें लखनऊहून पाठविलें आहे. दिल्लीचे मार्गानें पुढें जाणार. सेवेसीं श्रुत होय.

पूर्वीं शहा निजामुद्दीन यांचे तागिरीचा जाबसाल रूबकार होता. इतक्यांत मिर्जा इस्मालबेगाची आवाई ऐकोन बदस्तुर बहालीचीं पत्रें आलीं आहेत. दोन फिरंगी लखनऊहून आगऱ्यास आले. तेथून एका दो रोजां दिल्लीस येणार आहेत. येथें दाखल जाल्यानंतर पातशाहांची मुलाजमत होणार. पामरसाहेब कान्हपुराहून परभारें राजश्री पाटीलबावांचे लष्करास जाणार आहेत. परंतु नबाबवजीराकडून ऐवजाची सरबरा जालियासी डाकेवर दर मजल जातील, ह्मणून श्रवणांत आलें आहे. नबाबवजीर लखनऊकर छ ३ माहे मजकुरीं लखनऊस दाखल जाले. इंग्रेजांचे व पामरसाहेबांचे ऐवजाचा सख्त तगादा आहे. यास्तव हैदरबेगखां वगैरे कारभारी सर्व सचिंत आहेत. नबाबमजकुरांनीं कांहीं फौज बरतरफ केली. कारण कीं, इंग्रेजांचा भरणा जाल्यानंतर काय ठैरेल, तें प्रत्ययास आल्यावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ४८.

श्री. दिसेंबर इ. स. १७९०.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. नवाब अलीबहादर कोठड्यापलीकडे श्रीनगरनजीक वेत्रवतीतीरीं मु॥ करून आहेत. राजे बिजेसिंगबहादुर यांचें बोलणें आहे कीं, नोने अर्जुनसिंगास खारीज करून दरोबस्त मुलकाची जफ्ती करावी; पैकीं निम्मे सरकारांत घ्यावा व निम्मे मुलूख आह्मांस द्यावा. ह्याप्रमाणें जाबसाल ठैरल्यानंतर, नबाब मशारनिल्हेनीं राजेमजकुरांची बहुत खातरजमा करून, फौज बांद्याचे रूखास पाठवून तिकडील जप्ती केली व महाल सोडविले. ते राजश्री बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद यांचे जिम्मे करून, फौजखर्चाचा जिम्मा मशारनिल्हेकडे लाख रुपये दरमाहा ठैरला आहे. अर्जुनसिंगानें सरकारफौजेचा दबाव पाहून, बेणीहुजुरीचे पुत्रास शामील करून, इकडे सलुखाचें बोलणें लाविलें आहे, व अंतस्थ राजश्री पाटीलबावांकडे जाबसाल रूबकार आहे. अमलांत येईल तें विनंति लिहूं.

राजश्री खंडेराव हरी यांनीं दादरी वगैरे गड व नजबकुलीबद्दल दरोबस्त महाल जफ्त केले. नंतर कानोडचे किल्यासी मोर्चें कायम केले. किल्यांतील जमातदारांसीं साजीश करून, दोन हजार रुपये नख्त व सोन्याचीं कडी देणें कबुल करून, किल्यांतील बारूदचे कोठे सुमारे सव्वीस, जमादाराकडून अग्नी देऊन उडविले. त्यानें किल्यांतील बहुत लोक जाया जाले, व सरंजाम सर्व सोख्त

जाला. त्यावरून किल्ल्याचे लोक हिरासा होऊन सलुखाचा पैगाम रावमशारनिल्हेसीं आहे. रावमजकुरांचें बोलणें कीं, किल्ला जलदीनें खालीं करून दिधल्यास तीस हजार रुपयांची जागा तुह्मांस नेमून देतों. तेथें राहून गुजराण करावी. कदाचित् लढाईचा इरादा असल्यास, पारिपत्य करार वाक ही अंमलांत येईल. ह्याप्रमाणें जाबसाल रूबकार आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ ह्यांनीं जगोबानामें पांच हजार फौजेसीं रावमजकुराचे कुमकेस कानोडाकडे रवाना केलें आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ४९.

श्री. दिसेंबर इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. नवाब अलीबहादर भदोरचे मार्गानें झांसीनजीक दतियास दाखल जाले. दतियाकर राजा यांसीं खंडणीचा जाबसाल रूबकार आहे. परंतु तेथील खंडणी हमेशा राजश्री पाटीलबावांकडे येते, सबब राजाचा अनमान आहे. इकडून जातसमयीं नबाब मशारनिल्हेनीं हरएक कमाविसदारांसीं खंडणी सख्तीनें घेतली. हें वृत्त राजश्री पाटीलबावांनीं श्रवण करून, बुंदेलखंडचे राजेरजवाडे वगैरे सर्वांस पत्रें पाठविलीं आहेत कीं, खंडणीचा ऐवज कोणास न देतां इकडे पाठविणें. ह्याप्रमाणें वरचेवर पत्रें पाठविलीं आहेत. उमरावगीर गोसावी, हिंमतबहादराचा बंधु, चार हजार लोकांनिशीं दतियाचे मुकामीं येऊन नबाबास शामील जाला. परस्परें भेटी होऊन बहुत ममतेचें बोलणें जालें. नंतर सलाह ठैरण्यांत आहे कीं, डंघाईप्रांतीं जाऊन अर्जुनसिंगाचे मुलकाची खंडणी घेऊन वरकड बुंदेल्याची जागा जप्त करावी. ऐसा विचार सर्वांनीं ऐकोन राजेरजवाडे लढाईस मुस्तेद आहेत. हिंमतबहादर गोसावी यांचे अनुमतें तिकडील बंदोबस्त करणार, ऐसी वदंता चहूंकडे जाली आहे. अमलांत येईल ते सेवेसीं विनंति लिहूं."

लेखांक ५०.

श्री. दिसेंबर इ. स. १७९०

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. नबाब अलीबहादर जालोननजीक बारा कोसांवर मु॥ करून आहेत. हिंमतबहादर गोसावी यांचे विद्यमानें राजे छत्रजित दतियाकर यांची

खंडणी एक लक्ष रुपये ठैरून परस्परें भेटी जाल्या. नंतर सिमथरकर गुजर यांचा मामला पौण लक्ष रुपये ठैरला. त्याची सावकारीनिशा घेऊन, तेथून जालोनचे रूखास आले. पहाडसिंग, बेणीहुजूरीचा पुत्र, यानें गोसावी मजकुराचे इशाऱ्या-प्रमाणें लढाईची तयारी करून, नोने अर्जुनसिंग याची शिकस्त केली. दोन हजार लोक गोसावीकडील अर्जुनसिंगाकडे चाकर राहिले होते, ते युद्धाचे प्रसंगीं उठोन गोसावीकडे आले. अर्जुनसिंग पांचशें लोकांनशीं पळोन बांधास गेला. त्यावरून नबाब मशारनिल्हे यांचा विचार आहे कीं, अर्जुनसिंगाचा मुलूख दरोबस्त जप्त करून आपल्या कबज्यांत करावें, ऐसा बेत आहे. गुदस्तां अर्जुन-सिंगाचा मामला राजश्री पाटीलबावांसीं ठैरला होता. हल्लीं नबाब मशारनिल्हे यांची स्वारी त्या प्रांतीं गेल्यावर, पहाडसिंगानें जमाव करून, अर्जुनसिंगाचें प्रांतांत उपद्रव केला आहे. हें वृत्त राजश्री पाटीलबावांनीं श्रवण करून बहुत बेदील आहेत. राजश्री बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद यांचे आपसांत चित्तशुद्धता नाहीं, सबब अद्यापि मशारनिल्हेकडे आले नाहींत. येणार आहेत. झांसीकर सुभेदार व राजश्री शिवराम हरी दोन हजार फौजेनसीं नबाबमजकुरापासीं येऊन शामील जाले. हिंमतबहादर गोसावी ह्यांनीं पांच सात हजार खासगत फौज जमा केली आहे. तिकडील जाबसाल गोसावीमजकूर यांचे विद्यमानें रूबकार आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ५१.

श्री. ता० २० एप्रिल इ. स. १७९१.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ १६ माहे शाबान मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ २१ रजबचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तर, राजश्री पाटीलबावा पुष्करनजीक मुक्काम करून आहेत. राजश्री अंबोजी इंगळे यांस बिकानेरप्रांतीं फौजसुद्धां पाठविलें आहे. त्यास मशारनिल्हेची आंवई ऐकोन उदेपूरवाला वगैरे राजेरजवाडे यांचे वकील इंगळे मजकुराकडे मामल्याचे जाबसालास आले आहेत. तात्पर्य, तिकडील खंडणी घेऊन लष्कर श्रीमथुरेस छावणीस येणार आहे. जोधपूरकरांकडील बुधसिंग

वकील, दोन लक्ष रुपये नख्त व हत्ती, घोडे, बैल वगैरे भरण्याचा सरंजाम घेऊन आला आहे. त्यावरून राजश्री पाटीलबावांची ताकीद आहे कीं, नख्त ऐवजाचा अगोदर फडशा करून द्यावा. नंतर भरणा घेऊं. राजे बिजेसिंगासीं फकीरजी गाढवे यांनीं निरोप मागितला. त्यावरून राजेमजकुरांनीं उत्तर केलें कीं, बुधसिंग येथें आल्यानंतर तुमची रवानगी करूं. गुंता नाहीं. धारराव वगैरे शिलेदारांचा दंगा बहुत आहे. तलब तनखा मागतात. त्यास यांची मर्जी आहे कीं, वर्षांचे सहा महिने घ्यावे. ह्मणून सर्व बेदील आहेत. राजश्री पाटीलबावांनीं राजश्री आबा चिटणीस वगैरे कारकून मंडळीस सांगितलें कीं, ऐवजाची सरबरा करून शिबंदीचा फडशा करावा. त्यावरून सर्व सचिंत आहेत. जयपूरकरांकडील मामल्याबद्दल ऐवज व भरणा आला नाहीं. ह्मणून येथील ताकीद आहे. राजश्री सुभेदारांकडील पेंढारी वगैरे कांहीं लोक सांभरचे ठाण्यास जाऊन उपद्रव केला. ह्मणून तेथील कमाविसदारानें लढाई केली. पेंढारी वगैरे शिकस्त खाऊन माघारें आल्यावर राजश्री सुभेदारांनीं मिर्जा इस्मालबेगास अंतस्थपत्रें बोलावण्याचीं पाठविलीं आहेत. व मुनियमबेगाचेंही सूत्र लागलें आहे. परस्परें सरदारांत चित्तशुद्धता नाहीं. नवाब अलीबहाद्दर बुंदेलखंडप्रांतीं कूच करणार ह्मणून वदंता आहे. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविले आहेत त्यांजवरून श्रुत होईल. सदोदित कृपापत्रीं सांभाळ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ५२.

श्री. ११ मे. इ. स. १७९१.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ ७ माहे रमजान मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं चंद्र १६ साबानचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावांनीं पुष्कराहून दोन कूच, सांभरचे रूखास केले. एका दों रोजां तेथें दाखल होणार आहेत. जोधपुरकराकडील बुधसिंग वकील यांनीं भरण्याचा सरंजाम व लाख रुपये नख्त मामल्याबद्दल आणिले आहेत. बाकी राहील ती सांभरांत पावल्यावर फडशा करून द्यावा, ह्याप्रमाणें बोलणें ठैरलें आहे. मिर्जा इस्मालबेग जोधपुरांत आहे. राजे बिजेसिंग दो लक्षांची

जायदाद करून देतात. परंतु मिर्जाची उमेद भारी. यास्तव अद्याप पक्कें ठैरलें नाहीं. मिर्जाचा इरादा रेवाडीप्रांतीं मुनियाबेगाचे कुमकीस यावेसें आहे. ह्मणून राजश्री पाटीलबावा सांभरांत मु॥ करून, बिजेसिंगाचा जाबसाल कैसा येतो हें मनास आणून, मग छावणीस येणार आहेत. राजश्री सुभेदार जैपुरप्रांतीं देवशास मु॥ करून आहेत. जैपुरवाल्याकडून रोडजी खवास मामल्याचे जाबसालास आले आहेत. सोळा लक्षांवर मामला कबूल करतात. पैकीं मुलकांत पायमाली केली ती मुजरा द्यावी ह्मणून रदबदली आहे. अद्यापि पक्कें ठैरण्यांत आलें नाहीं. जाबसाल रूबकार आहे. नबाब अल्लीबहादर अजमेरचे जारतीस जाणार आहेत. नजबकुलीखान बदस्तुर गोकुळगडास मोर्चे लाऊन आहे. नबाब गाजुद्दीखान व मिर्जा अहसनबख्त शहाजादे लाहोरप्रांतीं कांगड्यांत दाखल जाले. तेथून तैमूरशहास पत्रें पाठविलीं आहेत. महासिंग नामें सीख, मोठा सरदार, अटक नजीक होता. तो मृत्यु पावला. सबब तैमूरशहांनीं काबिलाहून पेशावरचे रुखास कूच केलें. तेथें दाखल जाल्यावर श्रवणांत येईल ते विनंति लिहूं. मिर्जा फिरोजबख्त शहाजादे यांचे शरीरास ज्वराचे वगैरे अनेक उपद्रव जाले. ह्मणून केवळ समाधान नाहीं. यास्तव पादशाहा बहुत सचिंत रात्रंदिवस आहेत. भरंवसा शहाजादे यांचा नाहीं. शहा निजामुद्दीन यांनीं पालम वगैरे दोन गांव ताख्तताराज केले. ह्मणून गुजर व जाट मिळोन चोरीचा वगैरे अनेक उपद्रव केला आहे. नबाबवजीर श्रीअयोध्येस मोठी बेगमेचे भेटीस गेले आहेत. आठा चौ दिवसां माघारे लखनऊस येणार. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचें पत्रीं विनंति लिहिली आहे त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना. ”

लेखांक ५३.

११ मे. इ. स. १७९१.

“ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंति येथील कुशल तागाईत छ ७ माहे रमजान मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ १६ साबानचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावांनीं पुष्कराहून दोन कूच सांभरचे रूखास केले. एका दो रोजां तेथें दाखल होणार. राजश्री कृष्णाजीपंत चिटणीस यांस

राजश्री पाटीलबावांनीं हुजूर रुखसत केलें आहे. तात्पर्य, नबाब अल्लीबहादर यांनीं सरकारांत बोभाट लिहून, श्रीमंतांचे चित्तांत आह्मांकडील संशय आला, ह्मणून मशारनिल्हेबरोबर दोन चार घोडी वगैरे शालनामी सरंजाम व पंधरा लक्षांची हुंडी देऊन पुष्करचे मुक्कामाहून रवानगी केली. सरकारचा संशय दूर करून इकडील कामाची पोख्तगी करून आणावी, व हुंडी वगैरे सरंजाम हुजूर गुजराणून सर्व मतालीब करून यावें, ह्मणून मशारनिल्हेस सांगितलें आहे. त्यास पंतमजकूर उज्जेनीस जाऊन, राजश्री आबा चिटणीस यांचे मुलीचें लग्न करून, यांच्या लिहिल्यान्वयें पुढें जातील. राजश्री रायाजी पाटील यांनीं घरीं जाण्याचा निरोप घेतला. जालीमसिंग कोटेकर यांचा जाबसाल, राजश्री लालाजी बल्लाळ यांचे विद्यमानें, मागील बाकीसुद्धां फडशा होऊन, मशारनिल्हेस वस्त्रें हत्ती घोडा वगैरे जवाहीर, वरकड मंडळीस वस्त्रें सर्फराजीचीं देऊन निरोप दिल्हा. राजश्री अंबोजी इंगळे यांस मेवाडप्रांतीं रवाना केलें. व जालीमसिंगासही सांगितलें कीं, तुह्मी चार दिवस यांच्या सामील होऊन मेवाडचे मामल्याचा फडशा लौकर करून द्यावा. इंगळे मजकुरांचें मानस होतें कीं, राजश्री पाटीलबावांनीं महिना पंधरा दिवस ह्या प्रांतीं राहावें. परंतु राणेखानभाई वगैरे यांची सलाह सांभरास जाऊन तेथें महिना पंधरा दिवस राहाणें जाल्यास चिंता नाहीं. लष्करांत वैरण व पाणी नाहीं. ह्मणून लोकांस बहुत उपद्रव जाला आहे. यास्तव दरकूच मु॥ मजकुरास दाखल होणार आहेत. नबाबवजीर श्रीअयोध्येस दाखल जाले. मोठी बेगमची भेट घेऊन, आठा चौ रोजा माघारे लखनऊस येणार आहेत. मेंहदीघाटाकडे अंतरवेदप्रांतीं गंगातीरीं येऊन छावणी करावी, ऐसा विचार श्रवणांत आला आहे. शहा निजामउद्दीन यांनीं पालम वगैरे दोन गांव ताख्त-ताराज केलें. सबब, गुजर व जाट एकत्र होऊन, जमाव भारी करून, रात्रीं चोरीचा वगैरे उपद्रव बहुत केला आहे. ह्मणून शहाजीनीं आपले लोक येथें बोलावले आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ५४.

श्री. १२ मे इ. स. १७९१.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार



(३) नेपोलियन बादशाहाचें विनोदचित्रः—

(नेपोलियन बादशाहा पादाक्रांत झाल्यानंतर इंग्लंडमध्यें झालेल्या विजयानंदाचें प्रदर्शन.)

विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ८ माहे रमजान मु॥ दिल्ली जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ ७ माहे मजकूरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, छ ७ तारिखेस मिर्जा फिरोजबख्त शहाजादा चार घटका मागील रात्र राहतां मृत्यु पावले. पादशाहांस परम दुःख जालें आहे. दोन दिवस अन्न देखील भक्षिलें नाहीं. बहुत श्रमी आहेत. राजश्री पाटीलबावा सांभरास दाखल जाले. कांहीं दिवस तेथें मु॥ होतील. डिभाई फिरंगी यांचीं दोन पलटणा गोकुळगडाचें पारपत्यास तेथून येणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ५५.

श्री. १२ मे इ. स. १७९१.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ ८ माहे रमजान मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ ७ माहे मजकुरीचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, मिर्जा फिरोजबख्त शहाजादे यांचे शरीरास बहुत दिवस समाधान नव्हतें. छ ७ तारिखेस चार घटका मागील रात्र राहतां मृत्यु पावले. पादशाहांस परम दुःख जालें. दोन दिवस अन्न देखील भक्षिलें नाहीं. बहुत श्रमी आहेत. त्यास सरकारची अर्जी खलिता पादशाहांस समाधानाचे पाठविले पाहिजे. नबाब-वजीर वगैरे सर्वांची अर्जी येतील. ह्मणून विनंति लिहिली आहे. राजश्री पाटीलबावा सांभरास दाखल जाले. कांहीं दिवस तेथें मु॥ होईल. डिभाई फिरंगी यांचीं दोन पलटणा गोकुळगडाचे पारपत्यास तेथून येणार आहेत. वरकड वर्तमान बदस्तुर आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ५६.

श्री. मे इ. स. १७९१.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. जोधपुरकराकडील बुधसिंग वकिलानें राजश्री पाटीलबावांसीं

जाबसाल केला कीं, "आपण येथून कूच करून सांभरास मु॥ करावें. ह्मणजे मामल्याबद्दल बाकीचा ऐवज व भरणा दरोबस्त आदा होईल. हल्लीं एक लक्ष रुपये नख्त वैगेरे जवाहीर व आणीक भरण्याचा सरंजाम तयार आहेत. तो येथून कूच केला ह्मणजे दाखल करतों. गुंता नाहीं." ह्याप्रमाणें बोलणें जालें. आणि तेथें वैरणाची कमती फार जाली. त्यानें बहुतेक घोडीं उंटें मेलीं. सबब पुष्कराहून दोन कूच सांभरचे रुखास जाले. मिर्जा इस्मालबेग जोधपुरांत आहे. राजे बिजेसिंग तीन लाख रुपयांची जायदाद करून देतात. परंतु मर्जीत येत नाहीं. दहा लक्षांचे सरंजामी महाल लाऊन द्यावे ह्मणून रदबदली आहे. राजश्री पाटीलबावांनीं फकीरजी गाडवे यांस लिहिलें आहे कीं, तुह्मीं तुरुत आठ चार दिवस जोधपुरांत राहून मिर्जा मजकुराचा जाबसाल काय ठैरेल तें ध्यानास आणून लिहावें; व राजे बिजेसिंगासही येविसीं सांगावें कीं, मिर्जास ठेवणें ठीक नाहीं. तेथून खारीज होय तें करावें. मिर्जाचा इरादा आहे कीं, राजश्री पाटीलबावा छावणीस गेले म्हणजे रेवाडीकडे जाऊन, पुनः उपद्रवास प्रारंभ करावा व मुनियमबेगाची कुमक करावी. ऐसा विचार आहे. पुढें अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ५७.

पै॥ छ २९ सवाल सन इसन्ने तिसेन ज्येष्ठ मास.

श्री.

७ जून इ. स. १७९१.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ ४ माहे सव्वाल मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ ७ व छ ८ रमजानचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजे प्रतापसिंग कृष्णगडकर यांनीं राजश्री पाटीलबावांची मेजवानी केली व वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडा यांस, व वरकड मंडळीस वस्त्रें सर्वांस दिल्हीं. परस्परें बोलणें होऊन ठैरलें आहे कीं, चितोडवाल्याचा मामला ठैरल्यावर राजश्री अंबोजी इंगळे यांस अजमेरप्रांतीं ठेऊन जाऊं, ह्मणजे तुह्मीं एक विचारें बंदोबस्त करावा. ह्याप्रमाणें राजेमजकुरासीं बोलणें जालें आहे. मिर्जा अकबर शाहाजादे व शहा निजामुद्दीन यांसीं परस्परें विरुद्ध लागलें आहे. सांप्रत मिर्जांनीं आपल्याकडून हाजी नामें राजश्री पाटीलबावांकडे पाठवून, येथील साकल्य वृत्त राणेखानभाईस लिहिलें. त्यावरून भाईनीं तपशिलें राजश्री पाटील-

बावांसी सांगितलें. त्यावरून बहुत बेमर्जी शहाजीवर आहे. व पत्रें ताकीदीचीं आलीं आहेत कीं, तुह्मीं पातशाहा व अकबरशाहा वगैरे यांसीं सख्तगोई करितां, हें ठीक नाहीं. इतक्यावर तुमची स्थिति राहणार नाहीं. व राजश्री आबा चिटणीसांसही येविसीं ताकीद आहे कीं, शहाजीस लिहोन, पातशाहा व अकबर-शाहाचा राजीनामा आणवावा. त्यास सांप्रत येथें राजीनामा घ्यावयाचा उद्योग आहे. युक्तीनें घेऊन पाठवितील. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

पै॥ छ १५ जिल्काद सन इसन्ने तिसेन. आषाढ.

लेखांक ५८.

श्री.

७ जून. इ. स. १७९१.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ४ माहे सव्वाल मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष:– पेशजीं छ ७ व छ ८ रमजानचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावा सांभराहून मारोटनजीक जैपुराहून विसा कोसांवर मु॥ करून आहेत. मारोटवाल्याचा जाबसाल लागला आहे. ऐवजाची निशा जाली. यानंतर जैपुरकरांकडील मामलयाची बेबाकी करून छावणीस येणार आहेत. फकीरजी गाडवे जोधपुराहून भरण्याचा सरंजाम घेऊन लष्करांत पावले. शिलेदाराचा गवगवा आहे. सबब अद्यापि बुधसिंगांनीं सरंजाम दिल्हा नाहीं. मिर्जा इस्मालबेगास बिजेसिंगांनीं तीन लक्षांची जायदाद करून ठेऊन घेतलें आहे. परंतु मिर्जाचा विश्वास कोणासही नाहीं. राजश्री सदाशिव मल्हार व अंबोजी इंगळे चितोडनजीक जाऊन गडीस मोर्चे कायम केले आहेत. त्यावरून भीमसिंगाकडील वकील मामलयाचे जाबसालकरितां इंगळेमजकुरांकडे आला आहे. उदेपुरचा जाबसाल जालीमसिंग कोटेकर यांचें विद्यमानें रूबकार आहे. राजश्री सुभेदार व नबाब अल्लीबहादर बदस्तुर देवश्यास मु॥ करून आहेत. रावराजाचे मुलकांत जाऊन जप्ती करावी ऐसा विचार, रोडजी खवास यांचे अनुमतें करून ठैरला आहे. परंतु मामलयाची बेबाकी जाल्यावर कूच होणार. जैपुरकरही ह्या गोष्टींत सामील आहेत. मिर्जा अकबरशहा व शहानिजामुद्दीन

यांसीं परस्परें विरुद्ध लागले आहे. त्यावरून राजश्री पाटीलबावांची इतराजी शहाजीवर आहे. पादशाहाचा राजीनामा आणविला आहे. त्यास, येथून राजीनामा गेल्यावर ठैरेल तें प्रत्यास आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून श्रुत होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे विनंति."

लेखांक ५९.

श्री. २९ जून इ. स. १७९१.

" श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २६ माहे सव्वाल मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ ४ माहे मजकुरींचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावा यांनीं राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस इकडील मुखतारीचीं वस्त्रें देऊन, जिवबा बक्षी वगैरे देशची फौज व डिभाई फिरंगी कंपूसुद्धां मशारनिल्हेचे तैनातीस ठेऊन, मौजे देवळीहून दोन कूच मेवाडचे रुखास केले. राजश्री अंबोजी इंगळे यांची पत्रें वरचेवर आलीं कीं, आपल्या आल्याखेरीज इकडील बंदोबस्त होत नाहीं. सबब दरमजल चितोडास जातात. तेथील मामला फडशा जाल्यावर सावकारी निशा घेऊन तेथून परभारें उज्जनेस जावें ह्मणून वदंता आहे. राजश्री खंडेराव हरी यांस रेवाडी व मेवात वगैरे प्रांतचें बंदोबस्तास पाठविणार. राजश्री पाटीलबावा सांभरास पावल्यानंतर, राव मशारनिल्हे वगैरे फौजा छावणीस श्रीमथुरेस दिल्लीचे मार्गानें येणार आहेत. त्यास, तेथें दाखल जाल्यावर रवळोजी शिंदे यांजबरोबर कंपू वगैरे फौज देऊन पटियाल्याकडे सिखांचे मुकाबल्यास पाठवावें, व राजश्री गोपाळराव रघुनाथ यांणीं छावणींत राहून दिल्ली आगरा ग्वाल्हेर वगैरे प्रांत येथील बंदोबस्त राखावा, ह्याप्रमाणें ठरलें आहे. राजश्री सुभेदार व नबाब अल्लीबहादर देवश्यास बदस्तुर मुक्काम करून आहेत. जैपुरवाल्यांकडील मामल्याची बेबाकी करून नंतर छावणीस येणार आहेत. नबाब मशारनिल्हे यांनीं गनीबगास धरून कैद केलें. हल्ली शिलेदारांचा गवगवा बहुत आहे. यास्तव राजश्री सुभेदारांसी ऐवजाकरितां निकड करावी ऐसा विचार आहे. सादुलाखान एलची तैमुरशहाकडील यास राजश्री पाटीलबावांनीं रुखसत केलें. दहा हजार रुपये

नख्त व खिलत जवाहीर मशारनिल्हेस व हमराही लोकांस खिलत वस्त्रें देऊन विलायतेस रवाना केलें. वजहुदीखान यास आपल्याकडून शहाकडे पाठविलें आहे. पांच पोषाख वस्त्रें व हत्ती वगैरे तोफा तायफ देऊन एलची बरोबर रवाना केलें. त्यास लौकरच दिल्लीस येणार आहेत. तेथें आल्यानंतर पादशाहांचे विचारें आणीक सरंजाम लागेल तो शहाजीकडून देविले आहेत. ते घेऊन विलायतेस दरमजल जाणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ६०.

पै॥ छ जिल्हेज, श्रावण. **श्री.** २९ जून इ. स. १७९१.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल ता॥ छ २६ माहे सव्वाल मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ ४ माहे मजकुरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावांनीं तीन कूच पैदरपै मेवाडचे रुखास केले. राजश्री अंबोजी इंगळे यांचीं पत्रें वरचेवर आलीं कीं, चितोडचा मामला आपले आल्याखेरीज होत नाहीं. यास्तव दरमजल जाणार आहेत. तेथील मामला विल्हेस लाऊन परभारें उज्जेनीस जावें ऐसा विचार श्रवणांत आला आहे. सादुल्लाखान एलची तैमूरशहाकडील यांस ठेविलें होतें. हल्लीं एलचीस निरोपाचीं वस्त्रें व बारा हजार रुपये नख्त खर्चास व जेगा शिरपेंच वगैरे हमराही लोकांस वस्त्रें देऊन छ १७ तारखेस रुखसत केलें. व आपल्याकडून वजहुदीखान यांस एलचीबरोबर पाठविलें आहे. व तैमूरशहास पांच पोषाख वस्त्रें देशचीं व हत्ती दोन वगैरे तोफा तायफ शहाचे नजरेस देऊन रुखसत केलें. त्यास आठा पंध्रा रोजा दिल्लीस येणार आहेत. येथें आल्यानंतर पादशाहांची मुलाजमत होऊन पुढें काय ठैरेल, अंमलांत येईल, तें सेवेसीं विनंति लिहूं. वजहुदीखान यानीं विलायतेस जाऊन, शहास सर्व सरंजाम नजर करून, तेथून श्रीमंत स्वारीस खिलत व अलकाब वगैरे बहुमान सर्फराजीचा घेऊन यावा, ह्यास्तव त्वरेनें पाठविलें आहे. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणी पत्रावरून व

अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६१.

श्री. २९ जून इ. स. १७९१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, राजश्री पाटीलबावांनीं राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस आपल्याकडून इकडील मुखतारीचीं वस्त्रें देऊन, राजश्री जिवबा बक्षी वगैरे देशची फौज व डिभाई यांस कंपूसुद्धां रावमशारनिल्हेचे तैनातीस देऊन, सर्वांस सर्फराजीचीं वस्त्रें दिल्हीं, व दिल्लीचे रुखास रवाना केलें. तात्पर्य, राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं छावणींत राहून, आगरा, दिल्ली व ग्वालेर वगैरे प्रांतचा बंदोबस्त राखावा, आणि राजश्री रवळोजी शिंदे यांजबरोबर फौज देऊन शिखांचें पारिपत्यास पटयाल्याकडे पाठवावें, याप्रमाणें ठैरल्यावर रावमजकूर यांस छ० १६ तारीखेस इकडे रुखसत केलें. परंतु शिलेदारांची कांहीं समजोत होणें राहिली; सबब दो चौ रोजाचा अटकाव जाला आहे. शहाजी व रणजीतासिंग जाट, जोतपुरकर वगैरे सर्वांस पत्रें आलीं आहेत कीं, रावमशारनिल्हेचे विचारें रहावें. त्यास शिलेदारांची समजोत जाहल्यावर दरकूच छावणीस येणार आहेत. मथुरेस दाखल जाल्यानंतर काय विचार ठैरोन अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ६२.

श्री. जून इ. स. १७९१.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, राजश्री पाटीलबावा चितोडनजीक एक कोस अलीकडे मु॥ करून आहेत. राजे भीमसिंग चितोडकर याजकडून अर्जुनसिंग नामें वकील मामल्याचे जाबसालास राणेखान भाईचे विद्यमानें आला आहे. वीस लक्ष रुपये कबूल करितो. पैकीं पांच लक्ष पायमाली वजा करून पंधरा लक्षावर फडशा करावा, ह्याप्रमाणें चितोडकरांचें बोलणें आहे. परंतु राजश्री पाटीलबावांचा जाबसाल आहे कीं, पन्नास लक्ष रुपये नख्त व पंचवीस लक्षांचा मुलूख व चितोडगड येणेंप्रमाणें मामला ठैरल्यास करावा ह्मणून राणेखानभाईसीं बोलणें आहे. इतक्यांत खानमजकूर यांचे शरीरास गैरआरामी जाली. सबब दोन चार दिवस जाबसाल बंद होता. हल्लीं भाईमजकुरास कांहीं आराम आहे. राजश्री आबा

चिटणीस व खान मशारनिल्हे यांचें अनुमतें सलाह ठैरली आहे कीं, लष्करांत महागाई फार, यास्तव दारमदार करून लौकरच कूच करावें ऐसा विचार आहे. मामल्याची रूबकारी आहे. आठा चौ रोजां निशा जालियावर उज्जेनचे रुखास कूच होणार. राजे जालीमसिंग कोटेकर यांचे विद्यमानें मामला न ठैरला, सबब मशारनिल्हे बेदिल होऊन कोट्यास रुखसत जाले. राणा उदेपुरकरही आठा-पंधरा रोजा निरोप घेऊन जाणार. मिर्जा इस्मालबेग दौलतरामाचे इशाऱ्याप्रमाणें कानोडचे रुखास दरकूच आला आहे. इकडून राजश्री खंडेराव हरी यांनीं फौजेची निगादास्त जारी करून लढाईची तयारी केली आहे. मिर्जोनीं पेश-कदमी केल्यास लढाईचा मुकाबला होईलसें आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांसही ताकीद आली आहे कीं, लौकर फौज कानोडास रवाना करणें. त्यास, डिभाईकडील पलटणांची तयारी आहे. शिलेदार वगैरे फौजेची समजोत जालियावर बहिरोपंताची रवानगी दिल्लीकडे होणार आहे. राजश्री भास्कर लक्ष्मण यांस दरोबस्त पलटणाचें काम जालें आहे. कंपूचे जायदादेंत जलेश्वर व कोलमहावन वगैरे बारा लक्षाचे महाल लाऊन दिल्हे आहेत. मूर्तजाखान भडोच वगैरे मोंगले सरदार व रिसालदार यांची जायदाद राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं जप्त करून, सेर स्वार दहा रुपयेप्रमाणें नेमणूक करून नख्ती ऐवज द्यावा ह्याप्रमाणें ठैरलें आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६३.

पैवस्ती छ २९ सव्वाल. **श्री.** जून इ. स. १७९१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. नबाबवजीर श्रीअयोध्येस गेले होते. मोठी बेगम यांची भेट घेऊन पुढें गोरखपुराकडे जावयाचा विचार होता. इतक्यांत लखनऊस मोची वगैरे दुकानदार यवन यांनीं साहुकाराचे ब्राह्मणास जिवें मारिलें. नंतर ब्राह्मणांनीं जमाव करून एक यवनास मारल्यानंतर, मोची वगैरे मुसलमान सर्व जमा होऊन शहरांत मोठा हंगामा केला. हैदरबेगखान व राजे टिकतराय यांचे घरावर यवन चालून आले. हें वृत्त नबाबांनीं श्रवण करून दरकूच लखनऊस दाखल जाले. यवनांनीं हंगामा केला होता, त्यांस धरून कैद केलें. व सांगितलें कीं, यांस शहरा बाहेर करून राज्यांतून काहाडून द्यावें, व सर्वांचे घराची जसी करावी. ह्याप्रमाणें हैदरबेगखानास सांगितलें. ह्मणून सर्व यवनांस मोठी

दहशत जाली. सिलेमासिको शहाजादे व बडेसाहेब फिरंगी यांजकडे जाऊन बहुत नम्रतेनें विनंति केली. त्यावरून शाहाजाद्यांनीं व बडेसाहेबांनीं नबाबास सांगून पाठविलें. परंतु नबाबांची मर्जी हेच कीं, यवनास येथून काहाडून द्यावें. आखीर बडेसाहेब नबाबाकडे येऊन, मोची वगैरे यवनांची तकसीर माफ करोन वजिराचे मर्जीनुरूप पांच लक्ष रुपये यवनांसीं दंड मागतात. दोन लक्ष रुपये मोची वगैरे कबूल करितात. नबाबाची ताकीद हैदरबेगखानास आहे कीं, यांसी पांच लक्ष रुपये घेऊन मुचलका लिहोन घ्यावा. पुनः ऐसी वर्तणूक न करावी ह्याप्रमाणें निक्षून ताकीद आहे. दहापंधरा रोजा खुद्द बहिरायच प्रांतीं शिकारेस जाणार. राजश्री पाटीलबावांस पत्रें पाठविलीं आहेत कीं, आपली फौज शिखांकडे रवाना जाल्यास आह्मांसही लिहावें. त्याप्रमाणें अनुपशहरांत पलटणा वगैरे फौज आहे ती रवाना करूं. परस्परें फौज शामील होऊन शिखांचें पारिपत्य यथास्थित केलें पाहिजे. पूर्वीं शिखांनीं एक फिरंगी धरून नेला. तो अद्यापि सोडला नाहीं. ह्मणून नबाबाचा इरादा जरूर पारिपत्य करावेंसे आहे. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति.''

लेखांक ६४.

श्री. आगष्ट इ. स. १७९१

“ पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. नबाब गाजुद्दीखान व अहसनबख्त शाहाजादा पटियालाप्रांतीं नाहनवाल्याचे राज्यांत आले होते. तेथें कांहीं लोक सिबंदी वगैरे जमा केले. हे बातमी येथें हुजुरांत समजल्यावर पादशाहांनीं नाहनवाले राजास व साहेबसिंग सीख पटियालेकर यांस शुके पाठविले कीं, नमकहराम यांस तेथून काहाडून देणें. त्यावरून राजेमजकुरानें नबाबास व शाहाजाद्यास स्पष्टच उत्तर दिल्हें कीं, आमचे राज्यांतून निघोन जावें. ह्मणून लाचार होऊन नबाब मशारनिल्हे व शाहाजादेमजकूर दरकूच निंबडीचे मार्गानें काबिलास गेले. सीख बदस्तुर आहेत. कुंजपुऱ्यावरच लढाई करून आले होते. त्यास कुंजपुरेकर गुलशेरखान पठाण यानें शिखांचा मुकाबला करून लढाई केली. बहुत लोक ठार जाले. आखीर सीख सिकस्त खाऊन माघारे गेले. भंगासिंगनामें सिखाकडील सरदार लढाईंत ठार जाला. देवजी गवळी वगैरे फौजसुद्धां मटगांवनजीक पाणिपतप्रांतीं आहेत. गढीबंदासी मामला घेऊन पुढें जाणार. शहाजीकडील दोन पलटणा व तोफा गवळीमजकुराचे कुमकेस गेल्या आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ६५.

श्री. अक्टोबर इ. स. १७९१.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. तैमुरशाहा बदस्तुर काबिलांत आहेत. आदलशाहा नामें मुरादशाहाचा बंधू तेथून पळोन काबिलास शाहापासीं येऊन मुलाजमत केली. हें वृत्त मुरादशाहांनीं श्रवण करून तैमुरशाहास नामा लिहिला आहे कीं, आदलशा बेरुखसत येथून निघोन आपणाकडे आला आहे. त्यास मशारनिल्हेस बजिन्नस इकडे पाठवून द्यावें. शाहांनीं प्रतिउत्तर लिहिलें कीं, ही गोष्ट घडणार नाहीं. पेशावरचे सुभेदारास रक्कम सादर जाली कीं, शाहदादखान यांस दहा हजार फौजेनिसीं अटक नदीवर पाठवून पुलाची तयारी करविणें. त्यावरून शाहदादखान बजमेयत आठ हजार स्वारांनिसीं अटक नदीतीरीं येऊन मुक्काम केला आहे. परंतु पुलाची आवाई मात्र आहे. शहाचे मुलकांत फितुर फार, यास्तव इकडे येणार नाहीं. मिर्जा अहसनबख्त शाहाजादा पेशावरांत शावलीखानाचे हवेलींत राहिले आहेत. शाहाची मार्गप्रतीक्षा करीतात. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६६.

श्री. २८ आक्टोबर इ. स. १७९१.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना येथील कुशल ता॥ छ २९ माहे सफर मु॥ दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– छ ३ माहे मजकुरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ राजगडनजीक मु॥ करून आहेत. उमेदासिंग राजगडकर यांचा मामला दीड लक्ष रुपये ठैरला. पैकीं लाख रुपये नख्त व पन्नास हजारांत घोडीं वगैरे सरंजाम भरण्यांत देतात. तेथील गुंता दो चौ दिवसांत उरकोन राघोगडचे सुमारें कूच करून येणार. राजश्री जिवाजी बल्लाळ व लखबा फौजसुद्धां जोधपुरचे रुखास कूच करोन गेले. जालीमसिंग व भीमसिंग यांजकडील वकील बरोबर आहेत. जाबसाल नजराणा वगैरेचा करितात. पैकाची सरबरा ज्यासीं होईल त्यास जोधपुरचे राज्यावर स्थापित करून, मागील मामल्याची बाकी व हालचा नजराणा वगैरे घेऊन येणार. राजश्री

सुभेदार यांसीं व इकडील सरदारांसीं आपसांत सफाई होऊन सलूखाचे बोलणें ठैरलें आहे. हाफड व गणमुक्तेश्वर वगैरे हिंदुस्थानचे महाल पूर्ववत्प्रमाणें सोडोन द्यावे. येविसीं राजश्री पाटीलबावांस पत्रें पाठविलीं आहेत. तेथील उत्तर आल्यावर डिभाईकडून महाल सोडवून देणार. दौलतराम हरदिया व पिरूसाहेब कंपूसुद्धां जैपूरचे जिल्ह्याची तहसील महालाची निराशी करतात. डिभाई साहेब श्रीमथुरेंत दाखल जाले. हातरस वगैरे महालाचा बंदोबस्त करून खुर्ज्याचे रुखास येणार आहे. नसीरखान बलोच याची अर्जी जमाशाहास आली कीं, हुमाऊ-शाहाची तकसीर माफ केली. यासी मशारनिल्हेस हुजूरांत घेऊन येतों. त्याव-रून जमाशाहांनीं बलोचमजकुरास प्रत्त्योत्तर लिहून पाठविलें कीं, त्यास कैद करून लौकर पाठवून द्यावें; नाहींतरी तुमचेंही पारिपत्य अमलांत येईल. मिर्जा अहसनबख्त कंधारनजीक पावले. शाहामजकुरांसीं भेटी होऊन काय नक्षा ठैरेल तें विनंति लिहूं. हसनरजाखान व टिकैतराय अद्यापि कलकत्त्याहून निघाले नाहीं. गवरनर साहेबांनीं फुलचरीकर फरासीसाचें पारपत्य करून तेथें आपला बंदोबस्त केला. शोर साहेब कलकत्त्यांत आहेत. राजश्री खंडेराव हरी फौजसुद्धां मौजे कांठीं प्रांतीं हरियाना येथें मु॥ करून आहेत. राजगड जमीदार भिवानी वगैरे जमा होऊन रावमजकुराचे मुकाबलयास आले आहेत. इकडूनही लढाईची तयारी होते. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वर-कड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्याना-रूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.''

लेखांक ६७.

श्री. २८ आक्टोबर इ. स. १७९१.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं: —

विनंति ऐसीजे. राजश्री गोपाळराव रघुनाथ राजगडनजीक मु॥ करून आहेत. उमेदसिंग राजगडकर यांची खंडणी दीड लक्ष रुपये ठैरली. पैकीं लाख रुपये नख्त दाखल जाले. बाकी पन्नास हजारांत घोडीं व कापड वगैरे भरण्यांत देतात. तेथील गुंता उरकोन राघोगडचे सुमारें कूच करून येणार आहेत. रावमशार-निल्हेंनीं बजुहुदीखानाचे मसोद्याप्रमाणें जमाशाहाचें नांवें अर्जी लिहून, एल-चीची रुखसत विलायतेस लौकरच करणार आहेत. राजश्री जिवाजी बल्लाळ व लखबा फौजसुद्धां जोधपुराकडे कूच करोन गेले. जालीमसिंग व भीमसिंगा-

कडील बरोबर आहेत. नजराण्याचा वगैरे जाबसाल करितात. त्यास, सांप्रत उभयतांकडील वकिलांस यांनीं उमेदवारींत लावून ठेविलें आहे. पैक्याची सरबरा ज्यासीं होईल, त्यास जोधपुरचे राज्यावर स्थापीत करावें ऐसा विचार आहे. राजश्री खंडेराव हरी यांनीं कानोड व नारनोळ वगैरे महालांत जैपुरकराचा दखल दिल्हा नाहीं. बहादरगड वगैरे येथील मामला चाळीस हजार रुपये ठैरले. हरयानचे दोन गांव ताख्ततताराज केले. तेथें लाख पन्नास हजारांची जिन्नस सांपडली. हल्ली काठीकर जमीदार व भिवानी वगैरे सर्व जमा होऊन रावमजकुरांचे मुकाबल्यास आले आहेत. यांनींही फौजेची निगादास्त करून लढाईची तयारी केली आहे. परंतु काठींत चाळीस हजार रांगडे लोक जमा जाले आहेत. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति. ''

लेखांक ६८.

श्री. आक्टोबर इ. स. १७९१.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं.—

विनंति ऐसीजे. नबाब हसन रजाखान व राजे टिकतराय अद्यापि कलकत्त्यांत आहेत. शौर साहेबांसीं आपले कामाची पोख्तगी करून येणार. गवरनर साहेबांनीं फुलचरीकर फरासिसाचें पारिपत्य करून तेथें आपला बंदोबस्त केला. ह्मणून पादशाहासी अर्जी आली. त्यावरून हजरतींनीं बहुत सर्फराजी करून शुका पाठविला आहे. साहेबमजकूर विलायतेस परभारें जाणार. नबाब इब्राहिमखान श्रीकाशींत अदालतचा दारोगा होता, तो मृत्यु पावला. सबब इंग्रेजांनीं अदालतचें काम खासगींत ठेऊन कलकत्तेकरास लिहिलें आहे. तेथील उत्तर आल्याप्रमाणें करतील. पातशाहांनीं मातमपुरसीचा शुका खान मशारनिल्हेचे लेकास लिहिला आहे. नबाबवजीराचे कारभारी यांस येथील शाश्वत नाहीं. ह्मणोन इंग्रेजांचे पेट्यांत शिरून आपला कबजा करावे ऐसा बेत आहे. वजीराचे मनांत अनेक कल्प विकल्प येतात. सांप्रत कलकत्त्यास दुसरा वकील पाठविणार. देवजी गवळी व बापू मल्हार यांनीं रात्रौ दौड करून शिखांवर छापा घालोन पन्नास चाळीस लोक जखमी व ठार केले. शंभर घोडीं शिखांचीं पाडाव आणिलीं. वरकड शीख पळोन पटियालाकडे गेले. तेथें जमाव करितात. मिर्जा इब्राहिमबेग जमांशहाकडील येलची यानें नबाबवजीराची मुलाजमत करून शहामजकुराचा शुका दिल्हा. वजीरांनीं सा पारचे खिलत येलचीमजकुरास इनायत केला. नंतर ऐफ साहेबांची भेट जाली. त्यांनींही खिलत दिल्हा. लौक-

रच येलचीमजकुराची रुखसत होणार आहे. नसीरखान बलोच याची अर्जी जमांशहास आली कीं, हुमाऊशहा येथें आले आहेत, त्यांची तकसीर माफ केलीयासी हुजुरांत घेऊन येतों. त्यावरून जमांशहांनीं प्रत्योत्तर लिहिलें आहे कीं, हुमाऊशहास बजिन्नस कैद करून पाठवून देणें. नाहींतरी तुमचेंही पारिपत्य अमलांत येईल. मिर्जा अहसनबख्त कंधारनजीक पावले. जमांशहाची भेट होऊन काय नक्षा ठैरेल तें मागाहून विनंति लिहूं. भंभोखान, गुलाम कादराचा बंधू, पहाडतळींत मृत्यु पावला, ह्मणोन शहाजीकडे अखबार आली. त्यांनीं हुजुरांत गुजराणिली. त्यावरून सेवेसीं विनंति लिहिली असे. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६९.

श्री. २८ अक्टोबर इ. स. १७९१.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं सरदाराचे इशाऱ्याप्रमाणें गुलाम महमंद येलची यांस रुखसत केलें. जमांशहास एकवीस किस्ती पोशाकी व दोन हत्ती व खानमजकुरास चार पारचे खिलत जेगा शिरपेंच व पांच हजार रुपये वाटखर्चास देऊन बिदा केलें. आठापंधरा दिवसांत दिल्लीस येणार आहे. येलचीचें बोलणें आहे कीं, मार्गांत हत्तीचा निभाव होणार नाहीं. राजश्री पाटीलबावांकडील अर्जी व पातशाहाकडून नामा जमांशहाचे नांवें तेथें तयार जाला आहे. येलची बरोबर रवाना होईल. दोन अर्जी मातमपुरसीबद्दल तैमुरशहाचे व दुसरी तख्तनशीनीची मुबारकबाद ऐसीं दोन अर्जी व दोन नामे पाठविणार आहेत. श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

नबाबवजीर लखनऊकर बहिरायच प्रांतीं शिकारेस गेले आहेत. नबाब हसनरजाखान व राजे टिकेतराय यांचे आपसांत चित्तशुद्धता नाहीं. सबब कलकत्तेकर शोर साहेबांनीं उभयतांस आपले लगामीं उमेदवारींत लावून ठेविलें आहे. करनेल नामें फिरंगी इंग्रजाचे विलायतेहून कलकत्त्यास आला आहे. परंतु अद्यापि मशारनिल्हेचा दखल जाला नाहीं. राजेमजकुरांचा विचार आहे कीं, इंग्रेजाची अंतस्थ साजीश राखून वजीराचा कारभार करावा. याप्रमाणेंच खान मशारनिल्हेंचें मानस आहे. पामर साहेब लखनऊस पावले. निरमलदास कारभारी

वगैरे यांची भेट जाली. येथून हजरतांनीं आपले खर्चाविसीं साहेबमजकुरास दोन शुके पाठविले आहेत. नबाबवजीर आल्यावर प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७०.

श्री. डिसेंबर इ. स. १७९१.

"पु ॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. तैमुरशाहा काबिलांत मुक्काम करून आहेत. दुराणी लोक पूर्वीं फितुरांत सांपडले, सबब पातशाहांस त्यांचा विश्वास राहिला नाहीं. यास्तव सर्वांस शहर बाहेर करून दिलें आहे. व तेथील आवादिस उनबला व कजल बाश (?) वगैरे लोक कुटुंबसहित बलख बुखारा व कुंपस वगैरे प्रांताहून बोलाविले आहेत, व नव लक्ष रुपये हवेली वगैरे इमारतीचे खर्चास देविले. लोकांचे राहावयास जागेची तयारी काबिलांत होत आहे. बादबरसात अटक अलीकडे येऊन, महासिंग वगैरे शीख यांचा मुलूख काबीज करावा ह्मणून शहाचा इरादा श्रवणांत आला आहे. राजश्री पाटीलबावा व नबाबवजीर लखनऊकर यांस हल्लीं पत्रें शहाचीं आलीं आहेत. परंतु अद्यापि त्यांचा मजकूर प्रत्यास आला नाहीं. आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं.

राजश्री पाटीलबावांनीं रेवाडी मेवात वगैरे प्रांतचे बंदोबस्तास राजश्री खंडेराव हरी यांस पाठविणार आहेत. वस्त्रें सर्फराजीचीं आलीं ह्मणून वदंता आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. नबाब अलीबहादर व राजश्री सुभेदार बदस्तुर देवशास मु॥ करून आहेत. जैपुरकराकडील मामल्याची बेबाकी करून श्रीमथुरेस छावणीस येणार. ऐसा बेत श्रवणांत आला आहे. गनीबेगास नबाब मशारनिल्हेंनीं कैद करून वस्तभाव सर्व जफ्त केली. हल्लीं शिलेदारीचा गवगवा भारी आहे. यास्तव राजश्री सुभेदारासीं ऐवजाची तलब करणार ह्मणून श्रवणांत आलें आहे. पुढें काय ठैरेल तें प्रत्यास आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं.

गोरख्या राजा यानें कुमाऊं वगैरे पाहाडांत बहुत उपद्रव केला. ह्मणून नाहनवाले व श्रीनगरकर राजे यांनीं नबाबवजीर लखनऊकर यांजकडे वकिलास पाठविलें कीं, आमची कुमक करावी. त्यावरून नबाबमजकुरांनीं वकिलाचे सांगितल्याप्रमाणें आपली फौज व रामपुरवाला फैजुल्लाखान यांची फौज काशीपूर रुद्रपुराकडे रवाना केली. गोरख्याकडील लोक पहाडतळीस होते. त्यांसीं लढाई जाली. नबाबाचे लोकांनीं त्यांस लुटून घेतलें. यास्तव हिरासा आहे. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७१.

श्री. २ दिसेंबर इ. स. १७९१.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ ५ माहे रविलाखर मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद-लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं चंद्र २९ माहे सफरचीं विनंतिपत्रें सरकारांत व सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, जमांशहा पादशाहा यांनीं हुमाऊशहास कैद करून शादीखान नामें हमराही मजकुरास जीवें मारिलें. नंतर तिकडील बंदोबस्त करून कंधारचे रुखास डेरे बाहेर दिल्हे. काबिलास येऊन पेशोरास येणार. शहा आबास, हिरातचा सुभेदार, जमांशहाचा बंधू, यानें आपली कन्या शहा-मशारनिल्हेचे पुत्रास देऊन, यांची ताबेदारींत हाजीर जाला. मुरादशहांनीं पातशाहास अर्जी केली कीं, मिर्जा अहसनबख्त यास हुजुरांत बहुत दिवस येऊन जाले, परंतु अद्यापि मिर्जाचे कामाचा बंदोबस्त अमलांत न आला. ह्मणोन रदबदलीनें सांगितलें. त्यावरून शहामजकुरांनीं उत्तर केलें कीं, पेशोरास दाखल जाल्यानंतर मिर्जाबरोबर फौज देऊन हिंदुस्थानांत रवाना करूं. अटक नदीचे पुलाविसीं पेशोरचे सुभेदारास ताकीद आहे. ह्याप्रमाणें आखबार पादशाहाचे हुजूरांत गुजरली. त्यावरून विनंति लिहिली आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ राघोगडनजीक आहेत. शेरासिंगाकडील खंडणीचा जाबसाल रुबकार असे. राजश्री जिवाजी बल्लाळ श्रीनाथद्वारनजीक जोधपुरप्रांतीं आहेत. भीमासिंगाकडील लोकांनीं रात्रौ जालीमसिंगावर छापा घालून, दोनशें लोक जखमी व ठार केले. जालीमसिंग हिरासा होऊन पळोन गेला. ह्मणोन वदंता आहे. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७२.

श्री. २ डिसेंबर इ. स. १७९१.

"श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ५ माहे रविलाखर मु॥ दिल्ली जाणोन

स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं चंद्र २९ माहे सफरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजसुद्धां राघोगड नजीक आहेत. शेरसिंगाचे खंडणीचा जाबसाल रूबकार असे. राजश्री जिवाजी बल्लाळ वगैरे फौज श्रीनाथद्वारनजीक जोधपूरप्रांतीं आहेत. भीमसिंग यानें रात्रौ दौड करून जालिमसिंगावर छापा घालून बहुत लोक ठार केले. मशारनिल्हे पळोन गेला. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं गुलाम महंमद येलचीस विलायतेस रुखसत केलें. एकवीस किस्ती पोषाख जमांशहास व हत्ती दोन व खानमजकुरास चार पारचे खिलत, जेगा, सिरपेंच व पांच हजार रुपये वाटखर्चास देऊन बिदा केलें. आठा पंधरा दिवसांत येथें येणार. राजश्री पाटीलबावांची अर्जी व हजरताकडून नामा जमाशहाचे नांवें तयार जाला आहे. तो येलची मजकुराबरोबर रवाना होणार. शहा मशारनिल्हेनीं हुमाऊंशहास कैद केलें. व शादीखान नामें हमराही मशारनिल्हे यांस जिवें मारून, कंधाराहून डेरे काबिलाचे रुखास केलें. पेशोरास येणार. मिर्जा अहसनबख्त यांची बहुत तसल्ली केली कीं, पेशोरांत दाखल जाल्यानंतर तुमचे मतालिब सर्व अमलांत येतील. अटक नदीचा पूल बांधावयास पेशोरचे सुभेदारास ताकीद आहे. नवाबवजीर बहिरायच प्रांतीं शिकारेस गेले आहेत. हसनरजाखान व राजे टीकतराय यांसीं आपसांत चित्तशुद्धता नाहीं. सबब कलकत्तेकर साहेब बिदा करीत नाहीं. करनेल नामें फिरंगी कलकत्त्यांत दाखल जाला. डिभाई साहेब गणमुक्तेश्वरास कार्तिक शु॥ १५ येणार आहेत. पामर साहेब लखनऊंत पावले. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७३.

श्री. २ डिसेंबर इ. स. १७९१.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नानास्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री खंडेराव हरी यांनीं मौजे बेरी येथील दार मदार राखून अठरा हजार रुपये खंडणी घेऊन, खैनुनिसा बेगम पादशाहांची, यांचे जागीरचे गांवांसीं आठ हजार रुपये नजराणा घेतला. तेणेंकडून हजरताची मर्जी बहुत

बेदिल जाली आहे. भवानी कुंवर संस्थानचे किल्लेदार रावमशारनिल्हेकडून आहेत. त्यांस आज्ञा जाली कीं, गांवचा ऐवज घेतला असेल तो माघारा देवावा. नाहीं तरी राजश्री पाटीलबावांस येविसीं लिहून पाठवूं. बहादरगडवाला अमीर महमदखान बलोच याचा मामला पंधरा हजार रुपये व चार तोफा ठैरला. पैकीं सात हजार नख्त दिल्हे व आठ हजारांत खान मशारनिल्हेंनीं आपले पुत्रास वोलिस देऊन रावमजकुरांची समजोत केली. सांप्रत रेवाडीचे रुखास रावमजकूर कूच करून आले. नारनोळ वगैरे महालांत अद्यापि अंमल दखल जैपूरकराकडील जाला नाहीं. डिभाई साहेब, श्रीमथुरेहून कूच करून आगऱ्यास जाऊन, मिर्जा इस्मालबेगासी भेटोन, सहाशें रुपये मशारनिल्हेचे खर्चास दिल्हे व बहुत ममतेचें बोलणें जालें. नंतर तेथून दरकूच पिरोजाबादचे महालांत येऊन तेथील बंदोबस्त केला. हल्लीं गणमुक्तेश्वरास येणार आहे. चितोडकर गोसावी पांच सात हजार जमा होऊन, अंबोजी इंगळे यांजवर चालोन आले. परस्परें लढाई जाली. पांचशें गोसावी जखमी व ठार जाले. तदनंतर शिकस्त खाऊन पळोन गेले. इंगळेमजकुराचे फौजेचा मुक्काम चितोडगडनजीक आहे. श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७४.

श्री. दिसेंबर इ. स. १७९१.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विनंति ऐसीजे. राजा रणबहादर नेपाळांत आहे. जगजीत नामें राजाचा नायब, वीस हजार फौजेनसीं कमाऊं वगैरे पहाडांत येऊन, पांच सात राजांस शिकस्त देऊन त्यांचें राज्य कबज्यांत केलें. नंतर श्रीनगरवाले राजाकडे पत्रें व पैगाम पाठविलें आहे कीं, राजे रणबहादर श्रीज्वालाजीचे दर्शनास जाणार आहेत; श्रीनगरचे मार्गें जातील. त्यास तुह्मी हाजीर होऊन चाकरींत राहावें. कदाचित् इरादा लढाईचा असला तरी तुमचेंही पारिपत्य होईल. येणेंप्रमाणें वकील पत्रें घेऊन गेले आहेत. व जगजीत पांडे यांची अवाई ऐकोन श्रीनगरचे लोक बहुत हिरासा आहेत. पांडेमजकुरांनीं हरएक ठिकाणीं किल्ल्याची तयारी केली आहे व निगादास्त ज्यारी आहे. नाहनवाले राजासही सांगून पाठविलें आहे कीं, तुह्मीं येऊन शामील व्हावें, अथवा लढाईची तयारी करावी. त्यावरून राजेमजकुरांनीं उत्तर पाठविलें आहे कीं, राजे रणबहादर यात्रेस येत

असले, तरी दहापंधरा माणसांनसीं यावें; माफजतीनें पोंचवून देतों. कदाचित् फौजसुद्धां यावयाचा इरादा असला, तरी लढाई जालियावर काय होणें तें होईल. ह्याप्रमाणें पत्रोत्तर आल्यावर पांडेमजकुरांनीं राजास लिहिलें आहे. तेथून उत्तर आल्यावर काय ठैरेल तें प्रत्यास आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७५.

श्री. जानेवारी इ. स. १७९२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—शोर साहेबांनीं कलकत्त्यांत वगैरे जागा गव्हर्नर साहेबाप्रमाणें आपला बंदोबस्त करून, नवाब हसन रजाखान व राजे टिकेतराय यांची खातरजमा करून, खिलत उभयतांस देऊन, छ ५ माहे रविलाखरीं लखनौस रुखसत केलें. हें वृत्त नवाबवजीर व वरकड कारभारी यांनीं श्रवण करून, श्रीकाशीपर्यंत सामोरे जाऊन भेट घ्यावी ऐसा विचार करून, एका दो दिवसांत निर्मळदास वगैरे मुत्सद्दी सर्व श्रीकाशीस जाणार आहेत. नवाबवजीर शिकारचे बहाणें जातील. शोर साहेब पहिल्यापासून इकडील सर्व कामास माहीत फार आहे. ह्मणून नवाब वजीर आदिकरोन सर्व अंदेशात रहातात. एक साहेब लखनौंत मुख्त्यार होता. तोही छ ११ रविलाखरीं नावेवर बसून कलकत्यास गेला. लखनौंत आपल्याकडून तीलयर साहेबास कामावर ठेवून गेला आहे. पामर साहेबांनीं कानपुरांत मेघफराश साहेब यास ठेवून स्वतः कलकत्यास गेले. सर्वांची बदली होणार. शेख रजीखान, पामर साहेबांकडील वकील हुजुरांत रहात होता, तो छ २६ तारखेस दिल्लींत आला. छ १ माहे मजकुरींचे तारखेस हुजूरची मुलाजमत शहाजीचें विद्यमानें करणार आहे. श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७६.

श्री. जानेवारी इ. स. १७९२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:— कंधाराहून जमाशहा दरकूच छ ५ रविलाखरीं काबिलांत दाखल जाले. मिर्जा आहसनबख्त यांनीं मुलाजमत केली. तत्समईं शहा मजकुरांनीं मलबूसखास वस्त्र व........मिर्जास इनायत करून बहुत ममतेनें

तसल्ली केली. दोन दिवस काबिलांत राहून नंतर पेशोरचे रूखास कूच केला. पेशोरांत दाखल जाले ह्मणोन आंवई आहे. सीतकाळीं हमेषा मुलतानांत अथवा पेशोरांत येतात. अमृतसरकर सावकारांनीं मात्र शहाची आंवई या प्रांतीं प्रसिद्ध केली. त्याचा इरादा सांप्रत नाहीं. लाहोर प्रांतीं कांहींक सीख जमा होऊन, आपले हद्दीवर जाऊन रहाणार. बापू मल्हार व देवजी गवळी, बहिरो कोन्हेर व सात पलटणा सहारणपुरेच जिल्ह्यांत आहेत. परंतु यांच्या आपसांत चित्तशुद्धता नाहीं. तेणेंकडून रामधन वगैरे तिकडील जमीदार पैका व अंमल द्यावयास अनमान करितात. श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७७.

श्री. ता. १७ जानेवारी इ. स. १७९२.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ १२ माहे जमादिलावल मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– स्वामींनीं कृपा करून पत्र छ २० जिल्हेज व छ १ रबिलावलचीं पाठविलीं, तें पावून सनाथ जालों. पेशजीं छ ५ रबिलाखरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तर, मिर्जा आहसन बख्त यांची अर्जी पातशाहाचे नांवें व पत्र शहाजीस आले होतें तें, मशारनिल्हेनीं बजिन्नस हजरतास गुजराणलीं. त्यांत मजकूर कीं, जमाशहांनीं दोनशें रुपये रोज करून देऊन ठेविलें आहे. जमाशहाचे नाम्याची नक्कल मिर्जांनीं येथें पाठविली. त्यांत मजकूर कीं, कंधार व हिरात वगैरे सुभेजातची बंदोबस्त यथास्थित अमलांत आला. हल्लीं काबिलांत दाखल जाल्यानंतर तुमचे मतलब सर्व मनोदयानुरूप घडून येतील. ह्मणोन बहुत ममतेनें लिहिलें आहे. अर्जी व नाम्याची नक्कल हजरतांनीं पाहून, सेरदरबार मिर्जामजकुरावर फारच दिक्क जाले. परंतु अंतस्थ पत्रें मिर्जाचे विद्यमानें जमाशहाकडे हमेशा जातात. कंधाराहून एक करोड रुपये व जवाहीर वगैरे बहुत माल आसबाब किल्ल्यांतून शहामजकुरास सांपडला. पन्नास लक्ष रुपये शिबंदीस देऊन चार दस्ते नवे तयार करून चाकर ठेविले असेत. राजश्री खंडेराव हरी हरयान्या प्रांतीं दादरीनजीक मुक्काम करून आहेत. राव***** प्रगणेंमजकूरचे गांवावर चढाई करून गेले. महासरा केला. त्यावरून जमी-

दारांनीं जमाव करून फौजेवर चालून आले. दोनशें लोक यांजकडील जखमी व ठार जाले. फौज हटून माघारे आली. तदनंतर जमीदारांनीं दारमदार करून, सात हजार रुपये मामला देऊन, राजी केलें. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७८.

श्री. जानेवारी इ. स. १७९२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राजश्री पाटीलबावांचीं पत्रें शाहाजीचे नांवें वरचेवर आलीं आहेत कीं, आपले पुत्रास जलदीनें आह्मांकडे रवाना करून देणें. येथें पावल्यावर आह्मीं बीडास जाऊन त्याचे लग्नसिद्धि करून बरोबर घेऊन येऊं. हबीबशहा येविशीं वारंवार लिहितात. त्यास, आतां विलंब न करावा. ह्मणोन वरचेवर पत्रें आलीं. त्यावरून मशारनिल्हेनीं पुन्हां आपले चिरंजिवाची रवानगी माहे मजकुरीं ठेरावली आहे. परंतु मीर सैद महंमद, शहाजीचे कनिष्ट बंधु, यांस केवळ समाधान नाहीं. यास्तव बहुत सचिंत रहातात. नवाब अलीबहाद्दर यांनीं बुंदेलखंड प्रांतीं तोडीयाचे किल्ल्यास मोर्चे लावून महासरा केला होता. तो सांप्रत काळीं किल्ला फत्ते होऊन खालीं करून घेतला. तेथें नवाबमजकुरांनीं आपला बंदोबस्त केला. बुंदेले सरदार रजपूत होते. त्यास कांहीं गांव जहागिरींत द्यावे ऐसें ठरलें. ह्मणून अखबार हुजुरांत गुजरली. त्यावरून सेवेसीं विनंति लिहिली आहे. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७९.

श्री. जानेवारी इ. स. १७९२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– पातशाहानीं छ ११ माहे मजकुरीं नशन केला. शेख रजीखान यांनीं शोर साहेब व नवाब वजीराकडील एकशें एक मोहोरा व पामर साहेबाकडून एकवीस मोहोरा नशनबद्दल हजरतास गुजराणल्या. अमीर महं-

मदखान, शहाजीचा पुत्र, यांनीं राजश्री पाटीलबावांकडील एकशें एक मोहोर नजर केली. तदनंतर वरकडांनीं माफक मरातब नजरा दिधल्या. शहाजींचे चिरंजिवाची रवानगी दरपेश होती. इतक्यांत सैद महमदखान शाहाजीचे कनिष्ट बंधू यांस पंधरा दिवसांपासून केवळ समाधान नाहीं. सबब रवानगींत अटकाव जाला. बहुत सचिंत रहातात. राजश्री खंडेराव हरी कानोडाहून वीस कोस पलीकडे लोहाऱ्यास मुक्काम करून आहेत. दुगल अल्लीखान नामें नबाब निजाम अल्लीखानाचा रिस्तेदार पूर्वीं नजबखानाचे हजरतापाशीं होता. हल्लीं रावमजकुराचे विचारें राजश्री गोपाळराव रघुनाथ यांजकडे जाऊन भेटला. तात्पर्य, बेदारशहाचा बंधू येथें किल्ल्यांत कैद शरीक आहे. त्यानें खानमजकुराशीं कागदपत्रीं साजीश करोन लष्करास राव मशारनिल्हेकडे पाठविलें आहे. सारांश, आम्हांस पातशाहा केल्यास पंधरा लक्ष रुपये देऊं. याप्रमाणें खुफीया जाबसाल रावमजकुराचे विद्यमानें सरदारांसीं लागला आहे. परंतु अद्यापि पक्केपणें बोलणें येथील ठैरलें नाहीं. हजरताचें मानस पहिल्यापासोन अकबरशहास सल्तनत व्हावी. श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ८०.

श्री. ता. १८ जानेवारी इ. स. १७९२.

''श्रीमंत राजश्री तात्या स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ २३ माहे जमादिलावल मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः–पेशजीं छ २९ रविलाखरचीं विनंतिपत्रें सरकारांत व आपणांकडे पाठविलीं आहेत. तें पावून साकल्य वृत्त निवेदन जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरीः–राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं राघोगडवाल्यांसीं पंचवीस हजार रुपये खंडणी घेऊन रामनगरचे रूखास कूच करून आले. शिलेदार वगैरे फौजेचा दंगा फार जाला आहे. राजश्री पाटीलबावांचीं पत्रें वरचेवर येतात कीं, पतियाळ्याकडे लवकर जाऊन शिखांचे मुलुखाचा बंदोबस्त करावा. ह्यावरून रावमजकूर दरकूच या प्रांतीं येणार. तैमुरशहाकडील येलची पूर्वीं रुखसत जाले होते. परंतु त्याचे खर्चाची सरबरा आज तागाईत जाली नाहीं. सबब बहुत बेदिल होऊन लष्करांत आहेत. राजश्री जिवाजी बल्लाळ व अंबोजी इंगळे यांनीं शहापूरवाल्याची खंडणी दीड लक्ष रुपये घेऊन

सांप्रत फौज व पिरू साहेबाचे कंपूसुद्धां सांभरनजीक येऊन मुक्काम केला. भीमसिंग व जालीमसिंग यांचे आपसांत सलूखाचा जाबसाल रुबकार आहे. जमाशाहा कंधाराहून दरकूच काबिलांत दाखल जाले. दोन दिवस तेथें होते. मिर्जा आहसनबख्त यांनीं मुलाजमत केली. तत्समयीं शहामजकुरांनीं मलबुसखास व घोडा मिर्जास इनायत केला, व बहुत तसली करून नंतर छ ५ रविलाखरचे तारिखेस कूच करून पेशोरनजीक पावले, ह्मणोन वदंता आहे. नवाब हसन रजाखान व राजे टिकेतराय श्रीकाशीनजीक आले. सबब नवाब वजीर वगैरे कारभारी सर्व छ ११ माहे मजकुरीं लखनौहून श्रीकाशीकडे कूच करून गेले. पातशाहांनीं छ ११ तारखेस नशन केला. शेख रजीखानांनीं शोर साहेब व नवाब वजीराकडील दोनशें दोन मोहोरा नशनबद्दल हुजुरांत गुजराणल्या. व अमीर महंमदखान शहाजीचा पुत्र यानें एकशें एक मोहोर राजश्री पाटीलबावांकडून नजर केली. वरकडांनीं माफक मरातब नजरा केल्या. शहाजीचे कनिष्ट बंधू मीर सैद महंमद यांस केवळ समाधान नाहीं. ह्मणोन अहर्निश सचिंत रहातात. डिभाई साहेब उदईक शहरांत दाखल होणार. श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें सेवेसीं लिहूं. वरकड सविस्तर वृत्त श्रीमंत राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे. त्यावरून निवेदन होईल. सदोदित कृपापत्रीं सांभाळ केला पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंति."

लेखांक ८१.

श्री. ता. १८ जानेवारी इ. स. १७९२.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ २३ माहे जमादिलावल मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ २९ रबिलाखरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून साकल्य वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं राघोगडचा शह सोडून कोलारसचे जिल्ह्यांत येणार. नरवर वगैरे प्रांतची खंडणी मिळेल ते वरचेवर घेऊन या प्रांतीं येतील. बाळोजी इंगळे राघोगडनजीक आले. तेथील मामल्याचा वगैरे जाबसाल इंगळेमजकुराकडे ठैरला. जिवाजी बल्लाळ व रावमजकूर यांचे आपसांत चित्तशुद्धता नव्हती. यास्तव सरदारांनीं उभयतांस अलाहिदा कारभार सांगोन फौजा ती ठिकाणीं केल्या. राव मशारनिल्हेचे लष्करांत

खर्चाची केवळ विपत्य. व फौजेचा हंगामा अहर्निश आहे. हसन रजाखान व राजे टिकेतराय कलकत्त्याहून दरकूच मकसुदाबाद अलीकडे आल्याचें वृत्त नवाब वजीरांनीं ऐकोन हत्तीची डांक श्रीकाशीपर्यंत पुढें रवाना केली. निर्मळदास व हुकसराय वगैरे कारभारी सर्व छ ११ माहे मजकुरीं लखनौहून कूच करून दरमजल श्रीस गेले. नवाबवजीरही श्रीअयोध्येस शिकारचे बहाण्यानें सामोरे जातील ऐसा विचार आहे. दुभाई साहेबांचे शरिरास समाधान नव्हतें. ह्मणोन खुर्जांत पंधरा दिवस राहून जुलाब घेतला. आतां आराम जाला. दो चौ रोजांत येथें येणार आहे. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वर्तमान पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८२.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७९२.

" पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विनंति ऐसीजेः– मीर सेख महंमद, शाहाजीचे कनिष्ट बंधू छ २३ जमादिलावलीं मृत्यु पावल्याचें वृत्त पूर्वीं सेवेसीं लिहिलेंच आहे. नंतर छ २६ जमादिलावलीं शाहाजीचे बागांत पातशाहा व अकबरशहा वगैरे जाऊन मशारनिल्हेचें बहुत समाधान केलें. तदनंतर मीरमजकुराचे पुत्रांसहित शाहाजीस किल्ल्यांत घेऊन आले. तीन तीन पारचे खिलत मीरमजकूरचे तिन्हीं पुत्रांस व हमराई मुत्सद्दी यांस............व दुशाले इनायत केले. डुभाई साहेब सुभ्याहून कूच करून छ ५ मिनहूस दिल्लीस आले. दुसऱ्या रोजीं शाहाजीकडे जाऊन, बहुत समाधान करून, मीर सेख महंमद याचे पुत्रास पांच वस्त्रें मातमपुरसीचीं दिल्हीं. तदनंतर छ १० तारखेस शाहाजीचे विद्यमानें साहेबमजकुरांनीं पातशाहाची मुलाजमत केली. अकरा मोहोरा हजरतास व एकएक मोहोर चाळीस शहाजादे यांस नजरा केल्या. नंतर हुजुरांतून दस्तार, सरबस्ता, निम अस्तिन, तुरा मुकेसी, व गोश्वारा, जेगा, शिर्पेंच, मोत्यांची माळ, तरवार, हाती, घोडा, साहेब मशारनिल्हेस व वगैरे हमराई लोकांस तीन खिलत, व जीवनखान, राव बखतावरसिंग माचेडीकराकडील कारभारी, यांस पांच पारचे खिलत वगैरे तीन दुशाले हमराई मुत्सद्दी यांस इनायत जाले. साहेबमजकुरही आठां चौ रोजीं येथून कूच करून मेवातचे जिल्ह्यांत जाणार आहेत. श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लेहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति "

लेखांक ८३.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७९२.

" पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं :—

विनंति ऐसीजे:- राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं राघोगडवाल्यासीं पंचवीस हजार रुपये खंडणी घेऊन, तीन मजला माघारे हटून, रामनगरचे सुमारें आले. राजश्री पाटीलबावांचीं पत्रें वरचेवर यांस येतात कीं, तुह्मीं पटियाल्या-कडे त्वरेनें जाऊन शिखांचे मुलुखाचा बंदोबस्त करावा. त्यावरून राव मशारनिल्हे सत्वरच या प्रांतीं येणार. परंतु सिलेदार वगैरे फौजेचा दंगा रात्रंदिवस रहातो. ह्मणोन अटकाव जाला आहे. गुलाम महंमद वगैरे तैमुरशहाकडील येलची यांची रुखसत पूर्वीं राव मशारनिल्हेनीं केली होती. अद्यापि येलचीचे खर्चाची सरबरा जाली नाहीं. सबब बेदिल आहेत. राजश्री जिवाजी बल्लाळ व अंबाजी इंगळे यांनीं शहापुरवाल्याचा मामला दीड लक्ष रुपये यांवर फडशा करून, सावकारी निशा घेऊन, सांभरचे जिल्ह्यांत फौज व कंपूसुद्धां आले. गढीबंद रांगडे यांचे खंडणी-चा जाबसाल रुबकार आहे. राघोगड व माडवाड वगैरे तिकडील प्रांताचा जाबसाल इंगळेमजकुराचे जिमें राजश्री पाटीलबावांनीं केला. त्यांसीं पंधरा लक्ष रुपये तलब केले आहेत. भास्कर लक्ष्मण यांचे शरीरास समाधान नाहीं. यास्तव जयपुरास रुखसत जाले. तेथें औषध उपाय करणार. बाळोजी इंगळे राघोगडनजीक आले. राव मशारनिल्हेच्या भेटी होणार आहेत. भीमसिंग व जालीमसिंग यांचे आपसांत सलूखाचा जाबसाल ठरण्यांत आला ह्मणोन वदंता आहे. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८४.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७९२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—समरूचे बेगमेनीं रात्रौ दौड करून, काल भुमिये सीख ठार करून, घोडीं वगैरे सरंजाम सर्व लुटून आणिला. जाहाज फिरंगी बेगम-मजकुरापाशीं बहुत दिवसापासोन चाकर होता. सांप्रत कालीं मशारनिल्हे फितु-रास प्रवर्तक होऊन, शिखास सामील होऊन, दोन चार गांव बेगमकडील ताख्त-ताराज केले. सबब बेगम यांनीं पलटण पाठवून जाहाज फिरंगीचें पारिपत्य करून कैद केलें. हल्लीं शहाजीनीं रदबदलीनें लिहून त्यास कैदेंतून सोडविलें


आहे. बापू मल्हार व बहिरो कोन्हेर यांचे आपसांत चित्तशुद्धता नाहीं. ह्मणोन रामधन जाट यानें सहारणपूरचे जिल्ह्यांत बदअमलीस प्रारंभ केला आहे. पैका देत नाहीं. अंतर्वेद वगैरे दिल्लीचे गिर्द, गुजरांनीं रात्रंदिवस चोरीचा उपद्रव केला. दसऱ्यास राजश्री पाटीलबावांची आमद होती सबब काहींक दवाव होता. हल्लीं येथें नित्य दरोडे पडतात व सर्वत्र दुंडीचा प्रकार जाला आहे. एक कोस मार्गांत सोबतीखेरीज कोणाचा गुजारा होत नाहीं. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८५.

श्री. १० फेब्रुवारी इ०स० १७९२.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ १६ माहे जमादिलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ २३ जमादिलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत ते पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरीः— डिभाई साहेबांनीं हजरताशीं भगतन तोफा किल्ल्यांत होती ते मागितली. त्यावरून पातशाहाची परवानगी जाली. परंतु भवानी कुंवर किल्लेदार यांनीं राजश्री पाटीलबावांचे पत्राचा आक्षेप केला आहे. लखनौकर साहेबाकडून एक फिरंगी डिभाईकडे खुर्जाचे मुक्कामीं येऊन, यांजकडील तमाम परगण्याचे इजाऱ्याचा पैगाम केला. परंतु सांप्रत यांनीं कबूल न केलें. सध्या नीळची कोठी मात्र खुर्जा जलेश्वर वगैरे महालांत फिरंगीमजकुराची करून दिल्ही. तीन लक्ष रुपये नीळचा मक्ता ठैरला आहे. नबाबवजीर शरयूतीरीं शिकार करून आहेत. हसन रजाखान व राजे टिकेतराय अद्यापि श्रीकाशीस दाखल जाले नाहींत. आल्यानंतर नबाबवजिराची भेटी होऊन सर्व लखनौस येणार आहेत. मिर्जा अकबरशहा व हजरत यांसीं दोन चार रोजांपासून चित्तशुद्धता नाहीं. अकबरशहानीं चपकन व दस्तार सरबस्ता साहेबमजकुरास खुफिया पाठविले होते. सबब शहाजीनीं ऐकोन बहुत बेदिल जाले. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वर्तमान पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. यानंतर स्वामीकारणें मकरसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत. ते कृपापूर्वक स्वीकारून प्रत्योत्तरीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."



(४) नेपोलियन बादशाहाचें विनोदचित्रः—

(नेपोलियन बादशाहास सेंट हेलेना येथें कैदेंत ठेवल्यानंतरचा देखावा.)

लेखांक ८६.

श्री. १० फेब्रुवारी इ. स. १७९२.

“ श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार कुशल विज्ञापना. येथील तागाईत छ १६ माहे जमादिलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ २३ जमादिलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजसुद्धां ग्वाल्हेरनजीक आले. सिमथरकर गुजर याचे अनुमतेंकरून राजे छत्रजीत दतियाकर यांसीं खंडणीचा जाबसाल रुबकार आहे. तेथील मामला घेऊन लवकरच श्रीमथुरेस येणार. नवाब अल्लीबहादूर यांचीं पत्रें नानामऊच्या मुक्कामाहून रावमजकुरांस आलीं कीं, दतिया वगैरे बुंदेलखंड प्रांताचे खंडणीचा जाबसाल सरकारचा असतां, तुह्मीं इकडे येऊन उपद्रव करितां, हें ठीक नाहीं. मकनपूरची ज्यारत करून नवाब मशारनिल्हे काल्पीस आले. कांहीं फौज दतियाचे सुमारें रवाना करणार. जिवाजी बल्लाळ व अंबोजी इंगळे बदस्तुर सांभरप्रांतीं आहेत. दौलतराम हरदीया जयपूरकरांचा कारभारी कोलारचे गढीवर हल्ला करून गेला होता. तेथें अकस्मात् गोळी लागून मृत्यु पावला. डिभाई साहेब छ ५ माहे मजकुरीं येथें आले. दुसऱ्या दिवशीं शाहाजीकडे जाऊन, सैद महमदचे पुत्रास मातमपुरसीचीं वस्त्रें पांच देऊन, बहुत समाधान केलें. तदनंतर छ १० तारखेस साहेबमजकुरानें शाहाजींचे विचारें पातशाहाची मुलाजमत केली. अकरा मोहोरा हजरतास, व चाळीस शहाजादे यांस. चाळीस मोहरा नजरा केल्यावर, हजुरांतून दस्तार सरबस्ता व निम अस्तिन्, तुरा मुकेशी व गोशवारा, जेगा, शिपेंच, मोत्यांची माळ, तरवार, हत्ती घोडा, साहेबमजकूर यांस व वगैरे दोन फिरंगी व मुनशी यांस तीन तीन पारचे खिलत इनायत जाले. जीवनखानराव, बख्तावरसिंग माचेडीकराचा कारभारी, यानें साहेबाबरोबर पातशाहाची मुलाजमत हासील केली. पांच पारचे खिलत मशारनिल्हेस व हमराई लोकांस तीन शालजोड्या इनायत जाल्या. आठा चौ दिवसांत साहेबमजकूर कूच करून मेवातचे जिल्ह्यास जाणार. साहारगपूर व पानिपत वगैरे प्रांत बहिरो कोन्हेर यांजकडे राहिला. देवजी गवळी, बापू मल्हार बेदिल होऊन, कूच करोन सोनपतप्रांतीं उठोन आले. जमाशहा पेशावरांत आहे. मिर्जा आहसनबख्त याचा आग्रह फार आहे कीं, हिंदुस्थानाकडे इरादा करावा.

परंतु वरकड शाहाचे कारभारी आदिकरून यांचें मानस नाहीं. तुरुत शाहा-मजकुरांनीं पायंदबेगखानास पांच हजार फौजेनशीं अटकचे रूखास रुखसत केलें. व मिर्जाची बहुत तसली केली आहे. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे. त्यावरून ध्यानारूढ होईल. यानंतर स्वामीकारणें मकरसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत, ते कृपापूर्वक स्वीकारून प्रत्योत्तरीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ८७.

श्री. फेब्रवारी इ. स. १७९२.

" पु ॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे— राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजेसुद्धां ग्वाल्हेरनजीक आले. सिमथरकर गुजर याचे अनुमतेंकरून राजे छत्रजीत दतियाकर यांसीं खंडणीचा पैगाम केला आहे. राजे मजकुरांनीं यांची आंवई ऐकोन फौजेचा जमाव केला. खंडणीचा जाबसाल रुबकार आहे. वरचेवर तेथील मामला करून श्रीमथुरेस येणार आहेत. जिवाजी बल्लाळ व आंबोजी इंगळे सांभरप्रांतीं हरएक * * खंडणी घेतात. भीमसिंगाचा जाबसाल *** ठैरण्यांत आला नाहीं. दौलतराम हरदीया जयपूरकराचा कारभारी यानें कोलारचे गढीवर हल्ला केला, इतक्यांत अकस्मात् गोळी लागून मृत्यु पावला. सबब जयपूरकर बहुत सचिंत रहातात. राजश्री पाटीलबावांनीं सहारंगपूर, पानिपत प्रांतांचे मुखत्यारीची सनद बहिरो कोनेर यांचे नावें करून पाठविली. त्यावरून देवजी गवळी व बापू मल्हार बेदिल होऊन सोनपतास उठोन आले. राजश्री जिवाजी बल्लाळ यांचे लष्करास जाणार आहेत. नवाब अल्लीबहादूर मकनपुराची ज्यारत करून छ १० माहे मजकुरीं काल्पीस आले. नवाब मशारनिल्हे यांनीं राव मजकुराची आंवई दतियाकडे आल्याची ऐकून, पत्र यांस पाठविलें कीं, या प्रांताच्या खंडणीचा जाबसाल सरकारचा आहे. तुह्मी इकडे येऊन उपद्रव देतां, हें ठीक नाहीं. कांहीं फौज तिकडीलही दतियाकडे येणार. राव मशारनिल्हेनीं पत्रोत्तर पाठविलें आहे कीं, आह्मी मवास हरामखोराचे पारिपत्यास आलों. वरकड प्रांतांत खलस होणार नाहीं. श्रत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लेहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८८.

श्री. ता० ५ मार्च इ. स. १७९२.

" श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीः—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ११ माहे रज्जब मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः- पेशजीं छ १६ जमादिलाखरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजसुद्धां दतियानजीक हरएक गढीस मोर्चे लावून आहेत. राजे छत्रजीत दतियाकर यानें वकील रावमजकुराकडे पाठवून जाबसाल केला कीं, इकडील मामला पूर्ववत्पासोन सरकारचा असतां, तुह्मीं सिमथरकर गुजराचे अनुमतें ऐकोन, मुलकांत खलश करितां व हरएकाशीं खंडणी घेऊन खराबी केली, हें ठीक नाहीं. त्यावरून राव मशारनिल्हेनीं दतियाचे रूखास कूच करून, चार कोसांवर तफावतीनें *** केला. राजश्री शिवराव हरी झांशीहून येऊन भेटले. नवाब अलीबहादूर यांनीं रावमजकुराचें बोलणें ऐकोन, काल्पीहून दतियाचे रूखास कूच करावें ऐसा विचार केला आहे. जिवाजी बल्लाळ बक्षी, सांभर प्रांतांतून कूच करून जयपुराकडे गेले. तेथील मामल्याची बेबाकी वरचेवर करून, फौजसुद्धां राव मशारनिल्हेकडे सामील होऊन, बुंदेलखंड प्रांताचा मामला घ्यावा ऐसा विचार आहे. सरदाराचाही इशारा येविसीं असे. डिभाई फिरंगी येथून छ १९ जमादिलाखरचे तारखेस कूच करून, मेवातचे जिल्ह्यांत जाऊन, राव बख्तावरसिंग माचेडीकराकडून चार तोफा मोठ्या आणोन, सांप्रत पिरोजाबाद व कोलचे बंदोबस्तास गेला. तिकडे जमीदारांनीं मोठा हंगामा केला. सबब त्यांचें पारिपत्य करावें ऐसी योजना आहे. नवाबवजीर व हसन रजाखान व टिकेतराय वगैरे कारभारी छ १९ जमादिलाखरीं लखनौंत दाखल जाले. शोरसाहेब कलकत्तेकरांकडील खिलत वगैरे सरंजाम होता तो वजीरास नजर करून, बहुत ममतेचें भाषण साहेबांकडील निवेदन केलें. जमाशहाकडील कांहीं फौज पायंदबेगखानाबरोबर अटक नदी उतरून वीस कोस अलीकडे आले होते. इकडून सर्व सीख जमाव करून मुकाबल्यास गेले. इतक्यांत शहाचीं पत्रें खानमजकुरास आलीं कीं, नसीरखान बलोच मृत्यु पावला. तुह्मीं फौजसुद्धां मशारनिल्हेचे प्रांतांत जाऊन लटीचे मुलुखासहीत बंदोबस्त करणें. त्यावरून पायंदबेगखान माघारें हटून नसीरखानाचे व लटीचे

मुलुखांत गेला. शहामजकूर पेशोरांत आहे. गुलाम महंमद येलची, राव मशार-निल्हेचे लष्करांतून येथें आला. शहा निजामउद्दीन यांच्या भेटी परस्परें जाल्या. गुलाम अहंमद व * * * अद्यापि लष्करांत आहे. मशारनिल्हे येथें आल्यावर येलची व * * * शहाकडे रवाना होतील. पातशाहानीं दोन नामे तयार करून येलचीकडे दिल्हे. शाहाजीनीं राजश्री पाटीलबावांचे लिहिल्यान्वयें अमीर महंमदखान याची रवानगी लग्नाकरितां बीडास केली. भरतपूरचे मार्गानें देशीं येणार. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ८९.

श्री. मार्च इ. स. १७९२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः– चेरी साहेब फिरंगी लखनौस छ १५ रमजानचे तारखेस दाखल जाला. नबाबवजीरही सामोरें बिबीपूर पावेतों जाऊन घेऊन आले. अकरा किस्ती पोशाकी व जवाहीर, हाती, घोडा साहेबांस दिल्हा. त्यापैकीं फिरंगीमजकुरांनीं एक रुमाल शाली पसंद करून घेतला. दुसऱ्या दिवशीं नवाबवजीर त्याच्या डेऱ्यास गेले. साहेबांनीं विलायतचा तोफातायफ जिन्नस सर्व नजर केला. परस्परें बहुत ममतेचें बोलणें जालें. नवाबवजीरांनीं मेहदी-अल्लीखान बरेली प्रांताचा सुभेदार यास बोलावून कैद केलें. कारण हें कीं, खानमजकुरानें कलकत्तेकर साहेबास खुफीयापत्रें फितुराचीं पाठविलीं होतीं. तें बजिन्नस पत्रें टिकेतराय यांनीं नवाबास दाखविलीं. त्यावरून खान मशारनिल्हे-वर केवळ इतराजी जाली. हल्लीं बरेली वगैरे रोहिलखंड प्रांत मिर्जा रजाआली नामें पुत्राचे नावें बहाल करून, सर्वांस खिलत सर्फराजीचा देऊन, छ ५ माहे मजकुरीं बहिरायच प्रांतीं शिकारेस कूच करून गेले. हसन रजाखान व राजे टिकेतराय लखनौस कारभारी राहिले आहेत. श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९०.

श्री. ता. ५ मार्च इ. स. १७९२.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ ११ माहे रज्जब मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– छ १६ जमादिलाखरचीं विनंतिपत्रें व विलायती मेवा सेवेसीं पाठविले आहेत. तें पावून साकल्य वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावांचीं वरचेवर शाहाजीस पत्रें आलीं कीं, हबीबशहा मृत्यु पावले. तुह्मीं दोन वर्षांपासून अमीर महंमदखान याची रवानगी करीतच आहां; तरी आतांही मशारनिल्हेस सत्वर पाठवून द्यावें. ह्मणजे बीडांत त्यांचें लग्न करून पाठवून देऊं. त्यावरून शाहाजीनीं आपले पुत्राची रवानगी देशीं केली. व कुटुंब वगैरे नगदी ऐवज व हत्ती घोडे आदिकरून दरोबस्त सरंजाम, व मीर सैद महंमद यांचे तीन लाख रुपये नगदी व किरकोळी चांदीसोन्याचा सरंजाम निघाला त्यासुद्धां, भरतपुरास चिरंजीवासमागमें रवाना केलें. आपण सडा होऊन मात्र येथें राहिला आहे. डिभाई साहेबानीं छ १८ माहे गु ॥ नजबकुलीखानाचे लेकीशीं लग्न करून, छ १९ रोजीं येथून कूच करून मेवात प्रांतीं गेले. मेवातीं जमा होऊन, होडलचे कमाविसदारास लुटून घेतलें. कारण हें कीं, साहेबमजकुरानें हरएक महालांत दिढीनें जमाबंदी केली. सबब चहूंकडे अमलांत हंगामा जमीदारांनीं केला आहे. यास्तव साहेब मशारनिल्हेनीं, राव बखतावरसिंग माचेडीकराकडून चार तोफा मोठ्या घेऊन, सांप्रत पिरोजाबाद व कोलचे जिल्ह्याचे बंदोबस्तास कूच करून गेला. शाहाजीशीं व साहेबाशीं आपसांत केवळ विरुद्ध लागलें असे. फकिराची नियत ठीक दिसत नाहीं. मिर्जा आहसनबख्त याजकडे कागदपत्रीं सिलसिला जारी केला. त्यास बोध करून इकडे लाहोरप्रांतीं आणावें, ह्मणजे सरकारांत आवई होऊन सरदाराची रुखसत तेथून लवकर होईल, ऐसा विचार करून, खुफीयापत्रें सरदारांस लिहिलीं आहेत. तेथून उत्तर आल्याप्रमाणें साल आईदा उपद्याप करणार. तात्पर्य याची नियत ठीक दिसत नाहीं. शहरची अवस्था व पातशाहाची बेदिलीचें व हरएकाशीं सक्त भाषण करणें हें वरचेवर सेवेसीं विनंति लिहिलीच आहे. तुरुत जाहीरदारीकरितां येथून दोन नालकी व खिलत, श्रीमंत स्वामी व नवाब निजाम अल्लीखान व वगैरे पांच सात खिलत तयार करून, राजश्री पाटीलबावांपासीं पुत्रा-

समागमें पाठविले आहेत. तेथील सलाह ठैरेल त्याप्रमाणें देतील. तपशील खिलत वैगेरेः—

श्रीमंत साहेबांस.	निजाम अलीखानांस.
१ सात पारचे खिलत.	१ खिलत सात पारचे.
१ दस्तार सरबस्ता बमै कलगी व तुरा मुकेसी.	१ दस्तार सरबस्ता कलगी व तुरा मुकेसी.
१ जेगा शिर्पेच, मोत्यांची माळ, तीन रकमा.	३ जवाहीर रक्कम.
१ सिपर समशेर, हत्ती घोड्याची परवानगी राजश्री पाटीलबावांकडे.	१ सिपर समशेर.
	१ नालकी हत्ती घोड्याची परवानगी पाटीलबावांकडे.
१ नालकी झालरदार.	१ चार कुबा.

येणेंप्रमाणें खिलत, व याशिवाय पांच खिलत आणीक पातशाहाकडून वरकड सरदारांस रवाना केले आहेत. राजश्री खंडेराव हरी बिकानेर प्रांतीं जाऊन चुरू शहर चहूंकडून जेर करून महासरा केला. तेथील राजा गडांतून निघोन यांसीं भेटला. ऐसी हजार रुपये मामला कबूल करोन, बडीअली हकीम यास ऐवजाचे निशा करून देविण्याकरितां तेथें ठेवून घेतलें. व राव मशारनिल्हेचें कूच माघारें करवून नंतर बिकानेरवाल्याकडील चौ दिवसांनीं फौज बोलावून गडाचा व शहरचा बंदोबस्त राजांनीं केला. मामल्यापैकीं एक पैसा यांस प्राप्त जाला नाहीं. बडीअलीचें निघणें कठिण जालें. दिल्लीहून बारुदगोळा व बाण वगैरे सरंजाम जंगी, भवानी कुंवर किल्लेदारांनीं वरचेवर तिकडे रवाना केला. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.”

लेखांक ९१.

श्री. ८ मार्च इ. स. १७९३.

“श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ २४ माहे रज्जब मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद

लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः- पेशजीं छ ११ माहे मजकुरीचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, शाहाजीनीं गुलाम महंमद येलची यांस एकांतीं बोलावून त्यास सांगितलें कीं, "हिंदूचें राज्य जालें. त्यादिवसापासून आमचा दीन इमान सर्व बुडाला. काफिराचे फंद्यांत आह्मी फसोन दीन बरबाद केले. त्यास तुह्मीं जमाशहास याप्रांतीं आणोन, मुसलमानी दीन राखल्यास आह्मीं सर्व हाजीर होऊं." असें कितेक प्रकारें त्यासीं बोलणें जालें. नंतर श्रीमंत व राजश्री पाटीलबावा वगैरे यांस हजारों सख्त भाषण केलें. दुसऱ्या दिवशीं नवाब निजाम अल्लीखान याजकडून कामदार डासन्यांत आहेत, त्यांजकडील कारकून, कांहीं जाबसालाकरितां राजश्री पाटीलबावांचें पत्र यांचे नांवें होतें, तें घेऊन आले. जाबसालचे प्रसंगीं आमच्याकडील * * * त्यांच्या दरबारीं होते. डासनेकराकडील बोलणें रूबकार होतेंच. इतक्यांत डासनेकराकडील कारकून व पाटीलबावांकडील कारकून हुजरे व आमच्याकडील कारकून आदिकरून समस्त सरदारांस हजारो सख्तीचें भाषण शेरदरबार केलें. त्यास याचा बंदोबस्त सरकारांतून जाहल्यास येथें सर्वांची स्थित राहील. फकीराचा भरंवसा एकरूप नाहीं. सूचनार्थ विनंति लिहिली आहे. जमाशहाकडील येलची हाजीरजा लखनऊस नबाब वजीराकडे आला. त्यानें वजीराची मुलाजमत केली. शहाकडील खिलत व तीन घोडे नजर केले. नंतर चार पारचे खिलत, जेगा, शिर्पेच व खर्चास पांच हजार रुपये, नबाबवजीरांनीं येलचीस देऊन, बहुत समाधान करून ठेऊन घेतलें. कांहीं तोफातायफ वगैरे सरंजाम जमाशहास देऊन, येलचीमजकुराची बिदा विलायतेस करणार. कलकत्याहून कोणी साहेब लखनऊचे कामावर ऐफ साहेबांचे ठिकाणीं येणार आहे. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९२.

श्री. एप्रील इ. स. १७९२.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः- नबाब वजीरांनीं बंगाल्यांतून राजे झाऊकल यांस दोन मजला सामोरे पाठऊन, हसनरजाखान व टिकतराय यांस सांगोन पाठविलें कीं, मखदूम-

दरगाह सन्निध येऊन मु॥ करणें. तेथेंच भेटी होतील. त्यावरून खानमजकूर व टिकेतराय दरकूच छ ९ जमादिलाखरचे तारखेस मखदूम पिराचे दरगाह नजीक पावले. इकडून नबाब वजीर, पीराचे ज्यारतीचा बहाना करून, स्वार होऊन गेले. तेथें उभैतां कारभारी यांच्या भेटी जाल्यावर बंगल्यास स्वार होऊन आले. नंतर वजीरांनीं उभैतांस सात सात पारचे खिलत व तीनतीन रकमा जवाहीर सिपर समशेर, हत्ती घोडा इनायत करून, तिसऱ्या दिवशीं मोठे बेगमेची मुलाजमत जाली. तेथूनही खिलत कारभारी यांस मिळाले. तदनंर छ १४ माहे गु॥ कूच करून वजीरासुद्धां छ १८ तारखेस लखनऊस दाखल जाले. कलकत्त्याहून शोर साहेबांनीं बहुमान वस्त्रें दिल्हीं होतीं तें नबाब मशारनिल्हेस गुजारणलीं. तीं येणेंप्रमाणः—

२ पिस्तोल	३ शालजोड्या	२ चिरे बांधनूचे
२ कडाबीन इंग्रजी.	२ थान तमामी बादली	३ रुमाल शाली
२ दूरबीन	२ गुलबदन थान	२ चीनचें थान
६		२ सफेदान बंगाल्याचे
		१७ एकून

येणेंप्रमाणें सरंजाम नजर करून साहेबाकडील ममतेचें भाषण बहुत जालें. नबाब अल्लीबहादर ब्रह्मावर्तास गेले होते. कानपूरकर करनेल बिरसकूट साहेबांनीं ऐकोन, सामोरे येऊन, नबाब मशारनिल्हेस सदरेस घेऊन गेला. तोफखान्याची सलामी केली. परस्परें बहुत ममतेचें बोलणें जालें. साहेब मजकुरांनीं नवकिस्ती-पारचे पोषाखी वगैरे तोफातायफ नजर केला. नंतर नबाब व हिंमतबहादूर त्याच दिवशीं बिदा होऊन कालपीस आले. श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९३.

श्री. २ मे इ. स. १७९३.

"श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ता. छ २० माहे रमजान मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— स्वामींनीं कृपापत्र छ २३ रजबचें पाठविलें तें-छ १२ मिनहूस पावलें. शिरसावंदून सनाथ जालों. पेशजी चंद्र १४ साबानचीं

विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजसुद्धां रोहोटक नजीक बदस्तुर मुक्काम करून आहेत. डिभाई फिरंगी, मिर्जा इस्मालबेग व इस्मालखान नजबकुलीचा पुत्र वगैरे यांस, कुटुंबसहित कानोडाहून बरोबर घेऊन, राव मशारनिल्हे यांसीं एका दो रोजां दाखल होणार. लष्करांत दाखल जाल्यानंतर मिर्जामजकूर वगैरे लोकांची काय तंबीह अमलांत येईल, तें सेवेसीं विनंति लिहूं. परंतु डिभाई साहेबांस मिर्जाचा पक्ष अंतस्थ आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांचा विचार आहे कीं, महिना दोन महिना पाणिपतास मुक्काम करून राहावें. नंतर हरयान्यावर मोहीम करून मुलूख कबज्यांत करावा. शिखांकडील मोहीम सांप्रत राहिलीसी दिसते. फौजेचा अष्टौप्रहर दंगा राहतो. राजश्री पाटीलबावांनीं दोन लक्ष रुपयांची हुंडी फौजी खर्चास पाठविली आहे. राजश्री खंडेराव हरी यांनीं कानोडचे किल्ल्यांत आपला बंदोबस्त केला. राजश्री लखबा व जगोबा फौजसुद्धां सेखावाटीकडे दर कूच करून गेले. जैपूरकरांकडील खुशालीराम बोहरा वगैरे, राजश्री बापूजी होळकर यांनीं राव राजाचा मुलूख दाबून घेतला ह्मणून, बखतावरसिंग यांचीं पत्रें गोपाळराव रघुनाथ यांस आलीं आहेत. आमची कुमक करावी अथवा स्पष्ट उत्तर लिहावें ह्मणजे त्याअन्वयें राजेमजकूर यासीं दारमदार करूं. जैपूरकरांकडीलही वकील रोहोतकास आले. त्यांचें बोलणें आहे कीं, मामल्याची बाकी आहे ती घ्यावी. परंतु रावराजाचे पुत्राची कुमक न करावी. त्यावरून राव मशारनिल्हेनीं सांगितलें कीं, दोन लक्ष रूपये मामल्याचे बाकीशिवाय द्यावे, ह्मणजे येथून फौज पाठविणार नाहीं. कदाचित् लबाडीच्या गोष्टी सांगितल्यास जैपुराकडे फौज रवाना होईल. राजश्री बापूजी होळकर यांची फौज कांमा वगैरे महालाचे जफ्तेस येणार. इकडूनही फौज कांमाचे रुखास जाणार आहे. नबाब वजीर लखनऊकर बहिरायच प्रांतीं शिकारेस जाणार. हैदरबेग कारभारी यांचे शरीरास समाधान नाहीं; ह्मणून दोन चार दिवस अटकाव जाला आहे. तैमूरशहा बदस्तुर काबिलांत मु॥ करून आहेत. मिर्जा अहसनबख्त यांनीं खुफियापत्रें मुलतानचे सरदारास पाठविलीं होतीं. तीं पत्रें तैमूरशहांनीं पाहिलीं. त्यावरून मिर्जा मजकुरावर बेमर्जी जाली आहे. शहा निजामउद्दीन यांनीं बऱ्हाणपुराहून फकीर पीरजादे आणून, दोन्हीं मुलींचें लग्न छ ७ व छ १९ मिनहूस त्यासीं केलें. पातशाहाचें मानस आहे कीं, मिर्जा इस्मालबेगाचें पारिपत्य गुलामकादराप्रमाणेंच करावें. येविसीं राजश्री पाटीलबावांस वरचेवर पत्रें शुके पाठविलीं आहेत. तेथून पत्रोत्तर

आल्यानंतर अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ९४.

श्री. ७ जून इ. स. १७९३.

" पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. काबिलाहून छ २ सव्वालची अखबार दुबारां हुजूरांत गुजरली. त्यांत मजकूर कीं, तैमूरशहांनीं प्राणोत्क्रमणसमयीं काजी फैजुल्ला वजीर व मिर्जा गफोर वगैरे यांस सांगितलें कीं, मिर्जा जमाशहा यांस तख्तनशीन करून पातशाहा करावें. ह्याप्रमाणें आज्ञा करून मृत्यु पावला. शाहाचे सांगितल्याप्रमाणें कारभारी यांनीं जमाशहास तख्तनशीन केलें. दोन प्रहरपावेतों शहरांत मोठी गर्दी जाली. मिर्जामजकूर पादशाहा जाल्यानंतर, दहा वीस लोकांस जीवें मारून काबिलांत बंदोबस्त केला. काजी मजकुरांनीं व मिर्जा गफूर यांनीं हुमायूंशहाकडे सूत्र लाविलें. हें वृत्त जमाशहांनीं ऐकोन, उभयतांचे पोट चाक करावें ह्मणोन आज्ञा केली आहे. परंतु जीवें अद्यापि मारिलें नाहीं. जमाशहांनीं वरकड शहाजादे यांस पत्रें पाठविलीं कीं, बंदगींत हजर व्हावें. तेणेंकडून सर्व शहाजादे बेदिल होऊन, मिर्जा अबास कंधारचा सुभेदार व हुमायूंशहा वगैरे यांनीं किलमाच व कजलबास व उजबक वगैरे फौज जमा करून, डेरे बाहेर करून, दर कूच काबिलाचे रुखास आले. जमाशहांनीं स्वज्ञाति मुंगल जमा करून, काबिलांत लढाईचें सामान केलें आहे. तात्पर्य, त्या प्रांतीं आपसांत मोठा हंगामा लागला असे. मुरादशहाचाही इरादा काबीलचे रुखास रुबकार आहे. मिर्जा अहसनबख्त यांनीं तैमूरशहाचें वृत्त श्रवण करून, मुलतानहून विलायतेस जात होते. दरम्यान खैर चापडा येथें रोहिल्यांनीं लुटून घेतलें. सांप्रत पळोन पेशोरास आले. तेथील सुभेदारानें शहरांत येऊं न दिल्हें. शहर बाहेर मु॥ करून आहेत. ह्मणोन हजरतास अखबार गुजरली. त्यावरून एक दिवस मातम पादशांनीं लोक नौबत बंद केली. तिसऱ्या दिवशीं शहांनीं समाधान करून नौबत वाजविण्याची परवानगी दिल्ही. राजे बिजेसिंग जोधपुरकर मृत्यु पावला व जालीमसिंगास राज्यावर बसविलें ह्मणोन हुजूरांत अखबार गुजरली. त्यावरून विनंति लिहिली आहे. इंग्रजांचें विलायतेंत आपसांत कलह होऊन

आष्टकोसलवाल्यांनीं तेथील पातशाहास जीवें मारिलें. तेणेंकडून फरासिसांनीं जोर धरून कलकत्त्याकडे येण्याचा इरादा आहे. यास्तव शोर साहेबांनीं कलकत्त्यांत तोफखाना वगैरे लढाईची तयारी केली. श्रीकाशीकडील वगैरे कंपूस बोलाविलें आहे. याप्रमाणें खुफिया परचा पातशाहाकडे आला असे. त्यावरून सेवेसीं विनंति लिहिली आहे. पक्कें पत्रें समजल्यावर सविस्तर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९५.

श्री. १९ जुलै इ. स. १७९३.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल ता॥ छ १० माहे जिल्हेज मु॥ दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ १५ जिल्कादची विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ मौजे जुलमा नजीक चर्मवती तीर येथें मु॥ करून आहे. राा जिवाजी बल्लाळ बक्षी व लखबादादा यांस पांच हजार स्वारांनिसीं उज्जेनीस रवाना केलें. राजश्री सुभेदार इंदुरांत दाखल जाले. तेथून महेश्वरास जाणार आहेत. त्यांजकडील फौजेनें एकदोन महाल माळव्याप्रांतचे तारूत केलें. सबब बाळोजी इंगळे यांनीं मुकाबल्यास कूच केलें. इतक्यांत राजश्री सुभेदाराकडील कारकून सलूखाचे जाबसालास राजश्री सदाशिव मल्हार यांजकडे आला. त्यावरून मशारनिल्हेही त्यांजकडे जाणार आहेत. परंतु इकडील लोकांस त्यांचे जाबसालाचा भरंवसा एकरूप नाहीं. राजश्री पाटीलबावांचा विचार आहे कीं, माळव्या प्रांतीं गोपाळराव रघुनाथ यांस ठेवावें, व हिंदुस्थानांत खंडेराव हरी व डिभाई साहेब यांस एक कंपूनिसीं ठेऊन बंदोबस्त राखावा. डिभाई साहेबांस सत्तावीस लक्षांचे महाल पिरोजाबाद, हतरस, पलवल वगैरे कंपूचे जायदातेंत लावून दिल्हें. साहेब मजकुराचें बोलणें कीं, परगण्यांतील वसूल ऐवज आमच्या पदरीं पडेल तो मुजरा देऊं. येविशींची रदबदली राव मशारनिल्हेसीं रूबकार असे. साहेब मजकुरास लढाईचे फत्तेबद्दल खिलत, जेगा, शिरपेंच, मोत्याची माळ, हत्ती घोडा वगैरे पिरू साहेब आदिकरून यांस माफक मरातब खिलत दिले. लौकरच डिभाई साहेब रुखसत होऊन महालाच्या बंदोबस्तास या प्रांतीं येणार आहे. रावमजकुराचें कुटुंब कोट्यानजीक पावलें.

दो चौ रोजांत लष्करांत पावल्यावर उज्जनचें रुखास कूच करून जातील. चाळीस कोसांची तफावत राहिली आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९६.

श्री. १९ जुलै १७९३.

"श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ १० माहे जिल्हेज मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— छ १५ जिलकादचीं विनंति पत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री सुभेदार फौजसुद्धां दर कूच महेश्वराकडे जाणार. राजश्री गोपाळराव रघुनाथ वगैरे फौजेनसीं उज्जनीस जणार आहेत. डिभाई साहेबांस अंतरवेद प्रांतीं सत्तावीस लक्षांचा मुलूख कंपूचे जायदादेंत देऊन, दिल्ली प्रांतीं ठेऊन जातील, ऐसा विचार आहे. तैमूरशहा मृत्यु पावल्यावर जमाशहा तख्तनशीन होऊन काबिलाचा बंदोबस्त केला. हें वृत्त वरकड शहाजादे यांनीं ऐकोन, हुमायूंशहास सामील होऊन, काबिलावर चढाई करून आले. त्याप्रांतीं आपसांत मोठा हंगामा आहे. राजे बिजेसिंग जोधपुरकर मृत्यु पावला. त्यांच्या ठिकाणीं राज्यावर जालीमसिंगास कायम केलें. याची अखबार पातशाहाचे हुजुरांत गुजरली. त्यावरून सेवेसीं विनंति लिहिली आहे. तैमूरशहाचें वृत्त दुबारां आल्यानें पातशाहांनीं दोन दिवस बहुत मातम केलें. नोबत बंद केली. तिसऱ्या दिवशीं शहाजींनीं हजरतास समजोन सांगितल्यावर नौबतीस परवानगी दिल्ही. इंग्रजांचे विलायतेंतही आपसांत कजिया होऊन अष्टकोंसलवाल्यांनीं तेथील पादशाहांस जीवें मारिलें. तेणेंकडून फरासिसांनीं जोर धरून कलकत्त्या प्रांतीं उपद्रव केला. ह्मणोन शोर साहेबांनीं कलकत्त्यांत तोफखान्याची वगैरे लढाईचा सामना केला आहे. ह्याप्रमाणें हुजूरांत खुफिया अखबार आली त्यावरून सेवेसीं विनंति लिहिलीं आहे. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वर्तमान राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामीसमर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ९७.

श्री. जुलै इ. स. १७९३.

" पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. पायंदबेग खान कांहीं फौजसुद्धां जमाशहाचे आज्ञेप्रमाणें अटक नदी उतरोन, वीस कोस अलीकडे आले. मिर्जा अहसनबख्त यांच्या विचारें लाहोर प्रांतीं येऊन कबजा करावा ह्मणोन अमृतसराहून वरचेवर सावकारी चिठ्या दिल्लीस आल्या. पंजाबांत त्याप्रांतीं मोठा हंगामा .... चे मुकाबल्यास गेले होते. इतक्यांत जमाशहाकडून बातमी आली कीं नसीरखान बलोच मत्यु पावला. त्यावरून शहानीं पायबंदबेग खानास लिहिलें कीं, सांप्रत हिंदुस्थानचा इरादा मोकुफ करून, पत्र दर्शनीं फौजसहीत नसीरखान लटीचे प्रांतांत जाऊन तिकडील बंदोबस्त करणें. सबब खान मजकूर शहाचें लिहिल्यान्वयें जलदीनें कूच करून लटीचे प्रांतास गेला. ह्मणून सावकारी चिठ्या व हुजुरांत अखबार गुजरली. गुलाम महमद एलची, येथें आला. शहाजीचे जामात सामोरे जाऊन घेऊन आले. शहाजीची भेटी जाल्या. गुलाम अहमद व कायेनिगार अद्यापि राजश्री गोपाळ राव रघुनाथ यांचे लष्करांत कर्जदारांनीं अटकाऊन ठेविले होते. त्या वरून मशारनिल्हेनीं आपला जिम्मा करून तीन हजार रुपये व कायेनिगारास देऊन बिदा केलें. हजरतांनीं जमाशहाचे नांवें दोन नामे तयार केले. तैमूरशहाचे मातमपुरसीबद्दल एक, व दुसरा जमाशहास तख्तनसीनीची मुबारकबादीबद्दल ऐसे दोनी नामे एलची मजकुराचे स्वाधीन केले. जमाशहाकरितां दोन नालकी एलचीचे विद्यमानें तयार होतात. महिना पंधरा रोजांत तयार जाल्यावर एलची व कायेनिगारसुद्धां पेशोरास रवाना होतील. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति. "

लेखांक ९८.

श्री. जुलै इ. स. १७९३.

" पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवसीं:—

विनंति ऐसीजे, जमाशहांनीं काबिलांत व हिरात व मुलतान व कश्मीर वगैरे प्रांतांत आपला बंदोबस्त केला. मिर्जा गफूर वगैरे यांस जीवें मारावें ह्मणोन पूर्वी परवानगी जाली होती. हल्लीं मशारनिल्हेनीं पांच करोड रुपये नख्त वगैरे सर-

जाम खजान्यांतील तैमूरशहाचा होता तो सर्व स्वाधीन केला. सबब जांबक्षी जाली. व बदस्तूर साबीक जामदार खान्याचे काम सांगून खिलत देऊन बहाल केलें. वजीरातीचा खिलत, शावलीखानाचा पुत्र काबिलांत होता, त्यास इनायत केला. सर्व दुराणी यांच्या घराचे जफ्तीस कजलबाश वगैरे मोगल पाठविले. त्यावरून तमाम दुराणी जमा होऊन, जमाशहाचे हुजुरांत येऊन, अर्ज मारूज केली कीं, आह्मांसीं अन्याय कोठें जाला? ह्मणून जफ्तीस आज्ञा केली. त्यावरून शहामशारनिल्हेनीं प्रत्योत्तर केलें कीं, तुह्मी फितूर करून हुमाऊशहाकडे जाऊन त्यास सामील होणार, यास्तव जप्ती करणें प्राप्त जालें. शहाचें वचन ऐकोन, सर्व दुरानी यांनीं बंदगी ताबेदारी हुजुरची कबूल करून, हुमाऊशहास बजिन्नस धरून आणावें ऐसा करार केला. त्यावरून जमाशहांनीं बहुत सर्फराजी केली. जप्ती हरएकाची माफ करोन, खिलत जवाहीर माफक मरातब सर्वांस इनायत केलें. कश्मीर वगैरे सुभेदारांनीं जमाशहाची ताबेदारी मान्य केली, सबब यांसही खिलत इनायत जाले. दुराणी लोकांस आज्ञा केली कीं, कंधार प्रांतीं मोहीम करून हुमायूशहास दस्तगीर करून आणावें, ह्मणजे तुमचे मतालब सर्व घडून येतील. त्यावरून दुराणी लोकांनीं कंधारेस जाऊन, हुमाऊशहास बहुत महासरा करून तंग केलें. सबब हुमाऊंशहांनीं जमाशहास अर्जी केली कीं, आह्मी ताबेदारींत हाजीर आहों. पूर्ववत् प्रमाणें ठैरलेला पैका हुजुरांत पावता करूं. मिर्जा अहसनबख्त यांसही पत्र तसलीचें पाठविलें आहे. मिर्जा मजकुर काबिलास जाणार ह्मणून अखबार बादशाहाचे हुजुरांत आली. ते सेवेसीं विनंति लिहिली आहे. पुढें प्रत्यास येईल ते विनंति. लिहूं बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९९.

श्री. २४ जुलै इ. स. १७९३.

" श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ६ माहे जिलकाद मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ २६ व छ २९ सव्वालचीं विनंति पत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जाहालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ व डिभाई वगैरे फौज सुद्धां कोट्यानजीक सुलतानपुरास मु॥ करून आहेत. लखबादादा व

जगोबा व पिरू साहेब कंपू सुद्धां राजश्री सुभेदाराचे पिच्छास कोट्याहून पुढें तीस कोस गेले. राजश्री सुभेदाराकडील छ २१ तारिखेस हजार बाराशें लोक लढाईत जखमी व ठार जाले. व पाण्याचे दिकतीनें आणि उष्णकाळ भारी याजमुळें बुणग्यांतील हजार आठशें माणसें मृत्यु पावलीं. आखर, राजश्री सुभेदार व बापूजी होळकर व मल्हारराव आदिकरून सर्व लाखोरीचे घाटीं शिकस्त खाऊन दरकूच इंदुरचे रुखास गेले. अकरा तोफा वगैरे सरंजाम डिभाईकडे लुटीत आल्याचें वृत, छ २९ सव्वालचे तारिखेस साकल्य विनंति सेवेसीं लिहिलीच आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं कोटेकरासीं खंडणीबद्दल ऐवजाविसीं निक्षून ताकीद केली. त्यावरून दोन लाख रुपये जालीमसिंगानें कबूल केले आहेत. राजश्री सुभेदार व मल्हारराव वगैरे यांचा इरादा पुनः आहेकीं, कजाकी लढाई करून यांस जेर करावें. सबब इकडील कंपू वगैरे स्वार सर्व मुस्तेद होऊन त्यांच्या सामोरे जाऊन राहिले आहेत. परबतसर व लाहोरचे जिल्ह्यांतून सावकाराच्या चिठ्या अडतवाले दिल्लीकर साहुकारास आल्या आहेत कीं, तैमूरशहास अकस्मात वमन होऊन छ ८ सव्वालचे तारखेस जलालाबादचे मुक्कामीं काबिलांतून तीनचार मजला अलीकडे मृत्यु पावला. ह्याप्रमाणें पादशाहाचे हुजुरांतही अखबार गुजरली. त्यावरून सेवेसीं विनंति लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे. हे विज्ञापना."

लेखांक १००.

श्री. २ आगष्ट इ. स. १७९३.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंती ऐसीजे. नबाब हसन रजाखान व राजे टिकेतराय कलकत्यांत दाखल होऊन छ २४ जिल्हेजीचे तारिखेस गवरनर साहेबांची मुलाजमत केली. दुसऱ्या दिवशीं साहेबमजकूर प्रथम खान मशारनिल्हेचे डेऱ्यास येऊन, बहुत ममतेचें भाषण केलें. ह्यांनीं एकवीस किस्ती पोषाखी व जवाहीर वगैरे सरंजाम पुढें ठेविला. परंतु कांहीं घेतला नाहीं. नंतर राजे मजकुरांचे डेऱ्यास आले. यांनींही एकवीस किस्ती पोषाक व दोन किस्ती जवाहीर वगैरे तोफा तायफ जिन्नस नजर केला. त्यांपैकीं मोठे रदबदलीनें एक जरीब नकाशी पसंत करून घेतली. उपरांतिक साहेबमजकूर स्वार होऊन आपले स्थलास आला. छ २८ माहे मजकुरीं उभैतां बडेसाहेबांकडे गेले. भेटी जाल्यानंतर गवरनर साहेबांनीं सात सात किस्ती पोषाखीं वस्त्रें

व जवाहीर तीन तीन रकमा उभैतांस बहुमान देऊन बिदा केलें. व खुद्द कलकत्त्याहून स्वार होऊन फुलचरीकर फरासिसाचे पारिपत्यास गेले. त्याची तंबी करून मंद्राजाकडे त्वरेनें जाणार. कलकत्त्यांत बडेसाहबांचे ठिकाणीं तेथील कामावर शोर साहेब राहिला आहे. त्याची भेट घेऊन खानमजकूर व टिकेतराय रुखसत जाले. ह्मणोन नबाब वजीरास बातमी आली. त्यावरून निर्मलदास आदिकरून सर्व कारभारीं सामोरे जाणार. दुबारां वर्तमान तेथून निघाल्याचें आल्यावर, नबाब वजीर शिकारीचे बहाण्यानें श्री काशीपर्यंत सामोरे जातील ऐसा विचार आहे. इंग्रेजाचा तगादा ऐवजाविसीं बहुत सख्त होता. इलमास अल्लीखान खोजा यांजवर सात लक्षांची वरात तुरुत इंग्रेजांस लाऊन दिल्ही आहे. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०१.

श्री. १५ आगष्ट इ. स. १७९३.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल ता॥ छ ७ माहे मोहरम मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ १० जिल्हेजींचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजसुद्धां उज्जेन नजीक विसा कोसांवर पावले. राजश्री पाटिलबावांनीं मशारनिल्हेस पत्रें पाठविलीं आहेत कीं, तुम्हीं सांप्रत कोट्यानजीक पाटणचे जिल्ह्यांत छावणी करून राहावें. ह्याप्रमाणें पत्र आल्यावर यांचें मानस आहे कीं, एकदां उज्जेनीस जाऊन, तेथून जोधपुर वगैरे प्रांतांचा बंदोबस्त करून, बाद बरसात करोलीचे मार्गें या प्रांतीं यावें. डिभाईसाहेबांस सत्तावीस लक्षांचे महाल कंपूचे जायदादेकरितां लावून दिल्हे. एक कंपूसुद्धां साहेब मजकुरांनीं याप्रांतीं राहून बंदोबस्त राखावा. याप्रमाणें ठैरोन डिभाई साहेबांस रवाना केलें. दरकूच इकडे येतात. राजश्री खंडेराव हरी रेवाडीचे जिल्ह्यांत आहेत. साहेबमजकूर येथें आल्यानंतर, महालचा बंदोबस्त करून लखनऊस घरीं जाणार. मशारनिल्हेचे कुटुंब वगैरे लोक व सरंजाम सर्व इंग्रेजांचे पेठ्यांत आहेत. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०२.

श्री. आगष्ट इ०स० १७९३.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. जमाशहा पेशोरांत आहेत. मिर्जा अहसनबख्त यांचा रात्रंदिवस तगादा आहे कीं, हिंदुस्थानप्रांतीं आमचा बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. तीन वर्षे जालीं, आपल्यापासीं हाजीर असोन, आज तागाईत प्रथम दिवस आहे. त्यावरून शहांनीं मिर्जाची बहुत खातरजमा केली. व पायंदबेगखां नामें सरदार पांच हजार फौजेनसीं अटकेचे किल्ल्यांत पाठविलें आहे. वरकड सरदारांनीं शहामशारनिल्हेस समजाविलें कीं, आपण हिंदुस्थानचा इरादा करितां. पूर्वीं नजीबखां व शुजाद्दौला वगैरे हिंदुस्थानी सरदार सर्व आपल्यापासीं मिळोन होते. आतां त्यांपैकीं कोणी राहिला नाहीं. कदाचित् लढाईंत कांहीं कमती पडल्यास वाटेंत शीखदेखील निभों देणार नाहींत. ह्याप्रमाणें सांगितल्यावर पायंदबेगखानास पेस्तर शिखांचे बंदोबस्तास रुखसत केलें. शहांची मर्जी सांप्रत इकडे यावें अशी नाहीं. परंतु मिर्जा वारंवार स्मरण देऊन आहेत. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०३.

श्री. १० सप्टेंबर इ. स. १७९३.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ ३ माहे सफर मु॥ दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ ७ मोहरमचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालें असेल. हल्ली इकडील वर्तमान तरी, जमाशहांनीं फौज कशी करून हुमाऊशहावर मोहीम करून कंधार प्रांतीं गेला. तिकडून हुमाऊशहा मुकाबल्यास आल्यावर परस्परें लढाई जाली. बहुत लोक ठार व जखमी जाले. अखेर हुमाऊशहा शिकस्त खाऊन पाहाड तळीस गेला. जमाशहांनीं कंधारचे किल्ल्यांत व शहरांत आपला बंदोबस्त करून पायंदबेगखान यास हुमाऊशहाचे पारपत्यास रवाना केलें. कंधारचे किल्ल्यांत करोड रुपये नख्त व जवाहीर वगैरे सरंजाम जप्तींत आला. मिर्जा अहसनबख्त शहामजकुराचे भेटीस गेले आहेत. राजसिंग व जसवंतसिंग वगैरे बुंधेले चरखारींत जमा होऊन बांद्याचे सुमारें आले. त्यावरून नबाब अल्लीबहादर

फौजसुद्धां दरकूच येऊन, बुंधेले मजकुरांचा मुकावला केला. जसवंतसिंग वगैरे शें पन्नास लोक ठार जाले. वरकड बुंधेले शिकस्त खाऊन पळोन गेले. ह्मणोन शाहाजीकडे व हुजुरांत अखबार गुजरली. त्यावरून विनंति लिहिली आहे. राजश्री पाटीलबावांकडील करमखानाची पलटण शाहाजीचे तैनातीस आहे. सांप्रतकाळीं कारकुनी देण्याविषयीं पलटणचे लोकांनीं मोठा हंगामा केला. चार दिवस शहरांत परस्परें मोर्चेबंदी राहिली. शेवटीं राजश्री पाटीलबावांचे लिहिण्यावर पलटणवाल्यांची समजाविसी करून नजफगडाकडे रवाना केलें आहे. पादशाहांचें हुजूरचें वृत्त बदस्तूर आहे. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वर्तमान पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०४.

श्री.　　सप्टेंबर इ. स. १७९३.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. जमाशहानीं पायंदबेगखान वगैरे सरदार व फौज काश्मीरचे सुभेदाराचें पारपत्य करावयास पूर्वीं पाठविले होते. त्यास, खानमजकुरांनीं चहूंकडून काश्मिरास महासरा करून तेथील सुभेदारास कबज्यांत केल्यावर, जमाशहानीं सुभेदारास रुबरू तलब करून त्याचें पोटचाक केलें. मिर्जा अहसनबख्त यांनीं पांच हजार लोक जमा करून, पेशोराहून जंगस्वाल प्रांतीं आले. महासिंग शिख याचा नातू सरदार आहे. अगोदर यासीं साजीश करून, सामील करोन, लाहोरपावेतों बंदोबस्त करावा, ऐसा विचार मिर्जामशारनिल्हेचा श्रवणांत आहे. लाहोराहून सवाशें कोस पलीकडे मिर्जा मुक्काम करून आहेत. दरोबस्त शिखास शुके पाठविले आहेत. दिल्लीहून शावलीखानाचा पुत्र मनसूरखान मुंगल जमाशहाकडे जाणार आहेत. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १०५.

श्री.　　इ. स. १७९३.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. पादशाहांचे हुजुरांत पुण्याची अखबार गुजरली. त्यांत

मजकूर कीं, मिर्जा जुम्मा यास सरकारांतून वलीअहद करून राजश्री पाटीलबावांबरोबर इकडे पाठविणार. याप्रमाणें अखबार पाहून, हजरतांनीं दोन शुक्के श्रीमंत स्वामींचे नांवें व राजश्री पाटीलबावांचे नांवें लिहून पाठविले आहेत. व शाहाजीकडूनही राजश्री पाटीलबावांस लिहिवलें आहे कीं, मिर्जा जुम्मास वलीअहद केल्यास आमची प्रसन्नता नाहीं. मिर्जा अकबरशहा यांस वलीअहद अथवा पातशाहा करावा; यांत आमचा संतोष आहे. ह्मणून खुफियापत्रें वरचे वर दोन चार, येथील मुखतारांनीं लिहोन पाठविलीं आहेत. राजश्री पाटीलबावा व नबाब त्या प्रांतीं राहिल्यानें मुखतारांस केवळ संतोष आहे. मनास आलें त्याप्रमाणें हुजुरांत व रयतेसीं सलूख केला व करितात. वजीर लखनऊकर श्रीअयोध्येस मोठी बेगम यांजकडे आपले वर्षगांठीकरितां गेले होते. एकशें एक मोहरा नजर केली. आठ दिवस तेथें राहून नंतर लखनऊंत छ २२ जिल्हेजीस दाखल जाले. इंग्रेजांचा तगादा ऐवजाविसीं फार आहे. निर्मलदास, टिकेतरायाचा ज्येष्ठ बंधू, कारभारी यांणीं तुरुत तीन लक्ष रुपयांची सरबरा करून इंग्रेजांकडे पाठविले आहेत. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०६.

श्री. इ. स. १७९३.

" पुरवणी श्रीमंत नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, जमाशहा काबिलांत आहेत. मुरादशहांनीं फौज जमा करून महमूदशहावर चालून आला. इकडून महमूदशहा मुकाबल्यास जाऊन परस्परें लढाई जाली. आखर मुरादशहा, ताब लढाईची न आणितां, शिकस्त खाऊन हिरातचे रुखास कूच करून गेला. हें वृत्त जमाशहांनीं श्रवण करून बहुत खातरजमेचीं पत्रें महमूदशहास पाठविलीं. मुलतानचे सुभेदारांनीं मिर्जा अहसनबख्त यांस शहरबाहेर जागा देऊन ठेविलें. मारेकरी लोकांस पूर्वीं कैद केलें होतें व अर्जी शहामशारनिल्हेस लिहिली होती. त्याचा दरजाबनामा सादर जाला कीं, मिर्जा मजकूरही हिंदुस्थानचा पादशाहाजादा आहे; त्यांसीं तुह्मीं बेअदबी करून बाहेर ठेविलें, हें ठीक न केलें. आतां त्यांचे खर्चास देऊन ताबेदारींत हजीर राहाणें. त्यावरून सुभेदारमजकूर मिर्जापासीं येऊन हाजीर जाला. व तकसीर माफ करवून, मिर्जाचा राजीनामा घेऊन, जमाशहाकडे पाठविला असे. शीख बदस्तूर आहेत. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०७.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७९४.

" पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजसुद्धां दतिया व झांशी नजीक मुक्काम करून आहेत. तिकडील गढीबंद जमीदार यांसीं खंडणीचा जाबसाल रुबकार असे. मनोहरपूरचे गढीवर रावमजकुरानीं हल्ला केला होता. तेथें दोन अडीचशें लोक जखमी व ठार जाले. परंतु हल्ला करगर न जाला. सबब दुसऱ्या दिवशीं पुनः चहूंकडून हल्ल्याची तयारी केली. यानंतर तेथील जमीदारानें आठरा हजार रुपये देऊन गढी खालीं करून दिल्ही. गढींत जंबूरक वगैरे सरंजाम वीस हजारांचा सांपडला. राजे छत्रजीत दतीयाकर यांनीं वकिला-बरोबर रावमजकूर यांस सांगोन पाठविलें कीं, इकडील मामला पूर्ववत् पासोन श्रीमंत साहेबांचे सरकारचा आहे. हल्लीं तुह्मीं येऊन या प्रांताची खराबी करितां हें ठीक नाहीं. आपसांत खलश होईल. त्यावरून राव मशारनिल्हेनीं वकिलासीं बोलणें केलें कीं, राजश्री पाटीलबावांचे लिहिल्याअन्वयें इकडे आलों. आह्मांस सरकारचे मामल्याशीं प्रयोजन नाहीं............मामला आह्मांकडे द्यावा. अनमान केल्यास लढाईची तयारी करावी. या प्रमाणें वकिलासीं जाबसाल जाल्यावर, राजेमजकुरानें दहा हजार फौज जमा करून, लढाईची तयारी इंद्रगढ नजीक केली. व नबाब अल्लीबहादूर यांसही साकल्यार्थ लिहून पाठ-विला आहे. नबाबाकडीलही फौज दतीयाकराचे कुमकेस येणार ह्मणोन वदंता आहे. राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी यांनीं सांभर प्रांतीं मकुंदपूरचे गढीवर हल्ला करून, गढी खालीं करोन घेतली. व तीस हजार रुपये खंडणीचे ठैरले. कुटुंब अजमेरींत ठेवून नंतर जोधपुरास आले............जयपुराकडे वरचेवर येऊन, राव मशारनिल्हेस सामील होऊन, बुंदेलखंड प्रांतीं हरएकासीं मामला घ्यावा ऐसा विचार श्रवणांत आहे. पुढें प्रत्यास येईल ते सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति. "

लेखांक १०८.

श्री. २७ फेब्रुवारी इ. स. १७९४.

" श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २६ माहे रजब मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद-

लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—छ ११ व छ २४ माहे मजकूरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावांस देवाज्ञा जालीयाचें वृत्त शाहाजीकडे अखबार आली. त्यावेळीं शाहाजीस सांगितलें कीं, एक दोन दिवस या गोष्टीची पडदा ठेऊन, मग हुजुरांत जाहीर करावी. त्यास याची वर्तणूक पूर्वीं सेवेसीं विनंति लिहिलीच आहे. तत्काल बादशाहाकडे जाऊन शेरदरबार हें वर्तमान निवेदन केलें. व बोध केला कीं, हरएकाचें नांवें शुके खातरजमेचें लिहून पाठविले पाहिजेत. त्यावरून हजरतांनीं उत्तर केलें कीं, सर्व गोष्टी तुमच्यानें घडून येतील. उत्तम असेल तें करावें. त्यास मुखतारांनीं जाहिरदारींत गोपाळराव रघुनाथ व जिवाजी बल्लाळ व खंडेराव हरी वगैरे हरएकाचे नांवें शुके लिहविले आहेत, व अंतस्थही एलचीचें विद्यमानें लिहितील, यांत संशय नाहीं. यास्तव सरकारांतूनही प्रस्तुत हरएकाचें नांवें खातरजमेचीं पत्रें पाठविलीं पाहिजे. ह्मणजे हरएकास पावतीं करूं. व सरकारची अर्जी खातरजमेची हजरतांचे नांवें लौकर पाठविल्यास उत्तम सलाह आहे. पुढें प्रत्यास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०९.

श्री. ५ मार्च इ. स. १७९४.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ २ माहे साबान मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः-पेशजीं छ २६ रज्जबचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्ली इकडील वर्तमान तरीः- राजश्री पाटीलबावांची खबर आल्यानंतर, हजरतांनीं रो गोपाळराव रघुनाथ व जिवाजी बल्लाळ व डिभाई वगैरे सर्वांस खातरजमेचे शुके मातमपुरसीबद्दल वरचेवर लिहून पाठविले; व दौलतराव शिंदे यांसही पत्रें पाठविलीं आहेत. व बापू मल्हार यास पाणिपताहून शाहाजीनीं बोलावून, पातशाहाकडे नेऊन छ २७ तारिखेस मुलाजमत करविली. हजरतांनीं बहुत समाधान करून सांगितलें कीं, पूर्ववत्प्रमाणें आपले कामाचा बंदोबस्त राखणें, व कांहीं फौज दिल्लीचें गिर्द ठेवावी. याप्रमाणें त्यांस सांगोन रुखसत केलें. नंतर रनेल साहेब नामें फिरंगी सेर करावयास येथें आला. त्याची मुलाजमत शाहाजीचे विद्यमानें जाली. फिरंगी

मजकुरानें पांच पांच मोहरा हजरतास व वरकड शहाजादे यांस चारशें रुपये सर्व मिळून नजर केले. एक घटका पावेतों पादशाहांनीं फिरंगीसीं बोलणें केलें. खिलत पांच पारचे, साहेबमशारनिल्हेस, व हमराही लोकांस सात खिलत इनायत जाले. पातशाहांनीं फिरंगी यांस एकांतीं सांगितलें कीं, "पामर साहेबांस बोलाविलें आहे. ते येथें येत तों पावेतों तुह्मीं आमच्यापासींच राहावें." स्वहस्तें फिरंगी कलमेनें गवरनर वगैरे सरदारांस खुफियापत्रें रवाना केलीं. मिर्जा अकबरशहांनीं सैद रजीखानास चिठ्ठी लिहून पाठविली कीं, या प्रसंगीं इंग्रेजांसीं कांहीं बंदोबस्त इकडील होत असल्यास आह्मी हाजीर आहों. सांप्रत मैदान खाली आहे. सैद रजीखानानें ते चिठ्ठी बजिन्नस शाहाजीस दाखविली. त्यावरून यांनीं बहुत फजित केलें. अकबरशहाचा पैगाम हजरतासीं आहे कीं, आपल्या रूबरू आह्मांस पातशाहातीवर बसवून बंदोबस्त करोन देवावा; अथवा लखनऊस रुखसत करावें. नाहीं तरी रात्रीं एखादे वेळीं येथून निघून जाऊं. याप्रमाणें यांचा विचार आहे. छ २९ रज्जबचे तारिखेस राजश्री आबा चिटणीस यांचीं पत्रें व दौलतराव शिंदे यांजकडील अर्जी व शाहाजींचे नांवें पत्र बहुत खातरजमेचीं आलीं. त्यावेळीं शाहाजी हुजुरांत जाऊन अर्जी वगैरे पत्रें हजरतास दाखविलीं. शादियानें वाजवावयाची परवानगी जाली. व तोफखान्याची सलख जाहली. भवानीकुंवर किल्लेदार व हुजरे यांस तीन तीन पारचे खिलत इनायत जाले. शाहाजीनीं शेरणी वाटली. कारण हें कीं, मुलकांत हें वर्तमान प्रसिद्ध जाल्यावर बदअमली होणार नाहीं. चिटणिसांचे इशाऱ्याप्रमाणें यांनीं हा डौल केला. परंतु इंग्रेजांचे वकिलास अंतस्थ आणीकप्रकारें समजाविलें. दुसरें, शावलीखानाचा पुत्र मनसुरखान येथें आहे. त्यांस एकांतीं बोलावून सांगितलें कीं, विलायतेस जमाशहास व आपले बंधूस हें साकल्य वृत्त लिहोन, कांहीं तिकडील इरादा ध्यानास आल्यावर त्याप्रमाणें पुढें नक्षा पडेल. जर हिंदुस्थानची मुखत्यारी दौलतराव शिंदे यांस श्रीमंत साहेबांनीं पूर्ववत्प्रमाणें दिधली, तरी उत्तम आहे. कदाचित् दुसरा कोणी आल्यास, मिर्जा अहसनबख्त यांसीं सामील होऊन सलतनतचा बंदोबस्त अमलांत येईल. त्याप्रमाणें खानमशारनिल्हेस सांगून पत्रें परभारें लिहिविलीं आहेत. व एलचीचे हातून पै दरपै पत्रें पाठविलीं असेत. परंतु श्रीमंत स्वामींचा प्रताप थोर, तेणेंकडून सर्व पादाक्रांत होतील. इंग्रेज कायममिजाज आहेत. त्यांसीं वचनांत सरकारचे दोस्तींत तफावत होणार नाहीं. हिंमतबहादर गोसावी यानें वजिरासीं साजीश करून, तिकडून सफाई करून घेतली. नबाब अलीबहादर यांसीं जाहिरींत बहुत स्नेह दाखवून, अंतस्थ वजिराकडे सूत्र लागलें आहे. पहिल्यापासोन गोसावी याची वर्तणूक स्वामींस विदित आहेच. नबाब

अलीबहादर यांनीं कारकून राजश्री गोपाळ रघुनाथ यांजकडे पाठविले. आपसांत सफाई करून घेतली. राव मजकुरांनीं दतियेकराची गढी मनोलीची खाली करून दुसऱ्या गढीस मोर्चे कायम केले. इतक्यांत तेथेंही पाटीलबावांचें वर्तमान आल्यावर, भवानीकुंवर व शाहाजी वगैरे येथील मंडळीस पत्रें आलीं कीं, शहरचा व किल्ल्याचा बंदोबस्त यथास्थित राखणें. त्यावरून खंडेराव हरी यांनीं पांचशें लोक किल्ल्याचे माफजतीस व दोन तोफा आणीक पाठविल्या. शाहाजीनीं हजार प्यादे ठेऊन, तुरुत शहरचा बंदोबस्त राखिला आहे. जमाशहा कूच करून नसीरखानचे मुलकांत गेला. सांप्रत त्यास तिकडे अटकाव आहे. राजश्री खंडेराव हरी दादरीस येणार. नबाब वजीराचे पुत्राची शादी रूबकार आहे. बंगाल्याहून मोठी बेगम वगैरेस बोलाविलें आहे. ते आल्यानंतर निकाह होईल. कलकत्याहून चेरीसाहेब लखनऊचे कामावर येणार. हसनरजाखान व टिकेतराय सामोरे जातील. ऐसा विचार आहे. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ११०.

श्री. मार्च इ. स. १७९४

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंती ऐसीजे. राजश्री पाटिलबावा वैकुंठवासींचें वृत्त आल्यानंतर पातशाहानीं तत्काल आगऱ्याचे किल्लेदारास शुका लिहून पाठविला कीं, मिर्जा इस्मालबेग यास जिवें मारून टाकावें. कदाचित् तेथून निघोन गेल्यास अनेक उपद्रव होतील. त्यास मिर्जामजकुराचें जवळ निगाबाजीस डिभाईकडील दोन पाहारे तैनांत किल्ल्यांत होते. पातशाहाचा शुका किल्लेदारास पावल्यावर, वेंकाजीपंतनामें लखबादादाकडील तेथें किल्ल्यांत वगैरे कामावर आहे. त्यानें डिभाईकडील लोकांस किल्ल्यांतून बाहेर काढून देऊन, मिर्जामजकुरावर आपले लोक मातबरपैकीं पाहाऱ्याचे खबरदारीकरितां तैनात केले. डिभाईसाहेबही आगऱ्यास जाणार होता. हें वृत्त ऐकून कोलचे सुमारें कूच करून गेला. शाह निजामुद्दीन यासीं व साहेब मजकुरासीं केवळ नाचाखी आहे. व मिर्जा अकबरशाहानीं कागदपत्रीं सिलसिला डिभाईकडे कायम केला. तात्पर्य, पातशाहा व मिर्जा वगैरे पातशाई सलातीन आदिकरून सर्व येथील मुखतारासीं बेजार आहेत. खर्चाची विपत्य रात्रंदिवस राहते. याजमुळें किल्ल्यांतील लोक मिर्जा वगैरे उपद्याप करून, साल आईंदा कांहीं

खूळ उत्पन्न करणार आहेत. शाहाजीनीं केवळ हैराण केलें. व याशिवाय सख्त भाषण शेरदरबार हजरतास व मिर्जास बोलतात. तेणेंकडून यांसी राजी नाहींत. त्यास सूचनार्थ सेवेसीं विनंति लिहिली आहे. अगोदर येथील बंदोबस्त केला पाहिजे. श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १११.

श्री. १४ मार्च इ. स. १७९४.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. भवानीकुंवर व किल्लेदार यांनीं राजश्री खंडेराव हरी व जिवाजी बल्लाळ यांच्या लिहिल्यावरून चुरूचे व्यापारियांचे निळेचे गाडे नव बरेलीहून दिल्लीचे मार्गानें येत होते, ते जफ्त केले. कारण हें कीं, पूर्वीं रावमजकूर चुरूचे जिल्ह्यांत गेले होते. तेथील खंडणी दीड लाख रुपये ठैरण्यांत आली. इतकियांत राजश्री पाटीलबावांचें वर्तमान येतांच, दोन चार आसाम्या वोलीत घेऊन दरमजल माघोरे दिल्लीस आले. खंडणीचा ऐवज तिकडून आज तागाईत आला नाहीं. ह्मणून रावमजकुरांनीं व्यापारियांचा माल जफ्त केला. जहाज फिरंगीस या कामगारीकरितां पाठविलें होतें. कुंवर मजकुरांनीं अगोदरच निळेचे छकडे जफ्त करून किल्ल्यांत ठेविले. त्यावरून दरोबस्त शहरचे व्यापारी जमा होऊन शाहाजीकडे फिर्यादी जाले. दुसऱ्या दिवशीं शाहाजींनीं जहाज फिरंगीची अवाई ऐकून, शहरांत दरवाज्यावर मोर्चेबंदी करून बंदोबस्त केला. किल्ल्यांत कुंवर मशारनिल्हेचा बंदोबस्त जाला. परस्परें पांच सात दिवस मोठा हंगामा शहरांत व आपसांत राहिला. शेवटीं कुंवर मशारनिल्हेनीं फिरंगीमजकुरास येथून परभारां झझरचे रुखास रुखसत केलें. शाहाजी किल्ल्यांत पादशाहांपासीं जात नवते. सबब हजरत स्वार होऊन यांच्या डेऱ्यास आले. व कुंवर मजकुरासही समागमें आणून, उभयतांसीं परस्परें सलूख करून देऊन, शाहाजीस किल्ल्यांत बरोबर आणोन बहुता प्रकारें हजरतांनीं खातरजमा केली. छ १० तारखेस बकरीदची नजरा हरएकानें माफक मामूल गुजारणल्या. तात्पर्य, आपसांत कलह प्रारंभ जाला. सरदारांत चित्तशुद्धता नाहीं. बहिरो कोनेर यांनीं देवजी गवळी व बापू मल्हार यांस साफ उत्तर दिलें कीं, तुम्हीं फौजसुद्धां राजश्री जिवबा बक्षीकडे उठोन जावें. त्यावरून उभैतां बेदील होऊन, सहारंगपुराहून कूच करून आले. मुलुकांत कजाकी करून लुटून खातात. पाणीपताकडे मार्ग चालत नाहीं.

बक्षीमजकूर नीमच्या थान्यांत आहेत. हरएक गढीबंदासीं खंडणी घेऊन गुजराण करतात. शाहाजीनीं राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस साकल्य वृत्त येथून लिहिलें होतें. रावमशारनिल्हेनीं डिभाईस लिहिलें. त्यावरून साहेबमजकुरानीं दोन पलटणा व आपला बक्षी, दिल्लीचे रुखास शहरचे माफजतीकरीतां रुखसत केल्या. पिरूसाहेबांस लिहिलें आहे कीं, बक्षीमजकुराची नियत बमजकूर कायम असल्यास तुह्मीं एकत्र राहाणें. कदाचित् बदनियत व फूटचा प्रकार असला, तर त्यांच्या लष्करांतून चार कोस आगाऊ अगर तफावतीनें कंपूसुद्धां राहावें. याप्रमाणें डिभाईनीं पत्रें पाठविलीं आहेत. जैपूरकरानीं खुशालीराम बोहऱ्यास कैद करून रोडजी खवास यांस दरोबस्त कारभाराची मुखतारी दिल्ही. पुढें प्रत्ययास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति. ”

लेखांक ११२.

श्री. ३० मार्च इ. स. १७९४.

“श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ २७ माहे साबान मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विषेशः—पेशजीं छ २ माहे मजकुरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं हल्ला करून दतियाचे शहरपनाह नजीक जाऊन मुकाम केला. राजे छत्रजित दतियाकर यांजकडील पांचशें लोक व चार सरदार लढाईंत ठार जाले. ताब मुकाबल्याची न आणितां पळोन शहरांत गेला. तेथें हवेलीवर मोर्चे कायम करून जमीदाऱ्याची पुकार जमा केली. फिरोन साहेबानें गोळा मारून, राजेमजकुराची तोफ शिकस्त केली. यावर राजश्री शिवराव हरी झांसीकर दरम्यान येऊन मामलयाचा फडशा चौदा लक्षांवर केला. पैकीं तीन लाख रुपये मुलकाचे पायमालीबद्दल वजा होऊन, बाकी अकरा लक्षांत कांहीं जागा लावून द्यावी; नख्त दीढ लाख रुपये व भरणा हत्ती घोडा वगैरे मिळोन घ्यावा ऐसें ठैरोन, तुरूत निशा जालीयावर दारमदार करून, दरकूच श्री मथुरेस येऊन नंतर येथें हजरतापाशीं येणार. पूर्वीं पादशाहांनीं खुफिया दोन तीन शुके, सैद रजीखानाचे विद्यमानें, कलकत्त्यास शोरसाहेब वगैरे यांस पाठविले होते. त्यावरून तेथें पामरसाहेबानीं अगोधर राजश्री गोपाळराव

रघुनाथ यांजकडे येऊन, येथील नक्षा दरोबस्त ध्यानांत आणून, नंतर पादशाहाचे दर्शनास येथें येऊन, मिर्जा अकबर व हजरत यांसीं पक्केंपणें विचार ठैरावून, तदनंतर कंपनीस लिहोन इकडील बंदोबस्त करावा; याप्रमाणें कलकत्तेकरासीं बोलणें अंतस्थ होऊन ठैरलें आहे. पामर साहेबाची रुखसत त्वरेनेंच होणार. पामरसाहेबाकडून मेघफाश साहेब फरुक्काबादेंत आहे. त्यांस इशाऱ्यांत लिहिलें आहे कीं, पादशाहाकडे सैरचे बहान्यानें जाऊन दिल्लींत रहाणें. त्यावरून फरुक्काबादेहून साहेबमजकूर दरकूच संस्थानीं येणार आहे. यवनसाहेब कलकत्याहून विलायतेस गेला. त्याच्या बदलीवर चेरी साहेब लखनऊस येणार आहे. नबाब वजीरांनीं, वजीरअल्ली नामें पुत्र आहे, त्याचे शादीची तयारी पंचवीस लक्षांची करून, नबाब मुजफरजंग फरुकाबादकर व फैजुलाखान रामपूरकर वगैरे सर्व सरदारांस शादींत बोलावून, बहुमान वस्त्रें देऊन, लहान थोरांचे मेजमानीची तयारी होते. बंगाल्याहून नबाब वजिराची आई, मोठी बेगम, शादी करितां लखनऊस आली आहेत. श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणी पत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ११३.

श्री. ता० ३० मार्च इ. स. १७९४.

''श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २७ माहे साबान मुकाम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ २ माहे मजकूरची विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं दतियावर हल्ला करोन शहरपनाहचे दिवाळनजिक जाऊन मुकाम केला. राजे छत्रजीत दतियाकर यांजकडील पांचशें लोक लढाईंत ठार जाले. ताब मुकाबल्याची न आणितां माघारे हटून शहरांत गेला. राजश्री शिवराव हरी झांशीकर यांचे विद्यमानें मामलत्याचा जाबसाल चवदा लक्ष रुपये ठैरण्यांत आले. पैकीं तीन लाख रुपये पायमालीबद्दल वजा होऊन, बाकी अकरा लक्षांत दीड लक्ष रुपये नख्त व भरणा हत्ती, घोडे वगैरे सरंजाम जाल्यानंतर, तेथून दार मदार राखून दरकूच मथुरेस येणार. हजरतांचे शुके पै दर पै जातात कीं, एक वेळां येथें येऊन

जावें. ह्मणजे सीख वगैरे जमीदार मवास यांजवर दबाव होईल; खलश होणार नाहीं. शाहाजी केवळ हिरासा होऊन सर्व वस्तभाव युक्तीनें लखनऊ व भरतपुरास रवाना करून, एखादे वेळीं येथून निघोन जावें या उद्योगांत होते. हें वृत्त खंडेराव हरी यांनीं ऐकोन कानोडांतून दरकूच छ ५ मिनहूस संस्थानीं दहा हजार फौजेनसीं येऊन दाखल जाले. शाहाजीचे विचारें त्याचदिवशीं पातशाहाची मुलाजमत केली. अकरा मोहोरा हजरतांस व एक मोहोर मिर्जा अकबरशाहा व वगैरे शहाजादे यांस दोन दोन रुपये नजर करून, पातशाहाची बहुत खातरजमा केली. हुजुरांतून खिलताविशीं परवानगी जाली. त्यावरून राव मशारनिल्हेनीं अर्ज केला कीं, राजश्री दौलतराव शिंदे यांस सरकारांतून सर्फराजीचा खिलत जाल्याचें वृत्त आल्यानंतर हजरतांचा खिलत घेऊन रुखसत होईन. सबब प्रथम भेटीस खिलत मौकूफ राहिला. छ ८ तारिखेस शाहाजींचे अनुमतें पातशाहांनीं दौलतराव शिंदे यांस सर्फराजीचा खिलत तयार करोन राव मजकुरांचे स्वाधीन केला. व राजश्री पाटीलबावा वैकुंठवासी यांस खिताब होता त्याप्रमाणेंच मोहोर व अलकाबाची परवानगी जाली. व शुकाही सादर जाला. खंडेराव हरी यानीं मिर्जा मजकुराची बहुत दिलासा युक्तीचे वाटें करून फितुराचीं पत्रें हरएक सरदार, वजीर, इंग्रेज आदिकरोन सर्वांस लिहिलीं होतीं, तें बंद केलीं. तेणेंकडून येथें स्वस्थता राहिली. रनेल फिरंगी मिर्जाचे अनुमतें मुक्काम करून होता. तो छ ५ रोजींच येथून कूच करोन सरधन्यास गेला. तदनंतर पुण्याची अखबार शाहाजींनी हुजुरांत गुजराणली. राजश्री दौलतराव शिंदे यांस सरकारांतून हिंदुस्थानचे मुख्तारीचा खिलत इनायत जाला, हें वृत्त हजरतांनीं ऐकोन शादीयानें वाजवायाची परवानगी देऊन, तोफखान्याची सलख करविली. छ १७ तारिखेस नौरोजबद्दल सर्वांनीं नजरा केल्या. नंतर छ १९ तारिखेस राजश्री खंडेराव हरी, हजरतांसी रुखसत होऊन, फौजसुद्धां रेवाडीचे रूखास कूच करून गेले. देवजी गवळी व बापू मल्हार दोन हजार फौजेनसीं दिल्ली नजीक येऊन मुकाम केला. राजश्री लखबादादा जयपुरांत दाखल जाले. जिवाजी बल्लाळही दों चौ दिवसांत जयपुरांत येऊन, राजाची भेट घेऊन पाटणचे जिल्ह्याचा बंदोबस्त करणार. छ ११ तारिखेस गुलाम महंमद येलची यानें पातशाहाची मुलाजमत करून विलायतेस रुखसत जाला. हजुरांतून तीन पारचे खिलत, व पांचशें रुपये वाटखर्चास इनायत जाले. व जमाशाहास दोन शुके लिहोन येलची मजकुराचे स्वाधीन जाले. नबाब वजीर लखनऊत आहेत. कलकत्त्याहून चेरी साहेब येणार. मशारनिल्हे आल्यानंतर तेथील नक्षा अम-

ळांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामीसमर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ११४.

श्री. ता. ३० मार्च इ. स. १७९४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—शाहा निजामउद्दीन यांनीं केवळ हिरासा होऊन, आपली वस्तभाव युक्तीनें काढून, लखनऊ व भरतपुरास रवाना केली. व एकादी वेळ येथून निघोन जावें या उद्योगांत होते. हें वृत्त राजश्री खंडेराव हरीनीं ऐकोन, कानोडाहून दरकूच दहा हजार फौजेनिसीं येऊन, छ ५ माहे मजकुरीं दिल्लींत दाखल होऊन, शाहाजीचे विद्यमानें त्याच दिवशीं पातशाहाची मुलाजमत हांसील केली. खिलताची परवानगी जाली. त्यावरून राव मजकुरांनीं विनंति केली कीं, राजश्री दौलतराव शिंदे यांस श्रीमंत साहेबांचे हुजुरांतून सर्फराजीचा खिलत इनायत जाल्याचें वर्तमान आल्यावर, हजरताचा खिलत घेऊन रेवाडीकडे रुखसत होईन. सबब प्रथम भेटीस खिलत मौकूफ राहिला. दुसऱ्या रोजीं राव मशारनिल्हेनीं पातशाहा व अकबरशहा यांस एकांतीं बसोन, बहुताप्रकारें खातरजमा करोन, आपल्या लगामीं लावून घेऊन फितूर बंद केला. या पूर्वीं मिर्जा मजकुरांनीं नैनसिंग गुजर व समरूची बेगम व अमीर महंमदखान बलोच बहादरगडवाला यास लिहिलें होतें कीं, फौजेची निगादास्त करावी; पैका आह्मी सरबरा करून पाठवूं. दुसरे, रनेलसाहेब फिरंगी यांसही ठेवून घेतलें होतें. इतक्यांत राव मशारनिल्हे आल्यानें सर्वांस दहशत जाली. तेणेंकडून चहूंकडील उपद्रव बंद जाला. व रनेल साहेब छ ५ रोजींच येथून कूच करोन सरधन्यास समरूचे बेगमेपासीं गेला. शाहाजी घाबरले ह्मणोन हजरत व मिर्जा आदिकरोन सर्वांनीं फितुरास प्रारंभ केला होता. परंतु रावमजकूर आल्यानें येथील बंदोबस्त किल्ल्याचा व शहरचा कायम राहिला. या नंतर छ ८ तारखेस शाहाजीचे विचारें हजरतानीं राजश्री दौलतराव शिंदे यांस सर्फराजीचा खिलत तयार करोन खंडेराव हरीचे स्वाधीन केला. येणेंप्रमाणें:—

१ खिलत सात पारचे.	१ जेगा मय परगिरी
१ चार कुफ्त.	१ सरपेंच जवाहीर.

१ दस्तार १, सरबस्ता व	१ मोत्यांची माळ मय दूरबसी.
चद्‍लान १, किनखापी	१ सिपर १, शमशेर १.
मलबूस खास	१ हत्ती घोड्याची परवानगी

याप्रमाणें खिलत वगैरे संरजाम राव मजकुराचे स्वाधीन केला. त्यास येथून सर्व सरंजाम राजश्री गोपाळराव रघुनाथ यांजकडे रवाना करणार. व राजश्री पाटीलबावांस खिताब होता त्या प्रमाणें अलकाबसुद्धां हजुरांतून मोहोर व शुका तयार जाला आहे. खिलताबरोबर पाठविणार आहेत. पुढें अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ११५.

श्री. मार्च इ. स. १७९४.

" पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:-शाहाजीनीं पुण्याची अखबार हजरतास गुजराणली. छ० १ माहे मजकुरीं राजश्री दौलतराव शिंदे यांस हिंदुस्थानचे मुख्तारीचा खिलत श्रीमंत साहेबांचे सरकारांतून जाला; हें वृत्त अखबारावरून पातशाहानीं श्रवण करून तोफखान्याची सलख करविली. व खुशीचे शादीयानें वाजवायास परवानगी दिल्ही. दुसऱ्या दिवशीं नौरोजबद्दल शाहाजीनीं शिंदे मशारनिल्हेकडून एकशें एक मोहोर हजरतांस नजर केली. व राजश्री खंडेराव हरी वगैरे यांनींही माफक मरातब नजरा केल्या. सैद रजीखानानें नवाब–वजीर व शोर साहेब कलकत्तेकर यांजकडील दोनशें दोन मोहोरा नजर केल्या. तदनंतर छ १९ माहे मजकुरीं रावमजकूर पातशाहासीं रुखसत जाले. हजुरांतून सा पारचें खिलत, जेगा, शिर्पेच, मोत्यांची माळ, तरवार येणेप्रमाणें, व वरकड हमराही लोकांस चाळीस खिलत, दुशाले, गोशवारे इनायत जाले. छ २० तारखेस राव मशारनिल्हे येथून कूच करून बहादूरगडास जाऊन, पांच हजार रुपये मामल्याबद्दल तेथून वसूल केले. दो चौ दिवसांत रेवाडीकडे कूच करोन जाणार. कानोड व मेवात वगैरे प्रांतांत जमीदार व जयपूरकरांकडील रांगड्यांनीं मोठा हंगामा केला आहे. सबब त्याचें पारिपत्य करावें, ऐसा विचार यांचा असे. देवजी गवळी व बापू मल्हार चार हजार फौजेनसीं दिल्लीनजीक येऊन नित्य स्वराज्यांत पेंढारी लुटून नेतात. बहिरो कोनेर सहारंगपूर प्रांतीं आहेत. गवळी मजकुरासीं व त्यांसीं आपसांत चित्त शुद्धता नाहीं. ह्मणोन त्यांजकडील मुलखांत खलश करून गुजराण करितात. राजश्री लखबादादा जयपुरास येऊन राजे प्रतापसिंग जयपू-

रकर यांसीं भेटी जाल्या. परस्परें बहुत ममतेचें बोलणें होऊन राजे मजकुरांनीं वस्त्रें, हत्ती, घोडा देऊन बिदा केलें. राजश्री जिवाजी बल्लाळ जयपुराहून चवदा कोसांचे तफावतीनें आले. दो चौ दिवसांत मशारनिल्हेही जयपुरास येऊन, राजे मजकुरांची भेट घेऊन, पाटणचे सुमारें येऊन, रांगड्याचें पारिपत्य करणार आहेत. गुलाम महमद येलची यानें छ ११ तारिखेस पातशाहासीं मुलाजमत हांसील करून जमाशाहाकडे पेशोरास रुखसत जाला. हजुरांतून तीन पारचे खिलत, जेगा, शिपैंच व पांचशें रुपये नख्त् वाटखर्चास इनायत जाले. जाहिरींत शाहाजीचे विद्यमानें एक पत्र जमाशाहाचे नांवें लिहोन दिल्हें. व खुफिया नामा अलाहिदा पाठविला आहे. शाहा मजकूर पेशोरांतून काबीलास जाणार; ह्मणोन वदंता असे. सेवेसीं श्रुत होय हे विनंति"

लेखांक ११६.

श्री. मार्च इ. स. १७९४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:— राजश्री गोपाळराव रघुनाथ दतियानजिक तीन कोसांवर मुक्काम करून आहेत. झांशीकराचे विद्यमानें मामल्याचा जाबसाल रुबकार आहे. दोन लक्ष रुपये राजाचें बोलणें आहे. परंतु कांहीं अद्यापि ठैरण्यांत आलें नाहीं. नवाब अलीबहादर तीस कोसांचे तफावतीनें मौजे कछोन येथें मुक्काम करून आहेत. आपली फौज सर्व····राव मशारनिल्हे कडील पेंढारी यांनीं नवाब····निल्हेचे लष्करावर दौड केली होती. परंतु तो सावध होतांच, सबब कांहीं काबू न सांपडला. माघारे आले. त्यावरून नवाब मजकुरास केवळ खतराई-कडील फौजेचा जाला. असे नोने अर्जुनसिंगाचे पुत्रांनीं राव मशारनिल्हेकडे पैगाम केला कीं, बुंधेलखंडांतून नबाबाचा अंमल उठोन देऊन, आमचा बंदोबस्त करोन दिधल्यास, दहा लक्ष रुपये नजराणा व हरसालची खंडणी ठैरेल, ते आदा करूं. त्यावरून यांनीं जिवाजी बल्लाळ यांस कंपूसुद्धां बोलाविलें आहे. हिंमत बहादर यांनीं उमरावगिरास नवाब वजीराकडे पाठवून, नवाब अलीबहादर याची दोस्ती परस्परें पक्केपणें ठैरावून आले. राजश्री खंडेराव हरी झझर नजीक आले. बिकानेरवाला राजा मृत्यु पावला. सबब अद्यापि खंडणीचा पैका यांजकडोन आला नाहीं. जमाशाहानीं राजा मृत्यु पावल्याचें वृत्त ऐकोन, कांहीं फौज बिकानेरास पाठवावयाची योजना केली ह्मणोन वदंता आहे. राव मशारनिल्हेनीं जहाज फिरंगी यास चाकर ठेवून पलटणाची भरती करितात. व सीख पांच

हजार स्वार बोलाविले आहेत. जयपूरकरांनीं दौलतरामाचे पुत्रास खिलत, हत्ती, घोडा देऊन सर्फराज केलें. हल्लीं मशारनिल्हेस फौजसुद्धां राजश्री जिवाजी बल्लाळ यांजकडे पाठविलें आहे. देवजी गवळी व बापूजी मल्हार फौजसुद्धां दतियाकडे जाणार. सध्या दिल्लीचे गिर्द प्रांतांत खलश करून हरएका गांवासीं उपद्रव करून आहेत. श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ११७.

श्री. २८ एप्रिल इ. स. १७९४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राजश्री गोपाळराव रघुनाथ अद्यापि दतिया नजीक मुकाम करून आहेत. राजे छत्रजीत दतियाकर यांनें मामल्यापैकीं तीन लक्षांत नगदी सरंजाम व चार लक्षांत हत्ती, घोडे, कापड वगैरे जिन्नस भरणा करून दिल्हा. बाकींत दोन महाल लावून घेऊन, महालांत दखल जाल्यावर चंदेरी वगैरे मवास यांसी खंडणी द्यावी ऐसा विचार आहे. राजश्री खंडोजी इंगळे, ग्वाल्हेरचे किल्लेदार, यांचे विद्यामानें, राजधर सिमथरकर गुजर याची खंडणी पंचाहात्तर हजार रुपये व बिछोडकराची पसतीस हजार रुपये ठेरली. त्याची निशा इंगळे मजकुरांनीं करून देऊन, ग्वाल्हेवरीस रुखसत होऊन गेले. बहिरो कोनेर यांचा पुतण्या खंडोपंत नामें, देवजी गवळी व बापू मल्हार यांचे समजाविशीस दिल्लीस आले. परस्परें बहुत बोलणें जालें. गवळी मजकूर निमराजी जाले होते. परंतु यांचे आपसांत चित्तशुद्धता नाहीं. सबब उभयतां जिवाजी बल्लाळ यांचे लष्करास जाणार आहेत. नवाब वजीर यांनीं दोन चार रांडा गरोदर घरांत घालोन घेतल्या होत्या. त्यांस पुत्र जाले होते. त्यास वजीर-अल्ली नामें पुत्राचें लग्न, मीर अशरफअलीचे कन्येशीं केलें. मोठे तयारीनें शादी केली. नवाब मुजफरजंग फरुकाबादकर व फैजुल्लाखानाचा पुत्र व इंग्रेज वगैरे सरदार सर्व शादींत सामील होऊन, हरएकानें नीवत्याब हजारों मोहोरा नजर केल्या. तीस लाख रुपये वजिरानीं शादींत खर्च करून सर्वांस बहुत लवाजमा, पोशाखी, जवाहीर वगैरे दिल्हें. नवाब मुजफरजंग यास अकरा किस्ती वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडा वगैरे, हमराही लोकांस वस्त्रें देऊन, फरुकाबादेस रुखसत केलें. चेरी साहेब दरकूच येतात. एका दों दिवसांत लखनऊंत दाखल होणार. राजे बछराज यांस सामोरे पाठविलें आहे. लखनऊंत आल्यानंतर काय नक्षा ठेरेल तें प्रत्यास आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ११८.

श्री. २८ एप्रील इ. स. १७९४.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंद पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २७ माहे रमजान मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः- पेशजीं छ २७ साब्रानची विनंति पत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ दतिया नजीक मुक्काम करून आहेत. मामल्याबद्दल सात लक्षांचा भरणा नगदी व जिन्नस मिळोन यांजकडे जाला. बाकीबद्दल महाल लावून घेऊन, चंदेरी वगैरे गिर्दचे मवास यांसीं खंडणी घेऊन श्रीमथुरेस येणार. राजधर गुजर सिमथरकर व बिछोडकर यांचा मामला एक लाख दहा हजार रुपयांवर फडशा जाला. त्याची निशा खंडोजी इंगळे यांचे विद्यमानें जाली. नंतर इंगळे मजकूर रुखसत होऊन ग्वाल्हेरीस गेले. राजश्री जिवाजी बल्लाळ व लखबा फौजसुद्धां जयपूरकरांच्या इशाऱ्याप्रमाणें कालकचे गढीस मोर्चे लावून खालीं करून घेतली. सुखराम दौलतरामाचा पुत्र सामील होता, त्याचे स्वाधीन केली. आठा चौ दिवसांत बक्षी मजकूर फौजसुद्धां जयपुरास येणार. मागील बाकीचा व साल हालचे खंडणीचा फडशा करून, सेखावटीनजीक राजश्री खंडेराव हरी यांसीं भेटोन, हरएक मवासाचें पारिपत्य करून छावणीस येणार. राव मजकूर पाटणचे जिल्ह्यांत आहेत. पातशाहाचें वृत्त बदस्तुर असे. गोपाळराव रघुनाथ यांनीं येथील मुख्तारांसीं दहा लक्ष रुपये तलब केले. सबब मोठे अंदेशांत आहे. जमाशाहानीं मिर्जा आहसन बख्त यांस लाख रुपये खर्चास देऊन मुलतानास रुखसत केलें. व खुद्द खांसा स्वारी पेशोराहून कूच करून काबिलास गेला. नवाब वजिरानीं आपले पुत्राची शादी मोठे तयारीनें केली. नवाब मुजफरजंग फरुकाबादकर व फैजुल्लाखानाचा पुत्र व इंग्रेज वगैरे सर्व शादींत सामील होते. चेरी साहेबास आणावयाकरितां राजे बछराज यांस श्री काशीपर्यंत सामोरे पाठविलें आहे. दो चौ दिवसांत साहेब मजकूर लखनऊंत दाखल होणार. डिभाई फिरंगी कोलनजीक आहे. अद्यापि मशारनिल्हेची नीयत पूर्ववत् कायम असे. श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचें पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ११९.

श्री. एप्रिल इ. स. १७९४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—राजश्री खंडेराव हरी फौजसुद्धां पाटण नजीक जयपूरचे जिल्ह्यांत आहेत. पलटणचे लोकांनीं हंगामा बहुत केला. सबब नारनोलकर साहुकारांसीं जबरदस्तीनें दहा हजार रुपये कर्ज घेऊन पलटणवाल्यास दिल्हें. पाटणचे जिल्ह्याचा मामला घेऊन राजश्री जिवाजी बल्लाळ यांचे भेटीस जाणार. जहाज फिरंगी पूर्वीं समरूचे बेगमपाशीं चाकर होता. तेथें बटेबाजीस प्रारंभ केला. ह्मणोन बेगम मजकुरानें फिरंगीस काढून दिल्हें. सांप्रत राव मशारनिल्हेनीं त्यास आपल्यापाशीं एक पलटण देऊन चाकर ठेविले. फिरंगी मजकूर यांसीं व बेगमेसीं जिदीचा प्रकार. यास्तव येथून जाते समयीं पादशाहापूर तालुक्याचे गुडगांव वगैरे दोन तीन गांव मारले. त्यावरून बेगम बहुत बेदील आहे. डिभाईसाहेब कोलचे जिल्ह्यांत पिरोजाबाद वगैरे महाल यांजवर दबाव दाखवून पैक्याची तहसील करितात. अद्यापि साहेबमजकुराची नीयत सरकार चाकरीविशीं कायम आहे. जमाशाहानीं मिर्जा आहसनबख्त यास लाख रुपये खर्चास देऊन, बहुत खातर जमा करून, मुलतानास रुखसत केलें. व खुद्द खांसा स्वारी पेशोराहून काबिलास गेला. गुलाम महमद येलची पूर्वीं हजरताची आज्ञा घेऊन जयपूरचे मार्गानें विलायतेस जात होता. दरम्यान मनोहरपूरवाल्यानें येलची मजकुरास हांसिलाकरितां पंधरा दिवस कैद करून ठेविलें. हांसील घेतल्यानंतर सोडोन दिल्हें. ह्मणोन हजरतांस मशारनिल्हेची अर्जी आली. व गुलाम अहंमद व कायेनिगार याचे विद्यमानें श्रीमंत स्वामींचे नांवें व राजश्री पाटीलबावा वैकुंठवासीचे नांवें जमाशाहाचे दोन शुके शाहाजीकडे आले. त्यावरून येथील मुख्तारांनीं उत्तर केलें कीं, "राजश्री पाटीलबावांची हे गत्य जाली, आतां सिलसिला ठेवणार कोण आहे! व्यर्थ शुके पाठवून पशेमान व्हावें यांत ठीक नाहीं." याप्रमाणें व कायेनिगाराचे वकिलासीं बोलणें जालें. राजश्री आबा चिटणीस येथील मुख्ताराचे मुरब्बी बहुत. त्यांच्या भरंवशावर येथील रयतीस वगैरे लोकांस उजाड करोन लाखों रुपये तसरुफ केले. आतां यांजवर कोणाचाही दबाव राहिला नाहीं. मुख्तारांनीं येथून आपली वस्तभाव व नगदी ऐवज दरोबस्त यापूर्वींच भर्तपुरास पाठवून दिल्हे. हल्लीं चिटणीसमजकुराची अर्जी हजरतांस व पत्र खातरीचें शाहाजीचे नांवें आलें. त्या दिवसापासोन आणिकही लुटीस प्रारंभ केला असे. पुढें प्रत्यास येईल ते सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२०.

श्री. इ. स. १७९४.

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंती ऐसीजे. राजश्री खंडेराव हरी जैपूर व पाटणचे गीर्द आहेत. फौजेचा दंगा फार. दुसरें, बखता जमीदार यानें काटी व बोरी वगैरे रांगा आठ हजार केला. जमा करून झझर वगैरे प्रांतांत दुंडी केली. व ठाणीं उठोन दिल्लींत साहेबराव मशारनिल्हेनीं राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी यांस कुमकेविशीं लिहिलें, त्यावरून बक्षी मजकूर सेखावटीस आले. परस्परें यांच्या भेटी जाल्या. नंतर राव मजकुरांनीं बदअमलीचें वृत्त सांगितलें. त्यावरून बक्षीमजकूर यांनीं खर्चाची दरखास्त केली. यावर मशारनिल्हे बेदील होऊन कोट कासमचे रुखास कूच करून आले. व हाकीम बाडी जाली व जहाज फिरंगी यांस रेवाडीस दोन पलटणासुद्धां पाठविलें आहे. बखता जमीदार मुकाबल्यास तयार असे. दिल्ली नजीक नजफगड पावेतों, जमीदार मजकुरानें, गांव तारव्त करून लुटून नेलें. सबब शाहाजीनीं दोन तोफा व पलटणचे लोक चारशें नजफगडास पाठविले आहेत. देवजी गवळी व बापू मल्हार थानंद नजीक पावले. तेथें बहिरो कोनेर यांच्या भेटी परस्परें होऊन नंतर सहारंगपुराकडे सर्व कूच करून गेले. समरूची बेगम पलटणासहीत त्या प्रांतीं आहे, ह्मणून आज तागाईत शिखांचा उपद्रव नाहीं. राजश्री लखबादादा पीरूसाहेबाचे कंपूसहित जोधपुरांत दाखल जाले. राजे भीमसिंग यांस खीलत, हत्ती, घोडा, जवाहीर वगैरे सरंजाम दिला. मामल्याबद्दल ऐवजाचा तगादा आहे. तेथून ऐवजाची निशा जालीयावर श्री मथुरेस छावणी करितां येणार. राजे प्रतापसिंग जैपूरकर आपले लग्नास्तव उदेपुरास गेले आहेत. लग्नसिद्धी जाली. लौकरच जैपुरास येणार. आंबोजी इंगळे यांनीं गोसावी यांसी धरून त्याची कोटी लुटली. त्यांत दहा लक्ष रुपये नख्त वगैरे सरंजाम सांपडला. सांप्रत दोन कंपू नवे इंगळे मजकुरांनीं तयार केले आहेत. डिभाईसाहेब कोलनजीक मुक्काम करून सादाबाद वगैरे महालचा पैका तहसील करितात. लखबानीं इमामबक्षखान यांस साहेबाकडे पाठविलें होतें. तात्पर्य, त्यांस आपल्या लगामीं लाऊन, सर्व कंपू व साहेब सुद्धां पागनिसाचे पेव्यांत असावें, खान मशारनिल्हेनीं याप्रमाणें बोलणें बहुत केलें. एक मासपर्यंत डिभाईपाशींच होते. परंतु साहेब मजकुरांनीं साफ उत्तर केलें कीं, दौलतराव शिंदे आह्मांस मालिक आहेत. त्यांजपाशीं जो मुखतार ठरेल, त्याचे ताबेदारींत मी

हजीर आहें. याप्रमाणें उत्तर दिल्यावर खानमजकूर दिल्लीस उठोन आला. पुढें अमलांत येईल ते सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १२१.

श्री. मे इ. स. १७९४.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. पातशाहांनीं खुफिया एकांतीं बोलावून आज्ञा केली कीं, "कितेक गोष्टी श्रीमंतांस सूचनार्थ लिहावें, ऐसा मानस आमचा आहे. परंतु पारसी शुक्यांत लिहिल्यानें गोष्टीचा पडदा राहणार नाहीं. सर्वांस जाहीर जाल्यानें बोभाटा होईल. यास्तव तुह्मांस आज्ञा करितों कीं, याप्रमाणें सर्व मजकूर हिंदवीपत्रांत लिहावें कीं, "तुह्मांकडून दहाबारा वर्षें जालीं, राजश्री पाटीलबावांनीं हुजूरवाल्याची चाकरी व बंदगी उत्तम प्रकारें केली; व सर्वत्र श्रीमंतांचा दाब राखून हिंदुस्थानचा बंदोबस्त राखिला. तेव्हां ऐसा सरदार होणें दुरापास्त आहे. श्रीमथुरेच्या मुक्कामीं पाटीलबावांनीं बाळोबा पागनीस यांस कुलमुखत्यारीचें काम सांगितलें असतां, मशारनिल्हेसीं कामाची सरबरा कांहींच न जाली. आखर आबा चिटणिसांस श्रीकाशीहून बोलावून, दरोबस्त कामाची मुखतारी मशारनिल्हेकडे सांगून काम जारी केलें. चिटणिसांनीं हरएकविसीं सरकारचाकरी व हुजूरची बंदगी चांगली केली. कोणे गोष्टीचा बोभाटा जाहिरींत न आला. राजश्री पाटीलबावांस, सा वर्षांत वहिवाट कामाची प्रत्यास आल्यावर, चिटणिसाचे ठिकाणीं केवळ विश्वास होता. दोन वर्षांपासोन पाटीलबावा वगैरे सर्व श्रीमंतांपासीं हाजीर राहिले. चिटणिसांची वर्तणूक व विश्वास कैसा, हें सर्व त्यांचेंही ध्यानांत आलेंच असेल. राजश्री पाटीलबावांस देवआज्ञा जालियावर, श्रीमंत साहेबांनीं दवलतराव शिंदे यांजवर कृपा करून, पूर्ववत्प्रमाणेंच सरदारी व न्याबतचा खिलत देऊन सर्फराज केलें. व आबा चिटणीस यांसही बदस्तुर शिंदे मशारनिल्हेची न्याबत देऊन, वस्त्रें सरकारांतून न्याबतेची दिल्हीं. हें वृत्त येथें हुजुरांत आलें. तेव्हां बहुत संतोष जाला. दोन महिने पहिल्याप्रमाणेंच पागनीस व चिटणीस वगैरे सर्व एकविचारें होऊन कारभार केला. सांप्रत अखबारावरून श्रवणांत येतें कीं, आपसांत अनेक प्रकारचा खलश प्रत्यास येऊन, पागनिसांनीं सदाशिव मल्हार यांस उज्जेनीहून बोलावून, कामांत दरंदाजीचा उपद्याप करून, राजश्री दौलतराव शिंदे यांस आपल्या लगामीं लावलें.

तेव्हां शिंदेमजकूर साहेबजादे, त्यांच्या बुद्धीस लागून, चिटणिसांस बेदिल केलें. याप्रमाणें वर्तमान ऐकोन परम आश्चर्य वाटलें कीं, श्रीमंतांचें सरकारांतून जे गोष्ट ज्याकडे ठैरिली, त्यांत कोणाचा दखल व उपद्याप चालत नाहीं. ह्मणून पाटीलबावांचे जबानीं हमेशा ऐकत होतों व परभारेंही श्रवणांत आलें. आतां सरदार व कारभारी सर्व सरकारांत हाजीर असतां, चिटणिसांचे मुखतारीवर लोकांनीं डंष धरून, चहूंकडे आपसाचा कलह प्रसिद्ध व्हावा व सरकारांतून फितुरी लोकांची तंबीह न घडावी, हें परम आश्चर्य असे. श्रीमंतांस मोहीम दरपेश, दुसरें हिंदुस्तानचा बंदोबस्त कायम राखणें, ऐसें असतां इतके तगाफलीचें कारण काय? जे लोक आपसांत कलह व खलश करणार आहेत, त्यांची शिक्षा करावी. यांत इकडील प्रांतांतही सर्वांवर दबाव होऊन बंदोबस्त राहील. आईदा ऐसी वर्तणूक कोणी आपसांत करणार नाहीं. तेथील आपसाचे बिगाडामुळें इकडील सरदार लहान थोर सर्व पागनिसांकडे साजीश करून हवा पाहतात. हरएकानें या प्रांतीं लुटीस प्रारंभ केला. दबाव सरकारचा एकरूप राहिला नाहीं. जर तेथें आपसांत ऐसाच नक्षा असला, तरी श्रीमंतांस आह्मांकडून लिहोन हुजूरवालाचे कामाचा वगैरे सर्व बंदोबस्त श्रीमंतांकडून व्हावा; यांत आह्मांस खुशी आहे. आपसाचे बखेड्यानें आह्मांस व राज्यास खलेल राहील. यास्तव अगोदर कलह करणाराचें पारपत्य जरूर केलें पाहिजे. नेकसलाह जाणोन आज्ञा करितों. व शुक्राही श्रीमंतांचें नांवें लिहिला आहे. त्यास लौकर लिहून तपशीलें जाब आणवावा, ह्मणजे आह्मी स्वस्थ चित्तें राहूं. नवाब नजबखान स्वार प्यादे मिळून लाख फौजेनिसीं होता. त्याच्या मागें, लोकांनीं आपसांत कलह उपद्रव करून सर्व बरबाद केलें व सलतनतेची हे दशा केली! त्यास आतां आह्मांस सर्वस्व आधार श्रीमंतांचा आहे. यास्तव इ॥ त॥ सर्व वृत्तांत सांगितलें असे. त्याप्रमाणें श्रीमंत साहेबांस लिहोन लौकर उत्तर आणवावें." म्हणून पातशाहांनीं एकांतीं खुफिया बोलावून याप्रमाणें आज्ञा केली. व रूबरू बहुत ताकीद केली कीं, या शुक्याचा जाबसाल जलदीनें आणवावा. त्यास शुका श्रीमंत साहेबांचें नांवें इनायत जाला, तो सेवेसीं पाठविला आहे. त्यास स्वामींनीं या पत्राचा मजकूर एकांतीं मनन करून, शुक्याचा जाब सर्व मतालबसहित पाठविला पाहिजे. ह्मणजे यांची खातरजमा होईल. हजरत बहुत सचिंत राहतात. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२२.

श्री. मे इ. स. १७९४.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नानास्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजसुद्धां करोली नजीक आले. तेथील खंडणीचा जाबसाल रुबकार आहे. नरवरवाल्यासीं वीस हजार रुपये खंडणी ठैरली. पैकीं सात हजार नख्त, बाकींचा भरणा. यांशिवाय ग्वाल्हेर प्रांतचे गढीबंद यांसीं खंडणी हरएक मवासासीं घेऊन मुक्काम मजकुरीं आले. तेथील गुंता उरकोन श्री मथुरेस छावणी करितां येणार. राजश्री जिवाजी बल्लाळही येतील. बाद बरसात दिल्लीचे रूखास येऊन, अंतर्वेद प्रांतीं मवास आहेत यांचें पारपत्य करावें ऐसा विचार आहे. फरमुनसाहेबाचे शरीरास समाधान नव्हतें, यास्तव साहेब मजकूर कानपुरास रुखसत होऊन गेले. तेथें औषध उपाय करून लौकरच येतील. नबाब अलीबहाद्दर यांनीं काल्पी वगैरे प्रांतांत मुक्काम करून येरचे गढीस मोर्चे कायम केले, व जिदीनें दरोबस्त मुलूख पेंढारी यांनीं लुटून उजाड केला; ह्मणून राजश्री बाळाजी गोविंद केवळ बेदिल जाले आहेत. हिंमतबहाद्दर गोसावी अद्यापि आला नाहीं. नबाब वजिराकडे सूत्र लाविलें आहे. शाहाजीनीं राजश्री दौलतराव शिंदे यांची मोहोर बदस्तुर वैकुंठवासी पाटीलबावांचे आलकाबाप्रमाणें तयार करून रवाना केली. इद बाबत हजरतास सर्वांनीं नजरा केल्या. शिंदे मशारनिल्हेकडून मीर अबदुलांनीं एकशें एक मोहोर नजर केली. श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १२३.

श्री. १७ जुलै इ. स. १७९४

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ १९ माहे जिल्हेज मु॥ दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ २० जिलकादचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्ली इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजसुद्धां चंबल नदी उतरून अलीकडे आले. कंपूचा उतारा लागला आहे. फरमुन साहेब फिरंगी यास समाधान नव्हतें, सबब कानपुरास गेला होता. औषध उपाय बहुत केला. परंतु कांहीं आराम न जाला. अखीर छ ९ तारखेस फिरंगी मजकूर मृत्यु पावला. त्याच्या मुबदला,

गारदून फिरंगी यास सर्फराजीचीं वस्त्रें डिभाईचे लिहिल्यान्वयें देऊन, कंपूची मुखतारी त्याजकडे सांगितली. सुखराम, दौलतरामाचा पुत्र, यानें डिभाईस लिहिलें आहे कीं, रावमशारनिल्हे फौजसुद्धां खुशालगडास आल्यास तीन लाख रुपये नजराणा व याशिवाय गडमजकूर सरकारांत देऊं. जैपुरवाल्यासीं आमचा गुजारा करून द्यावा. त्यावरून साहेबमजकुरानीं राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस येविसीं लिहिलें होतें. सबब लष्कराचा कूच खुशालगडचे रुखास ठैरला आहे. जैपुरकराकडील वकिलास ताकीद असे कीं, सालगुदस्त व सालहालचा मामला दरोबस्त आदा करावा; नाहींतर फौजा तिकडे आल्यावर मुलकाची खराबी होईल. वकिलांनीं जयपुरकर राजे यास लिहिलें आहे. शिवपूरवाल्याची खंडणी घेऊन दरमजल गडमजकुरास येणार. राजश्री जिवाजी बल्लाळही याजकडे येऊन सामील होणार आहेत. नीळच्या गाड्याविषयीं पातशाहाचे शुके श्रीमंत स्वामींचे नांवें व राजश्री दवलतराव शिंदे यांचें नांवें शहांनीं लिहून पाठविले आहेत. नबाब वजीर बदस्तुर लखनऊंत शेरशिकार करून आहेत. अबदुल करीम, जमाशहाकडील एलची, पूर्वीं नबाब वजीराकडे आला होता. सात मास तेथें राहिला. नबाब मशारनिल्हेसीं कांहीं नाचाखी जाली. सबब एलची मजकूर बेदिल होऊन दिल्लीस उठोन आला. शाहाजीसीं भेट जाली. राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी जैपुराहून उज्जनचे रूखास कूच करून गेले. खंडेराव हरीचें लष्करांत फौजेचा दंगा फार जाला. ह्मणून रावमजकूर हिरासा होऊन, कोटपुतळीच्या किल्ल्यांत जाऊन राहिले. रेवाडीचे शहरांत लोकांसीं दंड घातले ह्मणून वदंता आहे. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

सेवेसीं विनंति सेवक गंगाधर शिवराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे, पादशाहांची आज्ञा जाली त्याप्रमाणें साकल्य विनंति लिहिली आहे. व शुकाही सेवेसीं पाठविला आहे. त्यास कृपाकरून पत्रोत्तरीं सनाथ करणार धणी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

लेखांक १२४.

श्री. जुलई इ. स. १७९४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:–राजश्री दौलतराव शिंदे यांचीं पत्रें शाहाजीस खातरजमेचीं व

हुजुरांत अर्जी व निळेचे गाडे सोडून देण्याविशीं खंडेराव हरीस ताकीदपत्रें आलीं. त्यावरून हजरतानीं व शाहाजीनीं राव मशारनिल्हेस ताकीदपत्र व आपलीं पत्रें नीळचे गाडे सोडून देण्याविशीं लिहिलीं आहे. भवानीकुंवर किल्लेदार येथें आल्यावर सोडोन देऊं ह्मणून मशारनिल्हेनीं प्रत्योत्तर लिहिलें असे. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांचीं पत्रें वरचेवर शाहाजीस आलीं आहेत कीं, सालगुदस्त व साल हालचे नजराण्याचा ऐवज लवकर पाठवून द्यावा. त्यावरून यांनीं ऐवजाची तजवीज केली. लष्कर मथुरेच्या रूखास आल्यावर ऐवज पाठविणार. शहरांत चोरांचा हंगामा रात्रंदिवस आहे. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२५.

श्री. इ. स. १७९४ जुलै

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विनंति ऐसीजे, राजश्री बापूमल्हार व देवजी गवळी सहारंगपुराहुन दरकूच राजश्री जिवाजी बल्लाळ यांजकडे गेले. सहारणपुर रामदयाल गुजराकडे अक्रा लक्ष रुपये इजारांत होता. हल्लीं बहिरो कोनेर यानीं राजश्री गोपाळराव रघुनाथ यांचे लिहिल्यावरून खासगत ठेविलें. लखबादादा फौज सुद्धां जोधपूर नजीक आहे. राजे भीमासिंग बदमामलीस येऊन मामल्याबद्दल ऐवज द्यावयास अनमान करितो. सबब जिवाजी बल्लाळ फौजसुद्धां दरमजल जोधपुरप्रांतीं गेले. राजे मजकुराकडील वकील जाबसालास आला आहे. खंडेराव हरी कडील नारनोळ वगैरे महाल फकीरजी गाडवे यांजकडे ठरले. पन्नास हजार रुपये गाढवे मजकुरांनीं सरबरा केले. राव मशारनिल्हेचा जाबसालही रूबकार असे. फौजेचा दंगा फार आहे. ह्मणून रावमजकूर कोटपुतळीच्या किल्ल्यांत जाऊन राहिले. अद्यापि शिबंदीचा फडशा जाला नाहीं. भवानीकुंवर संस्थानचे किल्लेदारही तेथें पावले. किल्ल्यांतील लोकांचा तंटा बहुत जाला. यास्तव कुंवर मजकुर येथून निघून गेले. डिभाई फिरंगी कोल वगैरे महालाचा पैका तहसील करून हल्लीं राजश्री गोपाळराव रघुनाथ यांचे लष्करास दाखल जाला. एक कोस रावमजकूर सामोरे येऊन घेऊन गेले. खिलत वस्त्रें व तीन रकमा जवाहीर हत्ती घोडा सिपर समशेर, फिरंगी मजकुरास देऊन, बहुत खातरजमा केली. सरदाराचे आपसांत केवळ फितूर अंतस्थ जाला आहे. परंतु फिरंगी मजकूर आज ताागा-

ईत चिटणीसांचे पेट्यांत आहे. सबब यांची अबरू कायम आहे. बकरीद बद्दल शेख रजीखानानें इंग्रेजाकडील व नबाब वजिराकडील नजर दोनशें दोन मोहोरा नजर केल्या. वरकडांनीं माफक मरातब हजरतास नजरा केल्या. जैपुरवाल्यांनीं दौलतरामाचे पुत्रासीं पांच लक्ष रुपये नजराणा घेऊन सोडून दिल्हें. इकडील फौजेची आवाई ऐकून राजे मजकुरांनीं फौजेची निगादास्त जारी करून शहराबाहेर डेरे दाखल जाले. रोडजी खवास यांचे विद्यमानें राव मशारनिल्हेकडे वकील जाबसालाकरीतां खुशालगडास आले आहेत. खंडेराव हरीची अर्जी हुजुरांत आली कीं, नीळचे गाडे लौकरच सोडून देतों. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२६.

श्री. ६ सप्टेंबर इ. स. १७९४.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वमींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ११ माहे सफर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ १६ मोहरमचीं विनंति पत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ व डिभाई फिरंगी फौजसुद्धां मिर्जापुरास जैपूरनजीक पंधरा कोस अलीकडे पावले. जैपुरकरानीं फौजेची निगादास्त जारी करून शहरबाहेर डेऱ्यांत दाखल जाले. रावमजकुरांनीं सडी फौज करून, त्या प्रांतीं दोन तीन वेळां दौड करून, दोन चार गांव ताख्तताराज केले. जैपुरकराकडीलही फौज यांच्या मुकाबल्यास आली आहे. परंतु त्यांचा जाबसाल डिभाईचे अंगीं होत असे. रोडजी खवास राजे प्रतापसिंग जैपूरकर यांजकडून मामल्याचे जाबसालास फिरंगीमजकुराचे विद्यमानें आला. बोलणें रूबकार आहे. जिवाजी बल्लाळ बक्षी व लखबा जोधपुराचे मुलखांत आहेत. रावमशारनिल्हेचीं पत्रें त्यांस गेलीं आहेत कीं, येथें लढाईचा प्रसंग जैपुरकरासीं रूबकार असे. त्यास तुह्मींही येऊन सामील व्हावें. बक्षी मजकुरापासीं पिरूसाहेब कंपूसहित होता. त्यास रावमजकुरांनीं आपल्यापासीं बोलावून घेतलें. सबब बक्षीमजकूर बेदिल होऊन उज्जेनचे रुखास कूच करून जाणार. खंडेराव हरी यांनीं नारनोळ वगैरे महालासीं दंड घेऊन"

(अपूर्ण)

लेखांक १२७.

श्री. सप्टेंबर इ. स. १७९४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—राजश्री गोपाळराव रघुनाथ व डिभाई फिरंगी दरकूच मिर्जापुरास जयपुर नजीक पंधरा कोसांवर पावले. राजे प्रतापसिंग जयपुरकर यांनींही इकडील आवई ऐकोन, फौज मुकाबल्यास रवाना केली. सबब राव मशारनिल्हेनीं राव बख्तावरसिंग माचेडीकर व रंजितासिंग जाट भरतपुरकर यांस पत्रें पाठविलीं आहेत कीं, जयपूरकरांचे मुलुखांत दखल करावा. जीवनखान माचेडीकराचा कारभारी यास खिलत देऊन, राव बख्तावरसिंगाकडे रुखसत केलें, व शिवसिंग नामें जाटाकडील कारभारी याजबरोबर लष्करचीं कुटुंबें सर्व देऊन भरतपुरास रवाना केलें. व रंजितसिंगास लिहिलें आहे कीं, तुह्मीं आपले फौजेनसीं हिंडोननजीक येऊन रहावें, व रसद लष्करांत पावती करावी. याप्रमाणें लिहून, सडे स्वारी जयपूरचे प्रांतांत दौड एक दोन वेळां करून, गांव दोन चार ताख्त्ताराज केले. डिभाई साहेबानीं आपल्याकडून भला माणूस जाबसालास जयपुरकराकडे पाठविला आहे. साहेबमजकुराचे पेट्यांत तेथील जाबसाल असे. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२८.

श्री. ६ सप्टेंबर इ. स. १७९४.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ ११ माहे सफर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष:— पेशजीं छ १५ मोहरमचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, ते पाऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, पातशाहांनीं आपसाचा खलश श्रवण करून बहुत आंदेशांत राहतात. शाहाजीही किल्यांत जात नाहीं. कलकत्त्याहून शोर साहेबांनीं शाहाजींस पत्र लिहिलें आहे कीं, पामरसाहेबास येथून रवाना केलें, लौकरच पादशाहाचे हुजुरांत पावतील. साकल्यवृत्त तुह्मांस सांगतील. याप्रमाणें पत्र सैदरजीखानाचें विद्यमानें आलें. यांनींही सिलसिला कागदपत्रीं जारी केला असे.

मीर अबदुल्ला यास शाहाजींनीं पुनः आपले पुत्राचे लग्नाकरितां देसीं रवाना केलें. भरतपुरचे मार्गानें वाटेची सोय पाहून पुढें रवाना होतील. पादशाहाचे हुजुराहून तीन पारचे खिलत मीरमजकुरास ब॥ रुखसत इनायत जाला. शाहाजींनीं जहाज फिरंगी नि॥ खंडेराव हरी यांची आवाई ऐकून, शहरचे गीर्द, शहरपनाचा व शहराचा बंदोबस्त स्वार प्यादे पाठवून केला. दरवाजे शहरचे बंद असतात; ऐसा प्रकार आहे. जैपुरकराकडून रोडजी खवास, मामल्याचे जाबसालाकरितां डिभाईचे विद्यमानें राजश्री गोपाळराव रघुनाथ यांजकडे आला आहे. बोलणें लागलें असे. राव-मशारनिल्हेनीं जिवाजी बल्लाळ व लखबा यांसही पत्रें पाठविलीं आहेत कीं, येथें लढाईचा प्रसंग जैपुरवाल्यासीं आहे. त्यास, फौजसुद्धां जलदीनें यावें. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठ-विल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२९.

श्री. सप्टेंबर इ. स. १७९४.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांचीं पत्रें समरूचे बेगमेस आलीं आहेत कीं, खंडेराव हरीकडून जहाज फिरंगी दिल्लीकडे येऊन उपद्रव करणार. त्यास, शाहाजीचे लिहिल्यान्वयें प्रसंगीं फौज व पलटण दिल्लीचे माफजती-करितां पाठवून देणें. त्यावरून मिर्जा रहिमबेग यांनीं शाहाजींस विचारिलें कीं, तुह्मी सांगाल तेव्हां पलटणा येथें बोलावून घेऊं. यांनीं उत्तर केलें कीं, सांप्रत भवानीकुंवर यांनीं फिरंगीमजकुरास बिदा करून दिल्हें. पुढें जरूरीस पलटणें बोलावून घेऊं. राजश्री खंडेराव हरी यांचे प्रांतांत केवळ बदअमली जमीदारांनीं केली. हकीम बुअल्ली झझरनजीक होता. तेथें जमीदारांसीं लढाई जाली. हकीममजकूर शिकस्त खाऊन माघारें हटून आला. एक तोफ वगैरे सरंजाम जमीदारांनीं नेला. त्या प्रसंगीं बलोच स्वारांनीं जुरत करून, तोफ मात्र जमी-दारांसीं घेऊन आले. शाहाजींनीं तैमाचबेगखानास डिभाईकडे पाठविलें आहे. कारण हें कीं, तेथून एकदोन पलटणें येथें आणून शहरचे माफजतीस्तव ठेवावीं. मेरट व शिकंदराबाद वगैरे अंतरवेद प्रांतीं दिल्लीनजीक उदेकरण गुजरानें बद-अमली करून दुंडी केली आहे. सबब शाहाजींनीं आपली फौज व पलटणा दोन त्याचे पारपत्त्यास पाठविल्या आहेत. गुजर मजकुराचे गढीसीं चार दिवस

जाले लढाई होते. याजकडील लोक बहुत जखमी व ठार जाले. राजश्री गंगाधर गोविंद यांचे पुत्राचें लग्न काल्पींत जालें. नबाब अल्लीबहादरही लग्नांत सामील होते. नबाबांनीं अकोडीवाल्याची गढी खालीं करून घेतली. मशार निल्हेस चार हजार रुपयांची जागीर देऊन चाकरींत ठेवावें, ऐसा ठराव जाला आहे. हिंमतबहादर गोसावी अद्यापि नबाबाकडे आला नाहीं. जाबसाल मात्र रूबकार आहे. श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३०.

श्री. १४ सप्टेंबर इ. स. १७९४.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ १९ माहे सफर मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ ११ माहे मजकुरचीं विनंतिपत्रें मुजरद कासीद-जोडीबरोबर सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री खंडेराव हरी यांनीं खुफियापत्रें बाळोबा पागनीस व सदाशिव मल्हार यांजकडे पाठविलीं कीं, राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं आह्मांकडील मुलूख तागीर करून, फकीरजी गाढवे यांजकडे सांगावेसें केलें आहे. त्यास, आज आमसीं ऐसा सलूख प्रत्यास आला, पुढें तुह्मांसीं ऐसाच सलूख चिटणीस करणार. त्यास, येविसीं राजश्री दवलतराव शिंदे यांस बोध करून, हिंदुस्थानचा बंदोबस्त दिल्लीसुद्धां आपल्या कबजांत ठेवणें सलाहनेक आहे. त्यास रावमजकुरांचीं पत्रें पागनिसांनीं मनन करून, शिंदेमजकुरास अनेक प्रकारें बोध करून, चिटणिससा बेदिल करून, खंडेराव हरीचे नांवें खातरजमेचीं पत्रें वरचेवर पाठविलीं कीं, तुम्हीं कानोडचे व दिल्लीचे किल्ल्यांत जकीरा वगैरे जंगी सरंजाम करून, चिटणिसाकडील लोकांस वगैरे किमपि दखल न देतां, आपणच बंदोबस्त प्रांतांत ठेवणें व शाहाजीस किल्ल्यांत येऊं न देणें. येविसीं पत्रें रावमजकुरांस येतांच, त्यांनीं आपल्या ठिकाणीं विचार केला कीं, शाहाजीस दगा करून ठिकाणीं लावावें, आणि संस्थानचा बंदोबस्त पागनिसाकडून आपल्या कबजांत करावा. हे बातमी शाहाजींनीं श्रवण केल्यावर, घरचा फितूर उत्पन्न जाला ऐसा विचार करून, तुरुत शहरचा बंदोबस्त केला. पादशाहाकडे आमदरफ्त बंद जालियानें सर्वत्र फितुराची आवाई जाली. तेणें-कडून हरएकानें इंग्रेजासीं सिलसिला जारी केला. व इंग्रेजांकडून जरनेल नामें

फिरंगी पामरसाहेबाबरोबर पादशाहाकडे येऊन, बोलणें करावें ऐसें ठैरलें आहे. इंग्रेजांकडील वकील व साहेब यांस मनाई किल्ल्यांत होणार. तेव्हां पडदा उफडून बिगाडाचा प्रारंभ होईल. शाहाजींनीं रावमजकुराची बदनियत ऐकोन, येथून कोणीकडे उठून जावें ऐसा विचार केला होता. हे बातमी मजला समजल्यावर त्यांजकडे जाऊन खातरजमा केली कीं, "पूर्वीं तुह्मांस खावंद कैलासवासी पाटीलबावा होते. सांप्रत सर्वांचे खाविंद श्रीमंत स्वामी व श्रीमंत नाना आहेत. त्या अर्थीं येथील काम सोडोन उठून जावें, व सरकारची बदनामी आपल्या जिम्में करून घ्यावी यांत ठीक नाहीं. तुह्मीं आपलें पत्र, सरकारांत अथवा श्रीमंत नानांस, साद्यंत वृतांत लिहून द्यावें. तेथील आज्ञा येईल त्याप्रमाणें करावें, हे सलाहनेक आहे." त्यावरून शाहाजींनीं स्वामींचे नांवें पत्र लिहिलें आहे. तें एकांतीं कोणास न कळतां मनन करून, त्याचें उत्तर तपशिलें लिहावयास आज्ञा जाली पाहिजे. येथील नक्षा आपसांतचा ठीक दिसत नाहीं. तेथें सरदार हुजुरांत असतां चिटणिसांवर डंष हरएकाचा कैसा आहे, हें स्वामींचे प्रत्त्यास आलेंच असेल. राजश्री पाटीलबावांनीं डिभाईस कंपू देऊन ठेविलें, त्याप्रसंगीं शाहाजींनीं दुरंदेशीनें सर्व मसलत जाहीर करून दिल्हेंच होतें कीं, डिभाईचा भरंवसा एकरूप नसावा. कारण हें कीं, वरकड ठिकाणीं हा चाकरींत कमती करणार नाहीं. परंतु इंग्रेजांसीं कदाचित् नाचाखी जाल्यास साफ फितूर करून निघून जाईल. तीन कंपू दिधल्यास इकडील राजेरजवाडे वगैरे हिंदुस्थानी सर्व याच्या पेव्यांत शिरोन मुलखांत फितूर करील. मग याचे आटोपणें फार कठीण पडेल. मशारनिल्हेचें कुटुंब वगैरे सरंजाम सर्व इंग्रेजांचे सामील आहेत. त्यास त्यावेळीं राजश्री पाटीलबावांस जोधपुराची मसलत दरपेश व सरकारांत जाणें जरूर होतें. सबब शाहाजींस सांगितलें कीं, तिकडून आल्यानंतर याची तोडाजोड बनेल तें करण्यांत येईल. त्यास इतक्यांत पाटीलबावा अकस्मात् कैलासवासी जाले. आठ महिन्यांत येथें डिभाईसुद्धां सर्वांची नियत फिरली. डिभाईनीं जैपुरकर व बखतावरसिंग माचेडीकर व भरतपुरकर रंजितसिंग जाट व इंग्रेजांसीं वगैरे अंतस्थ साजीश करून, हरएकास आपल्या लगामीं लाऊन ठेविलें. तात्पर्य हें कीं, आपसांत सरदाराचे फितूर प्रारंभ जालाच आहे. लांबणीखाले पडल्यास सहजांत तमाम मुलकांत कबजा करावा. इंग्रेजांकडील मातबर गृहस्थानें हें वृत्त सांगितलें आहे. परंतु तुरुत यांजकडील मुलूख काहाडल्यास सध्यांच फितुराचें कारण होईल. म्हणोन विनंति लिहिली आहे कीं, अगोदर पागनीस व सकारपूर्वक यांस आपल्या कबजांत करून, तदनंतर राजश्री सुभेदारांचा मुलुख बदस्तूर त्यांस देऊन, बाकी हरएकाचे नांवें सरकारांतून जागीर ठैरावून, साहेबमजकुरास

बहुत खातरजमेचें पत्र लिहून, एक दोन मास नगदी तनखा दिल्ही पाहिजे. नंतर हुजूर तलब कंपूसुद्धां करावें. जर तिकडे आला तर उत्तमच आहे. नाहीं-तर याच बहाण्यानें पलटना दूर कराव्या. खंडेराव हरीनीं जहाज फिरंगीस चाकर ठेऊन, त्यास कजाखीचे कामावर तैनात करून मुलकांत अनेक उपद्रव केले. त्यास येथील शहरचे लोक व पादशाहा आदिकरून, लहान थोर सर्व भयाभीत जाले आहेत. रावमजकुरास पकारपूर्वकाचा इशारा आहे कीं, संव-स्थानचे मुखत्यार यास ठिकाणीं लाऊन टाकावें व तेथील बंदोबस्त करावा. पाटील-बावांनीं होळकराची ही दशा केली. लढाई मारिली. त्याचें कोणीं काय केलें ? आतां शाहाजीस मारल्यानें मग कोणी काय करणार, तें समजोन घेऊं. ह्याप्र-माणें हल्लीं वृत्त यांनीं ऐकोन, रात्रंदिवस हिरासा होऊन, घराचे गीर्द तोफखाना व पलटण चौकीपाहऱ्यास ठेऊन राहतात. मजला बोलावून सांगितलें कीं, "सरकारांतून चिटणिसाकडे बदस्तूर कारभाराची मुखतारी जाली. यामुळें आमचे राहणें येथें त्यांचे लिहिल्यान्वयें आज तागाईत जालें. आतां तेथें हरएक सर-दार व मुखतार अनेक. तेव्हां राज्यकारभार कसा निभतो ? आतां श्रीमंत स्वामी व नाना हिंदुस्थान वगैरे याचे मालीक आहेत. व्यर्थ लोकांचे भरंवशावर राहून इकडील कामाची खराबी व्हावी, यांत ठीक नाहीं. त्यास सरकारांतून पत्रोत्तर आल्यानंतर आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. अथवा आह्मी फकीर आहों. हरएक ठिकाणीं बसोन गुजराण करण्यांत येईल. गुंता नाहीं ! येथील संस्थानची इच्छा इंग्रेज व विलायतवाले, रोहिले, राजेरजवाडे वगैरे सर्वांस आहे. त्याअर्थीं आपसाचे बिगाडानें राज्यास बरबाद जाऊं देणें पाटील-बावांचे मार्गे ही गोष्ट लौकिकांत ठीक दिसणार नाहीं." ह्याप्रमाणें कितेक बोलणें जालें. त्यास, इकडीलही बंदोबस्त तेव्हां होईल कीं, पकाऱ्यास वगैरे हुजुरांत अटकाऊन, त्वरेनेंच चिटणिसांचे हातून राजश्री गोपाळराव रघुनाथ यांसीं लिहून इकडील बंदोबस्त करून द्यावा. पागनिसांनीं वगैरे यांनीं शिंदेमजकुरास बोध केला ह्मणून श्रवणांत आले कीं, चिटणीस श्रीमंत नानांचे पेच्यांत आहे. त्यांचें मानस कीं, तुह्मांस हुजुरांतच ठेवावें, व दरोबस्त सरदारी व राज्य आपण करावें. ऐसा विचार राजाराम विठ्ठल यांचें अनुमतें आहे. त्यास चिटणिसास युक्तीनें हिंदुस्थानांत नेऊन, नारो गणेशाप्रमाणें पारिपत्य केल्यास बहुत पैका हातास येईल. व सहजांत पूर्ववत्प्रमाणें सरदारीचा बंदोबस्त राहील. याप्र-माणें तेथें ठरलें आहे. सरकारांतही जाहीर जालें असेल. सांप्रतकालीं चिट-णीस वगैरे सरदार हुजुरांत हाजीर आहेत, तों इकडील बंदोबस्त सर्व सरका-

रांतून व्हावा. यांत पुढें फितूर होणार नाहीं. जरनेल फिरंगी श्री कासीनजीक गाजीपुरास दाखल जाला. नबाब वजीर वगैरे सर्व प्रयागपावेतों सामोरे गेले. लखनऊंत आल्यावर काय नक्षा प्रत्यास येईल, ते सेवेसीं विनंति लिहूं. जैपुरकराचा मामला पंधरा लक्षांवर फडशा जाला. पैकीं तीन लाख रुपये पंधरा रोजांत द्यावे व बाकीचा ऐवज हप्तेबंदीप्रमाणें भरणा करून घ्यावा, येविसीं जीवनखानानें खातरजमा करून, अलवारचे रूखास कूच रावमजकुरांचें ठैरलें आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.”

लेखांक १३१.

श्री. सप्टेंबर इ. स. १७९४.

“पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः– जिवाजी बल्लाळ बक्षी व लखबा जोधपूरचे गीर्द आहेत. राजे भीमसिंग लखबाचे भेटीस येणार. त्यांची भेट घेऊन उभयतां सरदार उज्जनचे रूखास कूच करून जाणार. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं पिरू साहेबास कंपूसुद्धां आपल्यापाशीं बोलावून घेतलें. सबब बक्षीमजकूर बेदील होऊन उज्जनीस कूच करून जाणार. आंबोजी इंगळे मेवाड प्रांतीं खुशाल शेर शिकार करून आहेत. परंतु त्यांचे आपसांत कोणाशीं चित्तशुद्धता नाहीं. बहिरो कोनेर सहारंगपुरांत आहेत. समरूची पलटणा रावमजकुरांनीं जयपुरास बोलाविल्या आहेत. कारण हें कीं, जयपुरकरासीं खंडणी घेऊन खंडेराव हरीकडील प्रांतांत दखल करावा. ऐसा विचार आहे. भंगेलसिंग सीख पतियाल्याकडे गेला होता. त्याचे शरीरास केवळ समाधान नाहीं. ह्मणून शाहाजीनीं व समरूचे बेगमेनीं हकीम येथून पाठविला आहे. जमाशाहा कंधार प्रांतीं गेला होता. मुरादशाहासीं मामला फडशा जाला. हल्ली दसऱ्याचे सुमारें पेशोरचे जिल्ह्यास येणार आहे. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.”

लेखांक १३२.

श्री. सप्टेंबर इ. स. १७९४.

“पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री बाळोबा पागनीस वगैरे यांनीं, नबाब निजाम अलीखानासीं साजिश करून, सरदारांत विरुद्ध करावयास प्रारंभ केला. जिवाजी बल्लाळ बक्षी

व पागनीस व सदाशिव मल्हार व आंबोजी इंगळे, खंडेराव आपा यांचा एक विचार आहे. तात्पर्य, आपसांत विरोध प्रारंभ जाला. हें वृत्त मातबर माणसांनीं श्रवण केलें, तें सेवेसीं विनंति लिहिली आहे. या पूर्वी वरचेवर इकडील सरदारांचे आपसांचा नक्षा सेवेसीं विनंति लिहिलीच आहे. दसऱ्यापर्यंत सरकारांतून इकडील बंदोबस्त जाल्यास पुढें उपद्रव बंद होईल. सूचनार्थ विनंति लिहिली असे. पातशाहांचा शुका व आज्ञा केलीयाप्रमाणें साकल्यवृत्त, सेवेसीं विनंति पेशजीं लिहिलीच आहे. हजरतांनीं दोनचार वेळां प्रत्योत्तराविसीं विचारिलें. त्यास, शुक्याचा जाबसाल जरूर पाठविला पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३३.

श्री. ३ आक्टोबर इ. स. १७९४.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ ८ माहे रविलावल मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ ११ तारिखेचीं पत्रें मुजरद कासीद जोडीबरोबर, व छ १९ सफरचीं पत्रें डाकेंत, सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पाऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस राजश्री दौलतराव शिंदे यांचीं पत्रें वरचेवर आलीं कीं, आबा चिटणीस यांनीं काम सोडून पुण्यांत जाऊन राहिले. दोन चार वेळां त्यांजकडे पागनीस वगैरे मंडळी समजाविसीस पाठविले होते; परंतु त्यांच्या मर्जीस न आलें. सबब राजश्री बाळोबा पागनीस व सदाशिव मल्हार यांस मुखतारी कामाची सांगितली. त्यास, तुह्मीं डिभाईचे कंपूसुद्धां येथें येणें. व शाहाजी, बापू मल्हार, राजे रजवाडे व शीख, समरूची बेगम, व पातशाहा व वजीर, खंडेराव हरी आदिकरून सर्वांस पत्रें पागनिसांकडे काम सांगितल्याचें शिंदेमजकुराचीं आलीं. शाहाजींस व बेगम वगैरेस खातरजमेचीं पत्रें पागनीस यांनीं वरचेवर पाठविलीं आहेत. त्यास, राव मशारनिल्हेनीं बहिरो कोन्हेर यांस सहकुटुंब सहारनपुराहून बोलाविलें. त्यावरून मशारनिल्हेनीं तयारी केली. इतकियांत सर्वांस चिटणिसाचें वृत्त समजल्यावर फौजेचा दंगा मोठा जाला. सिखांनीं बातमी ऐकोन चार हजार स्वार अंतरवेदचे ताख्त करावयास रवाना केला. शाहाजीसीं व खंडेराव हरी यांसीं पहिल्यापासोन नाचाखी होतीच. हल्लीं रावमजकुरांचा इरादा आहे कीं, जहाज फिरंगीस यांच्या पारिपत्यास रवाना करावें.

किल्ल्यांत शाहाजींस दखल नाहीं. हजरतांचा दरबार बंद आहे. गोपाळराव रघुनाथ यांनीं डिभाईचे डेऱ्यांत जाऊन, साद्यंत वृत्त आपसाचे बिगाडाचें सांगितलें. त्यावरून साहेबांनीं शिंदेमजकुरास पत्रें पाठविलीं आहेत कीं, "गोपाळराव रघुनाथ यांनीं हरएकविसीं सरकारचाकरींत कमती केली नसतां, आबाचे बेदिलीमुळें यांसही तागीर करून तेथें बोलाविलें. सबब या प्रांतीं दरोबस्त दाब उडाला. जिवबा बक्षीकडून जगोबा इकडील कामावर येणार, तेव्हां आह्मांसीं व मशारनिल्हेसीं निर्वाह कामाचा होणें दुरापास्त आहे. राजश्री पाटीलबावांनीं राव मजकुरांचें स्वाधीन काम केलें असतां, बेतकसीर यांजवर इतराजीचें कारण काय? त्यास, मशारनिल्हेस तुरुत येथें बदस्तुर कामावर ठेवल्यानें या प्रांतीं हिंदुस्थानचा बंदोबस्त राहील. सरकार चाकरी केल्याचें हेंच फळ आखर असल्यास, आह्मांस तरी उमेद पुर्तेपणें ध्यानास आली!" या प्रमाणें डिभाईनीं पत्रें पाठवून रावमजकुरांची बहुत खातरजमा केली. शाहाजींस खातरजमेचीं पत्रें पागनिसांचीही आलीं असतां, मशारनिल्हे येथून निघोन जावयाचे उद्योगांत आहे. पूर्वीं वस्तभाव सर्व कुटुंबें भरतपुरास यांनीं पाठवून दिल्हींच आहेत. जिवबा बक्षी व लखबादादा दरकूच जैपूरचे सुमारें त्वरेनेंच येणार. बहिरो कोन्हेर यांचे तागिरीवर बापू मल्हार व देवजी गवळी बदस्तुर साबिक बहाल जाले. तेही येणार आहेत. समरूचे बेगमेचाही लक्ष डिभाईचे पेव्यांत आहे. जैपुरकरांचे भेटीस साहेबमजकूर चार पलटणांनिसीं जैपुरास गेले होते. दौलतरामाचा पुत्र व नंदराम बक्षी यांचे अनुमतें, राजास भेटीचे प्रसंगीं दगा करून, धरून घेतल्यास करोड रुपये देऊं. ह्या प्रमाणें पूर्वीं डिभाईसीं बोलणें जालेंच होतें. त्या इराद्यावर साहेबमजकुरही गेले होते. हे बातमी जैपुरकरास लागल्यावर त्यांनीं शहरचे दरवाजावर बंदोबस्त करून, साहेबमजकुरास सांगून पाठविलें कीं, दोनशें लोकांनसीं भेटीस व मामल्याचे निशा करितां आल्यास यावें. अधिक फौजेनिसीं येऊं देणार नाहीं. या प्रमाणें तिकडील उत्तर आल्यानें, साहेबमजकूर बेदिल होऊन, डेऱ्यास माघारें फिरून आले. व गोपाळराव रघुनाथ यांस साद्यंत वृत्त सांगोन पाठविलें. त्या वरून रावमशारनिल्हे कूच करून, लढाईचे मुकाबल्यास जैपुराहून चार कोसांवर सांगानेर दरवाजाचे सुमारें येऊन मु॥ केला. परस्परें लढाईची तयारी जाली. तेव्हां जैपुरकराकडून पुनः जोगराज महंत वगैरे डिभाईकडे मामल्याचे जाबसालास आले. मोठे रदबदलीनें जीवनखान व नंदराम बक्षी यांचे विद्यमानें पंधरा लक्षांवर मामला फडशा जाला. दौलतराम हरदियाचे पुत्र राजाकडे कैद होते. त्यांसही सोडोन द्यावें ऐसें ठैरल्यावर, चार लक्ष रुपये पायमाली, मुलूख व तीन

लाख रुपये जिऊबांनीं घेतले, व कांहीं लखबा वगैरेनीं घेतले, एकूण नव लक्षांचा जमाखर्च वजा होऊन, बाकी सा लक्ष द्यावें. त्यांत दौलतरामाचे पुत्रास स्वाधीन केलें कीं, यासींच मामल्याची निशा घ्यावी. बदस्तुर दौलतरामाप्रमाणें हेंच राज्याचें काम पूर्ववत्प्रमाणें करतील. याप्रमाणें साहेबमजकुरासीं ठैरल्यावर सुखलाल वगैरे हरदियाचे पुत्रांस साहेबाकडे जैपूरकरांनीं पाठवून दिल्हें. त्यास, मशारनिर्ल्हेनीं दोन लक्षांची सरबरा केली. बाकी चार लक्षांची निशा, जीवनखान, नंदराम वगैरे यांचे विद्यमानें होऊन, लवकरच तेथून कूच करून दिल्लीचे सुमारें येणार. याप्रमाणें ठैरलें आहे. खंडेराव हरीकडे डिभाईचीं पलटणें चार होतीं. तीं साहेबांनीं आपलयापासीं बोलावून घेतलीं. राजश्री पाटीलबावा कैलासवासी जाले तेव्हांही ऐसी दुंडी या प्रांतीं जाली नव्हती. सांप्रत गोपाळराव रघुनाथ यांची तागिरी जालीयानें व पागनिसाकडे मुखतारी ठैरल्यानें समस्त प्रांतांत व आपसांत अनेक उपद्रव प्रारंभ जाले. कोणी कोणाचे ह्मटल्यांत नाहीं. ऐसा प्रकार जाला असे. नबाब वजीर छ ९ सफरचे तारखेस जरनेल साहेबांचे पेशवाईकरितां श्रीप्रयाग पावेतों गेले. साहेबांची भेटी जाल्या. दरकूच लखनऊस येतात. जरनेल फिरंगी कलकत्त्याहून इकडील दरोबस्त कंपूची मौजदात घ्यावयास आला आहे. नबाब फैजुल्लाखान मृत्यु पावल्यानंतर, महंमदखानास गुलाममहंमद खानानें जीवें मारिलें. त्यावरून नबाब वजिराची रोहिलेमजकुरावर केवळ इतराजी आहे. सांप्रत कालीं गुलाममहंमद यानें आपले कनिष्ट बंधूस वजिराकडे पाठवून, पंचवीस लक्ष रुपये नजराणा देणें कबूल केलें. वजिरांनीं जरनेल साहेबासीं विचार केला. त्यांनीं उत्तर साफ दिल्हें कीं, रोहेल्यास मुलुखांतून खारीज करणें ठीक आहे. त्यावरून वजिरांनीं स्पष्ट उत्तर दिल्हें कीं, लढाईची तयारी करावी. अगर सर्व माल असबाब आपला रामपुरांतील, ते घेऊन आमचा मुलूख खाली करून निघोन जावें. आह्मी मुजाहीम होणार नाहीं. त्यास इंग्रेजमजकूर व उभैतांचा इरादा रामपूर वगैरे रोहिल्यांचा मुलूख खाली करून घ्यावा व रोहिल्याचें पारिपत्य यथास्थित करावें. हें वृत्त गुलाम महंमद यानें ऐकोन, फौजेची निगादास्त जारी करून, चाळीस हजार रोहिला जमा केला, व लढाईची तयारी करितों. एका दों रोजांत नबाब वजीर लखनौंत दाखल होणार. राजे भीमसिंग जोधपूरकर यांजकडील वकील लखनऊंत पूर्वीं दाखल जाला. नबाबाचें कूच त्वरेनेंच जालें. सबब त्याची मुलाजमत अद्यापि वजीरासीं जाली नाहीं. जमाशहासीं व महंमदशहा हिरातचा सुभेदार यांसीं आपसांत नाचाखी जाली. यास्तव शहा मजकूर काबिलाहून फौजसुद्धां हिरातचे रुखास कूच करून जाणार. शहाकडील कोणी खिदमतगार जैपुरांत आला. तेथून लखनौस येणार आहे.

भंगेलसिंग शीख मृत्यु पावला. राजे निर्मलदास, टिकैतरायाचा बंधु, यांस वजिरांनीं हांसी वगैरे प्रांत देऊन रुखसत केलें. वजिरांनीं अकराशें मोहरा जमाशहास नजर व एकशें एक मोहोर त्यांचे वजीरास, कायनिगाराबरोबर देऊन विलायतेस रुखसत केलें. व कायनिगारासही पांच हजार रुपये खर्चास दिल्हे. पादशाहाचे हुजूरांत विलायतचीं अखबार गुजरली. त्यांत मजकूर कीं, जमाशहा दरकूच हिरातचे जिल्ह्यांत जाऊन, पायंदबेगखानास महमूदखान यांजकडे पाठविलें. त्यास खान मजकुरांनीं जमाशहाकडून शपथ प्रमाण करून, महंमूदशास बरोबर घेऊन आला. शहासीं परस्परें भेटी जाल्या. महमूदशाबरोबर तीस हजार स्वार किल्याचे व दुराणी वगैरे होते. रात्रौ कोणी मशारनिल्हेस सांगितलें कीं, जमाशहा तुह्मांसीं दगा करून धरून घेणार. हें बातमी ऐकतांच महमूदशहा तीनशें स्वारांनिसीं कोणास न कळत, हिरातचें रुखास मार्गस्त जाला. इतक्यांत जमाशहांनीं ऐकोन, स्वतः दहा हजार स्वारांनिसीं त्यांची पिच्छा करून, हिरात अलिकडे चार कोसांवर मशारनिल्हेस हस्तगत केलें. तेथून आणोन कैद केलें. हिरात वगैरे किल्ल्यांत बहुत खजाना वगैरे सरंजाम करोडो रुपयांचा निघाला. तेथील सुभेदारी काजी फैजुल्लाखान, पायंदबेगखान यांस दिल्ही. लौकरच कूच करून पेशोरास येणार. याप्रमाणें वृत्त असे. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त अखबार पाठविली आहे त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३४.

श्री. ३ आक्टोबर इ. स. १७९४.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, नबाब फैजुलाखान रोहेला रामपूरवाला मृत्यु पावल्यावर, महमदअल्लीखान मोठा पुत्र तेथें स्थापित जाला. त्यानें हरएकासीं सख्तगोईचें भाषण केलें. सबब गुलाम महंमदखान कनिष्ट बंधू यानें स्वहस्तें खानमजकुरास जीवें मारिलें. महमदअल्लीखानाचें सूत्र नबाब वजीरासीं होतें. हें वृत्त वजीरांनीं ऐकोन, अलमाश अल्लीखान खोजा वगैरे सरदार व फौज बोलविली आहे. जरनेल साहेब कलकत्त्याहून दरकूच प्रयाग पावेतों आले. पामरसाहेब कानपुरांत दाखल जाले. नबाबवजीरही श्रीप्रयागपावेतों सामोरें जाणार. जरनेल साहेबांची भेट घेऊन, तदनंतर रामपूरकरावर मोहीम करून, नजराणा घेऊन बंदोबस्त करावा, ऐसा मानस वजीराचा आहे. गुलाम महमदखानानें जमाशहाकडील एलची

यास बोलावून त्याचे विद्यमानें जमाशहास अर्जी वकिलाबरोबर पाठविली. मजकूर कीं, "खासा स्वारी त्याप्रांतीं येऊन हिंदुस्थानचा वगैरे बंदोबस्त करून द्यावा. बशर्त अंमल दखल, दोन करोड रुपये हुजूरचा नजरणा पावता करूं." याप्रमाणें अर्जी आपले वकिलाबरोबर शहाकडे रवाना केली असे. व फौजेची निगादास्तही जारी करून लढाईचा सरंजाम करितो. श्रुत होय. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३५.

श्री. आक्टोबर इ. स. १७९४.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. डिभाईसाहेब व दौलतराव हरदिया जैपुरास जाऊन राजे प्रतापसिंगासीं भेटी जाल्या. सोहना व नारनोळ वगैरे महाल राजश्री खंडेराव हरीकडे होते, ते साहेब मजकुरांनीं सोडवून, जैपूरकराचा अंमल महालांत दखल करून दिला. हरदिया मजकुरांनीं सावकारी निशा दिली आहे. राव मशारनिल्हेस बहादरगड व हसनगड वगैरे सात महाल रोहोतक प्रांतीचे मुबदला लाऊन दिल्हे. सबब मशारनिल्हे फौजसुद्धां रेवाडीस आले. दो चौ दिवसांत बहादरगडवाला बलोच याजवर मोहीम करून अंमल दखल करणार. डिभाई साहेब जैपुरकरासीं बिदा होऊन मेवात प्रांतीं सोहन्यास आले. तेथील बंदोबस्त करून पळवळचे रुखास येऊन, अंतरवेदचे महालाचा बंदोबस्त करून, दसऱ्याचे सुमारें लखनऊस जावें ऐसा विचार आहे. राजांचा व यांचा एक पेटा असे. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांचे लष्करांत नित्य शिलेदार वगैरे लोकांचा हंगामा राहतो. ह्मणून मशारनिल्हे राघोगडचे रुखास कूच करून आले. भीमासिंग जोधपुरकर यांनीं साठ हजार रुपये यांजकडे दाखल जाले. पुढें पैकाची सरबरा तेथून होऊन आल्यानंतर, राजश्री जिवाजी बल्लाळ व लखबा फौजसुद्धां जोधपुरकराचे कुमकेस जाणार. राजश्री सुभेदाराकडील कारकून सलुखाचे जाबसालास राव मशारनिल्हेपासीं येणार आहेत. ठैरल्यावर प्रत्यास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३६.

श्री. आक्टोबर इ. स. १७९४.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, मिर्जा सुलेमा सिकोह याची अर्जी लखनऊहून पातशाहांचें

नांवें आली. ते मिर्जा अकबरशहांनीं एकांतीं हुजुरांत गुजराणली. राजश्री अंबोजी इंगळे ग्वालेरीस येऊन, तेथील प्रांताचा बंदोबस्त करून मेवाडास कूच करून गेले. महमदबेग कपतान व कारकुनास कंपूचे भरतीस फरूकाबाद वगैरे कितेक जागां पाठविले आहेत. बंदुखांची खरेदी आगऱ्यांत व दिल्लींत होते. दोन कंपू इंगळे मजकुरांनीं तयार केले आहेत. उदेपुरचे पेव्यांत राहून त्याप्रांतीं मुलूख कबज्यांत करितात. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं वरचेवर बहिरो कोनेर यांस लिहिलें कीं, पत्रदर्शनीं सहारणपुराहून निघोन येणें. त्यावरून मशा-निल्हेनीं कूच केलें होतें. इतकियांत शिलेदारांनीं दंगा करून महासरा केला. समरूचे बेगमेनें हें वृत्त ऐकून, मशारनिल्हेस आपल्यापासीं आणून ठेविलें आहे. परंतु फौजेचा तंटा भारी ह्मणोन, व बापू मल्हार व देवजी गवळी यांसीं जिद्दीचा प्रकार, सबब मार्गाचा निभाव नाहीं. सर्व जमीदार व शीख वगैरे व रामदयाळ यांस बापू मल्हार व देवजी गवळी मजकुरांनीं पत्रें पाठविलीं आहेत कीं, पंत मज-कुरास एक पैसा न देतां, त्यांस वाटेंत अडथळ्यांत ठेवावें. ह्याप्रमाणें पत्रें येतांच सर्वत्र जमीदारांनीं दुंडी करून पैका खरीफाचा तसरूफ केला. फरासिसांचे पातशा-हांनीं लोकांसीं व रयेतसीं बहुत बदसलूखी केली. त्यावरून दरोबस्त लोक व रयत जमा होऊन, पादशाहास जीवें मारून, वरकड सर्व कुटुंबाचा नाश केला अ-सतां, इंग्रेजांनीं मोहीम त्यांच्या विलायतेवर करून एक पुत्रास मात्र वाचविलें, व तेथील प्रांतांत आपला कबजा केला. ह्मणून पामरसाहेबांनीं हुजुरांत लिहिलें. त्यावरून विनंति लिहिली असे. राजश्री खंडेराव हरी कानोडचे किल्ल्यांत आहेत. फौजेचा दंगा बहुत राहतो. निमे तलब देतात. परंतु लोकांचीं समजोत आज ता-गाईत जाली नाहीं. जहाज फिरंगी बेलजीचे गढीस मोर्चे लावून आहेत. गंगाबिसन बेलजीवाला रावमजकुरांपासीं कैद आहे. मामल्याची निशा जाल्यावर सुटका होईल. दहा हजार स्वार शिखांचे, गुलाम महंमदखां रोहिल्याचे लिहिल्याप्रमाणे चाकरी .... करून रामपुराकडे येणार. नजीबाबाद पावेतों आले आहेत. पुढें अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.”

लेखांक १३७.

श्री. १० आक्टोबर इ. स. १७९४.

“पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. नवाब वजीर यांनीं छ १५ रविलावलचे तारिखेस फौजसुद्धां रामपुरचे रुखास कूच केला. पस्तीस पलटणें व हजार तोफ व पंचवीस हजार

स्वार व जंबूरक दोन हजार वगैरे जंगी सरंजाम वजीराबरोबर स्वारींत आहे. या शिवाय जरनेल फिरंगी चार कंपू सहित फरुकाबादचे नजीक श्रीगंगा उतरून बरेली नजीक दाखल जाला. नवाब मुजफरजंग फरूकाबादकर पठान बरोबर आहे. चेरी साहेब जरनेल याचे मर्जींत कीं, रोहिल्यासीं खलश न करितां मामला घ्यावा; परंतु नबाब वजीराचा आग्रह आहे कीं, गुलाम महंमद खान वगैरे रोहिले यांस आपलया प्रांतांतून खारीज करावें. त्यावरून इंग्रेजांनीं लढाईची तयारी पोख्त करून, रामपुराहून वीस कोस अलीकडे मुक्काम केला. हें वृत्त गुलाम महंमदखान यानें श्रवण केल्यावर, चाळीस हजार स्वार प्यादा रोहिले वगैरे जमाकरून, शहरचे गिर्द रामपुरांत खाई तयार करून, तेथून बरेलीचे रुखास चार कोसांचा कूच केला. रोहिल्यांनीं दरोबस्त माल असबाब सर्व कमाऊंचे पाहाडास रवाना केला. सडे होऊन लढाईचे मुकावल्यास येऊन, बरेलीस अगोधर लुटावें ऐसा विचार आहे. परंतु इंग्रेज व नबाब मिळोन फौजेचा व तोफखान्याचा जमाव भारी, सबब रोहिले हिरासा फार आहेत. जरनेल मजकुराकडे पैगाम आहे कीं, दोन करोडचा माल असेल ते घेऊन आह्मांस राहावयास एक जागा द्यावी. तेथें राहूं. त्यावरून चेरी साहेबांनीं वजिरांसीं पुनः जाबसाल केला. नबाब वजिरांनीं जमाशाचा शुका आला होता, तो इंग्रजांस दाखविला. त्यांत मजकूर कीं, रोहेल्यांनीं दिल्लींत पातशाहांसीं केवळ हरामखोरी करून गारत केलें. त्यास तुह्मीं रोहेल्यास एकरूप आपल्या मुलुकांत राहूं न देतां खारीज करून देणें. व पादशाही बंदे वजीर तुह्मी सन्निध असतां, पादशाहीची ही दशा होऊन कवडीस मोहोताजी व्हावी हें अपूर्व आहे. हजरतची खबर घेणें तुह्मांस ठीक आहे. याप्रमाणें इंग्रेजांनीं शुका एकांतीं मनन केला. नबाव वजीरही दो चौ रोजांत बरेलींत दाखल होऊन, रोहिले मजकुराचे पारिपत्त्य करून, नंतर दिल्लीस फौजसुद्धां येणार. पामर साहेबांनीं, सैद रजीखान येथें वकिलीस आहे, त्यास लिहिलें असे कीं, हुजूरचे आज्ञेप्रमाणें दरोबस्त जाबसालाची पोख्तगी वजीर व इंग्रेज यांसीं ठैराविली असे. रामपुरकराची तंबीह जाल्यावर, मीच हुजूरांत येऊन साकल्य वृत्त समक्ष जाहीर करीन. ह्मणोन हजरतास खुफिया विनंति करून सांगावें. त्यास नबाब वजीर व इंग्रज यांचें मानस, दिल्लीस अथवा आग्र्यास निश्चयें यावें, ऐसा विचार श्रवणांत आला. दुसरें सावकारीची व्याही शहरांत आल्या आहेत. मिर्जा सुलेमासिकोह यासही वजीरानीं आपल्या समागमें आणिलें आहे. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.”

लेखांक १३८.

श्री. ३१ आक्टोबर इ. स. १७९४.

" श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ६ माहे रविलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ ८ रविलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री जिवाजी बल्लाळ बक्षी यांची अर्जी व बत्तीस मोहरा, शाहाजीचे विद्यमानें हजरतास एकवीस व मिर्जा अकबरशहा यांस अक्रा येणें प्रमाणें गुजरली. डिभाई फिरंगी यानें जैपुरचे मामल्याचा ऐवज परभारा घेऊन, पलटणचे लोकांस दिला. जैपुराहून कूच करून माचेडीकर बखतावरसिंगाकडे येऊन, चार लक्ष रुपये तेथील खंडणी ठरली. पलटणचे लोकांसीं व शिलेदार यासीं जामदारीबद्दल कजिया जाला. पलटणवाल्यानें पांच सात माणसें शिलेदाराकडील जखमी व ठार केलीं. सबब शिलेदार सर्व डिभाईशीं बेदिल आहेत. लखबादादा एका दों रोजांत लष्करांत दाखल जाल्यावर, माचेडीकरासीं ऐवज घेऊन, शिलेदारांस देऊन राजी करणार. फिरंगी मजकुराचे शरीरास समाधान नाहीं. पिरूसाहेब आगऱ्यास रुखसत होऊन गेला. तेथून कुटुंब सहित डिभाईपासीं येऊन सहा पलटनांनिसीं राजश्री गोपाळराव रघुनाथ यास बरोबर घेऊन देशीं रवाना होणार आहे. नबाब वजीर छ १५ रविलावलीं लखनऊहून कूच करून दरमजल कटऱ्यानजीक दाखल जाले. जरनेलसाहेब चार कंपू सुद्धां बरेलींत पावला. गुलाम महमदखान रोहिला यानें चाळीस हजार स्वार प्यादे जमा करून, लढाईचे मुकाबल्यास रामपुराहून दहा कोस बरेलीचे रुखास येऊन डेऱ्यांत दाखल जाला. मामल्याचा पैगाम इंग्रेजांचे विद्यमानें आहे. परंतु वजीराचा निश्चय रोहिल्यास मुलकांतून खारीज करावें, नंतर संस्थानीं पातशहापासीं द्यावें, ऐसी वदंता आहे. जमशहांनीं महमूदशहा व हुमायूशहा यांस बदस्तुर साबिक बहाल करून हिरात व कंधार प्रांतीं रुखसत केलें. व शहामजकुराचा पेशखेमा पेशोरास रवाना जाला. अटकनदीचे पुलाची तयारी करण्याविसीं पेशोरचे सुभेदारास ताकीद लिहिली आहे. सहराणपुराकडे रामदयाल गुजर व शीख यांनीं दुंडीस प्रारंभ करून, बहिरो कोनेर यांचा अंमल उठोन दिला. राजश्री खंडेराव हरी यांनीं शाहाजीसीं दारमदार करून किल्ल्यांत हजरताकडे जावयासी लिहिलें होतें. रावमजकुराकडून हरीसिंग किल्ल्यांत आहे. ते येऊन शहाजीस समजोन घेऊन गेले. अगोदर याजकडील लोक चारशें किल्ल्यांत गेल्यानंतर खुद्द स्वार होऊन पादशाहापासीं गेले. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड

सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक १३९.

श्री. ३१ आक्टोबर इ. स. १७९४.

''श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ ६ माहे रविलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ ८ रविलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरीः– राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं डिभाईपासीं येऊन कंपूंत आपला डेरा सहकुटुंब केला. वरकड शिलेदार वगैरे लोकांस सांगोन पाठविलें कीं, जो कोणी इकडील मुखतार होऊन येईल, तो तुमचे तलब तनखाची निशा करील. डिभाई साहेबांनीं बहुत खातरजमा करून आपले पहारे रावमजकुराचे गिर्द निगाबानीस तैनात केले. साहेबमजकुरांनीं जैपुरकराचे खंडणीचा ऐवज दरोबस्त हस्तगत करून पलटणचे लोकांस दिल्हा. व जयपुर-करासीं रुखसत होऊन लष्करांत आल्यावर, तेथून कूच दरकूच राजगडास बखतावरसिंग माचेडीकर याचे मुलखांत आले. शिलेदार व पलटणेच लोक यांसीं जामदारीवर कजिया जाला. आठ माणसें शिलेदाराकडील पलटणचे लोकांनीं जखमीं केलीं. सबब, सर्व शिलेदार जमा होऊन, माधवराव पागनिसा-कडील कारकून लष्करांत आहे, त्याजपाशीं आले, कीं, खंडणीचा पैका सर्व डिभाईनीं घेऊन आह्मांस कहीची मनाई करून लोकांस जखमी केलें. आह्मीही एकदां त्यांचें लोकांस हरकोठें काबू पाहून जीवें मारूं. अनेक प्रकारचा किरसा राहिला. आखर लखबादादा आल्यावर फडशा होईल. याप्रमाणें ठैरलें. बखतावरसिंगासीं चार लक्ष रुपये खंडणीबद्दल ठैरलें. दादामजकूर आल्यावर ऐवजाची निशा घेऊन, श्रीमथुरेचे रुखास कूच करून येणार. माचे-डीकरांनीं साहेबमजकुरासीं व गोपाळराव रघुनाथ यांसीं भेटी, राजगड नजीक हत्तीवर स्वारींत करून, नंतर किल्ल्यांत दाखल जाला. हें वृत्त माधवराव व रवळोजीं शिंदे यांनीं ऐकोन, बहुत वाईट मानलें असे. एका दों दिवसांत लखबा लष्करांत दाखल जाल्यावर, पुढें काय नक्षा ठैरोन अंमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या

आहेत, त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

पै॥ छ १५ जमादिलावल
सनखमस तिसैन मार्गशीर्ष

लेखांक १४०.

श्री.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ १ माहे रविलाखर मु॥ दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ १० रविलाखरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, शंभोनाथ, राजे टिकेतरावाचा भाचा, बरेलीचे कामावर होता. यानें, लढाईचे प्रसंगीं रोहिल्याची शिकस्त जाली त्यावेळीं, चारशें स्वार व दोन पलटणांनिसीं रोहिल्याचा पिच्छा लोहगढपावेतों करून, गुलाम महंमद खान रामपूरकर यास सत्तावीस स्वारांनिसीं पुनः लढाई करून, धरून आणिलें. नबाब वजिरांनीं मशारनिल्हेस खिलत हत्ती घोडा देऊन बहुत सर्फराजी केली. वजिरांनीं सत्तावीस असाम्यांपैकीं सहा सरदार व गुलाम महंमद यांस मात्र बेड्या घालोन, तोफखान्यांत कैद केलें. वरकड स्वारांस सोडून दिल्हें. इलमास अल्लीखान यास रामपूर वगैरे रोहिल्यांची जागा वजिरांनीं दिल्ही व मशारनिल्हेस फौजसुद्धां............केला व श्रीनगरवाल्यास नबाबांनीं ताकीद वरचेवर लिहिली कीं, रोहिल्यास तुह्मीं आपल्या मुलखांत जागा देऊन ठेवल्यास, तुमचेंहि पारिपत्त्य यथास्थित होईल. ह्मणून पत्रें पूर्वींच पाठविलीं होतीं. त्यावरून श्रीनगरकर राजानींच चहूंकडील घाटे बंद करून, रोहिल्याचे पारिपत्त्यास सर्वत्र लोक तैनात केले आहेत. याप्रमाणें शाहाजींनीं व सैदरजीखान इंग्रेजांचा वकील यानें अखबार पादशाहाचे हुजूर गुजारणिली. पालमर फिरंगी वजिरापासून रुखसत जाला. फरुकाबादेचे मार्गानें अगोधर............करणार. येविशीं कलकत्तेकराची ताकीद फार आहे. लखबादादा व जगोबा छ ७ तारखेस कारभारास प्रवर्तक जाले. लष्करचे लोकांनीं नजरा दिधल्या. आतां राजगडाहून कूच दरकूच श्रीमथुरेस येणार. जमाशहा काबिलाहून पेशावरास त्वरेनेंच दाखल होऊन, अटक नदीचे पुलाची तयारी जाल्यावर कश्मीरास येणार ह्मणोन वदंता असे. पुढें अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

पुरवणी.

दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें.

[इ. स. १७९४ सालचीं पत्रें छापून प्रसिद्ध झाल्यानंतर याच विषयासंबंधाची आणखीं कांहीं पत्रें उपलब्ध झालीं; तीं महत्त्वाचीं असल्यामुळें पुरवणीरूपानें प्रसिद्ध केलीं आहेत.]

लेखांक १.

श्री. ता. १ जानेवारी इ. स. १७९०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ. १४ माहे रबिलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ. १९ रबिलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. ते प्रविष्ट होऊन साकल्यवृत्त ध्यानारूढ जहालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरीः–नजबकुलीखान व रामसेवक दिवाण चार हजार फौजेनशीं भाडावास नजीक रेवाडीहून ती कोसांवर येऊन मुक्काम केला आहे. गुलाबसिंग मुन्यमबेगाचे फौजेसुद्धां कुलीमजकुराचे मुकाबल्यास येऊन लढाई केली. पांच सात माणसें परस्परें ठार जालियावर माघारें येऊन, गोकुळगडांत दाखल जाला. पुनः लढाईची तयारी आहे. येथें शाहाजी व पातशाहा वगैरे शहरचे लोक बहुत भयभीत होते; परंतु नजबकुलीखान आल्यानें स्वस्थ जाले आहेत. रामसेवक दिवाण व होशदारखान यांसी आपसांत बिघाड, ह्मणून रावराजाचे घरांत फितूर जाला आहे. राजश्री पाटिलबावा मार्गांत गढीबंदासीं खंडणी घेऊन दरमजल सांभरास पावले. नवलसिंग जोधपूरकराकडील वकील लष्करांत दाखल होऊन, पूर्वीं मामल्याचा जाबसाल पन्नास लक्ष रुपये व अजमेरचा किल्ला घ्यावा ऐसें गोपाळ रघुनाथ यांसीं बोलणें होतें. त्याप्रमाणें येथेंही भेटी घेऊन रूबरू निवदेन केलें. व पायमाली व मेरत्याची जफ्ती वगैरे लूट मुल्कांतून घेतली असेल, ते सर्व मुजरा द्यावी. पन्नासांपैकीं सा लक्ष बाकी काहाडून दाखविल्यानंतर येथील बेमर्जी बहुत जाली. वकिलास लष्करांतून काहाडून द्यावें ह्मणून सांगितल्यानंतर, राणेखानभाई व राजश्री आबा चिटणीस यांनीं रदबदली करून ठरविलें कीं, अगोदर येथून कारकून वकिलाबरोबर जोधपुरास पाठवून तेथील मानस काय तें पहावें. कदाचित् टाळाटाळ असल्यास जोधपुराकडे कूच करून पारपत्य

करावें, ऐसा विचार करून, वकिलासी व लक्ष्मणराव बरोबर आले आहेत त्यांसही, जोधपुराकडे रवाना केलें. लौकरच जातील. पंधरा दिवसांचा करार ठरला आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं पांच हजार स्वार जोधपुराकडे रवाना केले. खुद्द मशारनिल्हे फौज सुद्धां जोधपुराहून आठ कोस अलीकडे मौजे चौकडी येथें मुक्काम करून आहेत. जोधपूरकरांनीं इस्मायल बेग व भीमराज यांस नागोराहून बोलावून लढाईची तयारी केली; परंतु राठोड तोफखान्याचे लढाईस बहुत भितात. मिर्जाचें मानस कीं, एक वेळ लढाई करून मग काय करणें तें करावें. ऐसा बेत ठरला आहे. लष्करांत सात शेर अन्नाची धारण आहे. रसद पावत नाहीं. सडी फौजेंतही महागाई बहुत. पूर्वीं एक गांव ताख्ततराज केला. त्यांत जकीरा बहुत निघाला. सबब तेरा शेरांचा निरख अन्नाचा होता. पुनः महागाई फार जाली आहे. व मारवाड प्रांतीं काळ पडला ह्मणून तिकडील लोक उठोन या प्रांतीं येतात. यंदां प्रजन्य तिकडे नाहीं. यास्तव पाण्याची मोठी विपत्य लष्करांत आहे. राजश्री सुभेदारांचीं पत्रें राजश्री पाटीलबावांस गेलीं आहेत कीं, नवाब अलीबहादूर यांची समजोत करोन लौकरच घेऊन येतों. परंतु सरदारांत गोसावी-मुळें चित्तशुद्धता नाहीं. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबार पाठविलें आहे त्यावरून श्रुत होईल. विलायती मेवा सेवेसीं पाठविला आहे. तो प्रविष्ट होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति. ”

लेखांक २.

श्री. १ जानेवारी इ. स. १७९०.

“ श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ. १४ माहे रबिलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ. १९ रबिलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, तैमूरशहाकडील सादुलाखान नामें एलची छ. ७ तारखेस येथें दाखल जाला. छ. १२ माहे मजकुरीं पातशाहाची मुलाजमत जाली. मशारनिलेनीं पांच मोहरा नजर करून, शहाकडील नामा गुजराणून तिकडील स्नेहाच्या गोष्टी निवेदन केल्या. राजश्री पाटीलबावांस शाहानीं सर्फराजीचीं वस्त्रें, गुलामकादराचें पारिपत्य केल्याबद्दल पाठविलीं आहेत, तें दाखविलीं.

खिलत लबत बमय तुरा व चरकसी दुशाला व पटका व शालनामी येणेंप्रमाणें आहे. ते हजरतांनीं अवलोकन करून आज्ञा केली कीं, जलदीनें लष्करास जाऊन तेथील विचारें ठरेल तें करावें. व मशारनिलेस तीन पारचें खिलत व शिरपेंच एलचीस व चार शालजोड्या वरकड मोंगलांस इनायत जाल्या. त्यास दो चौ रोजां येलची मजकूर राजश्री पाटीलबावांकडे दरकूच जाणार. राजश्री पाटीलबावा दरमजल सांभरास दाखल जाले. जैपूर जोधपूरकरांकडील वकील जाबसालास आले आहेत. भेटी जाल्या, परंतु अद्यापि कांहीं ठरलें नाहीं. सांभराहून लौकरच सडी फौजेंत सामील होणार. गोपाळ रघुनाथ यांनीं येथील इशाऱ्याप्रमाणें पांच हजार स्वार जोधपुराकडे रवाना केले. खुद्द मशारनिल्हे व डिभाई वगैरे कंपूसुद्धां आठ दहा कोस अलीकडे मौजे चौकडीनजीक जोधपूर येथें मुक्काम करून आहेत. राजश्री सुभेदार भर्तपूरचे मार्गानें हिंडोन पलीकडे मुक्काम करून आहेत. तिथून जयपूरचे रुखास नवाब अलिबहादर यांजकडेस जाऊन तेथील विचारें सांभरास जाणार. परंतु सरदारांत चित्तशुद्धता नाहीं. नजबकुलीखान रेवाडीनजीक भाडावासास येऊन मुन्यमबेगाचा मुकाबला केला. लढाई गोकुलगडासीं होते. नवाब असफुद्दौला छ. २ माहे मजकुरीं लखनौस दाखल जाले. कलकत्याहून इष्टीन साहेबांचीं पत्रें मारकीन साहेबांस आलीं आहेत कीं, तुरुक स्वार पांच हजार चाकरीस ठेवून जलद रवाना करणें. त्यावरून मारकीन साहेबांनीं निगादास्त लखनऊंत ज्यारी केली आहे. बहिरोपंत दोन तीन हजार फौजेनशीं दरकूच पाणीपताचे मार्गानें सहारणपुरास जातात. शिखांचा मुकाबला करणार आहे. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानाचे पत्रीं विनंति लिहिली आहे. त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत लिहिणें कृपा केली पाहिजे ही विज्ञापना".

लेखांक ३.

श्री. जानेवारी इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः—तैमूरशहाकडील सादुलाखान नामें एलची छ. ७ तारखेस दिल्लींत सडा दाखल जाला. बराबर दहा स्वार व वीस प्यादे आहेत. शाहाजीनें शंभर रुपये मेजमानी मशारनिलेस पाठविले. उपरांत छ. १२ तारखेस पातशाहाची मुलाजमत जाली. एलची मजकुरानें पांच मोहोरा नजर करून शहाकडील

नामा गुजराणून तिकडील स्नेहाच्या गोष्टी निवेदन केल्या. त्यांत हुजुरांतून एलचीस तीन पारचे खिलत व शिरपेंच, व बरोबर मंडळी होती, त्यांस चार शालजोड्या गोशवारे इनायत जाले. तैमूरशहांनीं सरफराजीचा खिलत राजश्री पाटीलबावांस पाठविला आहे. तोही हजरतांनीं अवलोकन करून आज्ञा केली कीं, लवकर लष्करास जाऊन राजश्री पाटीलबावांचे विचारें अमलांत आणावें. त्यास एलची मजकूर आठा चौ रोजां लष्करास जाणार आहे. येथून शाहाजीनीं तैमाचबेग नामें मुंगल मशारनिल्हेबरोबर दिला आहे. जोधपूरवाल्यांनीं सल्ला केली-यास उत्तम. नाहीं तरी, मुंगल मजकुरासुद्धां एलची विलायतेस शाहाकडे जाणार. तेथें जाऊन सर्व जाबसालाची पकायत करून येणार. ऐसा विचार येथील आहे. तैमूरशहांनीं मुरादशहाची पूर्वीं सिकस्त केली. यानंतर आपसांत सलूख ठैरला. तीमुनदी पार मुरादशहानें राहावें ऐसा करारमदार ठरल्यावर, मुरादशहानें पांचहजार स्वारांचा सरदार शहाचे चाकरींत ठेऊन, आपण कूच करून बलख बुखाऱ्याकडे गेला. ताबेदारी तैमूरशहाची करावी ऐसें ठरलें आहे. शहा पेशावरास दाखल होणार, ह्मणून श्रवणांत आलें आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति.''

लेखांक ४.

श्री. ता. २६ जानेवारी १७९०.

''पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- जोधपूरकराकडील बुधसिंग वकील यांनीं राजश्री आबा चिटणीसांचे विद्यमानें मामल्याचा जाबसाल फडशा करून, साठ लक्ष रुपये ठराव केला. व यादी करार ठरोन लिहोन दिल्ही. साडेसात लक्ष रुपये तुरुत नख्त घ्यावे व विसां लक्षांत सांभर परवतसर वगैरे चार महाल लाऊन घ्यावे, परंतु कमाविसदार राजे मजकुराकडील राहून ऐवजाचा फडशा चौं वर्षांत करून घ्यावा. साडेबावीस लक्षांत जवाहीर, कापड, हत्ती, घोडा वगैरे भरणा हप्तेबंदीप्रमाणें चौ महिन्यांत घ्यावा; व दहा लक्ष बाकी राहिले, ते पायमाली वगैरे मुजरा सूट द्यावी; याप्रमाणें वकीलांनीं याद करार करून, आठा रोजांचा वाईदा करून निरोप घेऊन छ. २९ रबिलाखरचे तारखेस जोधपुरास गेला. तात्पर्य, अजमीरचे किल्ल्याची सूटचिठ्ठी आल्यावर, राजश्री पाटीलबावा तेथें दाखल होऊन, किल्ला हस्तगत जाल्यावर व मामल्याचे ऐवजाची निशा जाली ह्मणजे सडी फौज गोपाळ रघुनाथ वगैरे माघारे

बोलाविणार. व मेरताही जोधपूरकराचे स्वाधीन करावा ऐसें ठरण्यांत आलें. इकडील बोलणें कीं, मिर्जा इस्मायलबेगास राजानीं जवळ ठेवूं नये व जैपूरकरांचे जाबसालांत राजे मजकुरांनीं मध्यस्ती करूं नये. जयकृष्णगडवाला राजा याचे मुलकांत उपद्रव न करावा. येणेंप्रमाणें वकीलासीं बोलणें होऊन जोधपुरास रवाना केलें आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ५.

श्री. जानेवारी इ. स. १७९०.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—तैमुरशहाकडील नामा पातशाहाचे नांवें आला. त्यांत मजकूर येणेंप्रमाणें आहे. अगोदर ईश्वराची स्तुति. नंतर पातशाहाची. उपरांत मजकूर कीं, बहुत दिवस आपल्याकडील वर्तमान कळत नव्हतें. गुदस्तां अखबारावरून समजलें कीं, गुलाम कादर रोहिल्यानें बेआदबी करून सलतनत बरबाद केली. व नेत्रांस उपद्रव केला. मोठी शोखी केली. त्यावरून इकडून राजे रजवाड्यांस शुके सादर केले होते कीं, गुलामास बजिन्नस धरून हुजूर पाठऊन देणें. इतक्यांत शहामत व आवालीमर्तबात माधोराव शिंदे मन्हटे यांनीं फौजा पाठवून गुलामास धरून कैद केलें. व बहुत तंबीह करून नाक, कान, डोळे काहाडून हुजुरांत पाठविलें. त्यावरून बहुत संतोष जाला. सबब सर्फराजीचा खिलत इनायत करून एलची मशारनिल्हेकडे पाठविले आहे व आपली भेट घेऊन त्याजकडे जाईल. कितेक मजकूर आपले पराक्रमाचे व मुरादशाहाची शिकस्त केलीयाचे विस्तारें लिहिले आहेत. सेवेसीं श्रुत होय ह्मणोन विनंति लिहिली आहे. राजश्री पाटीलबावांनीं श्रीमंत स्वामींची नवी मोहर मोठी व आपले नांवें दुसरी मोहर तयार केली आहे. ते शाहाजीनीं पो दिली. त्यास मोहरेची नक्कल सेवेसीं पाठविली आहे. श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ६.

श्री. जानेवारी १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ० १० माहे जमादिलावल मुक्काम दिल्ली

जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष पेशजीं विनंतिपत्रें छ० १४ रबिलाखरचीं सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरीः— राजश्री पाटीलबावा दरकूच अजमेर नजीक पावले. जोधपुराकडील बुधसिंग वकील यांनीं मामल्याचा फडशा साठ लक्ष रुपये ठराव करून यादी करार ठैरोन दिली. साडेसात लक्ष तुरुत नख्त् द्यावे. व विसां लक्षांत सांभर वगैरे चार महाल लावून घ्यावे. साडेबावीस लक्षांत जवाहीर हत्ती घोडा, कापड, उंट वगैरे भरणा; व बाकी दहा लक्ष राहिले ते पायमाली वगैरे मुजरा सूट मागतात. याप्रमाणें यादी, वकील मजकुरानें करून दिल्ही; व आठां दिवसांचा वाईदा करून, जोधपुरास निरोप घेऊन गेला. तेथून अजमीरचे किल्ल्याची सूटचिट्टी व सावकारी निशा आलियावर किल्ल्याचा बंदोबस्त करून फौजा लवकरच माघारे येणार आहेत. जैपूरकराकडील मामल्याचा जाबसाल रुबकार आहे. खुशालीराम बोहोरा आल्यावर मामल्याचा ठराव होईल. नवाब अल्लीबहादूर व राजश्री सुभेदार मानपूरनजीक मुक्काम करून आहेत. जैपूरकरांचे मुलूकांत खंडणी घ्यावी व रावराजा माचेडीवाला याचे मुलकांची जप्ती करावी, ऐसा बेत आहे. सेवेसीं श्रुत होय. आपणाकारणें रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत, ते कृपाकरून स्वीकारून पत्रोत्तरीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिलें आहे. त्याजवरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विज्ञापना."

लेखांक ७.

श्री. ता. २६ फेब्रुवारी इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंति येथील कुशल तागायत छ० ११ माहे जमादिलाखर मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ० १० जमादिलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. ते प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री सदाशिवपंत आसवलकर यांनीं राजश्री पाटीलबावांस लिहिलें कीं, आम्हीं कांहीं जाबसालाकरितां आपणाकडे येतों. त्यावरून यांनीं उत्तर लिहिलें कीं, उत्तमच आहे. आम्हीं आज तागाईत तुमच्या मर्जीखेरीज नाहीं. त्यास पंत मशारनिल्हे लष्करास जाणार. तेथें

गेल्यावर जाबसाल काय ठरेल ते विनंति लिहूं. तात्पर्य, हिंमतबहाद्दर गोसावीमुळें आपसांत सरदाराचे कलह जाला आहे. नवाब अलीबहादूर यांची फौज बेदिल होऊन लोक उठून जातात. यास्तव खुद्द मशारनिल्हे बुंदेलखंडाकडे कूच करणार होते. राजश्री सुभेदारांनीं एक लक्ष रुपये तुरत खर्चास देऊन ठेवून घेतलें आहे. कारण कीं, गढीबंदासीं मामला घेतल्यावर पैकीं निमे मामला नवाबास द्यावा व निमे आपण घ्यावा; व मुलूक सुटेल त्यापैकीं निमे वांटून घ्यावा; ऐसा करार मदार परस्परें ठरण्यांत आला आहे. नवाब वजीर लखनऊंत आहेत. नवी पलटणाची तयारी होते व ऐवजाची सरबरा करून पै दर पै बडेसाहेबाकडे मंदराजेस रवाना करितात. पामरसाहेब फरुक्काबादेस गेले. लष्कर इकडे आल्यावर लौकरच इकडे येणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. पूर्वीं कासीद जोडी पाठविली होती. ती मार्गांत कजाकांनीं लुटली. सरकाराचीं पत्रें गेलीं ह्मणून आजुरा कासीदास न पटला. त्यास फौजा मथुरेहून गेल्या. तागाईत मार्गांत मोठा उपद्रव जाला आहे. कितेक कासीद मवासांनीं जीवें मारलेत. ऐसा प्रकार जाला आहे. त्यास आजुऱ्याविशीं विनंति लिहिली आहे. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ८.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७९०.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. नवाब निजामआलीखानानीं एकावनशें मोहरा पातशाहास नजर पाठविले आहेत. राजश्री बाबाराव वकिलास पत्रें आलीं आहेत कीं, राजश्री पाटीलबावांचे विचारें, पातशाहास नजर देणें व बाग, मिलक(?) हवेली वगैरे सर्व पातशाहाकडून सोडवून बहाल करून घ्यावी. त्यावरून राजश्री पाटीलबावांचे अनुमतेंकरून रावमशारनिले शाहाजीबरोबर येथें आले आहेत. व बद्रीनाथ राव हरकारे यांसही नवाबाचें पत्र आलें आहे कीं, बाबाराव व तुम्हीं मिळोन पातशाहास नजर देणें व मतालीब सर्व करून घ्यावे. त्यास दों चा रोजा मुलाजमत होणार आहे. बाग मिलक(?) वगैरे बहाल करून देणें ह्मणून शाहाजीस रूबरूही तेथून राजश्री पाटीलबावांची परवानगी आहे. त्यावरून, येथें मशारनिलेनीं हजरतास विनंति केली कीं, गाजुदीखानाबरोबर नवाबाची मिलला बाग वगैरे दरोबस्त बहाल व्हावी म्हणून राजश्री पाटीलबावांची मर्जी व आज्ञा आहे. त्यास बाग

मीलला वगैरे सर्व जागा अकबरशाहाकडे आहे म्हणून पातशाहा वगैरे आनमान करितात. शाहाजींनीं समजोन सांगितलें व राजश्री पाटीलबावांची येविशीं परवानगीच आहे ह्मणून मीलला बाग हवेली वगैरे सर्व बहाल करून द्यावे ऐसें ठरलें आहे. त्यास नवाब निजामअलीखानास खिलत सात पारचे, जेगा, बमय परगिरी शिरपेंच, माळा मरवारी, हत्ती घोडा सीपर समशेर येणेंप्रमाणें व वकिलास पांच पांच पारचे खिलत व शिरपेंच वगैरे, मंडळीस शालजोड्या येणेंप्रमाणें ठैरोन यादी लिहून दिधल्या आहेत. त्याप्रमाणें शहाजी तयारी करितात. राजश्री पाटीलबावांसही नवाबाचीं पत्रें आलाहिदा आलीं आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति. ”

लेखांक ९.

श्री. २६ फेब्रुवारी इ. स. १७९०.

“ पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना येथील कुशल तागाईत छ ११ माहे जमादिलाखर मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ १० जमादिलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरीः—राजश्री पाटीलबावा मौजे भौला प्रांत अजमेर येथें मुक्काम करून आहेत. लक्ष्मणराव वकील यांचे विद्यमानें जैपूरकराचें बोलणें होऊन, रोडजी खवास व ठाकूर पहाडसिंग चार हजार लोकांनशीं लष्करांत दाखल जाले. राजश्री पाटीलबावा सामोरे जाऊन डेऱ्यास घेऊन आले. खवास व ठाकूर मजकूर यांनीं पांच पांच मोहरा नजर देऊन, राजे प्रतापसिंग जैपूरकरांचीं पत्रें व घोडावस्त्रें वगैरे सरंजाम नजर केला व परस्परें बहुत ममतेच्या गोष्टी जाल्या. नंतर राजश्री पाटीलबावांनीं मेजमानी व हजार रुपये नख्त त्यांजकडे पाठविले. जैपूरकरांचे मामल्याचा जाबसाल रुबकार आहे. राजेमजकुरांनीं शहरांत व जमीदारांशीं पंचवीस लक्ष रुपये दंड ठैराविला आहे. मामल्याचा फडशा जाल्यावर कराराप्रमाणें ऐवजाची निशा होईल. व दरसालचे खंडणीबद्दल महाल लावून द्यावे, वारंवार कलह न व्हावा, ऐसा विचार राजाचा आहे. अगोदर वकील राजश्री सुभेदाराकडे आले होते. परंतु येथें कांहींच ठैरण्यांत न आलें. सबब रोडजी वगैरे मुखत्यार कारभारी तिकडे गेले आहेत. हें वृत्त उभयतां सरदारांनीं श्रवण करून पुनः जैपूरप्रांतीं पेंढारी वगैरे फौज

पाठवून उपद्रव केला आहे. त्यावरून जैपूरकरांनीं आपले राज्यांत सर्वांस लिहिलें कीं, आम्हीं मामला, राजश्री पाटीलबावांसीं फडशा करितों. उभयतां सरदारांकडील फौज मुलकांत ताख्त करावयास आली, तरी तुम्हीं लढाई करणें. त्यास, राजश्री अलीबहादरबाबा व सुभेदार, मानपूर नजीक जैपूरप्रांतीं मुक्काम करून आहेत. हिम्मतबहाद्दर गोसावीमुळें सरदारांत चित्तशुद्धता नाहीं. हल्लीं राजश्री सदाशिवपंत असवलकर राजश्री पाटीलबावांकडेस जाबसालास जाणार आहेत. रावराजा याचे घरांत जीवनखान व रामसेवक दिवाण यांसी कलह जाला, ह्मणून तेथेंही फितूर आहे. लष्कर इकडे आल्यावर त्यांचा जाबसाल काय ठरेल तें सेवेसीं विनंति लिहूं. राजश्री गोपाळराव रघुनाथ वगैरे सडी फौज मेरत्यानजीक दाखल जाले. मेरत्यांत जोधपूरकरांचा अंमल दखल जाल्यावर अजमेरचे किल्ल्याची सूटचिठ्ठी वकील घेऊन येणार व ऐवजाची वगैरे निशा करणार, ऐसा विचार आहे. अजमेरचे किल्ल्याचा बंदोबस्त करून सत्वरच फौजा इकडे येणार. शिखांनीं अंतर्वेदप्रांतीं बहुत उपद्रव केला होता; परंतु राजश्री रवळोजी शिंदे व बहिरोपंत दहा बारा हजार फौजेनशीं आल्यानें शीख हिरासा होऊन यमुनापार पाणिपताकडे दरकूच गेले. हल्लीं शहा निजामुद्दीन यांनीं दिल्लीहून दोन हजार फौज शिंदेमजकुराकडे आणिक पाठविली आहे. देवजी गौळी वगैरे किराण्यापलीकडे मुक्काम करून शिखाचे मुकाबल्यास आहेत. नवाब निजामअलीखान यांजकडील वकील पाठविले बाबाराव गोविंद यांनीं पातशाहाचा निरोप छ० २६ जमादिलावलचे तारखेस घेतला. हाजुरांतून नवाबास सात पारचे खिलत, शिरपेंच, जवाहीर, जेगा मयपरगिरी, मोत्यांची माळ, सिपर समशेर, व रजाई शालनामी मलबूसखास इनायत जाला. हत्ती घोडा घ्यावयास राजश्री पाटीलबावांस शुका लिहून दिल्हा आहे. मिलक बाग वगैरे याची इनामी सनदा नवाबाचे नांवें तयार जाल्या. वकील मजकुराचे शरीरीं समाधान नाहीं. महिना पंधरा रोजां आराम जाल्यावर लष्करास जाणार. नवाब-वजीर लखनाऊस स्वस्थ आहेत. नवी पलटणा तयार होतात. नजबकुलीखान गोकुलगडास मोर्चे लावून आहे. अद्यापि गडमजकूर खालीं जाला नाहीं. लढाई होते. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विज्ञापना."

लेखांक १०.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७९०.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:—राजश्री पाटीलबावांनीं बहिरोपंताबरोबर दोन पलटणा व दोन हजार स्वार तोफखाना देऊन सहारणपुरास रवाना केलें. त्यास मशारनिल्हे दिल्लीस दाखल जाले. शाहाजीनीं बारुद गोळा वगैरे तयारी करून दिल्ही. त्यास छ० १० तारखेस सुनपताचे मार्गानें सहारणपुराकडे कूच करून गेले. तेथें शिखांनीं जमाव करून देवजी गवळी व बापू मल्हार यांस बहुत हैराण केलें. हल्लीं इकडील फौजेची अवाई ऐकोन पंधरा कोस अलीकडे मेरठेचे रुखास छपरोली किरण्याकडे आले. अंतरवेदप्रांतीं रखी घेऊन महाल तहसील करितात. कर्मसिंग निरमळेकर यांस पूर्ववत्प्रमाणें कांहीं जहागीर द्यावी ऐसा बेत गवळीमजकुराचा येथील लिहिल्याअन्वयें आहे. परंतु सरदार कूच करून लांब गेले, इकडे कोणी नाहीं, म्हणून प्रांतांत हंगामा करून जबरदस्तीनें तहसील करितात. राजश्री खळोजी शिंदे शहाबादाकडे गेले होते. त्यांस तिकडेही मर्जीप्रमाणें मामला न जाला. दारमदार करून हातरसास आले. राजश्री पाटील-बावांची निक्षून ताकीद आहे कीं, प्रथम सहारणपुराकडे जाऊन शिखांचें पारपत्य करावें. नंतर होणें तें होईल. शिखांनीं मुलूख काबीज केल्यावर मग जाणें ठीक नाहीं. त्यास शिंदेमजकुरांनीं खर्चाची विपत्य लिहिली. फौज काबूंत नाहीं. कांहीं खर्चाची सरबरा मामल्यापैकीं अथवा सरदारांनीं केलीयासी लौकर शिखांचे मुकाबल्यास येणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति.''

लेखांक ११.

श्री. फेब्रुवारी १७९०.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- राजे बिजेसिंगांनीं आपले वकिलाबरोबर अजमीरचे किल्याची सूटचिठ्ठी देऊन राजश्री पाटीलबावांकडे पाठविलें आहे. सात लक्षपैकीं चार लक्ष रुपये राजश्री गोपाळ रघुनाथ यांजकडे पाठविले. बाकीं तीन लक्ष रुपयांस ठिकाण नाहीं. व भरण्याचा सरंजाम अद्यापि आला नाहीं. टाळाटाळ करितात. ह्मणून फकीरजी गाढवा तेथें आहे. त्यांनीं राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस लिहिलें होतें. त्यावरून राजश्री पाटीलबावांनीं राजे बिजेसिंगास निक्षून पत्रें

पाठविलीं आहेत. वकिलाचें बोलणें आहे कीं, मेरत्यांत राजाचा बंदोबस्त करून देवावा ह्मणजे मी अजमीरचे किल्यांत आपला बंदोबस्त करून देतों. राजश्री पाटीलबावा अजमेरीस जाणार होते. परंतु राजश्री कृष्णोबा चिटणीस जखमी जाल्यानें व शिलेदाराच्या दंग्यामुळें सांप्रत शहापुरांतच मुक्काम करून आहेत. चिटणीस मजकुरास आराम जाल्यावर अजमेरास जाणार आहेत. मिर्जा इस्मालबेग जोधपुरास राजाकडे गेला होता. त्यास राजे बिजेसिंगांनीं बहुत खातरजमा मिर्जाची केली, व नजफअल्लीसुद्धां मिर्जास नागोराकडे रवाना केलें. त्यास, मिर्जा व नजफ अल्लीखान हमदानीचा पुत्र, नागोरांत मुक्काम करून आहेत. उदेपुराकडे पाठवावें ऐसा बेत राजेमजकुराचा श्रवणांत आला आहे. परंतु मेरत्यांत अमल दखल त्यांचा जाल्यानंतर, राजाचे विचारें पुढें कसें ठैरेल तें अमलांत आल्यावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १२.

श्री. फेब्रुवारी १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– नवाब–वजीर शिकार करून बेरलीस दाखल जाल्यावर मेहदीबेग तेथील सुभेदार यानें मेजमानी केली. नंतर तेथून रामपूर नजीक आल्यावर फैजुल्लाखानाचा पुत्र पेशवा येऊन पंधरा किस्ती पोषाखी व दोन घोडे व हत्ती येणें प्रमाणें नजर केले. तेथून दरमजल लखनूस छ० २ मिनहूस दाखल जाले. मिर्जा हैदरबेगखां एक मजल सामोरें जाऊन वजीरास घेऊन आले. कलेक्टर साहेबाची ताकीद आहे कीं, हसेबंदीप्रमाणें ऐवज लौकर पाठवावा. त्यावरून हैदरबेगांनीं इलमासअलीखानास सांगितलें कीं, अंतर्वेद प्रांतावर पांच लक्ष रुपये इजाफा कबूल करावा आणि किस्तीप्रमाणें ऐवज सरकारांत दाखल करावे. पूर्वीं अंतर्वेद इटावा वगैरे प्रांत साठी लक्षांची तहसील होती. इलमास अलीखानांनीं पंचेचाळीसीचा मक्ता केला. हल्लीं पस्तीसही वसूल नाहींत ! ह्मणून मामलत सोडून द्यावी. इजाफास ठिकाण नाहीं. याप्रमाणें प्रतिउत्तर केलें. यावर हैदरबेगखानांनीं खात्री करून पूर्ववत्प्रमाणें बहाली केली. लाख रुपये नख्त व दोन लक्षांची निशा घेऊन, वरकड मामलेदारांसीं रसद घेऊन कलकत्त्यास पांच लक्ष रुपये रवाना करणार. याप्रमाणें वृत्त असे. पुढें

निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३.

श्री. फेब्रुवारी १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- जैपूरकरांकडील वकील राजश्री पाटीलबावांचे लष्करांत दाखल जाला. राजाकडील पत्रें व वस्त्रें आणलीं होतीं, तें नजर केलीं. नंतर मामलयाचा जाबसाल रुबकार केला आहे. व अद्यापि कांहीं ठरण्यांत आलें नाहीं. जोधपूरकरांचें संधान पाहून मग जैपूरकरही सलूख करतील. ऐसा परस्परें बेत आहे. परंतु सांप्रत जाहीरदारी दाखवून बोलणें करितात. ठरल्यानंतर सेवेसीं विनंति लिहूं. मिर्जा अहसनबकत पूर्वीं विलायतेस जात होता; मार्गांत निर्वाह न जाला, सबब फिरून जैपुरास आले. राजांनीं शंभर रुपये दरमहा करून कांहीं दिवस ठेविलें होतें. परंतु याचाही निर्वाह न जाला. यास्तव शहाजादे मजकुरास स्पष्ट उत्तर दिलें कीं, जेथें मर्जीस येईल तेथें जावें. त्यास हल्लीं पुनः विलायतेस जाण्याचा विचार श्रवणांत आला आहे. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १४.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- जैपूरकरांनीं मामलयाचें वृत्त श्रवण करून, राजे बिजेसिंगास वरचेवर पत्रें पाठविलीं आहेत कीं, आमचाही मामला तुह्मीं आपले विद्यमानें फडशा करावा. तुह्मी जलदी केली नसती तरी महागाईमुळें फौज हैराण होऊन उठोन जाती, परंतु त्वरा केली. असो. राजश्री अलीबहादूर व सुभेदार आमशीं मामला मागतात, व राजश्री पाटीलबावांही मागतील. यास्तव नेक सलाह जाणाल, त्याप्रमाणें निर्णय करून लिहाल त्यान्वयें अमलांत येईल. याप्रमाणें तिकडील पत्रें गेलीं आहेत. व वकील जैपूरकरांकडील राजश्री पाटीलबावांपाशीं हजीर होऊन येथेंही मामलयाचा जाबसाल करितात. परंतु यांचें बोलणें कीं, खुशालीराम बोहरा यांस बोलावून, त्याचे हातून मामलयाचा फडशा करून निशा द्यावी ह्मणजे गुंता नाहीं. त्यावरून वकीलांनीं राजे प्रतापसिंगास

लिहिलें आहे. त्यास खुशालीराममजकूर आल्यावर तेथीलही तह ठरेल. याप्रमाणें वृत्त श्रवणांत आलें आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १५.

श्री. फेब्रुवारी १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:- रावराजे प्रतापसिंग माचेडीवाले यांचीं पत्रें राजश्री पाटीलबावांस येतात कीं, जैपूरकराकडील फौज तयार होऊन कामयाकडे येणार. व आमचे मुलुकांत येऊन दखल करणार आहेत. त्यास, आह्मांस तो सर्वप्रकारें भरंवसा आपला आहे. कांहीं मदत जाली पाहिजे. त्यावरून इकडूनही पत्रें गेलीं आहेत कीं, खातरजमा ठेवणें. फौज बोलाविली आहे. आल्यावर तुह्मांकडे रवानगी केली जाईल. भिकानेरवाल्याकडील वकील आला होता. त्यासी जाबसाल होऊन वकीलास तिकडे रवाना केलें आहे. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १६.

श्री. १३ मार्च १७९०.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति यथील कुशल तागाईत छ० २६ माहे जमादिलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः- पेशजीं छ० ११ माहे मजकूरचीं विनंति पत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें प्रविष्ट होऊन साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. व हल्लीं इकडील वर्तमान तरी, आजमेरचा किल्ला एका दों रोजां खालीं होणार. हुताशनी जाल्यानंतर लष्कर मथुरेस येणार आहे. रोडजी खवास व ठाकूर पहाडसिंग जैपुरास गेले. तूर्त दोन लक्ष रुपयांची निशा खुशालचंद शट याचे विद्यमानें मान्य केली. बाकीचे ऐवजास राजश्री पाटीलबावांकडील कारकून बरोबर घेऊन गेले आहेत. लौकरच मामल्याची बाकी फडशा करणार. पांच लक्ष नक्त व बाकीचा भरणा कराराप्रमाणें आदा करावा याप्रमाणें ठरलें आहे. दिल्लींत शाहाजी बदस्तूर आहेत. हिरासिंग जाट यांस गीर्दची फौजदारी व येथील किल्लेदारी राजश्री पाटीलबावांकडून आहे. त्यास मशारनिल्हेनीं एक दोन पातशाई

मुकरबे तोडून खराबा केला ह्मणून जाटमजकुरांशीं व यांसीं परस्परें विरुद्ध लागलें आहे. किल्ल्यांत दरबार होत नाहीं. पातशाहा बहुत हैराण आहेत. मिर्जा अहसनबख्त विलायतेस जातां मार्गांत मृत्यु पावले, ह्मणून वदंता आहे. राजश्री खंडोजी शिंदे दरकूच माघारे सादाबादाकडे गेले. मथुरावृंदावन महावन वगैरे मशारनिल्हेकडे आहेत. त्याचे बंदोबस्तास त्वरेनें गेलेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तरवृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून श्रुत होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति. ''

लेखांक १७.

श्री. एप्रिल १७९०.

'' पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीः—

विनंति ऐसीजेः—

जैपूरकर राजे प्रतापसिंग यांचे मामल्याचा जाबसाल रोडजी खवास व ठाकूर पहाडसिंग यांचे विद्यमानें राजश्री पाटीलबावांसीं बोलणें होऊन सत्रा लक्ष रुपये मामला करार ठरला. पैकीं, पंधरा लक्ष सरकारचे व दोन लक्ष दरबारी खर्चाबद्दल, एकूण सत्रा लक्ष रुपये ठरल्यावर, एक लक्ष रुपयांची सध्यां निशा साहुकारी दिली. बाकी जैपुरास गेल्यानंतर कराराप्रमाणें ऐवज सत्वर पाठवितों ह्मणून रोडजी खवासाचे बोलणें जालें. नंतर छ० १२ माहे मजकुरीं उभेतांनीं राजश्री पाटीलबावांचा निरोप बहुत संतोषें घेतला. निरोपाचीं वस्त्रें उभेतांस पांच पांच पारचे खिलत, जेगा शिरपेंच, जवाहीर, मोत्यांची माळ व एक एक घोडा येणेंप्रमाणें उभेतांस, वरकड मंडळी त्यांजबरोबर होती त्यांस वस्त्रें, सांठ असामींस दिलीं. व रा॥ लक्ष्मणराव वकील यांस साडेतीन वस्त्रें सिरपेंच येणें प्रमाणें दिले. राजे प्रतापसिंगास सा पारचे खिलत, जेगा, सिरपेच, मोत्यांची माळ, हत्ती, घोडा येणेंप्रमाणें व राणी वगैरे यांस दाहा खिलत; राजश्री लक्ष्मणराव वकील यांचे स्वाधीन केले. त्यास लौकरच जैपुरास जाणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

तैमूरशाहाकडील सादुल्लाखान एलची छ० ५ तारिखेस लष्करांत दाखल जाला. छ० ६ माहे मजकुरीं राजश्री पाटीलबावांनीं फर्मानबाडी करून दोन कोस सामोरें गेले. एलचीची भेट जाली. नंतर शहाकडील खिलत बातशाही कायद्याप्रमाणें बहुत संतोषें घेऊन, पत्र होतें तें मस्तकीं ठेविलें. उपरांत डेऱ्यास

आले. सर्वांनीं नजरा केल्या. एलचीस पांच पारचे खिलत व जेगा, शिरपेंच, जवाहीर, मोत्यांची माळ वगैरे मंडळी हमराही होते त्यांस नव खिलत दिले. एलची मजकुरानें तिसऱ्या रोजीं निरोपाचा जाबसाल केला. त्यावरून राजश्री पाटीलबावांनीं, तीन रुपये रोजमरा एलचीचे खर्चास नेमून दिला. व तूर्त म॥ निल्हेस ठेऊन घेतलें आहे. लष्कर मथुरेस दाखल जाल्यानंतर एलचीची रवानगी होणार ह्मणून श्रवणांत आलें आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

राजश्री सुभेदाराकडे जैपुरकराचे वकीलांनीं मामल्याचा जाबसाल अठरा लक्ष परीयंत केला, परंतु करारांत आलें नाहीं. राजश्री काशीराव होळकर यांनीं राजे मजकुराचे मुलकाची जफ्ती केली. नवाब अलीबहादरांनीं मामल्याची मुखत्यारी राजश्री सुभेदारांकडे सांगितली आहे. सालजाब होतो. अमलांत आल्यावर विनंति लिहूं.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १८.

पै॥ छ० रमजान वैशाख **श्री.** ७ एप्रिल १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवरात्र कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २१ माहे रजब मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः- पेशजीं छ० २६ जमादिलाखरचीं विनंति पत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावोन समस्त वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावा दरकूच अजमेरास जातात. तेथील किल्ल्याचा वगैरे बंदोबस्त करून, पुष्करस्नान करून दरमजल श्री मथुरेस येणार. राजश्री सुभेदार बदस्तुर जैपूरनजीक मुक्काम करोन आहेत. तेथील मामला बारा लक्षांवर फडशा जाला. ऐवजाची निशा आलीयानंतर तेथून कूच होणार आहे. नवाब अलीबहादर व राजश्री सुभेदार एका जागांच आहेत. फरुकाबादाहून पालमर साहेब छ० १३ तारखेस येथें दाखल जाले. छ० १५ माहे मजकुरीं पातशाहाची मुलाजमत जाली. नंतर छ० २० मिनहूस कूच करून अनूपशहरास गेले. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ

करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे ही विज्ञापना."

लेखांक १९.

पै॥ छ० १ रमजान वैशाख. **श्री.** ७ एप्रिल १७९०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाइत छ० २१ माहे रजब मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष:- पेशजीं छ० २६ जमादिलाखरचीं विनंति पत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावोन साकल्य वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावा भोलापूर प्रांत अजमेर येथें आहेत. जाहाजपूर वगैरे गढीबंदाचा मामला लाख रुपये ठरला. त्यास, ऐवज मामल्याचा घेऊन, दरमजल अजमेरास जाणार. अजमेरचे किल्ल्याचा बंदोबस्त राजश्री जिवबा बक्षी यांचे बंधूकडे सांगितला आहे, व आपण किल्ला वरचेवर पाहून, पुष्कर स्नान करून दरकूच श्री मथुरेस येणार आहेत. शिलेदाराचा हंगाम होता. त्यास सर्वांची हजीरी घेऊन हिशेबाचा फडशा होत आहे. परंतु शिलेदार सर्व बेदील आहेत. राजश्री कृष्णोबा बावांसही आराम जाला आहे. सांप्रत कालीं राणेखानभाईसीं सलाह बहुत आहे. दिल्लींत शहाजी बदस्तूर आहेत. उदईक यमुना पार उतरून माहालाचे बंदोबस्तास जाणार आहेत. हिरासिंग बलंगडकर जाट यांजकडे दिल्लीचे किल्ल्याची किल्लेदारी व गीर्दची फौजदारी राजश्री पाटीलबावांकडून आहे. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून श्रुत होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक २०.

श्री. एप्रिल इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—

नवाब निजाम अल्लीखान यांनीं राजश्री पाटीलबावांस खिलत व बिदरी भांडीं वगैरे तोफाताफ दहा कावडी पाठविले, ते आग्र्यापावेतों आले आहेत. त्यांपैकीं

कांहीं सरंजाम पातशाहासही आहे. परंतु राजश्री बाबाराव वकील, नवाब मशारनिल्हेकडील, येथें आहेत; त्यांचे शरीरास समाधान नाहीं. कांहीं आराम जाला ह्मणजे लष्कर सन्निध आल्यावर, तेथें जाऊन राजश्री पाटीलबावांस वस्त्रें वगैरे सरंजाम पावते करून, तेथील विचारें ठरेल त्याप्रमाणें पातशाहास पाठवितील. याप्रमाणें वृत्त आहे. सेवेसीं श्रुत होय.

नजबकुलीखान गोकुळगडास मोर्चे लावून आहे. हल्लीं बखतावरसिंग रावराजाचा पुत्र यानें, रामसेवक दिवाण याची समजोत करून, पुनः बहालीचीं वस्त्रें मशारनिल्हेस देऊन, चार हजार फौज व पांच तोफा तैनातीस देऊन, नजबकुलीखांचे कुमकेस, राजश्री पाटीलबावांचे लिहिल्यान्वयें पाठविलें आहे. मोर्चे चहूंकडून गडानजीक पावले. लौकरच खालीं होईलसें आहे. मुनीयमबेग हिरासा बहुत जाला आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं.

अनूपशहरांत इंग्रेजांकडील कंपु आहे. त्यास त्या कंपूचा फिरंगी शिकारेस अलीकडे दोन चार कोस आला होता. इकडून शिखांनीं बातमी राखून कर्मसिंग वगैरे हजार स्वार शिखांचे तिकडे जात होते. मार्गांत फिरंगी सांपडल्यावर त्यांस धरून नेलें आहे. इंग्रेज मजकूर वीस हजार रुपये कबूल करितो. परंतु शीख एक लक्ष रुपये मागतात. पाणिपतापलीकडे घेऊन गेले आहेत. हें वृत्त लखनऊंत हैफसाहेब व नवाब वजीर यांनीं श्रवण करून, दहा हजार पलटण वगैरे फौज शिखांचे मुकाबल्यास रवाना केली. व राजश्री पाटीलबावांसही लिहिलें आहे कीं, शिखांनीं फिरंगी धरून नेला. सोडवावयास येथून फौज पाठविली आहे. त्यास, गंगा उतरोन सहारणपूरचे मार्गानें शिखाचे मुकाबल्यास जाणार, ह्मणून सूचनार्थ लिहिलें आहे. त्यास राजश्री पाटीलबावांचे पत्रोत्तर नवाब-वजीरास गेल्यावर फौज मजकूर लौकरच शिखांचे मुलखांत जाणार. सांप्रतकालीं अनूपशहरचे घाटीं गंगातीरीं मुक्काम करून आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति.”

लेखांक २१.

श्री. एप्रिल १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—

नबाब अलीबहादूर व राजश्री सुभेदार माणकपूर नजीक जैपूर प्रांतीं मुक्काम करून आहेत. त्या प्रांतीं गढीबंदांसीं खंडणी घेऊन, राव राजा माचेडीवाला याचा दत्तपुत्र बखतावरसिंग आहे, त्याचाही मामला दोन लक्ष रुपये ठरला. पैकीं, कांहीं ऐवजाची निशा जाली. बाकीचा ऐवज पटल्यावर हिंमतबहादूर गोसावी याचे विचारें, राव राजा माचेडीवाल्याचे प्रांतांतही दखल करावा, ऐसा बेत श्रवणांत आला आहे. नवाब मशारनिल्हेचे लष्करांत खर्चाची विपत्य ह्मणून नवे लोक चाकर ठेविले होते, ते बेदिल होऊन उठोन गेले; व राहिले तेही उदास आहेत. गोसावीमुळें सरदारांत चित्तशुद्धता अद्याप जाली नाहीं. याप्रमाणें वृत्त आहे. सेवेसीं श्रुत होय. कलकत्तेकर बडे साहेबांनीं नवाब वजीर यांस लिहून पाठविलें कीं, तुमची फौज समयास पोंहचणार नाहीं. यास्तव तुमचे फौजेच्या ऐवजीं पांचशें गोरे येथून चाकर ठेऊन, बरोबर घेऊन चिनापट्टणाचे रुखास दरकूच गेलों. पांचशें गोऱ्यांची तलब तनखा वरचेवर तुह्मीं पाठवीत जावी. व तेथील लिहिल्यान्वयें वजिरांनीं पांचशें घोडे व तीनशें हत्ती दरबारदारीस तयार केले आहेत. दों चौ रोजां त्वरेनेंच मंदराजास रवाना होणार. सेवेसीं श्रुत होय. तैमूरशहाकडील सादुल्लाखां एलची व येथून तैमाचबेग, छ० ६ तारखेस पातशाहाचा निरोप घेऊन आग्र्याचे मार्गानें दरकूच राजश्री पाटीलबावांचे लष्करास गेले. येथून शाहा निजामुद्दीन यांनीं सार्शे रुपये एलची मजकुरास व शंभर रुपये तैमाचबेगांस खर्चास देऊन रवाना केले. सेवेसीं श्रुत होय. कर्मासिंग वगैरे डलेवाले शीख दहा बारा हजार जमा होऊन, अंतरवेद प्रांतीं येऊन, कोल वगैरे दोन तीन महाल ताख्ततराज करून माघारें सहारणपूरचे रुखास हापडचे नजीक आले. लुटींत लाखो रुपयांची नख्ती वगैरे सरंजाम बहुत सांपडला. आपले देशांत पोंहचून पुनः इकडे यावें ऐसा विचार आहे. देवजी गवळी व बहिरोजीपंत, बापुजी मल्हार वगैरे आठ हजार फौजेनिशीं शिखांचे मुकाबल्यास सहारणपुराहून दोन मजली अलीकडे आले आहेत. व हातरसाहून खंडोजी शिंदे दोन अडीच हजार फौजेनिशीं दरकूच सिकंदऱ्यास दाखल जाले, ह्मणून शिखांनीं ऐकोन अंतर्वेद प्रांतीं तहशील रखीची केली व कितेक महाल लुटले. त्यांत लाखों रुपये मालियत सांपडली.

यास्तव लौकरच पत्त्याल्याकडे कूच करून जाणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. नजबकुलीखान फौजेसुद्धां रेवाडीस मुक्काम करून आहे. गोकुळगडास मोर्चे कायम केले. किल्ल्यांत रसद पावत नाहीं, यास्तव किल्ल्याचे लोक हिरासा होऊन उठोन गेले. हजार बारांशें मोगल राहिले आहेत. गुलाबसिंग वगैरे जमीदार पांचशें लोकांनिशीं आहे. लढाई तोफगोळ्यांची होते, परंतु मार्गांत निर्वाह नाहीं. चहूंकडे जमीदारांनीं दुंडी केली आहे. फौजा इकडे आल्यावर गोकुळगड सहजांत हस्तगत होईल. सेवेसीं श्रुत होय. तैमूरशहाकडील रुक्कम पत्र राजश्री पाटीलबावांस आलें आहे. त्याची नकल सेवेसीं पाठविली आहे. त्यावरून सविस्तर वृत्त श्रुत होईल.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक २२.

पै॥ छ० २६ साबान सन इहिदे तिसैन अधीक.

श्री.

११ मे १७९०.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २६ माहे साबान मुक्काम लष्कर नजीक श्री मथुरा जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं विनंतिपत्रें छ० ३ माहे मजकुराचीं सेवेसीं पाठविलीं आहेत, तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जहालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरीः– त्रिवर्ग सरदार मुक्काम मजकुरीं छावणींत आहेत. नबाब अलीबहादर यांजकडील पांच हजार फौज व राजश्री बळवंतराव सदाशिव असवलकर यांची रवानगी छ० २४ तारखेस रेवाडीचे रुखास जाली. दों चौ रोजां कूच करून जाणार. राजश्री आंबोजी इंगळे व रामसेवक दिवाण यांजकडील पांच हजार फौजेनसीं जाल्यास मिर्जाचे गीर्द दहा कोसांवर आहेत. नित्य करोलीची लढाई परस्परें होते. राव मजकूर अलवरचे किल्ल्यांत आहे. राजश्री जिवबा बक्षी वगैरे फौजा तिकडे पावल्यावर मशारनिल्हेही सामील होणार. नजबकुलीखान दोनहजार फौजेनसीं इंगळे मजकुरांपाशीं येणार आहे. मिर्जाचे मुलकाचीं ठाणीं आठ सात महालांचीं घेतलीं. दिल्लीहून पातशाहाचा शुका व शाहाजीचें पत्र राजश्री पाटीलबावांस आलें. मजकूर कीं, अहसनबख्त शहाजादा मिर्जाजवळ पावला. राजे बिजेसिंग व राजे प्रतापसिंग यांचा विचार आहे कीं, शहाजादे मजकुरास सलतनत देऊन इकडे यावें. त्यास,

हे गोष्ट त्याजकडून घडणें ठीक नाहीं. येविशीं आपली सलाह काय आहे व अकबरशाहास पातशाहा करावयाची मर्जी असली तरी उत्तम आहे. इकडील गुंता नाहीं. याप्रमाणें पत्रें व शुका आला. त्यास येथून अद्यापि स्पष्ट उत्तर गेलें नाहीं. रंजीतसिंग जाट भर्तपूरकर याजकडील ठाणें भुसावरचें, जैपुरकराचे लोकांनीं घेतलें ह्मणून येथें पत्रें आलीं. त्यावरून यांनीं लिहिलें कीं, तुह्मीं फौज जमा करून त्यांचे रुखांवर पाठवावी. येथूनही फौज तुह्मांकडे रवाना करितों. सावध राहून तिकडील बंदोबस्त राखणें. याप्रमाणें राजश्री पाटीलबावांचीं पत्रें गेलीं आहेत. तैमुरशाहा बदस्तूर विलायतेस आहे. वकील अद्यापि येथें आला नाहीं. आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणी-पत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत, त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक २३.

श्री. २६ मे १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:-देवजी गवळी व बापू मल्हार वगैरे फौजसुद्धां सोनपत नजीक मु॥ करून आहेत. मौजे खेवडा वगैरे दोन चार गांव गवळीमजकुरासीं फिरोन राहिले होते. त्यावरून यांनीं मौजे मजकुरास ताख्तताराज केलें. पन्नास हजारांची मालियत तेथें सांपडली. वगैरे गांवाचा मामला खातरखा जाला. नानूमलाचा पुत्र राजश्री पाटीलबावांचे स्वारीबरोबर आहे. त्यानें शिखांचे मसलतीचा जिम्मा आपला करून निरोप घेतला. त्यास मशारनिल्हे गवळी-मजकुराकडे येऊन फौजसुद्धां सिखांवर मोहिम करणार ऐसा बेत आहे. साहेबसिंग पटियालेकर यांसीं डल्लेवाले शिखांचा परस्परें बिगाड जाला. आपसांत गांव लुटतात. ह्मणून साहेबसिंगाचें पत्र राजश्री पाटीलबावांचे नांवें आलें आहे. येथून काय ठैरेल तें प्रत्यास आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २४.

श्री. २९ मे १७९०.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, मिर्जा अहसनबख्त शहाजादे, नबाब गाजुद्दीखानासीं बेदिल

होऊन विलायतचे रुखास गेले. मार्गांत बखतावरखां लटीचे मुलकाचा सुभेदार यानें आपली कन्या मिर्जास दिल्ही. लग्न करून काबिलास रवाना केलें. शहांनीं शहाजाद्याचें वृत्त श्रवण करून, तिकडील सुभेदार वगैरे कमाविसदार मार्गांत आहेत त्यांस पत्रें पाठविलीं कीं, शहाजादे मजकुरास सांभाळून येथें पावते करावें. त्यास, दरकूच विलायत नजीक बारा कोंसांवर दाखल जाले. तैमूरशाहाची भेट एक दों रोजांत जाली असेल. राजश्री पाटीलबावांचे लष्करांत महागाई फार जाली आहे. तीन शेर अन्न रुपयास मिळत नाहीं ! ऐसी अवस्था आहे. चहूंकडील रसद बंद जाली आहे. घोडीं उंटें वगैरे बहुत जाया जालीं. ह्मणोन राजश्री शिवाजी विठ्ठल यांचें बोलणें जालें कीं, येथून लौकर कूच करावें. यांत लोकांची स्थिति रहाते. याप्रमाणें बोलणें जालें. पुढें अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५.

पै॥ छ० २५ सवाल इहिदे तिसैन **श्री.** २९ मे १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ० १४ माहे रमजान मुक्काम लष्कर नजीक श्री मथुरा जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं विनंति-पत्रें छ० २६ साबानचीं सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जहालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तर, मिर्जा इस्मालबेग छ० २८ साबांनीं नारनोलाहून कूच करून वीस कोस माघारा पाटणास गेला. तेथें चहूंकडून पहाड व घांट आहेत ह्मणून त्या ठिकाणीं मुक्काम करून आहे. शोभाराम भंडारी व शहामल वगैरे जोधपुराकडील फौज व सुखलाल हरदीया पांच हजार फौजेनसीं जैपूरवाल्याकडून येऊन मिर्जाचे समीप मुक्काम करून आहेत. मिर्जा मजकुराचा कंपू पूर्वीं फितुरांत होता. त्यास राठोराकडील सरदारांनीं कंपूचे खर्चाची जिमा आपला करून समजोन ठेविलें आहेत. मिर्जाचें भाषण बहुत सख्त, ह्मणून मोगले वगैरे सर्व लोक बेदिल होऊन राहिले आहेत. अद्यापि चित्तशुद्धता आपसांत नाहीं. रावराजा माचेडीवाला त्याचे विद्यमानें खुफिया जाबसाल इकडे लागला आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवबा बक्षी, आंबोजी इंगळे, काशीराव होळकर, रावराजा, नजबकुलीखान आदि-करून, डिभाई कंपूसुद्धां सर्व एकत्र होऊन, पाटणाहून दोन कोस अलीकडे नदीवर

मुक्काम करून आहेत. मिर्जाचे फौजेसीं ती कोसांची तफावत राहिली आहे. छ० ८ माहे मजकुरीं मिर्जा व राठोर स्वार होऊन लढाईस आले. त्यावरून डिभाई फिरंगी कंपूसुद्धां व जिवबा बक्षी वगैरे फौजा तयार होऊन मिर्जाचे मुकाबल्यास गेल्या. दोन प्रहर पावेतों परस्परें लढाई जहाली. डिभाईमजकूर यानें पेशकदमी करून तोफखान्याचा मार दिल्हा. त्यावरून मिर्जा घांट सोडून एक कोंस माघारे हटून गेला. दोनशें लोक त्याजकडील ठार जाले. व दोन कुमेदान व हेमराजसिंग व राठोराकडील जमादार जखमी जाले. तों संध्याकाळ जाल्यावर डिभाई वगैरे फौजा माघारें येऊन डेरेदाखल जाल्या. हल्लीं जैपुराहून गंगाराम भंडारी वगैरे पांच हजार फौजेनसीं मिर्जापाशीं एका दों रोजीं येऊन शामील होणार. जोधपूरकराकडील आणिक फौज येणार ह्मणून आंवाई आहे. मिर्जाचे खर्चास कराराप्रमाणें पावत नाहीं, यास्तव राठोरांत कजियाचा प्रारंभ आहे. जैपूरकराकडील राजाराम वकील नवाब अलीबहाद्दर यांचे छावणींत आहे. जोधपूरकरांकडील वकील येथें येणार आहे. तो आल्यावर काय जाबसाल ठरेल तें प्रत्यास आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. सीख बदस्तूर कर्नाल प्रांतीं आहेत. नवाब वजीर लखनऊस स्वस्थ मुक्काम करून आहेत. त्रिवर्ग सरदार छावणींत आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिलें आहे. त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विज्ञापना."

लेखांक २६.

श्री. मे १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—

मिर्जा अहसनबख्त शहाजादा पूर्वीं दिल्लीहून निघून गोकुळगडास आला होता. त्यास मिर्जा इस्मालबेगांनीं मुनीयमबेग व मुरादबेग वगैरे सरदार व फौज पाठवून शहाजाद्यास नेलें, व मिर्जा मजकूर पांच कोस सामोरे येऊन बहुत जिलोहानें, शाहाजाद्याचे खवासींत बसोन, नारनोलास दाखल जाल्यावर तोफखान्याची सलख केली. नंतर पांच मोहोरा मिर्जांनीं नजर केल्या. व वरकड लोकांनीं व सरदारांनीं माफक मरातीबही नजरा केल्या. उपरांत राजे बिजेसिंग व राजे प्रतापसिंग यांस मिर्जांनीं पत्रें लिहिलीं कीं, आपले लिहिल्यान्वयें शाहाजाद्यास येथें आणिलें आहे. त्यास छत्राची व जीलोहाची तयारी जलदीनें

करून पाठवावी, व खर्चास पाठवावें. लढाईचा प्रसंग आला. या वेळेस फौज बेदिल असल्यानें मसलत सिद्धीस जाणार नाहीं. याप्रमाणें पत्रें लिहिलीं होतीं. त्यास उभैता राजांचीं आरंभीं शहाजाद्यास व मिर्जास पत्रें आलीं कीं, मागाहून लिहिलीयाप्रमाणें सर्व तयार करून खर्चासुद्धां पाठवितों. तुह्मीं सावध राहणें. याप्रमाणें पत्रें वरचेवर येतात. परंतु खर्चास आलें नाहीं. तेथून खर्चास आल्यावर मिर्जाचे कुचाची तयारी आहे. सेवेसीं श्रुत होय.

मिर्जा इस्मालबेगाचे फौजेंत दरयावसिंग व बलीसिंग वगैरे पलटणेचे लोकांनीं तलबेकरितां गवगवा करून फितुर केला, व राजश्री आंबोजी इंगळे व रावराजा माचेडीकर यांचे विद्यमानें राजश्री पाटीलबावांकडे सूत्र लाविलें कीं, दोन लाख रुपये आपण दिधल्यास आह्मी पलटणांसुद्धां उठोन येतों. त्यावरून यांनीं पंचवीस हजार रुपये नख्त इंगळे मजकुराकडे पाठविले. हें वृत्त मिर्जानीं श्रवण करून आत्माराम व सोभामल वकील जोधपूर जैपुराकडील, यांस बोलावून सांगितलें कीं, तुह्मीं जाऊन पलटणचे लोकांची समजोत करावी. नाहीं तर फितूर जाल्यानें सर्व इकडील उठोन जाईल. मसलत आखर होईल. त्यावरून वकीलमजकूर पलटणचे सरदारांपाशीं जाऊन, बोलणें करून, दोन लक्ष रुपयांचा जिम्मा आपला केला. पैकीं लाख रुपये पंध्रा रोजांत भरून द्यावे; बाकी लक्ष रुपये लढाई जाल्यावर देऊं; याप्रमाणें जाबसाल ठैरावून मिर्जाकडे येऊन सांगितलें व मिर्जासीं वचन घेतलें कीं, कोणांसीं सख्त भाषण बोलूं नये. याप्रमाणें ठैरलें. जोधपुराकडील फौजेची मार्गप्रतीक्षा आहे. त्यास फौज व खर्चास आल्यावर रेवाडीचे रुखास कूच करून येणार. पलटणवाल्यास मिर्जाचा विश्वास पुरत नाहीं. सर्व बेदिल आहेत. श्रुत होय.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

पै॥ छ० १० जिल्हेज

लेखांक २७.

इहिदे तिसैन श्रावण. **श्री** १० जुलई १७९०.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ५ माहे जिलकाद मुक्काम लष्कर नजीक श्री मथुरा जाणून स्वानंदलेखानाज्ञा केली पाहिजे. विशेषः- पेशजीं विनंतिपत्रें छ० १० सव्वालचीं सेवेसीं पाठविलीं आहेत. तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जहालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरीः- नजबकुलीखान

यांस कानोड वगैरे मुलूख वसुली सात लक्षांचा देऊन, सांप्रत लावून ठेवावें ह्मणून, राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस येथील पत्रें गेलीं आहेत. रावराजानें वकील राजश्री पाटीलबावांकडे पाठविला आहे. व पत्रें वरचेवर येतात कीं, माझे शरिरास समाधान नाहीं ह्मणून येणें घडत नाहीं. याप्रमाणें जाहीरदारी पत्रें मात्र येतात. परंतु परस्परें चित्तशुद्धता नाहीं. रामसेवक दिवाण मशारनिल्हे-कडील दोन हजार लोकांनिशीं सडी फौजेबरोबर आहे. पालमर साहेब आग्र्यांत छावणी करून आहे. येथील बोलावणें गेलें होतें. त्यांस मशारनिल्हेंनीं पत्रोत्तरीं लिहिलें कीं, फरुक्काबादेहून इंग्रेज दोन चार साहेब येथें येणार आहेत, ते आल्यावर सत्वरच येतों. त्रिवर्ग सरदार छावणींत आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक २८.

श्री. २२ जुलई १७९०.

" पुरवणी राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:—

मिर्जा इस्मालबेग चौदा स्वारांनिशीं पळोन छ० ९ सव्वालचे तारखेस जैपुरांत दाखल जाला. सोभाराम भंडारी वगैरे राठोराकडील फौज हिरासा होऊन सांबरपावेतों गेले. गंगाराम भंडारीचा शोध नव्हता. त्यास तिसऱ्या दिवशीं मशारनिल्हे फौजेंत पावला. राजे बिजेसिंगानीं लढाई सिकस्त जाल्याचें वृत्त श्रवण करून, गंगाराम भंडारी वगैरे लोकांवर बहुत इतराजी करून जीवें मारावें ह्मणून परवानगी केल्यावर, राणीनें रदबदली करून, तकसीर माफ करविली, नंतर राजे मजकुरांनीं मिर्जा इस्मालबेगास खातरजमेचीं पत्रें पाठविलीं कीं, तुह्मीं फौजेची निगादास्त करून फौज जमा करावी. येथें जालिमसिंग व भीमसिंग बक्षी यांजबरोबर वीस हजार फौज जंगी देऊन रवाना केले आहेत. लौकरच पावतील. त्यास जालीमसिंगानीं दोन कूच जोधपुराहून जैपुरचे रुखास केले, ह्मणून वदंता आहे. जैपूरकर राजे व दौलतराम यांनीं फौजेची निगादास्त जारी केली आहे, परंतु खर्चाची सरबरा होत नाहीं. यास्तव मिर्जा वगैरे सर्व बेदिल होऊन जोधपुराकडील फौजेची मार्गप्रतीक्षा करितात व

तिकडे जावें ऐसाही बेत मिर्जाचा आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं.

जैपुरकराचें मानस आहे कीं, राजश्री पाटीलबावांसीं सलूख करून, मामला नवाब अलीबहाद्दर यांचे विद्यमानें करावा; परंतु जोधपुरकराचे चित्तांत एकरूप मामला न करावा. एक दोन लढाई जालीयावर मग होणें तें होईल. जैपुरवाल्याचें अंतस्थ बोलणें, राजश्री शिवाजी विठ्ठल यांचे विद्यमानें इकडे लागलें आहे. परंतु राजश्री पाटीलबावांचें मानस आहे कीं, दाबानें मामला घ्यावा. याप्रमाणें जाबसाल आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

मिर्जा अहसनबख्त शहाजादा दरकूच जोधपुरास दाखल जाला. राजे बिजेसिंग चार कोस सामोरे येऊन त्यास घेऊन गेले. व बहुत सन्मान करून हत्ती, घोडा, जवाहीर वगैरे सरंजाम नजर केला. व पांच हजार रुपये तूर्त खर्चास नेमून दिल्हे. व शहरांत जागा देऊन ठेविले आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं.

रावराजे प्रतापसिंग माचेडीवाला लढाई फत्ते जालीयावर दुसऱ्या रोजीं अलवरास कूच करून गेला, ह्मणून राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं राजश्री पाटीलबावांस लिहिलें; त्यावरून येथून पत्रें मशारनिल्हेस गेलीं होतीं कीं, तुह्मीं एक वेळां येथें होऊन जावें. त्यास त्यांनीं उत्तर लिहिलें कीं, शरीरीं समाधान नाहीं. याप्रमाणें वृत्त आहे.

बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक २९.

श्री. जुलई १७९०.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—

मिर्जा इस्मालबेग व राठोर यांची लढाई शिकस्त जाली. तेव्हां लूट चहूंकडे आली. ते शोध करून घेतली. येणेंप्रमाणें सवाशें तोफांपैकीं एकशें पांच पाटीलबावांकडे व वीस काशीराव होळकर यांजकडे आल्या. व आठ हजार चकमकी बंदुखा, तेराशें उंट, तीनशें घोडे. एकवीस हत्तींपैकीं, राजश्री पाटीलबावांकडे पंध्रा, व राजश्री शिवाजी विठ्ठल यांजकडे तीन, आंबारी सरंजामासुद्धां, व किरकोळीं तीन, एकूण एकवीस हत्ती. येणेंप्रमाणें यादी सडे फौजेहून आली आहे.

त्यास लष्करांतून सवीसशें बंदुका व नंवद तोफा, हत्ती वगैरे सरंजाम येथें दाखल जाला. नंवद तोफांपैकीं कांहीं तोफा कृष्णगडांत आहेत व पंध्रा तोफा डिभाईनें निवडून आपले कंपूत ठेविल्या आहेत. सेवेसीं श्रुत होय. डिभाईवर दक्षणी फौजेचा डौंश आहे. ह्मणून तोही भयभीत राहतो.

मिर्जा अहसनबख्त शाहाजादा पूर्वीं जोधपुरास गेले होते, तेथें राजे बिजेसिंगांनीं चार दिवस शिष्टाचार करून ठेविलें. नंतर खर्चाची नेमणूक आजमेरचे सुभेदारावर केली. त्यास तेथून ऐवजाची सरबरा न होय, व खर्चाची आबाल फार जाली, सबब मिर्जा उदास होऊन तैमुरशाहाकडे उठोन गेला ह्मणून श्रवणांत आलें आहे. सेवेसीं श्रुत होय. राजश्री लक्ष्मणराव हरी बदस्तुर बुंदेलखंड प्रांतीं श्रीनगर पलीकडे आहेत. पठाणाचे गढीवर चढून गेले. तेथें पठाणांनीं जमाव करून लढाईची तयारी केली. ह्मणून मसलत पडली आहे. व येथेंही पत्रें लिहिलीं आहेत. नोने अर्जुनसिंगाकडील दीक्षित नामें कारभारी येथें आला आहे. राजश्री पाटीलबावांची भेट जाली. पुढें काय जाबसाल ठैरोन अमलांत येइल तें विनंति लिहूं."

बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ३०.

श्री. आगस्ट १७९०.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं विनंति ऐसीजेः—

शीख बदस्तूर पव्याल्याकडे आहेत. सहारणपूर अंतर्वेद प्रांतीं पांच चारशें स्वार डह्लेवाले शिखांकडील येऊन उपद्रव करितात. भंभोखान, गुलामाचा बंधू, जैपूरकर राजाजवळ आहे. परंतु विशेष थाप व अब्रू त्याची नाहीं. शिखांकडे सूत्र लाविलें आहे. सिद्धीस जावें ऐसें नाहीं. सहारणपूर, गोसगड वगैरे जागा रामदयाल गुजराकडे बदस्तूर बहाल आहे. राजश्री रवळोजी शिंदे यांजकडे तिकडील काम सांगावें, ऐसा विचार येथील आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति.

नवाब अलीबहादर यांचा जाबसाल पूर्वीं ठरण्यांत आला होता. त्याप्रमाणें हल्लीं दोन लक्ष रुपये नख्त देविले व रेवाडी वगैरे बारा लक्षांची जागा लाऊन द्यावी. त्याच्या सनदा तयार करून देतात. परंतु सर्व फौज राजश्री लाडोजी देशमुख शितोळे यांजबरोबर जैपुरास रवानगी करावी, याप्रमाणें बोलणें होऊन ऐवजाचा भरणा होतो. ऐवज पदरीं पडल्यावर काय विचार ठरोन अमलांत येईल तें विनंति लिहूं.

नजबकुलीखान यास जायदाद लावून दिली आहे. मशारनिल्हे व रामसेवक, रावराजाचा दिवाण, राजश्री गोपाळराव रघुनाथ यांजबरोबर आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

आग्र्याचे किल्ल्यांत आटक नामें तोफ मोठी होती. त्यास, तेथील कमाविसदारानें राजश्री पाटीलबावांची परवानगी घेऊन, तोफ गाळोन धातू वेगळी केली. त्यास पन्नास मण चांदी व दोन मण सोनें, साडे सातशें मण वगैरे धातू निघाली. त्याची यादी राजश्री पाटीलबावांनीं पाहून, नफर पैकर नामें दरवाज्याचे आंत मोठी तोफ आहे, तिलाही मोडून धातू काहाडून पाठवावें, याप्रमाणें ताकीद येथील जाली आहे. नवीन बिरंजी तोफा येथें तयार होतात. त्यास त्या तोफेचा किरकोळ मसाला नवीन तोफांत पाहोन आणिक लहान तोफखान्याची तयारी होते. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं.

रावराजे प्रतापसिंग माचेडीवाला यांस समाधान जालीयाचें वृत्त राजश्री पाटीलबावांनीं श्रवण करून, मशारनिल्हेस येथें बोलाविलें आहे. त्यांचींही पत्रें आलीं कीं, लौकरच येतों. रावमजकूर येथें दाखल जाल्यावर, येथील विचार आहे कीं, लाडोजी देशमुख यांजबरोबर समरूची पलटणा वगैरे फौज देऊन, रावमजकुरांसही जयपुराकडे रवाना करावें व आपला डेरा जैपूरचे रुखास करावा म्हणजे चहूंकडे आवाई होईल व दबाव पडेल. ऐसाही विचार आहे. रावमजकूर येथें आल्यावर काय ठरेल तें अमलांत आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं.
बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ३१.

श्री. आगस्ट १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. इस्मालबेग फौजेचा जमाव करून कानोडचे अलीकडे दहाबारा कोसांतर मुक्काम करून आहे. नजबकुलीखानासीं व मशारनिल्हेसीं एक लढाई जाली. त्यास कुलीमजकूरचे लोकांनीं शिकस्त खाऊन कानोडचे किल्ल्यांत नजबकुलीसहीत पळोन गेले. इस्मायलबेगाकडे दहा तोफा व हत्ती वगैरे नजबकुलीचे लुटीचा सरंजाम आला. इकडून राजश्री पाटीलबावांचीं पत्रें वरचेवर खातरजमेचीं मशारनिल्हेस जातात व बारुद गोळा दिल्लीहून राजश्री रवळोजी

शिंदे वरचेवर पाठवितात. व राव राजाकडून नजबकुलीची कुमक होत असते. राजश्री पाटीलबावांनीं दोघांस आपसांत भिडविलें आहे. यांजपैकीं राहेल त्याचें पारपत्य इकडून घडेल. ऐसा विचार केला आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ३२.

श्री. आगस्ट १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- राजश्री सुभेदार टोकतोळ्याचे गीर्द आले आहेत. पेंढारे जयपूरवाल्याचे प्रांतांत कजाकी करून मुलूख बेचिराग करितात. राजश्री पाटीलबावांस मशारनिल्हेचीं पत्रें आलीं आहेत कीं, आह्मी सत्वरच येऊन पोंहचतों. येथूनहीं पत्रोत्तरें गेलीं आहेत. त्यास, येथें आल्यावर परस्परें उभयतां सरदारांच्या भेटी होऊन काय विचार ठरेल तें विनंति लिहूं. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ३३.

श्री. आगष्ट १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:- राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवबा बक्षी व काशीराव होळकर, डिभाईचा कंपू वगैरे सर्व फौजा, दरकूच सेखावटीचा मामला कचेहलीवाले वगैरे सेखावट यांचा तीन लक्ष रुपये रामसेवक दिवाण याचे विद्यमानें ठरोन मशारनिल्हेस वस्त्रें दिलीं. व दरकूच मंगरोल सांभराहून दोन तीन कोस पुढें गेले. सांभरचे शहरांत वगैरे आपला अंमल दखल केला. जोधपुराकडील गंगाराम भंडारी वगैरे पांच सात हजार राठोर सांभरांत होते, ते इकडील फौजेची आवाई ऐकोन, हिरासा होऊन, अगोदर कूच करून जोधपुराकडे गेले. जैपूरचे गीर्दचे जमीदार व ठाकूर वगैरे सर्व रुजू जाले, व मामला द्यावयास राजी आहेत. रामसेवक याचे विद्यमानें कछवाय जमीदार याचें बोलणें लागलें आहे. पूर्वीं सर्व जमीदार व ठाकूर सेखावट वगैरे यांनीं राजे प्रतापसिंग जैपूरकर यांस पत्रें पाठविलीं होतीं कीं, आपण खांसा स्वारी बाहेर निघोन करावी; ह्मणजे आह्मीं सर्व ताबेदारींत हजर आहों. कदाचित् दौलतराम व

मिर्जा इस्मालबेग यांजबरोबर तैनातीस पाठवाल, तरी आह्मांस कबूल नाहीं. आमच्या मुलकांत फौजा येऊन पोहचल्या; आपण स्वस्थ जैपूरचे शहरपनाची तयारींत आहांत. त्या अर्थीं आह्मीं आपली जागा उजाड करावी तरी दुसरी उपजीविका नाहीं. यास्तव मामला कबूल करून आपली जागा आबाद ठेवितों. त्यावरून राजांनीं पत्रोत्तरें लिहिलीं कीं, लौकर फौज कुमकेस पाठवितों. अखेर कांहीं अमलांत न आलें. इकडील दहशत गालीब ह्मणून, सर्व रुजू होऊन मामला देतात. जैपूरकरांनीं मिर्जा इस्मालबेगाचें फौजेची हाजरी घेतली. त्यास आठ नऊ हजार स्वार प्यादगान मिळोन हाजरींत आले. दौलतराम वगैरे पांच चार हजार फौज राजाकडील मिर्जास सामील होऊन डेरा बाहेर केला आहे. बारा तेरा हजार सर्व फौज मिर्जासुद्धां जैपुराहून तीन कोसांवर शहरची निगाबाजी मात्र करितात. व शहरांत रयतीशीं घरोघर दांड लाविला आहे. मिर्जास लाख रुपये दरमहा तुरुत नेमून दिला आहे व कुटुंब शहरांत ठेविलें आहे. परंतु ऐवजाची सरबरा लौकर होत नाहीं, यास्तव मिर्जा उदास आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति. "

लेखांक ३४.

पै॥ छ० २७ मोहरम **श्री.** आगस्ट १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:–नवाब वजीर लखनऊस स्वस्थ आहेत. पालमर साहेबांचीं पत्रें आग्र्याहून राजश्री पाटीलबावांस आलीं होतीं कीं, आपण कूच केला. आह्मांस लिहाल त्या अन्वयें करूं. त्यावरून यांनीं उत्तर पाठविलें कीं, तुह्मीं स्वार होऊन येथें येणें. भेट जाल्यावर सांगूं. त्यास, मशारनिले येणार आहेत. राजश्री पाटीलबावा छावणीहून ती कोसांवर डीगच्या रुखास शांतनवकुंडावर मुक्काम करून आहेत. बारावे तारखेपावेतों तेथेंच मुक्काम आहे. नंतर कूच व्हावें ऐसी वार्ता आहे. राजश्री अलीबहादर बाबा व सुभेदार छावणींतच आहेत. तैमूरशहाकडील वकील लाहोरपावेतों आला ह्मणून वदंता आहे. अगोदर पातशाहाकडे दिल्लीस येऊन मग इकडे येणार. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ३५.

छ० २७ मोहरम **श्री.** आगस्ट १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:— कर्मसिंग व भंगेलसिंग वगैरे डलेवाले शीख यांजकडील वकील येथें आले आहेत. राजश्री आबा चिटणीसांचे विद्यमानें राजश्री पाटील-बावांची भेट घेऊन, तोफा तायफ, कमाना वगैरे सरंजाम आणिला होता, तो नजर केला. नंतर जाबसाल केला कीं, पूर्वींपासोन आमची रखी चालत आली आहे, याप्रमाणें आपणही बहाल करून द्यावी. अथवा मुलूख जायदादेंत लावून द्यावा. ह्मणजे आह्मी सर्व आपले ताबेदारींत हजीर आहों. कर्नाल वगैरे सहारणपूर प्रांत आहे, याचा बंदोबस्त यथास्थित राहील. त्यास, सांप्रत यांस मसलतीचा प्रसंग, यास्तव तूर्त वकिलास उमेद्वार करून लाऊन ठेविलें आहे. व सहारणपूर अंतर्वेद प्रांतचे बंदोबस्तास राजश्री रवळोजी शिंदे यांजबरोबर पांच हजार फौज देऊन रवानगी करणार आहेत. अंतर्वेद प्रांतीं मवासांनीं बहुत उपद्रव केला, ह्मणून लौकरच मशारनिल्हे जातील. राजश्री बापूजी मल्हार व देवजी गवळी, कर्नाल प्रांतीं मुक्काम करून आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ३६.

श्री. आगस्ट इ. स. १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजे बिजेसिंगांनीं मिर्जा इस्मालबेग यास ती लक्षांची जायदाद सरहिंद वगैरे महाल लाऊन दिल्हे आहेत. त्यास तेथील बंदोबस्तास दरकूच गेले. परंतु जमीदार व रांगडे यांनीं मिर्जाची आवाई श्रवण करून, चहूंकडील घाटे व रसद बंद केली. याजमुळें मिर्जाकडील लोक बहोत उठोन गेले. पांच हजार स्वार प्याद्यांची जमात मिर्जाबरोबर आहे. मुनियमबेग मिर्जाकडून गोकुळगडांत होता. हल्ली राजश्री गोपाळराव रघुनाथ वगैरे फौजेची आवाई ऐकोन, गडमजकूर खालीं करून दिल्हा. राजश्री पाटील-बावांकडील लोक छ १५ तारखेस गडांत दाखल होऊन तेथील बंदोबस्त केला. नंतर मुनियमबेग यांस घेऊन कैद करून ठेविलें आहे. बावीस तोफा वगैरे किरकोळी सरंजाम जप्तींत आले आहे. नजबकुलीखान यांनीं मुनियमबेगासीं

साजीश करून मसलतीस इतके दिवस लाविले. सबब राजश्री पाटीलबावांची बेमर्जी आहे. यास्तव कुलीमजकूर हिरासा होऊन कानोडास उठोन गेला. याप्रमाणें वृत्त आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

पै॥ छ० २५ मोहरम इहिदे तिसैन भाद्रपद.

लेखांक ३७.

श्री.

४ सप्टेंबर १७९०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ० २३ माहे जिल्हेज मुक्काम लष्कर नजीक श्री मथुरापुरी येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:– इकडील वर्तमान पेशजीं छ० २६ जिलकादचीं विनंतिपत्रें पाठविलीं तीं पावून सविस्तर ध्यानारूढ जालेंच असेल. अलीकडे सडी फौज राजश्री गोपाळराव रघुनाथ चिटणीस व जिवबा बक्षी व काशीराव होळकर वगैरे सरदार यांनीं जैपूरचा रोंख सोडून, जोधपूरचे मुलकांत रूपनगरचा किल्ला व शहर अंमल दखल करून, पर्वतसरचा किल्ला खालीं करून घेऊन, सांभर वगैरे जागा घेतली. ठाणीं जिकडील तिकडे पाटीलबावांकडील कायम जालीं. नंतर अजमेरीस दरकूच जाऊन सडे स्वारीनिशीं शहर घेतलें. किल्ल्यास मोर्चे चहूंकडून घेरून बसले आहेत. अजमेरीचे किल्ल्यानजीक पाण्याची विहीर आहे, ते आपले काबूंत करून घेतली. किल्ल्याचे लोकांचें बोलणें लागलें आहे कीं, वस्तभाव हत्यार सुद्धां निघून जाऊं द्यावें. इकडील सरदारांनीं ऐकिलें नाहीं. राजश्री पाटीलबावांस लिहिलें आलें आहे. त्याचें उत्तरही इकडून गेलें आहे कीं, किल्ला खालीं करून घ्यावा. गोळीची लढाई होत आहे. प्रत्यास येईल तें विनंति मागाहून लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ३८.

छ० २५ मोहरम

श्री.

सप्टेंबर १७९०.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना ऐसीजे:– जोधपूरकर व जैपूरकर राजे यांचे फौजेचा जमाव होऊन अजमेरीचे मोर्चे उठवावयास जाणार. यास्तव राजश्री पाटीलबावांनीं छ १६

मिनहूस आपण डेरादाखल जाले. जन्मअष्टमीचा उत्साह याजकरितां आठ दहा दिवस मुक्काम जाले. त्रयोदशीस कूच करून पुढें जाणार. जोधपुराहून राजे बिजेसिंग यांनीं वकील पाठविले. त्यांनीं जैपुरास येऊन इकडील जाबसाला-विषयीं राजासीं पकायत करून भरतपुरास आले. रंजितसिंग जाटास भेटून राजश्री पाटीलबावांस पत्रें लिहिलीं. त्याचें उत्तर पाठविलें कीं, तुह्मांस आह्मांसीं सलूख करणेंच आहे, तर अजमीर खालीं करून, ठाणें राजश्री गोपाळ रघुनाथ यांचे स्वाधीन करून, त्यांचें पत्र आणावें; मग तुह्मांसीं बोलणें तें बोलू. तोंपावेतों आह्मांकडे यावयाचें प्रयोजन नाहीं. याच अन्वयें रंजितसिंगास पत्र गेलें. तेव्हां वकीलांनीं जाटास सांगितलें कीं, आह्मी येथपावेतों आलों, आणि भेटी न घेतां माघारें जावें, यांत ठीक नाहीं. यास्तव पाटीलबावांपाशीं जाऊन, भेटी घेऊन समक्ष बोलणें तें बोलून, आज्ञा करतील त्याप्रमाणें जाणें राहाणें तैसें करूं. ह्मणोन लष्कराकडे येत होते. हें वर्तमान पाटीलबावांस कळलें. तेव्हां शंभर स्वार पाठविले. आणि त्यास परिच्छिन्न सांगून पाठविलें कीं, तुह्मांस जाबसाल करणें तो रंजितसिंगाकडे करावा. येथें आल्यास कार्यास येणार नाहीं. तेव्हां माघारे फिरोन भरतपुरास गेले. त्यांनीं हें वर्तमान राजास लिहिलें आहे. प्रत्यास येईल ते विनंति मागाहून लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति.'

लेखांक ३९.

श्री. सप्टेंबर १७९७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विनंति ऐसीजेः– राजश्री गोपाळराव रघुनाथ मेरत्याहून चार कोस नागोरचे रुखास पुढें कूच करून गेले. राजश्री काशीराव व बळवंतराव वगैरे दोन्ही फौजा माघारे फिरल्यानें चहूंकडे आवाई जाली. राजेरजवाडे वगैरे दम खाऊन आहेत. जोधपूरवाल्याकडील वकील पूर्वीं आले आहेत. त्यांसीं मामल्याचा जाबसाल होतो. त्यावरून रावमजकुरांनीं राजश्री पाटीलबावांस लिहिलें होतें कीं, पन्नास लक्ष रुपये मामला देणें कबूल करितात. परंतु मेरत्यांत वगैरे पायमाली व दांड घेतला, तो पंचवीस लक्ष मजुरा मागतात. याप्रमाणें बोलणें आहे. त्यास येथून यांनीं लिहिलें कीं, अजमेर घेऊन मामला समयोचित सलाह ठरेल त्याप्रमाणें करून घेणें. त्यास हल्लीं आपसांत विरुद्धता जाली-याचें वृत्त समजल्यावर जोधपूरकराचें बोलणें आहे कीं, नवाब अलीबहादूर अथवा राजश्री सुभेदार यांचे विद्यमानें मामला ठरल्यास कबूल करूं. आह्मांस

तुह्मांकडील धीर पुरत नाहीं. याप्रमाणें बोलणें लागलें आहे. व डिभाई वगैरे फौज राजश्री पाटीलबावांकडील हिरासा होऊन तेथें आहेत. नबजकुलीखान व रामसेवक दिवाण रावराजाकडील सडे फौजेंत होते. तेही रावमजकूराचे लिहिलेप्रमाणें तेथून उठोन आले. जैपुरास जाले. राजे प्रतापसिंग यांनीं वकील पाठविला होता, त्यास सांप्रत जाहिरदारी करून, उभैतां रावराजाकडे माचेडीस गेले. रावमजकूरही यांसीं फिरून आहे. चित्तशुद्धता नाहीं. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ४०.

श्री. सप्टेंबर १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—

नवाब अलीबहाद्दर याजकडील फौज करोलीस गेली होती, त्यास बोलावणें पाठविलें आहे. ते फौज आल्यावर राजश्री सदाशिवपंत यांचे चिरंजीव दरकूच सडी फौजेंत जाऊन सामील होणार. राजश्री पाटीलबावांकडील येविसीं ताकीद आहे कीं, जोधपुराकडील जमाव भारी होतां, लढाई लौकर करावी. त्याचा जमाव भारी जालीयास मग कठीण आहे. यास्तव येथून फौज वरचेवर रवाना होत आहे. पुढें एक दों रोजां लढाईचा प्रसंग येईल तें विनंति लिहूं.

रंजीतसिंग जाट भर्तपूरकर याजकडील दोन हजार फौज व इकडील दोन हजार स्वार भुसावर प्रांतीं जाऊन, जैपुरकराचे रुखावरच मुक्काम करून आहेत. तिकडे मलक महमदखान वगैरे जैपूरवाल्याकडून फौजसुद्धां आपले शिवेवर पडले आहेत. सेवेसीं श्रुत होय.

राजश्री लक्ष्मणराव हरी बदस्तूर श्रीनगर महोव्या प्रांतीं आहेत. नोने अर्जुनसिंगाची खंडणी ठैरली होती. त्यास, मशारनिल्हे नख्त ऐवज देत नाहीं; भरणा देतो. ह्मणून रावमजकूर यांस येविशीं येथून ताकीद आहे कीं, लौकर ऐवजाचा फडशा करून घ्यावा व छत्रपुराकडे जाऊन खंडणी घ्यावी. याप्रमाणें पत्रें येथील वरचेवर जातात. तेथून पत्रोत्तर आल्यावर अमलांत येईल तें सेवेसीं श्रुत करुं. श्री अयोध्येस मूर्ति स्थापित होत्या, त्यास माघ शुद्ध एकादशीस मंदिराचे कुलूप न तुटतां, भिंती कायम असून, अकस्मात अदृश्य

जाल्या. दुसरे दिवशीं पुजारीस कळल्यावर बहुत श्रम करून शोध केला. परंतु कोठेंही ठिकाण न लागलें. ह्मणून नवी मूर्ति सोन्याची करून मंदिरांत स्थापित केल्या. सेवेसीं श्रुत होय."

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ४१.

श्री. सप्टेंबर १७९०.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

सेवेसीं ऐसीजे:-

नवाब अलीबहाद्दर यांचा जाबसाल राजश्री आपाजीराम दाभोळकरांचे विद्यमानें ठरण्यांत आलें आहे कीं, तूर्त दोन लक्ष रुपये नख्त घेऊन फौज जयपुराकडे रवाना करावी व रेवाडी वगैरे मुलूक बारा लक्षांचा लाऊन घ्यावा. याप्रमाणें राजश्री पाटीलबावांचें बोलणें होऊन सनदापत्रें तयार जाल्या आहेत. परंतु नवाब मशारनिल्हे यांचें मानस कीं, अगोदर नख्त ऐवज घेऊन, मग मुलुखाचा जाबसाल करावा. त्यास, येथील मर्जी आहे कीं, सनदा पत्रें व नख्त ऐवज एकदांच घेऊन फौज त्वरेनें रवाना करावी. याप्रमाणें वृत्त आहे. पुढें निदर्शनास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं.

राजश्री बापूजी मल्हार व समरूची बेगम पाणिपतनजीक छावणी करून आहेत. समरूची पलटणा चार यांचे बोलाविल्याप्रमाणें छात्या पावेतों आल्या आहेत. येथें दाखल जाल्यावर भुसावर प्रांतीं जैपूरचे रुखास रवाना करावें, ऐसा बेत ठरला आहे. सहारणपूर वगैरे प्रांत अद्यापि रामदयाल गुजराकडे आहे. परंतु खळोजी शिंदे यांजकडे सांगावें ऐसा जाबसाल आहे. मशारनिल्हेचा हिशेब फडशा जालीयावर तिकडे जाणार. सीख बदस्तूर जेथील तेथेंच आहेत. सेवेसीं श्रुत होय.

राजश्री गोपाळराव रघुनाथ व रा. जिवबा बक्षी, डिभाई फिरंगी, बापूजी होळकर वगैरे फौजा पाटणनजीक होत्या. त्यास मिर्जा व राठोर यांची शिकस्त जालीयावर पाटणास मोर्चे लाविले. त्यावरून तेथील राजानें रामसेवक, दिवाण रावराजाचा, याचे विद्यमानें साठ हजार रुपये मामला कबूल करून फडशा केला. नंतर लालजीमल दिल्लीकर साहुकार मिर्जापाशीं होता, तो व बलीसिंग मगनीसिंग वगैरे कुमेदान लढाई शिकस्त जाली ते वेळे पळोन पाटणांत राहिले होते,

त्यांस त्यांच्या स्वाधीन केलें; व चार तोफा वगैरे कांहीं सरंजाम किरकोळी शहरांत होता तो दरोबस्त यांजकडे दिल्हा. राजश्री पाटीलबावांचे लिहिल्यान्वयें पाटणाहून डिभाई वगैरे फौजेनें कूच करून, जैपूरचे रुखास दोन मजल येऊन, पिरागपुरानजीक मुक्काम करून आहेत. तेथून जयपूर पंचवीस कोस आहे. राजश्री लखबादादापांच हजार फौजेनशीं व राजश्री काशीराव होळकर यांजकडील दोन हजार फौज वगैरे दोन पलटणा सेखावट प्रांतीं कूच करून जाणार. राजश्री बळवंतराव सदाशिव अस्वलकर दोन हजार फौजेनसीं तेथेंच सामील आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ४२.

श्री. सप्टेंबर १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विज्ञापना ऐसीजेः— जैपूरकरानें यांजकडील लढाईचा मोड जाल्यावर इस्मालबेग शहरांत दाखल जाले. नंतर फौज पळून गेली होती ते, व कांहीं लुटली व जगले गेले, हे सर्व जमा जाले. त्यास राजांनीं थोडे बहुत खर्चास देऊन ठेविलें. सर्वांची खातरजमा केली. राजे प्रतापसिंग मिर्जाचे डेऱ्यास येऊन बहुता प्रकारचीं बोलणीं होऊन, खर्चास चाळीस हजार रुपये देविले. त्याजवरून मिर्जानीं सांभरचे रुखास आठा कोसांचा कूच केला. राजाकडील जमियत दौलतराम दिवाण याजबराबर मिर्जासमागमेंच आहेत. राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिऊबा बक्षी यांजकडेही मिर्जानीं सूत्र लाविलें आहे. निदर्शनास येईल तें विनंति मागाहून लिहूं. दौलतरामासमागमें फौज वीस हजाराचे आंत बागरूचा महाल जैपुराहून बारा कोस मुक्काम आहे. परंतु त्याचे फौजेंत ताकद राहिली नाहीं. तोंडानें गोष्टी सांगतात व मिर्जाचे कोणास विश्वास नाहीं. राजांनीं शहरांत दांड लाविला आहे. आपले फौजेसीं व राजाचे फौजेसीं सोळा कोसांचा मुफासला आहे. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. दिनचर्येच्या अखबारा व लखनऊच्या अखबारा हिंदवींत पाठविल्या आहेत. सेवेसीं प्रविष्ट होतील. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ४३.

छ० २५ मोहरम **श्री.** सप्टेंबर १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना ऐसीजे. नवाब अल्लीबहादूर यांजकडील जाबसाल ठरण्यांत आला कीं तूर्त दोन लक्ष रुपये नगद व रेवाडी प्रांत नव लक्षांचा मुलूख घ्यावा, आणि फौजेची रवानगी करावी म्हणून बोलण्यांत येऊन खुशालचंद सावकार यांजकडून दोन लक्ष रुपये नगद देविले, ते घेऊन राजश्री सदाशिवपंत दिवाणजी यांस रवाना केलें. ते राधाकुंडानजीक डेरादाखल आहेत. परंतु फौजेची समजूत या ऐवजांत होत नाहीं. लोक कोणी ऐकत नाहींत, यास्तव मुक्काम आहे. रेवाडी प्रांताच्या सनदा पाटीलबावांपाशींच आहेत. फौज रवाना जाल्यावर सनदा नबाबाकडे पाठवून द्याव्यासें आहे. निदर्शनास आल्यावर तपशीलवार विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा पाहिजे ही विनंति."

लेखांक ४४.

श्री. सप्टेंबर इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:— राजश्री सुभेदार यांनीं काशीराव व बापूजी होळकर यांस पत्रें पाठविलीं कीं, तुह्मीं तेथून उठून येणें, आणि येथें फौजेची निगादास्त केली. कांहीं लोक बेरोजगारी राजश्री पाटीलबावांकडील त्यांजकडे चाकरीस गेले. हें वृत्त यांनीं श्रवण करून, आपले लष्करांत बंदोबस्त केला. व मुकेरु साहेब फिरंगी यांस सांगितलें कीं, चहूंकडे माणसें पहारा पाळून बंदोबस्त राखणें. लष्करांतील शिलेदार अथवा कोणी मऱ्हाटा, सुभेदार व अल्लीबहादूर यांजकडे गेल्यास धरून आणावें. पारिपत्य केलें जाईल. याप्रमाणें सांगितल्यावर हल्लीं चहूंकडे चौकी पहारा निगाबानी लष्करांत आहे. राणेखान भाईनीं सांगितलें कीं, ऐसे बंदोबस्त केलियानें शिलेदार कोणी राहणार नाहीं. जर ऐशीच मर्जी आहे कीं कोणी न जावें, तरी शिबंदी वगैरे सर्वांस खर्चास देवावें; ह्मणजे सर्व राजी होऊन राहातील. त्यावरून राजश्री आबाजी नाईक वानवळे यांजकडून ऐवजाची तजवीज केली आहे. फौजेस खर्चास देऊन राजी राखावें ऐसा विचार आहे. राजश्री सुभेदारही उदास आहेत. अद्यापि छावणीहून कूच जाला नाहीं. हिंडोनचे रुखास नन्हेखान आरब कांहीं फौजेनशीं गेला होता. त्यासीं

जैपुरावाल्याकडील चत्रभुज नामें सरदार यासीं व यांजकडील लोकांशीं लढाई जाली. राजश्री सुभेदारांकडील लोकांची शिकस्त जाली. नन्हेखान वगैरे माघारे आले. यास्तव हल्लीं तिकडे फौज पाठवावयाची तजवीज आहे. राजश्री नारो गणेश यांजवर बहुत सख्ती आहे. व बापूजी होळकर वगैरे फौज सुभेदारांकडील सडे फौजेंतून निघोन पांच कोसांवर अलीकडे अजमीरचे रुखास आले आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ४५.

श्री. आक्टोबर १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—

नोने अर्जुनसिंग छत्रपुराकडील याचा मामला पावणे अक्रा लक्ष रुपयांवर ठैरला. पैकीं कांहीं नख्त व बाकींचा भरणा द्यावा. याप्रमाणें जाबसाल ठैरोन मशारनिल्हेस खिलत वस्त्रें, हत्ती, घोडा, जेगा, शिरपेंच येणेंप्रमाणें वकिलाजवळ दिल्हें. व राजश्री लक्ष्मणराव हरी यांस पत्रें लिहिलीं आहेत कीं, तुह्मीं व अर्जुनसिंग एकविचारें होऊन, छत्रपुराकडे जाऊन तिकडील मामला करून घ्यावा. या प्रमाणें राजश्री पाटीलबावांचीं पत्रें गेलीं आहेत. सेवेसीं श्रुत होत. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं.

राजश्री बापुजी मल्हार व देवजी गवळी वगैरे सात आठ हजार फौजेनिशीं कसबे बिडोलीचे घांटावर सहारणपुराहून आठां कोसांवर मुक्काम करून आहेत. कर्नालप्रांतीं शीख जमा होऊन उपद्रव करितात. ह्मणून राजश्री पाटीलबावांनीं रवळोजी शिंदे यांजबरोबर दोन हजार फौज देऊन सहारणपुराकडे पाठविलें आहे. लौकरच कूच करून जाणार. साहेबसिंग पत्यालेकर व नानूमल, भंगेलसिंग शीख इकडे राजश्री पाटीलबावांशीं सूत्र राखून आहेत. साहेबसिंगाचा मामला सा हजार रुपयांवर फडशा होऊन, ऐवजाची साहुकारी निशा जाली. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

पालमर साहेब आगऱ्यांत आहे. इंग्रेजास टिपूची मसलत प्राप्त जाली. यास्तव फिरंग्याचे कंपू इकडे कान्हपुरांत होते ते कलकत्त्यास गेले. व दोन कंपू दारानगराकडे आहेत, तेही कूच करून जाणार. कलकत्त्याहून मोठे साहेबानीं नवाब-

वजीर यांस पत्रें पाठविलीं आहेत कीं, आह्मांस टिपूकडील मसलत प्राप्त जाली. ह्मणून कंपू बोलाविले आहेत. त्यास, सांप्रत कांहीं फौज आपण चाकर ठेऊन मुल्काचा बंदोबस्त राखणें. त्यावरून नवाबांनीं मोठे साहेबांस पत्रें लिहिलीं आहेत. तेथून उत्तर आल्यावर प्रत्यास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं.

राजश्री गोपाळराव रघुनाथ चिटणीस व जिवबा बक्षी, डिभाई फिरंगीचा कंपू वगैरे फौजा रेवाडीस दाखल जाल्या. तेथील शहराचें ठाणें घेऊन गोकुळगडास मोर्चे कायम केले. व पुढें कूच कांटीचे घांटाकडे केला. नारगोळाशीं वीसां कोसांचा तफावत राहिला आहे. पेंढारी नित्य मिर्जाचे लष्करापावेतों कही मारून आणितात व तिकडीलही फौज यांचे गीर्द दौड करून जातात. राजश्री काशीबा होळकर व बाळोजी इंगळे रेवाडीहून पांच कोसांपुढें मुक्काम करून आहेत. लढाई रुबकार आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ४६.

श्री. २५ आक्टोबर १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- सरकारचा खलिता पातशाहास गुजराणून दिल्हा. व टिपूकडील वर्तमान साकल्य निवेदन केलें. त्यावरून आज्ञा केली कीं, राजश्री हरीपंततात्या समयास पावले ह्मणून इंग्रेजांचे पाय ठरले. पुढें सलूखाचा जाबसाल घडेलसें आहे. तिकडील बातमी वरचेवर आणवीत जावी. याप्रमाणें इरशाद करून खलिता वाचून बहुत श्रमी जाले. नंतर श्रीमंतांचे प्रतापाची वर्णना बहुत केली. अर्जीचे जाब विषयीं शाहाजीनीं विचारलें. त्यावरून मुनशीनीं सांगितलें कीं, मातमचे अर्जीचा शुका होत नाहीं. यास्तव खलित्याचा जाब दिला नाहीं. सेवेसीं श्रुत होय. लखनऊंतून फिरंगी आले. त्यांची मुलाजमत छ १६ तारिखेस हुजुरांत जाली. पांच पारचे खिलत यासुन साहेबास व दुमनेक साहेबास गोशवारा, निम अस्तिन्, दुशाला येणेप्रमाणें हुजुरांतून इनायत जाले. साहेबमजकुरानीं अफूचा पेटारा नजर केला. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ४७.

श्री. ३ नोव्हेंबर १७९०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाइत छ० २५ माहे सफर मुक्काम लष्कर नजीक गोवर्धन जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष:– पेशर्जी छ० २६ मोहरमचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, नवाब अलीबहाद्दर यांचा जाबसाल पूर्वीं ठैरण्यांत आला होता, त्याप्रमाणें अमलांत न आला. सबब नवाबमजकूर बेदील होऊन फौजसुद्धां भर्तपुरास कूच करून गेले. हिंमतबहादूर गोसावी समागमेंच आहे. मशारनिल्हेचे विचारें कोणत्या रुखास कूच ठैरेल तें प्रत्यास आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. राजश्री सुभेदार अद्यापि छावणींत आहेत. परस्परें सरदारांसीं चित्तशुद्धता नाहीं. राजश्री पाटीलबावांनीं आपल्या फौजेंत बंदोबस्त केला आहे कीं, कोणी सरदार अथवा सिलेदारांनीं उभैतां सरदारांकडे न जावें; गेल्यास चहूंकडे फिरंग्याची चौकी आहे. ऐसा बंदोबस्त जाला आहे. त्यावरून राजश्री सुभेदारांनीं काशीराव व बापूजी होळकर यांस निक्षून पत्रें पाठविलीं आहेत कीं, लौकर मेरत्याहून कूच करून येणें. व बळवंतराव सदाशिव अस्वलकर, नवाब मशारनिल्हेकडील, फौजसुद्धां तेथून दरकूच भरतपुरास येणार. तात्पर्य, त्रिवर्ग सरदारांत आपसांत विरुद्ध जालियानें जोधपूर जैपूरवाले राजे रजवाडे सावध होऊन फौज जमा करितात. सांभर व पर्वतसर वगैरे येथें राजश्री पाटीलबावांकडील ठाणीं होतीं, तें जैपूरकरांनीं उठोन दिल्हीं. आपला अंमल दखल केला. व रेवाडीकडे मुन्यमबेग वगैरे जमीदार दहाबारा हजार लोक जमा होऊन, त्या प्रांतीं दुंडी केली आहे. भंगासिंग कर्मसिंग वगैरे आठ सात हजार शीख, यमुना उतरोन गोसगड, मेरठ वगैरे अंतर्वेद प्रांतीं येऊन, चहूंकडे लुटतात; ऐसा प्रकार जाला आहे. नवाब निजाम अल्लीखान यानें पातशाहास एक्कावनशें मोहरा नजर पाठविल्या आहेत. त्यास राजश्री पाटीलबावांचे विचारें बाबाराव वकील नवाबाकडील शहा निजामुद्दींबरोबर दिल्लीस आले आहेत. वकीलमजकुराचे हातून नजर ठरली आहे. दों चौ दिवसां मुलाजमत होणार. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति

लिहिलें आहे. त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विज्ञापना."

लेखांक ४८.

श्री. नोव्हेंबर १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राजश्री सुभेदाराचा कूच रेवाडीचे रुखास ठरला होता. त्यास राजश्री पाटीलबावा दर कूच गेल्याचें वृत्त श्रवण करून, भर्तपुराकडे कूच करोन हिंडोनचे रुखास गेले. तेथील ठाणीं घेऊन बंदोबस्त केला. पुढें नबाब अलीबहादूर यांजकडे जाणार. येथील प्रसंगोचित सलाह ठरल्यावर पुढें करणें तें करावें ऐसा विचार आहे. नबाब अलीबहादूर यांनीं पूर्वीं हिम्मतबहाद्दर गोसावीस जैपुरास रवाना केलें होतें, परंतु पुनः कांहीं समजोन तो विचार राहिला. कारकून त्याजकडील जाबसालास पाठविला आहे. अद्यापि कांहीं ठरण्यात आलें नाहीं. राजांनीं लावून मात्र ठेविलें आहे. अमलांत आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ४९.

श्री. नोव्हेंबर १७९०.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

तोटा फिरंगी पूर्वींप्रमाणें राजश्री पाटीलबावांपाशीं चाकर होता. त्यास गतवर्षीं फितूर करून इस्मायलबेगाकडे आग्र्याचे मुक्कामीं उठोन गेला होता. त्यास मशारनिल्हेचा मोड जाल्यावर पुनः इकडे येऊन चाकर राहिला होता. हल्लीं गुलामाची दुर्दशा जालीयाचें वर्तमान त्यानें श्रवण करून, राणेखानभाईचें लष्करांतून निघोन, परभारेंच दहशत खाऊन फरुक्काबादेस उठोन गेला. हें वर्तमान राजश्री पाटीलबावांनीं ऐकून मशारनिल्हेस खातरजमेचीं पत्रें पाठविलीं आहेत. परंतु त्याजवर दहशत गालीब जाली आहे. येणार नाहीं. सेवेसीं श्रुत होय. रावराजा प्रतापसिंग भागीरथीस्नानास रामघाटीं जाऊन, स्नान करून माघारें लष्करांत येऊन, दोन दिवस येथें राजश्री पाटीलबावांजवळ राहोन, पुनः निरोप घेऊन माचेडीस स्वार होऊन गेला. राजश्री पाटीलबावांनीं बहुत खातरजमा केली आहे. परंतु जैपूरकरांनीं त्याचा मुलूक सर्व कबजांत केला ह्मणून बहुत चिंताग्रस्त आहे. सेवेसीं श्रुत होय.

पूर्वीं राजश्री आंबोजी इंगळे फौज घेऊन हातरसवाल्याचे मुलुखांत जाऊन आपला अम्मल दखल केला होता. त्यास हल्लीं हातरसवाला दयाराम जाट याणें दहशत खाऊन एक लक्ष एक्याऐशी हजार रुपयांवर मामला फडशा केला. आणिक जमीदाराची खंडणी होते. राजश्री आंबोजी इंगळे सध्यां येथेंच आहेत. सेवेसीं श्रुत होय.

लोकांस जायदाद पेशजीं राजश्री पाटीलबावांनीं करून दिल्ही होती ते, जागीरदार होते त्यास त्यांची जमाबंदी सरकारांतून बांधून, दोन हिस्से जायदादवाले व जागीरदार यांजकडे द्यावे, व एक हिस्सा त्या जमेपैकीं सरकारांत द्यावा, येणें-प्रमाणें विचार ठैरोन, येथून कारकून जमाबंदी करावयासी हरएक महालीं राजश्री पाटीलबावांनीं नेमून पाठविले आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

सहारणपूर वगैरे प्रांत नवाब अलीबहाद्दर यांजकडे नेमणुकींत लावून द्यावा ऐसा विचार होता. त्यास सांप्रत सरकारचे पत्रोत्तराची मार्गप्रतीक्षा उभयपक्षीं आहे. तेथील उत्तर आल्यावर त्याप्रमाणें घडेल.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ५०.

श्री. नोव्हेंबर इ. स. १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राजश्री पाटीलबावांनीं चितोडाहून सा कोसांचा कूच उज्जेनचे रुखास करून मु॥ केला आहे. राजे भीमसिंग चितोडकर यांचा मामला बारा लक्ष रुपये नख्त, शिवाय बारुद गोळा वगैरे फौजखर्च ठैरोन, पैकीं सात लक्षांची सावकारी निशा जाली. बाकीं पांच लक्षांविशीं ताकीद आहे. त्याची निशा घेऊन, उदेपूरकराकडून कांहीं पैका अथवा महाल लावून घेऊन, चितोडगड राणाचे स्वाधीन करून दरकूच उज्जनीस जावें, ऐसा विचार आहे. जोधपूरकर व जयपूरवाले यांनीं चितोडगड सुटल्याचें वृत्त श्रवण करोन बहुत हिरासा जाले. आणि मामल्याची बेबाकी लौकर करणार. दहशत गालीब जाली आहे. राजश्री सुभेदारांस ऐवज पावला नाहीं. म्हणून यांनीं राजश्री बापूजी होळकर व पेंढारी वगैरे फौज जयपूरच्या गीर्द ताख्ततताराज करावयास रवाना करणार आहेत. मिर्जा इस्मालबेगासही शामील करून जैपूरकरांचा मुलूख जप्त करावा

ऐसा विचार श्रवणांत आला आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ५१.

श्री. नोव्हेंबर १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- नवाब अलीबहाद्दर यांचा जाबसाल पूर्वीं बोलण्यांत आला होता. तो कांहीं अमलांत न आला. सबब, नवाबमजकूर यांनीं औरंगाबादाकडे डेरे उभे करून, बुंदेलखंडाकडे कुचाची तयारी केली. हें वृत्त राजश्री शिवाजी विठ्ठल यांनीं श्रवण करून, नवाबमशारनिल्हे यांस सांगितलें कीं, चार दिवस आणिक मुक्काम करावा. राजश्री पाटीलबावांकडे जाऊन आपल्याविषयीं बोलणें करून येतों. त्यावरून राजश्री शिवाजी विठ्ठल, राजश्री पाटीलबावांकडे गोवर्धनास येऊन, साकल्यवृत्त नवाब अलीबहादूर यांजकडील सांगितलें. दोन दिवस खलबत जाबसाल होऊन बोलणें ठरलें कीं, दोन तीन लक्ष रुपये नख्त सरंजाम करून देऊं. वरकड जी जागा व मुलूख नवाब मशारनिल्हे यांचे विचारें ठरेल, ते लावून देऊं. याप्रमाणें जाबसाल जाल्यावर, राजश्री शिवाजी विठ्ठल माघारे मथुरेस येऊन, नवाब अलीबहादूर यांसीं सर्व बोलणें केलें. त्यावरून नवाबानीं प्रतिउत्तर केलें कीं, आग्र्याचा सुभा किल्ल्यासुद्धां वगैरे वीस लक्षांचा वसुली मुलूख लावून द्यावा. कदाचित् येविषयीं अनमान असल्यास रामगड किल्ला व कोलजलेश्वर मेरठ वगैरे सदर्हू वसुली महाल द्यावे. व नख्त चार पांच लक्ष रुपये तुरुत् खर्चास द्यावे. म्हणजे फौजेची समजूत करून कूच जयपुराकडे अथवा जेथें मर्जी असेल तेथें सिद्ध आहों. याप्रमाणें जाबसाल होत असल्यास करून द्यावा ऐसें बोलणें जालें. त्यास राजश्री शिवाजी विठ्ठल यांनीं राजश्री पाटीलबावांस लिहिलें, वकीलही पाठविला; परंतु नवाबाचे बोलण्याप्रमाणें कांहीं न ठरलें. नंतर राजश्री शिवाजी विठ्ठल छावणीहून कूच करून गोवर्धनास आले. तिकडील जाबसाल सांगितला. तदनंतर छ० ११ तारखेस नवाबमजकूर बाराशें राऊतांनिशीं पाटीलबावांचे निरोपाकरितां मौजे आडीनपावेतों मथुरेहून पांच कोस डीगचे रुखास आले. सांडणीस्वार गोवर्धनास पुढें पाठविला. त्यास सांडणीस्वारांनीं माघारां जाऊन बातमी सांगितली कीं, तेथें लष्करांत व डेऱ्याचे गीर्द चहूंकडे आपलें आगमन

श्रवण करून बंदोबस्त केला आहे. हें वृत्त नवाबमजकुरांनीं ऐकून, सांगून पाठविलें कीं आम्ही आपल्या निरोपास येत होतों. आपल्या चित्तांत कांहीं संशय जाला, त्यास आमचें येणें फळ नाहीं. याप्रमाणें सांगून पाठविलें. त्यावरून राणेखानभाईस व राजश्री आबा चिटणीस, आपाराव यांसीं खलबत होऊन भाईस व आबा चिटणीस यांस नवाबाकडे पाठविलें. त्यास मशारनिल्हेनीं जाऊन बहुतकरून सांगितलें. परंतु कांहीं न ठरे. ह्मणून नवाब मजकूर कूच करून मथुरेस माघारे आले. राजश्री सुभेदारांची भेट घेऊन, जालें वृत्त सांगितलें. नंतर दुसऱ्या दिवशीं छ १४ तारखेस कूच करून भर्तपुरास गेले. हिम्मतबहाद्दर गोसावी यांच्या बरोबरच आहे. गोसावीमजकुराचे विचारें तेथून कोणत्या रुखास कूच ठरेल, तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ५२.

श्री. नोव्हेंबर १७९०.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– नवाब अलीबहादूर यांचा जाबसाल पूर्वीं ठैरला होता त्याप्रमाणें अमलांत न आलें. राजश्री पाटीलबावा रेवाडी वगैरे प्रांताच्या सनदा आतां देतात. त्यावरून नवाबमजकुरांनीं सांगितलें कीं, पूर्वीं सनदा दिधल्या असत्या तरी, फौज पाठवून तिकडील बंदोबस्त तरी होता. हल्लीं मुनियमबेग वगैरे जमीनदारांनीं दुंढी करून तुह्मांकडील ठाणीं उठविलीं. आतां सनदा घेऊन काय करावें? नगदीं ऐवज दहा पांच लाख रुपये खर्चास देवावे, ह्मणजे फौजांची समजोत करून कूच करावयास येईल. त्यास यांचें बोलणें कीं, सांप्रत ऐवजास ठिकाण नाहीं. रेवाडी वगैरे जागा घ्यावी. पुढें ऐवजाची सोय जालीयासी थोडें बहुत खर्चास देऊं. इतक्यावर कूच करावयाची मर्जी नसली तरी सुखरूप रहावें. याप्रमाणें परस्परें बोलणें होऊन, राजश्री पाटीलबावा डीगचे रूखास गोवर्धनास कूच करून गेले. नवाबमजकूर बेदिल होऊन बुंदेलखंड प्रांतीं कूच करून जावें ऐसा इरादा आहे. व बळवंतराव सदाशिव वगैरे फौज मेडत्यास होती ते बोलाविली आहे. व सदाशिवपंत आसवलकर कांहीं फौजसुद्धां डिगेस होते ते माघारें छावणींत दाखल जाले. ऐसा प्रकार जाला आहे. परस्परें चित्तशुद्धता नाहीं. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यासी येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ५३.

श्री. डिसेंबर १७९०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:-रावराजा प्रतापसिंग माचेडीवाला याचे शरीरास बहुत दिवस समाधान नव्हतें. बखतावरसिंग दत्तपुत्र आहे, त्यास सरदारी देऊन होशदारखान व रामसेवक दिवाण यांस प्राणोत्क्रमणसमयीं सांगितलें कीं, बखतावरसिंगाचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करून राज्याचें संरक्षण होय तें करावें. याप्रमाणें सांगून छ० १७ रविलावलचे तारखेस मृत्यु पावला. स्त्रीनें सहगमन केलें. राजश्री पाटीलबावांनीं वर्तमान श्रवण करून बखतावरसिंगास समाधानाचीं व सरफराजीचीं वस्त्रें, हत्तीघोडा जवाहीर येणेंप्रमाणें कारकुनाबरोबर पाठविलें व बहुत खातरजमेची पत्रें पाठविलीं; आणि रामसेवक दिवाण यांस लिहिलें कीं, तुह्मीं व नजबकुलीखान एकत्र होऊन फौजसुद्धां गोकुळगडाकडे जाऊन मुन्यमबेगाचें पारपत्य करणें. येविसीं विलंब न करावें. याप्रमाणें मशारनिल्हेस पत्र पाठविलें. जैपूरकरांनीं रावराजा मृत्यु पावल्याचें वृत्त ऐकोन बखतावरसिंगास वस्त्रें व खातरजमेचीं पत्रें पाठविलीं आहेत. पूर्वीं राजश्री पाटीलबावांनीं दोन पलटणा स्वार, व कारकून व रेवाडीकर माहीतगार जमीदार यांस गोकुळगडास पाठविलें होतें. त्यास मशारनिल्हे रेवाडीस दाखल जाल्यावर मुन्यमबेगानें गडाहून निघोन लढाई केली. पलटणा व दोन तोफा लुटून नेल्या. शेंपन्नास लोक ठार जाला. शेवटीं हत्यार घेऊन प्याद्यांस सोडोन दिल्हें. आतां निगादास्त जारी केली. पांच हजार स्वार, प्यादा जमा केला आहे. व कोटपुतळी वगैरे महाल जप्त करून दांड घेतला व मार्गांत कोणी निभत नाहीं. साहुकारांची रोकड चाळीस हजार रुपये माणसें घेऊन लष्करास जात होते, त्यांस धरून दरोबस्त ऐवज वस्त्रें लुटून घेतलीं. ऐसा प्रकार आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ५४.

श्री. ५ जानेवारी १७९२.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० १० माहे जमादिलावल मु० दिल्ली जाणोन स्वानंद-

लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष–पेशजीं छ० २० रविलाखरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, ते पाहून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस राजश्री पाटीलबावांचीं वरचेवर पत्रें आलीं कीं, तुह्मी फौजसुद्धां कूच करून पटयालाकडे जाऊन सिखांचें पारपत्य करणें. व अंतरवेद प्रांतीं सीखांनीं उपद्रव केला आहे त्यांची तंबीह करावी. त्यावरून रावमजकुरांनीं फौजसुद्धां छावणीहून दों कोसांचा कूच रेवाडीचे रुखास केला. शहा निजामुद्दीन याची तागीरी रुबकर होती. इतक्यांत मशार॰ निल्हेनीं पन्नास हजार रुपये नजराण्याबद्दल मीरअबदुल्ला जामात याजबरोबर देऊन रावमशारनिल्हेकडे पाठविले आहे. त्यास मीरमजकुराचीं भेट जाली. जाबसाल ठेरल्यावर विनंति लिहूं. पातशाहासी हमेशा आपसांत सख्तगोईमुळें नाचाखीच रहाते. नवाब वजीर लखनौकर बदस्तूर मुक्काममजकुरीं आहेत. पामरसाहेबास राजश्री पाटीलबावांनीं जलदीनें बोलाविलें आहे. त्यास लौकरच साहेबमजकूर उज्जेनेचे रुखास जाणार. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्याजवरून ध्यानारूढ होईल. सदोदीत कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.”

लेखांक ५५.

श्री. ५ जानेवारी १७९२.

“श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ १० माहे जमादिलावल मुकाम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष—पेशजीं छ २० रोज मजकूरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावा बदस्तुर चितोडनजीक पांच कोसांवर मुक्काम करून आहेत. उदेपुरकर राणासी ऐवजाचा तगादा आहे. मशारनिल्हेचें बोलणें कीं, उदेपुरास रुखसत करावें; ह्मणजे तेथें पावल्यावर ऐवजाची तजवीज घडून येईल. त्यावरून राजश्री पाटीलबावांची मर्जी बहुत बेदील जाली. राणाकडील वकिलावर इतराजी करून सांगितलें कीं, तुरुत दहालक्ष रुपये नख्त द्यावे व बाकीचा ऐवज राजश्री आंबोजी इंगळे या प्रांतीं रहातील यांस द्यावा. त्यास ऐवजाची निशा जालीयावर उजेनचे रुखास कूच होणार

ह्मणून वदंता आहे. राजश्री खंडेराव हरी व जगोबा वगैरे फौज यांनीं चहूंकडून हल्ला करून मिर्जा इस्मालबेगाची लढाई छ ७ तारिखेस सिकस्त केली. बहीरबुणगे व वगैरे सरंजाम पेंढाऱ्यांनीं गारत केले. मिर्जा चारशें लोकांनसीं पळोन कानोडचे शहरांत दाखल जाला. त्यावरून रावमशारनिल्हे यांनीं शहरचें गीर्द महासरा केला आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवबा बक्षी वगैरे फौजसुद्धां सिखाचे पारपत्यास रेवाडीवरून पटयाल्याकडे जाणार. राजश्री सुभेदार देवस्यानजीक मुक्काम करून आहेत. राजे प्रतापसिंग जेपुरकर भेटीस येणार ह्मणून आवाई आहे. भेटी जाल्यानंतर अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. शाहाजीनीं पन्नास हजार रुपये नजराणाबद्दल राजश्री गोपाळराव रघुनाथ यांजकडे पाठविले आहेत. पातशहासीं चित्तशुद्धता नाहीं. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदीत कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.''

लेखांक ५६.

श्री. २५ जानेवारी १७९२.

''श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांगनमस्कार विनंति येथील कुशल ता० छ ३० जमादिलावल मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष—स्वामीनीं कृपाकरून पत्रें छ १५ सफर व छ १ रविलावलचीं पाठविलीं, तें छ १८ माहे मजकुरीं पावून सनाथ जालों. छ १० जमादिलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री सुभेदार यांसीं व राजे प्रतापसिंग जेपूरकरासीं देवस्याचें मुक्कामीं भेटी जाल्या, परस्परें वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे बहुमान करून आपसांत बहुत ममतेचें बोलणें जालें. राजेमजकुराचे अनुमतें ठैरण्यांत आलें आहे कीं, राजश्री बापूजी होळकर यांस फौजसुद्धां याप्रांतीं ठेवून रावराजाचे प्रांताची जफ्त करावी. याप्रमाणें बोलणें ठैरलें आहे. राजश्री सुभेदार सडे महेस्वरास लवकरच जाणार. तेथें दाखल जाल्यानंतर पुण्यास यावयाचाही इरादा आहे. छ १७ तारखेस हजरतांनीं कुरसीची तयारी करून नशन केलें. शहाजी व भवानीकुंवर वगैरे सर्व दरबारांत हजीर होऊन माफक मरातब सर्वांनीं नजरा केल्या. राजश्री पाटीलबावांकडील एकशेंएक

मोहोर हजरतांस नजर आली होती. ते शहाजीचे चिरंजीवानीं नजर गुजराणली. नंतर इंग्रेजाकडील व नवाब वजीर यांजकडील दोनशें दोन मोहोरा वकिलानीं नजर केल्यानंतर मिर्जा अकबरशहा यांसही एक एक मोहोर नजर केली. हजुरांतून मिर्जा मजकुरास खिलत चपलान व दस्तार, सरबस्ता मेमुकेश व वगैरे, शहाजादे यांस मुकेशीहार फुलांचे व पान खुशबेत इनायत जाले. सिका चवतीसचे सालचा ज्यारी जाल्याची इनायात एक मोहोर, पांच मोहोरा राजश्री पाटीलबावांस व येणेंप्रमाणेंच इंग्रेज व वजीर यांस हजुरांतून बक्षीस जाल्या. मिर्जा अहसन बख्त पेशावरास आले ह्मणोन वदंता आहे. नवाब वजीर बदस्तूर लखनौंत आहेत, व नहुदीखां व शहाकडील येलची पेशावरास गेले. तेथून हिंवाळ्यानंतर काबीलास जातील. शहाजीनीं पातशहासीं आपले चिरंजीवाचे नांवें हप्त हजारी मनसफ व खिताबची फर्द दसखत करून घेतली आहे, त्याचे जागीरीचे फर्मानाची तयारी होते. नवाब निजामअलीखान यांस खिलत, जवाहीर वगैरे यांचीही तयारी केली आहे. कारण कीं, नवाबासीं जागीर त्या प्रांतीं हजुरचें फर्मानाप्रमाणें करून घ्यावी ह्मणोन उद्योगांत आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं. वरकड साकल्यवृत्त पुढील पत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून ध्यानारूढ होईल. सदोदीत कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ५७.

श्री. २५ जानेवारी १७९२.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं.

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता।० छ ३० माहे जमादिलावल मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष–स्वामीनीं कृपा करून पत्रें छ १५ सफर व छ १ रबिलावलचीं पाठविलीं तीं छ १८ मीनहूस पावलीं. सिरसां वंदून सनाथ जालों. पेशजीं छ १० जमादिलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठवीलीं आहेत ते पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हालीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावांनीं छ ११ तारखेस चितोड प्रांताहून उज्जनचे रुखास कुच करोन परतापगडानजीक पावले. राणा उदेपुरकर व राजे भीमसिंग व जोधपूरकराकडील वकील वगैरे राजेरजवाडे यांस वस्त्रें देऊन हरएकाची

खातरी करून रुखसत केलें. राजश्री आंबोजी इंगळे यांस मेवाड व परतापगड वगैरे येथील खंड खंडणीचा ऐवज तहसील करावयास दहा हजार फौजेनसीं राणाचे अनुमतें ठेविलें आहे. छ १८ तारखेस परतापगडाहून दरकूच उजेनीस गेले. छ २६ तारखेस तेथें दाखल होणार. राजेश्री सुभेदार व राजे प्रतापसिंग जेपूरकर यांच्या भेटी देवस्थानजीक जाल्या. परस्परें ममतेचें बोलणें होऊन राजेमजकुराचें विचारें राजश्री बापूजी होळकर यांस या प्रांती ठेऊन राजश्री सुभेदार महेस्वरास लौकरच जाणार आहेत. राजश्री गोपाळराव रघुनाथ व दुभाईचा कंपु वगैरे फौज मथुरेहून दिल्लीचे रुखास कूच करून वृंदावणास आले. आठा पंध्रा रोजांत इकडे येणार. येथें पावल्यानंतर शाहाजीचा वगैरे जाबसाल अमलांत येईल ते सेवेसीं विनंति लिहूं. राजश्री खंडेराव हरी बदस्तूर कानोडचें गीर्द मोर्चे लावून मिर्जा इस्मालबेगास किल्ल्यांत चहूंकडून महासऱ्यांत केलें आहे. सीख पांच हजार स्वार अंतरवेद प्रांतीं आले ह्मणोन देवजी गवळी सडे राजश्री गोपाळराव रघुनाथ यांजपासीं मथुरेस गेले. सीखांकडील वृत्त रावमशारनिल्हेनीं श्रवण करून दरकूच इकडे येणार आहेत. मिर्जा अहसनबख्त पेशावरास आल्याचें वर्तमान हजुरांत आलें. तैमूरशाहानीं दहा हजार मोहोरा खर्चास देऊन जाहीरदारी बहुत खातरी करून आहे. नवाब वजीर बदस्तूर लखनौंत शेरशिकार करून आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वर्तमान राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदीत कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.''

लेखांक ५८.

श्री. जानेवारी १७९२.

''पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसिजेः—राजश्री जगोबा आठ हजार फौजेनसीं छ ५ तारखेस राजश्री खंडेराव हरीचे लष्करांत सामील जाले. दुसऱ्या रोजीं मिर्जा इस्मालबेगाचा गीर्द केला. त्यावरून मिर्जानीं तमाम लोकांस बोलावून सांगितलें कीं, लढाईचा प्रसंग रुबकर आहे. या समयीं सर्वांनीं शपथ प्रमाण केली. यासी लढाईचा मुकाबिला करूं. त्यास सर्वांनीं उत्तर केलें कीं, खर्चाची सरबरा करून दिधल्यास तयार आहों. इतक्यांत मिर्जानीं सख्तगोई केली. ह्मणोन महमदखांबदखची वगैरे चार जमातदार बेदील होऊन राजश्री खंडेराव हरी यांजकडे पेगाम केला कीं, आमची दस्त-

गिरीं केलीयासी तुह्मांकडे येऊन सामील होतों. त्यावरून राव मशारनिल्हे यांनीं जाहीरदारी खातरी करून सांगून पाठविलें कीं, आपली जमात घेऊन यावी, ह्मणजे चाकरीची सोय करून देऊं. त्यास, छ ७ तारिखेस मदमदखां वगैरे जमादार यांनीं मिर्जासीं नाचाखीचें भाषण करून निघाले. नंतर मिर्जानीं पिछा केला व तोफाचे बार दोनचार जाल्यावर, राव मजकूर वगैरे फौज तयार होऊन मिर्जाचे मुकाबलयास गेले. इकडूनही तोफगोळ्यांचा मार आला व तिकडे मिर्जानीं छरे भरून मारले. त्यांत जमादार मजकूर ठार जाले. उपरांत राव मजकुरांनीं चहूंकडून हल्ला करून मिर्जाची लढाई सिकस्त केली, व दरोबस्त सरंजाम हत्ती घोडे वगैरे लुटून घेतले. मिर्जामजकूर चारशें लोकांनसीं पळोन कानोडचे किल्ल्यासंनिध मुक्काम केला. बहीर बुणगें यांस मौजे भिवाजीचे रुखास रवाना केलें होतें, तें पेंढाऱ्यांनीं गारत केलें. जगोबा वगैरे फौजेनीं शहरांत दखल केला, सबब मिर्जा हिरासा होऊन सलूखाचा पेगाम केला आहे. परंतु यांनीं सांगोन पाठविलें कीं, गुलामकादराप्रमाणें तुमचेंही पारपत्य घडून येईल. याप्रमाणें वृत्त आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ५९.

श्री. ता. २२ फेब्रुवारी १७९२.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ २८ माहे मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ ७ माहे मजकुरचीं विनंतीपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून साकल्य वृत्त ध्यानारुढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तर, शहा निजामउद्दीन यांनीं राजश्री पाटीलबावांस खुफीया पत्रांत गोपाळराव रघुनाथ यांची नालीश सख्तगोईची लिहिली. त्यावरून राजश्री पाटीलबावांनीं राव मशारनिल्हेस निक्षून पत्रीं लिहलें कीं, शाहाजीस संस्थानीं ठेविलें आहे. कोणेविसीं त्यासी सख्तीचा जाबसाल न करावा. त्याजवरून शाहाजीच बहाल राहिले. परंतु यांनीं पन्नास हजारांची निशा सावकारी करून दिल्ही. मीर अबदुल्ला वगैरे रावमजकुरासीं रुखसत होऊन लौकरच दिल्लीस येणार. हजरतासीं हमेशा केवळ नाचाखीच रहाते. हुजूरची मर्जी नवती; परंतु कांहीं उपाय नाहीं ह्मणून लाचार आहेत. शाहाजीसीं येथील व अंतरवेदचे महालाचा बंदोबस्त

कांहींच होत नाहीं. मेरट वगैरे अंतरवेद प्रांतीं पांचशें स्वार शिखांचे आले. त्यांनीं शहादऱ्यापावेतों दिल्लीहून एक कोसावर उपद्रव करून रस्ता बंद केला. व चहूंकडे रखी घेऊन गांव ताख्तताराज करितात. कांहीं दबाव गुजरावर अथवा शिखांवर नाहीं. नवाब वजीर लखनऊंत आहेत. पेहेलवान साहेब व राजश्री हणमंतराव नवाब अलीबहादूर यांजकडून तोफा तायफ जिन्नस, वस्त्रें वगैरे घेऊन गेले आहेत. त्यांची मुलाजमत नवाब वजीर व बडेसाहेब यांसी जाली. इकडून सरंजाम नेला होता, तो गुजराणला. तेथून खिलत उभेतांस सा सा पारचे, जेगा, शिरपेंच, मोत्यांची माळ येणेंप्रमाणें मिळाले. नवाब अल्लीबहादूर मकनपूरचे ज्यारतीस येणार, ह्मणून नवाबासीं बोलणें आहे. तात्पर्य, कोणी मार्गांत मुजाहीम न व्हावें. यास्तव शिष्टाचार राखून नंतर जावें ऐसा विचार आहे. त्यास नवाब वजीराची सल्लाह सर्व पामरसाहेबांचे मर्जीवर आहे. त्यांची सल्लाह ठैरल्यान्वयें यांस उत्तर येईल. इंग्रेजांचा संधान राजश्री पाटीलबावांकडे आहे. पामरसाहेबासही राजश्री पाटीलबावांनीं देशीं बोलाविलें आहे, ह्मणून त्वरेनेंच जाणार. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व आखबारा पाठविल्या आहेत, त्यांजवरून ध्यानारूढ होईल. छ ७ तारखेस कासीद मेव्याचे पाठविले होते, त्यांस रेवाडीस चार दिवस वाटेच्या खतऱ्यामुळें कासीदास आटकाव जाला. ह्मणोन रेवाडीहून वर्तमान आलें. यास्तव सेवेसीं विनंति लिहिली आहे. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६०.

श्री. २२ फेब्रुवारी १७९२.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीः—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता० छ २८ माहे जमादिलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ ७ माहे मजकूरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. ते पाहून सविस्तर वर्तमान ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ बरसान्या नजीक मुक्काम करून आहेत. डिभाईचे कंपूचा कूच छावणीहून जाला नाहीं. ह्मणून राव मशारनिल्हेनीं खर्चाची सरबरा करून पाठविलें आहे. कंपू सामील जाल्यावर बरसान्याहून कूच करून कानोडचे रुखास जाणार. तेथून

बहादूरगडवाल्याचा मामला घेऊन पटयाल्याकडे जावेंसें आहे. राजश्री लखबादादा फौजसुद्धां कानोडास दाखल जाले. राजश्री खंडेराव हरी यांनीं माधोगड नामें किल्ला पहाडी, नजबकुलीखानाकडे नजीक कानोडचे होता, तो सांप्रत शिबंदीचे लोकांस फोडोन किल्ला खालीं करून घेतला. तेथें इकडील लोकांनीं बंदोबस्त केला. माधोगडाहून वरचेवर कानोडचे किल्ल्यांत रसद पावत होती. हल्लीं चहूंकडून लखबादादा वगैरे फौजेनें महासरा केला. सबब मिर्जा इस्मालबेग वगैरे सर्व हिरासा जाले आहेत. राजश्री खंडेराव हरी यांचे लग्नाची तयारी आहे. ह्मणून दहा पंधरा दिवस हल्ला होत नाहीं. तदनंतर हल्ला करून किल्ला घ्यावा ऐसा बेत आहे. जैपुराहून खुशालीराम बोहोरा राजश्री सुभेदाराकडे येणार. मशारनिल्हे आल्यानंतर बापूजी होळकर वगैरे फौज रावराजाचे मुलुखांत पाठविणार. बखतावरसिंग, रावराजाचा दत्तपुत्र, यानें लढाईची तयारी केली आहे. मिर्जा अहसनबख्त पेशावरास दाखल जाले. गाजुद्दीखानासही तैमूरशहानीं खातरजमेचें पत्र पाठविलें आहे कीं, तुह्मी मिर्जाचे ताबेदारींत राहणें, व सुभेदाराचा बंदोबस्त करावा. याप्रमाणें पत्र आल्यावर खानमशारनिल्हे मिर्जास सामील होणार आहेत. नवाब अलीबहादूर यांनीं नवाब असफद्दौला वगैरे यांस तोफा तायफ जिन्नस, वस्त्रें वगैरे पहलवानसाहेब व राजश्री हणमंतराव बिनीवाले यांजबरोबर देऊन लखनौस पाठविलें. नवाब वजीराची मुलाजमत जाली. यानंतर तोफा तायफ जिन्नस होता तो नजर केला. तेथून सा सापारचे खिलत उभेतांस दोन रकम जवाहीर इनायत जालें. राजश्री पाटीलबावांनीं शाहाजीविसीं राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस बहुत लिहिलें. त्यावरून सांप्रत शाहाजीच बहाल राहिले. हजरतासीं केवळ नाचाखी आहे. परंतु त्यांचा उपाय चालत नाहीं. शीख पांच सातशें स्वार अंतरवेद प्रांतीं येऊन दरोबस्त महालांत उपद्रव केला आहे. व नित्य दिल्लीनजीक शाहाधड्याहून मेवासी वगैरे लुटून नेतात, ऐसा प्रकार आहे. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ६१.

श्री फेब्रुवारी १७९२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः—शाहाजीनीं मीरअबदुल्ला जामात व चिमणाजीपंत व हुजरे यांस

राजश्री गोपाळराव रघुनाथ यांजकडे जाबसालाकरितां पूर्वीं पाठविलें आहे. त्यास यांनीं पन्नास हजारांची किस्तबंदी करून पैकीं पंधरा हजार नख्त पाठविले. बाकी दहा हजारांची दरमहाची किस्तबंदी सावकाराकडून करून दिल्ही. त्यावरून राव मशारनिल्हेनीं हिशेब पाहून वगैर मुजराई रकमा वजा केल्या, व पन्नास हजार तुरुत द्यावे, ऐसा पैगाम मीरमजकुरासीं केला. त्यांनीं येथं शाहाजीस लिहिलें. त्यावरून हे बहुत बेदील जाले आहेत. तात्पर्य, यांसीं व राव मशारनिल्हे वगैरे लोकांसीं चित्तशुद्धता नाहीं. ह्मणून अद्यापि कांहीं ठैरण्यांत आलें नाहीं. जाबसाल रुबकर आहे. बऱ्हाणपुराहून छ १८ तारखेस हबीबशाहा, राजश्री पाटीलबावांचे गुरु, यांचें निश्चयपत्र लग्नाविसीं शाहाजीस आलें कीं, तुह्मीं तयारी करून बीडास यावें. ह्मणजे तेथें लग्नाचा समारंभ होईल. हबीबशाहाचे कन्येसीं व अमीर महंमदखां, शाहाजीचा पुत्र, यांसीं शरीरसंबंध ठैरला आहे. ह्मणून सर्वांनीं शाहाजीस नजरा मुबारकबादीच्या केल्या. दुसऱ्या दिवशीं शाहाजी हजुरांत जाऊन एक मोहोर पुत्राकडून हजरतास बद्दलशादी नजर करविली. हल्लीं लग्नाची तयारी होते. अखेर माघमासीं येथून निघणार. राजश्री पाटीलबावांनीं शाहाजीस लिहिलें आहे कीं, माहीमरातब व खिलत वगैरे आलकाबची श्रीमंतास फर्द लौकर तयार करून उज्जेनीस पाठविणें. त्यास त्याचीही तयारी होते. शाहाजीचे बंधु मीर सैदमहंमद बीडास जाणार. त्यांच्याच बरोबर हे सर्व सरंजाम येथून रवाना करणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६२.

श्री. फेब्रुवारी १७९२.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- राजश्री खंडेराव हरी यानीं दमदम्याची तयारी कानोडचे शहरांत केली आहे. कारण कीं, तेथें तोफा ठेवून किल्ला जेर करावा. मिर्जा इस्मालबेग कानोडचे किल्ल्यांत दोन हजार लोकांनसीं आहे. हजार स्वार व हजार प्यादे येणेप्रमाणें मिर्जाबरोबर, व नजबकुलीखानाचे पुत्राची जमात हजार बाराशें लोक आहेत. किल्ल्यासीं लढाई होते. मिर्जाचा विचार होता कीं, रात्रीं किल्ल्यांतोन निघोन जावें. जैपूरकर व जोधपूरकर राजेरजवाडे जमीनदारांस पत्रें पाठविलीं आहेत कीं, आमची कुमक करावी. किल्ला स्वाधीन करून घ्यावा. याप्रमाणें खुफीया पत्रेंही पाठविलीं आहेत. परंतु चहूंकडून इकडील

फौजेनें महासरा केला आहे. निघावयास मार्ग नाहीं. यास्तव बहुत हिरासा आहे. किल्ल्यांत लाख मण गल्ला बाकी राहिला, त्यापैकीं सिबंदीस खर्चास गल्ला देतात. बारुदची कमती किल्ल्यांत आहे. लखबा कानोडास पावल्यावर किल्ल्यास सुरुंग लावणार आहेत. जैपूर जोधपूरकर मिर्जासीं खुफिया कागदपत्रें सिलसिला राखितात. बहुत काय लिहणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६३.

श्री. फेब्रुवारी १७९२.

"श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ ७ जमादिलाखर मु० दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—स्वामींनीं कृपा करून पत्र छ १२ व छ २० रबिलाखरचें, पाठविलें, तें छ १ मीनहूस पावलें. शिरसा वंदून सनाथ जालों. पेशजीं छ ३० जमादिलावलचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हालीं इकडील बर्तमान राजश्री नानाचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून श्रुत होईल. मेवा विलायती सेवेसीं पाठविला आहे ते घेऊन पत्रोत्तरीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ६४.

श्री. फेब्रुवारी १७९२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे— दीढ वरीस जालें तेव्हां लखपतरायानें लाहोरचा अजुरा लिहोन दिल्लीहून कासीदजोड्या सरकारांत पाठविल्या, तेथें चौकसी जाली. तेव्हां एक कासीद पाठविला व अजुरा लाहोरचा लिहिला. सबब येथील मिर्धे पेंचांत आले. आह्मांकडे ती॥ राजश्री देवरावतात्यांनीं शब्द आणोन लिहिला. त्यावरून मथुरेच्या मुक्कामीं मशारनिल्हेकडील कासीद बजिन्नस सांपडल्यानंतर मवाजी मिर्धा यास बोलावोन मुचलका लिहोन घेतला कीं, अतःपर ऐसी चूक करणार नाहीं. लखपतरायानें कासीद पाठविले, तरी तुह्मांस इतल्ला करून देऊं. न केल्यास गुन्हेगार आहों. याप्रमाणें मिर्ध्याचा मुचलका लिहून घेतल्यानंतर लखपतराय यांनीं सरकारांत अलाहिदाच सिलसिला चोरून ज्यारी केला, व पत्रें

पाठविलीं. त्याचीं उत्तरें सरकारचीं वगैरे मशारनिल्हेचे नांवें, मोठें आलकाबानें व बहुत खातरी करून, हमेषा सिलसिला ज्यारी ठेवणें याप्रमाणें वरचेवर पारसी जाब आले. शिक्का मोर्तबही पत्रावर आहे. सांप्रत पुन्हां सरकारांत पुरसिदा जाली. यावर श्रवणांत आलें की, सरकारांतून अजुरा व जाब हिंगण्याकडील कारकून ह्मणोन दिल्हे. त्यास लखपतरायाची येथें दरकाय साडेतीन रुपये दरमहा! कसबात पण करून मोहोरा हरएकाची घरीं खोदवून ठेविल्या आहेत. त्यानें कालक्षेप दिल्लींत करितो. ही गोष्ट सर्वांस ठाऊक आहे. विनंति लिहावीसी नाहीं. इतका अलकाब व खातरीचीं पत्रें जमा करून लखपतरायानें शाहाजी व भवानी- कुंवर आदिकरोन सर्वांस दाखविली. व दरबारांत बोलणें जालें कीं, सरकारांत आमचा सिलसिला चाळीस वर्षांपासोन याप्रमाणें चालत आहे. आह्मांस हिंगण्यासीं गरज काय? गंगाधर शिवराम, हिंगण्याकडील गुमास्ते, यांनीं मवाजी मिर्धा यांस मुचलका गुदस्ता लिहोन घेतला, व तंबीह करणार. त्यावरून शहाजींनीं दरबारांत बोलावून गुमास्ते मजकूर यांस सांगितलें कीं, लखपतरायांसीं सरकारची मोहोर मोहोरनसीं सर्वांसीं पत्रें दस्तावेजीं आहेत, व तेथील परवानगी असतां तुह्मीं तकरार करितां हें काय? या गोष्टीचा बंदोबस्त सरकारांत. पैकीं हरएकानें लबाडी करून पत्रें लिहिलीं, व मध्यस्त लोकांनीं गरम बाजारी करून पत्राचे जाब पारसी येणेप्रमाणें यांस लिहिल्यांस, तुमचे रहाण्याचें स्वरूप हजुरांत काय राहिलें? नंतर सर्व पत्रेंही बजिन्नस आणोन दाखविलीं. त्यावरून आह्मी उत्तर केलें कीं, आज तागाईत आमचे नांवानें श्रीमंतांनीं अजुरा व पत्राचे जाब दिधले. त्याजवर बहुत बोलणें जालें. परंतु सरकारचीं पत्रें पाहिल्यानंतर रद- बदली केल्यास कायली येते ह्मणून सेवेसीं विनंति लिहिली आहे. पूर्वापार आमची अब्रू व लौकिक वाढविला सरकाराचा आहे. स्वामीकडील आहेत ह्मणून चौघांत प्रतिष्ठा चालत आली. आज तागाईत सर्व मानितात. लोकांनीं ऐसीं पत्रें हरकोठें दाखविल्यानें आमची थाप कैसी रहातें? त्यास, येविसीं राजश्री पाटीलबावांस अथवा राजश्री, गोपाळराव रघुनाथ, जिवबा बक्षी यांचे नांवे पत्रें पाठविलें पाहिजे. कीं, सरकांरातून आज तागाईत हिंगण्याकडील मुत्सद्दी ह्मणोन लखपतरायाचें नांवें जाब व अजुरा दिल्हा होता. हल्लीं मशारनिल्हेची लबाडी जाहीर जाली. तरी तुह्मीं इ॥ त॥ सरकारचीं वगैरे पत्रोत्तरें त्याजकडे हिंदवी पारसी आहेत, तें घेऊन तंबीह करून मुचलका लिहोन घेणें, कीं पुन्हां ऐसी वर्तणूक कोणी न करी. याप्रमाणें सरकाराचें पत्र आल्यानंतर लखपतरायाकडील सर्व कागदपत्र घेऊन सेवेसीं पाठ- वून देतों. दस्तैवज हलके माणसाजवळ राहिल्यानें आह्मास ठीक नाहीं. यास्तव

विनंति लिहिली आहे कीं, लौकर येविसीचे ताकीदपत्र पाठविलें पाहिजे. ह्मणजे चौघांस लबाडी त्याची ध्यानांस येऊन, कोणी पक्ष करणार नाहीं. सर्वप्रकारें पूर्वापार प्रतिपाळ स्वामींनींच केला व पुढेंही आमचीं आबताब रक्षण करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६५.

श्री. फेब्रुवारी १७९२.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ ३० माहे जमादिलावल मुकाम दिल्ली जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष, स्वामीकारणें मकरसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत ते कृपापूर्वक स्वीकारून पत्रोत्तरीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ६६.

श्री.

" विज्ञापना ऐसीजे. मेवा विलायती सेवेसीं पाठविला आहे.

३५ आनार बेदाना सुमारें.

२५ नासपाती सुमारें.

४ खुती अंगुर सुमारें.

याप्रमाणें घेऊन पत्रोत्तरीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति. "

लेखांक ६७.

श्री. २१ मार्च १७९२.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ता० छ २७ माहे रजब मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ २८ जमादिलाखरचीं विनंतिपत्रें सरकारांत व सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावा पन्नासहारज

रुपये विलायती घोडे खरेदीस राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस दिल्हे आहेत. त्यास, सदरहू ऐवजाची हुंडी करून व नहुदीखानाकडे काबीलास पाठविणार आहेत. नवाब निजामअल्लीखानाचाही विचार आहे कीं, कोणी वकील विलायतेस पाठवून तैमूरशहाचा खिलत आणवावा. तैमाचबेगखानास पाठवावें ऐसी योजना श्रवणांत आली आहे. ठैरल्यावर विनंति करूं. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व आखबारा पाठविल्या आहेत, त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६८.

श्री. २१ मार्च १७९२.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तारिख छ २१ माहे रजब मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ २८ जमादिलाखरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ मथुरेहून दरमजल येऊन बहादरगडनजीक मुक्काम करून राहिले. तेथील मामला तीस हजार रुपये व दहा हजार दरबारखर्च, एकूण चाळसा हजारांवर फडशा करून, पुढें खरखोद्याकडे शह दिल्हा. शिखांकडील व पत्याल्याकडील वकील येऊन भेटले आहेत. डिभाई फिरंग्याचा अद्यापि छावणीहून कूच जाला नाहीं. खर्चाची सरबरा जाल्यावर तेथून कूच करून राव मशारनिल्हेस सामील होणार. मिर्जा अकबरशहानीं शाहाजीची नालीश राजश्री पाटीलबाबांस व गोपाळराव रघुनाथ यांस दोन चार वेळां लिहिलें. ह्मणून शहाजीवर रावमजकुराची केवळ अनास्था जाली आहे. त्यावरून शाहाजीनीं येविसींचा गिल्ला हजरतापासीं बहुत केला. पातशाहानीं प्रतिउत्तर केलें कीं, तुह्मी महालाचे लोकांस खर्चास देत नाहीं. याजकरितां तुमची नालीश लोक लिहितात. दिल्लीचे सावकारांवर वगैरे दोनलक्ष रुपये रावमजकूर मागतात. शाहाजीसही ऐवजाचे सरबराकरितां लिहिलें होतें. त्यास मशारनिल्हेनीं उत्तर केलें कीं, राजश्री पाटीलबावांनीं आज तागाईत कोणासीं दांड घेतला नाहीं. आतां सावकारांस हें वृत्त कळल्यावर शहर वैराण होईल व व्यर्थ बदनामी येईल. मजसीं हें काम घड-

णार नाहीं. दुसऱ्या कोणास पाठवून याची सरबरा करावी. मिर्जा अहसनबख्त पेशावरास पावले. व नहुद्दीखां व सादुल्लाखान येलची यांनीं मिर्जोची मुलाजमत केली. तेथून दरकूच काबिलास गेले. तैमूरशहाकडे जाणार. नवाब अल्लीबहादर मकनपुरास जाणार ह्मणून नवाब-वजीराकडे लखनौस हणवंतराव यास पाठविलें होते. त्यास येथील संधान पाहून जातील. हिंमतबहादर गोसावी यांनीं दहा हजार स्वार, प्यादे जमा करून, बुंदेलखंडाची खंडणी हरएकासीं मशारनिल्हेच्या हातून होते. राजश्री सुभेदार टोंकनजीक पावले. तेथून महेश्वरास जाणार. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे. त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ६९.

श्री. मार्च १७९२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे— राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस राजश्री पाटीलबावांचीं पत्रें आलीं आहेत कीं, माहीमरातब व खिलत वगैरे सरंजामाविसीं शहाजीस लिहिलें आहे. तुह्मीं ताकीद करून लौकर पाठविणें. सरंजाम उज्जनीस पावल्यावर आह्मी कूच पुण्यास करूं. तुह्मीं पटयाल्याकडे जाऊन शिखांची तंबी करणें. परंतु मिर्जाचे पारपत्य अगोदर करोन कानोडचे मार्गानें पटयालास जाणें. वगैरे चहूंकडील बंदोबस्त ठीक राखणें. याप्रमाणें पत्रें आल्यावर रावमजकुरांनीं तीसां कोसांचा कूच करोन वृंदावनास आले. राजश्री लखबादादा आग्रेकर सुभेदार यांस वस्त्रें व हत्ती देऊन, राजश्री खंडेराव हरी यांचे कुमकेस पांच हजार स्वार व चार पलटणा डिभाईकडील वगैरे जंगी सरंजाम देऊन कानोडास रवाना केले. ते गोवर्धननजीक पावले. तेथून दरकूच कानोडास येणार आहेत. व राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजसुद्धां दिल्लीचें रुखास येणार. इकडे आल्यानंतर काय अमलांत येईल तें सेवेसीं विनंति लिहूं.

राजश्री अलीबहादर बाबा कालपीस येऊन रा० बाळाजी गोविंद यांसीं ऐवजाची ताकीद केली. त्यास मशारनिल्हेकडून ऐवजाची सरबरास विलंब जाला. सबब वेदमूर्ति लक्ष्मणभट कारभारी यांस पहाऱ्यांत बसविलें. तेव्हां दोन लक्षांची निशा सावकारी घेऊन नंतर सोडून दिल्हें. नवाब वजीर असफ-

द्दौला यास खिलत हत्ती, घोडा, जवाहीर वगैरे सरंजाम राजश्री हणमंतराव बिनीवाले व पहलवान साहेब यांच्या बरोबर देऊन लखनौस एका दों रोजां रवाना करणार. एक मुत्सद्दी अगोदर पाठवून नंतर यांची रवानगी होणार. सांप्रत बांद्यास कूच करून गेले. तेथून अर्जुनसिंग दोन हजार लोकांनसीं बारा कोसांवर मुक्काम करून आहेत. इकडूनही फौज त्यांचे मुकाबल्यास रवाना जाली. व गढी वगैरे महाल बांद्याकडील जफ्त करून अंमल दखल करितात. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं.

बहुत काय लिहणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७०.

श्री. मार्च १७९२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसाजे:– राजश्री पाटीलबावांनीं उज्जनीहून ती कोसांचा कूच केल्याचें वृत्त हजुरांत आलें. तेथून छ १८ तारखेस पुण्याचे रुखास कूच करून जाणार. सावकार व कारकून वगैरे लोकांसीं सत्तर लक्ष रुपयांची तजवीज केली आहे. ऐवजाची सरबरा लौकर करून बिडास जाणार. तेथून नवाब निजामअल्लीखान यांच्या परस्परें भेटी होऊन, तदनंतर उभेतांनीं श्रीमंत स्वामींकडे जावें, ऐसा विचार श्रवणांत आला आहे. राजश्री सदाशिव मल्हार यांस हिंदुस्थानाकडे पाठवावेसें आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांणीं फौजसुद्धां पाणिपताकडे राहून शिखाचें पारपत्य करावें व सदाशिव मल्हार यांनीं मथुरेंत छावणींत राहून इकडील बंदोबस्त राखावा, ऐसी वदंता ऐकिण्यांत आली आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं.

राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं छावणीहून कूच करून नंदगाव बरसान्यास दाखल जाले. डिभाईचे कंपूची समजोत जाली नवती; सबब राजश्री जिवबा बक्षी छावणींत राहिले आहेत. हल्लीं रावमशारनिल्हेनीं दोन लक्ष रुपयांची तजवीज करून डिभाईचे खर्चास पाठविलें आहे. त्यास लौकरच कंपूचे लोकांची समजोत होवोन छावणीहून कानोडचे रुखास कूच करून येणार. राजश्री खंडेराव हरी यांनीं युक्तीनें माधोगड पहाडी किल्ला नजबकुलीखानाकडे होता, तो खालीं करोन घेतला. तेथील शिबंदीचे लोकांस बावीसशें रुपये खर्चास दिल्हे आणि किल्ल्यांत अंमल दखल केला. रावमजकुराचें लग्न फाल्गुन शु॥० ५ स होणार. ह्मणोन कानोडचे किल्ल्यावर हल्ला जाला नाहीं. नंतर चहूंकडून

हल्ला करून, मिर्जा इस्मालबेगास दस्तगीर करोन आणावें, ऐसा विचार ठैरण्यांत आला आहे. राजश्री लखबादादाही रावमशारनिल्हेपासीं दाखल जाले. किल्ल्यास चहूंकडून महासरा केला ह्मणोन व माधोगड खालीं जाल्यानें मिर्जामजकूर वगैरे लोक बहुत हिरासा जाले आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

राजश्री सुभेदार जेपूरनजीक बदस्तूर छावणींत आहेत. खुशालीरामबोहोरा जेपुराहून यांजकडे येणार ह्मणून मार्गप्रतीक्षा करितात. मशारनिल्हे आल्यानंतर जेपूरकराकडील फौज व बापूजी होळकर यांस रावराजाचें मुलकांत पाठवून मुलूख जप्त करावा ऐसा विचार ठैरण्यांत आला आहे. राजे बिजेसिंग जोधपूरकर यांचा पुत्र जालीमसिंग यांसीं परस्परें आपसांत विरुद्ध आहे. हल्लीं राजश्री पाटीलबावांकडे जालीमसिंगाचें सूत्र लागलें होतें, ह्मणून मशारनिल्हेनीं बिजेसिंगाचें महालांत उपद्रव करून, लढाई सिकस्त केली. त्यावरून राजेमजकुरानीं राजश्री पाटीलबावांस लिहिलें कीं, आमची कुमक केलीयासी मामल्याबद्दल रुपये बाकी आहे तो आदा करूं, नाहींतर पैका पावणार नाहीं. याप्रमाणें लिहिल्यावर तेथून कांहीं फौज पलटण वगैरे राजेमजकुराकडे रवाना जाली आहे. पुढें काय ठैरोन प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

मिर्जा अहसनवख्त पेशावरास दाखल जाले. तैमूरशाहांनीं मिर्जाचे खर्चास दीड लक्ष रुपयांची वरात थाणेगाजी याजवर केली. सबब मिर्जामजकूर मुलतानास येऊन वरातीचा ऐवज घेणार. तैमूरशहाचा शहाजादा मिर्जाबरोबर सामील आहे. तात्पर्य, मुलतानास येऊन नवाब गाजुदीखानाचें विचारें शिखांवर मोहीम करून, लाहोरप्रांतीं यावें ऐसा विचार मिर्जा वगैरेचा आहे. संसारचंद व महासिंगाचा पुत्र वगैरे सर्व शीख जमा होऊन, शहाकडील फौजेचे मुकाबल्यास अंबरसराहून पुढें कूच करोन मुलतानचे रुखास जाणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

या प्रांतीं खुषकीमुळें अन्नाची धारण अठरा शेर जाली आहे. ह्मणोन बहुत लोक परेशान होऊन लखनौस उठोन गेले. पातशाहासुद्धां सर्व सचिंत होते. हल्लीं ईश्वरकृपेनें छ २५ तारिखेस चार घटिका प्रजन्य पडला. तेणेंकरोन लोकांस धैर्य आलें आहे. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.”

लेखांक ७१.

श्री. मार्च १७९२.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:— राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनीं माधवराव फाळके यांस हकदादखानाकडे पन्नास हजारांची जागा होती त्याची जफ्ती सांगितली. त्यावरून रावमजकूर फौज व पलटणासुद्धां जाऊन खानमजकुराचे गांव ताख्तताराज केले. व मामगडास मोर्चे कायम केले आहेत. शीख अंतरवेद प्रांतीं होते, त्यांनी फौजेची आवाई श्रवण करून, हरएक गावांत लपून राहिले आहेत. रात्रौ कजाकी करून गांव ताराज करितात. सेवेसीं श्रुत होय.

रावमजकुराचा विचार दिल्लीनजीक यावेसें आहे. शिखांकडील वकील येऊन जाबसाल करितात कीं, तुह्मीं येथेंच रहावें, फौज आमचे बरोबर द्यावी. ह्मणजे पटयाल्यापुढें सतलूजपावेतों बंदोबस्त सहजांत करून देतों. पटयालाकडेही कूच्याची आवाई आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं.

तैमूरशाहा बदस्तूर काबीलांत आहेत. व नहुदिखां व सादुल्लाखान येलची यांनीं पेशावरांत मिर्जा अहसनबख्त यांची मुलाजमत केली. उभयतांस तीन तीन पारचे खिलत देऊन पुढें रवाना केलें आहे. मिर्जामजकुरांनीं खुफीया पत्रें इस्मालबेगास पाठविलीं आहेत. तीं बजिन्नस पत्रें राजश्री खंडेराव हरी यांनीं धरून हजरतास पाठविलीं. तात्पर्य, मिर्जास पेशावरास बोलावलें होतें. नवाब गाजुद्दिखानही शाहाजाद्यास सामील जाला आहे, ह्मणोन वदंता आहे. राजश्री खंडेराव हरी यांनीं दोन लग्नें केलीं, व बदस्तुर कानोडास मोर्चे लावून आहेत. दोन सुरुंग लाविले होते ते बराबर गेले. पुन्हां सुरुंगाची तजवीज आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं.

राजश्री पाटीलबावा देशीं गेल्यानें जेपूरकर राजे यांनीं मामल्याबद्दल ऐवजाविषयीं टाळाटाळ केली. बाकीचा ऐवज देत नाहींत ह्मणोन यांजकडील कारकुनानीं गोपाळराव रघुनाथ यांस लिहिलें आहे. राजश्री पाटीलबावांचा दाब मोठा होता, ह्मणून राजेरजवाडे सर्व रुजू होते. हल्लीं काय अमलांत येईल ते विनंति लिहूं.

मिर्जा अकबरशहा यांनीं खुफिया पत्रें शाहाजीची नालीश लिहून राजश्री पाटीलबावांस व गोपाळराव रघुनाथ यांस वरचेवर लिहून पाठवीत होते. ह्मणोन शाहाजीवर रावमजकुराची केवळ आनास्था जाली आहे. तीं पत्रेंही बजिन्नस शाहाजीकडील कारकुनास दाखविलीं. याजवरून शाहाजी मिर्जावर बेदील आहेत.

हजरतासीं येविसीं बहुत गिल्ला केला. त्यावरून पातशाहानीं उत्तर केलें कीं, तुह्मी महालाचे लोकांस खर्चाकरितां बहुत हैराण करितां, ह्मणून मिर्जा लिहीतात. त्याजवरून वाईट मानावें हें अपूर्व आहे. तात्पर्य परस्परें विरुद्ध लागलें आहे. अखेर काय ठैरेल तें सेवेसीं विनंति लिहूं.

राजश्री पाटीलबावा दरकूच बऱ्हाणपुरास दाखल जाले. हुताशनी करून नवाब निजामअल्लीखां यांजकडील पत्रोत्तर आल्यानंतर तेथून कूच करणार, ह्मणोन अखबार हजुरांत आली आहे. डिभाई फिरंगी मथुरेंत आहे. आजतागाईत पलटण्याचे रोजमऱ्याचा बंदोबस्त जाला नाहीं. यास्तव राजश्री गोपाळराव रघुनाथ यांस पत्रें पाठविलीं आहेत. त्यास यांनींही ऐवजाची सोय केली आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

राजश्री नवाब अलीबहाद्दर डंघाई प्रांतीं आहेत. हिंमतबहाद्दर गोसावी यांनीं सात आठ हजार स्वार प्यादा जमा करून बरोबर आहेत. त्यांच्या विचारें बुंदेल्याचा जाबसाल होत आहे. नवाबमशारनिल्हेनीं हणमंतराव वगैरे लखनौस नवाब वजीराकडे खिलत देऊन पाठविले होते. कारण हें कीं, मकनपुरास फौजसुद्धां येण्याची परवानगी घेऊन यावी. त्याजवरून तेथें आजतागाईत येविसीं उमेदवारीच आहे. नवाबमजकुराचे बंधु कोणी लखनौस गेले होते. पूर्वीं त्यांस नवाब वजीरानीं खिलत दिल्हें होतें. सांप्रतकालीं त्याजवर केवळ बेमर्जी करून गावांतून काढून दिल्हें, ह्मणून अखबारांत लिहिण्यांत आलें आहे. पामरसाहेब उज्जनीस कूच करून गेले. लवकरच राजश्री पाटीलबावांस सामील होणार. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७२.

श्री. मार्च १७९२.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसी जे:— बीनचे तयारीकरितां तोंब्याची तलाश बरेली व कासीपूर व जैपूरपावेतों चहूंकडे केली, परंतु बीनचे उपयोगीं तोंबे मिळत नाहीं. यास्तव लाचार होऊन बीन मुलाव्याची तयार करविली आहे. तयार होऊन आली ह्मणजे सेवेसीं रवाना करितों. श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति. "

लेखांक ७३.

श्री. मार्च १७९२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसी जे:— खानम बेगम नजबकुलीखानाची आई मृत्य पावली. व कानोडचे किल्ल्यांत नजबकुलीची बेगम गोळा लागून चौथ्या रोजीं मृत्य पावली. तेणेंकरून किल्ल्याचे लोक बहुत हिरासा जाले आहेत. लौकरच किल्ला खालीं होईल ह्मणून आवाई आहे. तैमूरशाहा बदस्तूर काबीलांत आहेत. सादुल्लाखान येलची व नहुद्दीखान पेशावराहून काबीलच्या रुखास पुढें कूच करून गेले. मुरादशहानीं शाहाचें मुलकांत हंगामा केला, ह्मणोन तैमूरशाहानीं मिर्जा फिरोजशाहास लिहलें आहे कीं, बदक्षी वगैरे दहा बारा हजार फौज निगादास्त करोन मुरादशाहाचें मुकाबल्यास जावें. याप्रमाणें वृत्त श्रवणांत आलें. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७४.

श्री. १३ एप्रील १७९२.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता० छ १० माहे साबान मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष— पेशजीं छ २७ रजबचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. ते प्रविष्ट होऊन साकल्यवृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री गोपाळराव रघुनाथ फौजसुद्धां व डिभाई कंपुसहीत बहादरगडाहून छ १४ तारखेस कूच करून हरयान्याचे रुखास खरखोद्यास गेले. तेथें गांवासीं लढाई होते. मामला ठेरल्यावर कानोडास जावेसें आहे. पटाल्याकडून करमसिंग निर्मला व भंगासिंग वगैरे सीख यांजकडील वकील जावसालास आहेत. राजश्री खंडेराव हरी बदस्तूर कानोडास मोर्चे लावून आहेत. कानोडचे किल्ल्यांत मदारीखान नामें मेवाती चारशें लोकांनसीं आहे. त्याजकडील बोलणें रंजितसिंग भरतपुरकर याचे विद्यमानें आहे कीं, आमची तलबतनखाचा फडशा करून द्यावा, व पुढें जायदाद लावून द्यावी. ह्मणजे किल्ला खालीं करून देऊं. त्यावरून राजश्री खंडेराव हरी यांनीं उत्तर दिल्हें कीं, मीर्जा इस्मालबेग यांस धरून आमचे स्वाधीन करावे, ह्मणजे बोलल्याप्रमाणें अमलांत येईल. तात्पर्य हेंच कीं, मिर्जास युक्तीनें काहाडून द्यावें, ह्मणून मेवाती

मजकुराचें मानस आहे. ठैरल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. जैपूरकर राजे प्रतापसिंग यांनीं रावराजाचे मुलखांतील दोन चार महाल जफ्त केले. यास्तव बखतावरसिंगाकडील वकील राजश्री गोपाळराव रघुनाथ यांजकडे जाबसाल करितात कीं, आमची कुमक केलीयासी नजराणा ठैरेल तो देऊं. परंतु फौजेचा रुख हरयान्याकडे आहे. शाहाजीचा जाबसाल सांप्रत दोन महिने पूर्ववत्प्रमाणेंच आहे. सरसालापासोन दुसऱ्याची योजना होईलसें आहे. पातशाहासीं केवळ नाचाखी आहेच. नवाब वजीर बदस्तुर लखनौंत शेरशिकार करून आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानाचे पत्रीं विनंति लिहली आहे. त्याजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ७५.

श्री. १७ एप्रील १७९२.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २४ माहे साबान मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ २० माहे मजकूरचीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वर्तमान ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, मिर्जा इस्मालबेग यानें कानोडचें किल्ल्यांत लोकांचा फितूर पाहून, पिरू साहेब फिरंगी दुभाई साहेबाकडील, राजश्री खंडेराव हरी यांच्या तेनातीस चार पलटणांनसीं कानोडांत आहे, त्याजकडे पेगाम केला कीं, मी कुटुंबसुद्धां तुम्हांकडे येतों. त्यावरून साहेबमजकुरानें जाहीरदारी बहुत खातरतसली केली. यानंतर मिर्जामजकूर कुटुंबासहित बोमे इस्मालखान, नजबकुलीचा पुत्र, किल्ल्यांतून निघोन, छ २२ तारिखेस तीस स्वार व तीन हत्ती व आठ रथनसीं पिरूसाहेबाचे डेऱ्यानजीक येऊन दाखल जाल्यानंतर, राजश्री खंडेराव हरी यांनीं फिरंगीमजकुरास सांगोन पाठविलें कीं, आज तागाईत मसलत सर्व मिर्जाची होती. आतां गुन्हेगार तुमचे घरास आला. इतक्यावर त्याची खबरदारी न केलीयासी राजश्री पाटीलबावांचा शब्द आम्हांकडे नाहीं. त्यावरून साहेबांनीं तत्काळ मिर्जामजकुराचे गीर्द पलटण चौकीस ठेवून, कुटुंबासहित पहाऱ्यांत ठेविलें आहे. कानोडचे किल्ल्यांत गुलाबसिंग व मदारीखां मेवाती मात्र चारशें लोकांनशीं राहिला आहे. त्यांजकडीलही बोलणें

लागलें आहे. दो चौ दिवसांत किल्लाही खालीं होईलसें आहे. राजश्री गोपाळराव रघुनाथ सांगीहून कूच करोन सोनपतचे रुखास गेले. डिभाई साहेबास कानोडास पाठविलें आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ७६.

श्री. २३ एप्रील १७९२.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ २० माहे साबान मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ २७ रजबचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, कर्मसिंग निरमला व भंगासिंग व गुरुदत्तसिंग वगैरे सीख यांजकडील वकील येऊन राजश्री गोपाळराव रघुनाथ यांसी जाबसाल केले कीं, या प्रसंगीं पटयाल्याकडे कूच केलीयासी सरकारचा मामला खातरखां मिळेल. रबीचा हंगाम आहे. नंतर कूच जाल्यानें लोक सर्व पळोन जातील. मग पैका मिळणें नाहीं. मुलूख वैराण होईल. सांप्रतकालीं सतलूजपावेतों सर्वांचा मामला सहजांत घडून येईल. पुढें संसारचंद कोट कागडा व ज्वालाजी प्रांताचा राजा आहे. त्याच्या अनुमतें लाहोरपरियेंत सर्व बंदोबस्त केल्यास होईल. याप्रमाणें वकीलाचें बोलणें जालें. त्यास, कानोडचा जाबसाल फडशा जाल्यानंतर पुढें कूच करावें ऐसा बेत आहे. नवाब वजीर लखनौंत बदस्तुर शेरशिकार करून आहेत. इंग्रजांचा तगादा ऐवजाविसीं सख्त आहे, ह्मणोन कारभारीसुद्धां सर्व साचिंत रहातात. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व आखबारा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७७.

श्री. एप्रील १७९२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राजश्री गोपाळराव रघुनाथ व डिभाई वगैरे खरखोद्यास दाखल जाले. देवजी गवळी, बापुजी मल्हार, वीसहजार फौजेनसीं मौजे सांगी नामें हरयान्याचा गांव आहे. भंगेलसिंगाचे सांगितल्यावरून तेथें मोर्चे लाविले. त्यास एक मास जाला. मौजे मजकुरासी लढाई होते. दहा हजार लोक त्या गावांत आहेत. परस्परें लढाई जाली. त्यानें पांच सातशें लोक जखमी व ठार जाले. ह्मणोन राव मशारनिल्हे दरकूच खरखोद्याहून दोन कोस पुढें मुक्काम करून आहेत. मौजेमजकुराचें पारपत्य करावें ऐसा विचार होता, इतक्यांत तेथील जमीदारांनीं मामल्याचा पैगाम डिभाईसाहेबाचे विद्यमानें वीस हजारांचा केला. जाबसाल रुबकर आहे. जेपूरकर राजे प्रतापसिंग यांसीं पूर्वीं मामला ठैरला होता, त्यापैकीं कांहीं ऐवजाचा भरणा जाला. बाकी राहिली ते देतो; टाळाटाळ करितात. राजश्री पाटीलबाबा देशीं गेल्यानें दबाव कोणास राहिला नाहीं. हल्लीं राण्याकडील वकील जाहीरदारीस रावमजकुराकडे येऊन बोलणें लाविलें आहे कीं, बाकीचा फडशा करून देतों. परंतु रावराजाची कुमक न करावी. रायचंद वकील, बखतावरसिंग, रावमजकुराचा पुत्र याजकडून आला आहे कीं, एक लक्ष रुपये फौज खर्चास घ्यावे व आमची कुमक करावी. त्यावरून तीस हजार रुपये खर्चास वकीलासीं घेऊन लगामी लावून ठेविलें आहे. जेपूरकरानीं दों कोसांचा कूच अलवरचे रुखास केला. राजश्री बापूजी होळकर त्यास सामील आहेत. इकडून यांची फौज कुमकेस जाणार ह्मणोन वदंता असे. शाहाजींनीं पातशाहास खर्चाकरितां बहोत हैराण केलें. त्यावरून राव मशारनिल्हेची केवळ अनास्था जाली आहे. आखर सालीं येथील कामावर दुसऱ्याची योजना करावी ऐसा विचार आहे. मिर्जा अकबरशाहाचीं पत्रें खुफीया, राजश्री जिवबा बक्षी व रावमजकूर यांस, शाहाजीचे बोभाटाचीं जातात, तेणेंकडून पातशाहासी कारभारी सख्तगोई फार करितात. सर्व बेदील आहेत. पूर्वीं दिल्लीकर सावकारांसीं ऐवजाची तजवीज होती ह्मणोन येथील लोक हिरासा होऊन कितेक निघोन लखनौस गेले. तेव्हां + + + + + वगैरे सेट यांनीं रावमजकूर यांस समजोन खातरजमेचीं पत्रें येथील सावकारांस पाठविलीं कीं, कोणेविसीं उपद्रव तुह्मांस होणार नाहीं. स्वस्थ रहावें. त्यावरून लोकांस कांहीं धैर्य आलें आहे. मोंगले व हिंदुस्थानी लोक पातशाही

वगैरे यांची जहागिरा दरोबस्त जप्त जाल्या. सबब तमाम बेदील आहेत. नजराणा ठैरल्यावर सोडावी ऐसा विचार आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७८.

श्री. १२ मे १७९२.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल छ २० माहे रमजान मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– स्वामींनीं कृपा करून छ २३ रजबचें पत्र पाठविलें, तें पावून सनाथ जालों. पेशजीं छ २४ साबान व छ १ रमजानचीं पत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. लखपतरायाचे तंबीहविसीं सरकारचें पत्र रा. गोपाळराव व जिऊबा यांचे नांवें पाठविलें तें पावलें. सरकारचें पत्र रावमशारनिल्हेकडे पाठविलें आहे. तेथून ताकीदपत्र शाहाजीचे नांवें आल्यावर, लखपतराय यांजपासोन सर्व कागदपत्र व मुचलका जामीनी घेवोन सेवेसीं विनंति लिहूं. तसबिरा सोबत पाहून रवाना करितों. मार्गाचे खतऱ्यामुळें पाठविलीं नाहीं. आणीक जे आज्ञा येईल त्याप्रमाणें सरबरा करून रवाना करीन. बीन, तुंब्याची नूरखां बीनगर याजकडून तयार करविली आहे. कांहीं काम रंगाचे त्यांत होणें राहिलें आहे. तें तयार होऊन आल्यानंतर सेवेसीं पाठवितों. पसंदीस योग्य तयार करविली आहे. जर गिसाचे गठ्ठे दुसऱ्या जोडीबरोबर आषाढ मासीं रवाना करितों. श्रुत होय. राजे बिजेसिंग जोधपुरकर यांची राख राजपुतांनीं जिवें मारून राजेमजकुराचे राज्यावर राजाचा नातू भीमसिंग नामें यांस बसविलें. व जामलीसिंगासीं अंतस्थ मिळोन निमे मुलूख त्यास द्यावे ऐसें ठैरलें आहे. बिजेसिंगासीं बोलणें आहे कीं, तुह्मी श्रीनाथद्वारास जाऊन रहावें. याप्रमाणें हुजुरांत अखबार आली होती. ह्मणोन विनंति लिहली आहे. ग्वालेर प्रांतीं जमीनदारांनीं मोठा हंगाम केला ह्मणोन बाळोजी इंगळे किल्लेदार फौजसुद्धां बाहेर निघोन जमीनदारांसीं मुकाबला केला. अखेर जमीनदारांचा जोर पाहून पुन्हां किल्ल्यांत पनाह घेतली. सबब बदअमली जाली आहे. वरकड सविस्तर वर्तमान पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहे त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. सर्व प्रकारें भरंवसा स्वामींचे

चरणांचा आहे. विस्तारें विनंति काय लिहूं? बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७९.

श्री. मे १७९२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसिजे– तैमूरशाहा काबीलांत आहेत. व नहुद्दीखान व सादुल्लाखान एलची तेथें दाखल जाल्याचें वृत्त आलें नाहीं. मुरादशाहानीं बुखाऱ्याकडे कांहीं उपद्रव केला आहे. सबब शाहा तिकडे जाणार ह्मणोन आवाई श्रवणांत आली आहे. मिर्जा अहसनबख्त यांनीं मुलतान प्रांतीं कोणी सरदारांसी खुफिया पत्राचा सिलसिला ज्यारी केला होता. हें वर्तमान तेमूरशाहांनीं ऐकोन मुलतानचे सुभेदारास पत्र पाठविलें कीं, मिर्जास नजरबंद करणें. त्यावरून तेथील सुभेदारानें मिर्जाची गीर्द चौकी पहाऱ्यास लोक ठेवून घेतले आहेत. एक पुरबिया मिर्जामजकुर यापासीं पहिल्यापासोन होता. त्यास देवढीचें लोकांनीं सख्तगोई केली. यावर पुरबीयानें दोन चार माणसें+++ धरून डेऱ्याचें आंत मिर्जाजवळ गेला. तेथें मिर्जामजकुरांनीं दोन तीन शिपाई यांस मारलें. हें वृत्त मुलतानचे सुभेदारास कळल्यावर पुरबीयास धरून जिवें मारलें. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८०.

श्री. मे १७९२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे– राजश्री खंडेराव हरी वदस्तूर कानोडचे किल्यास मोर्चे लावून आहेत. नजबअल्ली हमदानीचा पुत्र जोधपुरास पावला. तेथून जोधपूरकरांनीं स्पष्ट उत्तर दिल्हें कीं, आमसीं कुमक होणार नाहीं. त्यावरून नजफअलीनें मिर्जा इस्मालबेगास लिहून पाठविलें आहे कीं, राजांनीं साफ उत्तर दिल्हें यावर सावध रहाणें. याप्रमाणें पत्रें आलीयानें किल्यांतील लोक बहुत हिरासा होऊन मुरादबेगखां वगैरे मोंगल पन्नास स्वारांनसीं निघोन लखबाचे डेऱ्यासंनिध येऊन राहिले. किल्यांत बारूद व वैरण, मीठ, तूप याची बहुत कमती आहे. तेणेंकडून मदारीखां मेवाती व गुलाबसिंग यानें रंजितासिंग भरतपूरकर जाठ, याचे

विद्यमानें बोलणें लाविलें आहे कीं, आमची सोय करून द्यावी; व शिबंदीचे लोकांची तलब पन्नास हजार रुपये चढले आहेत ते देवावे, ह्मणजे किल्ला खालीं करून देतों. त्यावरून राजश्री खंडेराव हरी यांनीं सांगोन पाठविलें कीं, तुमची जायदाद वगैरेची बंदोबस्त घडून येईल. परंतु मिर्जा मजकुरास बजिन्नस धरून आमच्या स्वाधीन केलीयास सर्व गोष्टी कबूल करूं. त्याचें बोलणें कीं, मिर्जास काहाडून द्यावे, व किल्ल्यांत अंमल दखल करावा. याप्रमाणें परस्पर जाबसाल रुबकर आहे. समरूचे पलटणाची तेनाती रावमजकुराकडे कानोडास जाली. लौकरच सामील होणार. राजश्री गोपाळराव रघुनाथ यांनी लाख रुपये रावमशारनिल्हेचे खर्चास पाठविले आहेत. सडी फौजेचा कूच कानोडचे रुखास जाल्यानें मिर्जासुद्धां तमाम लोक बहुत भयभीत जाले आहेत. किल्ला लौकरच हस्तगत होईलसें आहे. पुढें प्रत्यास येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८१.

श्री. १७९२.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे— पाटीलबावा बदस्तुर चितोडनजीक पाच कोसांवर मुक्काम करून आहेत. उदेपूरकर राणांसीं ऐवजाचा सख्त तगादा केला. त्यावरून मशारनिल्हेनीं उत्तर दिल्हें कीं, आमची रवानगी करावी. ह्मणजे उदेपुरास दाखल जाल्यानंतर ऐवजाची तजवीज घडून येईल. याप्रमाणें जाबसाल जाल्यावर राजश्री पाटीलबावांनीं वकिलावर बहुत इतराजी करून सांगितलें कीं, दहा लाख रुपयांची सरबरा सध्या करून द्यावी. बाकीचा ऐवज आंबोजी इंगळे यांस या प्रांतीं ठेवूं, त्यांच्या हवालें करावा. व चितोडचे गीर्द आमचे लोक रहातील त्यांच्या खर्चास महाल लावून द्यावे. त्यावरून राणाजी ती लक्षांचे महाल तजवीज केले आहेत. ऐवजाची सरबरा राणाकडून जाल्यास उजेनीस लौकरच कूच होणार. नाहीं तरी राजे भीमसिंग व राजश्री आंबोजी इंगळे यांसीं पोख्तगी ऐवजाची करोन भीमसिंगाचें जिमें सर्व काम करणार ऐसा बेत आहे. राणेखांभाई छ २५ रविलाखरचे तारखेस मृत्यु पावले. ह्मणून राजश्री पाटीलबावा बहुत श्रमी जाले. मिर्जा रहीम बेग यांनीं येऊन सांगितलें कीं, भाईचे घरांत कांचणी आहे. तिजपासीं तीस लक्षांचा सरंजाम व नख्त मिळोन आहे. ते जप्त करावी. हें वृत्त ऐकोन उत्तर केलें कीं, पुरते चाळीस दिवस जाले नाहीं, इत-

क्यांत जप्ती करणें ठीक दिसत नाहीं. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८२.

श्री.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:-राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवबा बक्षी फौजसुद्धां छ १६ तारिखेस बहादूरगड नजीक दों कोंसांवर मुक्कामीं दाखल जाले. बहादूरगडवाला बलोच यानें फकीरजी गाढवे यांचे विद्यमानें तीस हजार रुपये खंडणीबद्दल देणें कबूल करून, दहा हजार रुपये दरबारखर्च, एकूण चाळसां हजारांवर मामला ठैरल्यानंतर बलोचा मजकुरानें पंध्रा हजार नख्त व हाती नग दोन, घोडे वगैरे सरंजाम भरण्यांत दिल्हा. बाकी ऐवज राहिला त्याजकरितां रयतीवर दांड घातला आहे. तो ऐवज वसूल जाल्यावर देण्यांत येईल. सांप्रत आपले पुत्रास व दिवाणास ऐवजाबद्दल वोलीस रावमशारनिल्हेपासीं ठेविलें आहे. शाहानिजामुद्दीन यांनीं चिमणाजीपंत व मुनसीस लष्करास पाठविलें होतें कीं, फौजेचा मुक्काम शहराचे सन्निध राहिल्यानें येथील व महालांतील शेती, कहीवाले कापून नेतात. नुकसानी होते. त्याजवरून रावमजकुरानीं खरखोद्याचे रोखें भंगेलसिंगाचे गांवाकडे कूच करणार. शाहाजीशीं दोन लक्ष रुपये याचा पैगाम केला आहे कीं, सावकार शहरचे असतील त्यांजकडून सरबरा करून देवावी. त्यावरून शाहाजीनीं स्पष्ट सांगोन पाठविलें कीं, राजश्री पाटीलबावांनीं आजतागाईत ऐसा पयगाम सावकारासीं केला नाहीं. हल्लीं तुह्मी सावकारांस व रयतीस नागविणार. हें काम आमचे हातून घडणार नाहीं. तुह्मीं मालीक आहांत, आणीक कोणास येथील कामावर पाठवून सरबरा करावी. व्यर्थ बदनामी चहूकडे होईल. याप्रमाणें बोलणें परस्परें रुबकर आहे. राजश्री सुभेदार टोंकनजीक पावले. गढीबंधासीं खंडणीचा जाबसाल आहे. जेपूरकर राजे प्रतापसिंग यांनीं बापूजी होळकर यांस दरमहा पन्नास हजार रुपये ठैराऊन फौजसुद्धां ठेवून घेतलें आहे. खुशालीराम बोहोरा व होळकरमजकूर फौजसुद्धां रावराजाचे प्रांताचे जप्तीस गेले. तिकडून सेवक रामराव मजकुराचा कारभारी फौजेनसीं येऊन मुकाबला केला. परस्परे लढाई जाली. राजश्री बापूजी होळकरानीं त्यांची सिकस्त करून लुटून घेतलें. व दोन तीन महाल रावराजां-

कडील जप्त करून गढ्यांस मोर्चे लाविले आहेत. राजश्री सुभेदार महेश्वरास जाणार. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८३.

श्री.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:--

विनंति ऐसीजे- राजश्री पाटीलबावांनीं राजे भीमासिंग यांसीं सोळा लक्ष रुपये बाा मामल्याचे घेऊन व पांच लक्ष रुपये राणा उदेपुरकर यांसीं व लाख रुपये नजराणाबद्दल लालगीर गोसावी यांसीं घेऊन, राणा उदेपुरकर यांस सांगोन पाठविलें कीं, आह्मांस जरुरी काम आहे सबब उज्जेनीस जातों. त्यास, आपली भेट जाल्यावर कूच होईल. त्यावरून राणा + + + हमराही येऊन चार घटका खिलबत होऊन, राण्याचें अनुमतें ठैरलें कीं, राजश्री आंबोजी इंगळे यांजबरोबर दहा हजार स्वार, व समरूची पलटणा चार, याप्रमाणें जमात ठेवून, मामल्याचें बाकीचा पैका वसूल करावा. छ. १० तारखेस राणा व भीमसिंग निरोपास आले. त्यावरून यांनीं राण्याची बहुत खातरजमा केली आणि आंबोजी इंगळे व राजश्री भीमसिंग यांस राणाजीचे तैनातीस ठेविलें. नंतर वस्त्रें, जवाहीर, हाती, घोडा राणास वगैरे हमराही लोकांस शालजोड्या दिधल्या. भीमसिंगाची दस्तगिरी राणासीं करोन दिल्ही. व जोधपूरकराकडील वकील व वगैरे राजेरजवाडे यांस वस्त्रें देऊन, हरएकाची खातरी करून रुखसत केलें. दुसऱ्या रोजीं राजश्री पाटीलबावा राणाचे डेऱ्यास गेले. राणानीं अकरा किस्ती पोशाकी वस्त्रें, जवाहीर, हाती, घोडा, तवाजा केला. हाती पसंदीस न आला, सबब माघारे दिल्हा. वरकडास वस्त्रें जालीं. तदनंतर तेथून बिदा होऊन छ. ११ तारखेस उजेनीचे रुखास कूच केलें. आंबोजी इंगळे व समरूची पलटण परताबगडपावेतों बरोबर नेल्या आहेत. तात्पर्य, परताबगडवाला व वगैरे जमीदार यांसीं खंडणी वरचेवर घेऊन, उजेनीस जावें ऐसा बेत होता. त्यास छ ११ तारिखेपावेतों नजीक परताबगड मुक्काम करून होते. छ १८ तारिखेस उजेनीकडे कूच केलें. इंगळेमजकूर यांस सांगितलें कीं, परताबगडवाल्याचे वकील मामल्याचे जाबसालास आले आहेत. एका दो रोजांत येथील जाबसाल ठैरल्यावर सावकारी निशा घेऊन लौकर चितोडाकडे कूच करून जाणें. व

तेथील ऐवज मामल्याबद्दल वसूल करावा. याप्रमाणें बोलणें होऊन दरमजल उजेनीस गेले. छ २६ तारिखेस तेथें दाखल होणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे. हे विनंति."

लेखांक ८४.

श्री.

" पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसाजे:- राजश्री सुभेदार देवस्यानजीक मुक्काम करून आहेत. राजे प्रतापसिंग जैपूरकर भेटीस येणार ह्मणून वंदता आहे. भेटी जाल्यानंतर राजश्री सुभेदारांचाही विचार आहे कीं, राजश्री बापूजी होळकर यांस फौजसुद्धां या प्रांतीं ठेवून सडे महेश्वरास जावें, ऐसा बेत आहे. हल्लीं नवे कंपूची तयारी केली आहे. फिरंग्यांनीं कंपूचे तयारीचा निमा लोक, दिल्लींत बंदुखा वगैरे सरंजामाची खरिदी होत आहे. सेवेसीं श्रुत होय.

नवाब अलिबहादर वेत्रवती तीरीं मुक्काम करून आहेत. नोने अर्जुनसिंगाकडील बोलणें हिंमतबहादर गोसावी यांच्या विद्यमानें रुवकर आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

मिर्जा अहसनबख्त शाहाजादा काबील नजीक पावल्यावर तैमूरशहांनीं आपले शहाजादे यास सामोरे पाठवून भेटीस बोलाविलें. मुलाजमतीचें प्रसंगीं कुरसीवर बसोन बहोत ममतेचें भाषण यांसीं केलें. नंतर मिर्जांनीं इकडील साद्यंत वृत्त निवेदन करून श्रमी जाले. त्यावरून शाहांनीं बहुत तसली करून सांगितलें कीं, सांप्रत हंगाम राहिला नाहीं. पेस्तरसालीं सर्व गोष्टी घडून येतील. इतक्यांत मिर्जामजकुराचे शरिरास गैरअरामी जाली. सबब शाहांनीं पेशावरास रुखसत केलें. व पेशावरचे सुभेदारास ताकीद केली कीं, यांच्या ताबेदारींत राहून खर्चास लागेल तें देत जाणें. याप्रमाणें वृत्त श्रवणांत आलें, तें सेवेसीं विनंति लिहिली आहे. पुढें प्रत्यास येईल तें विनंति करूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

समाप्त.